१४ जून १९२८ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित शिक्षण संस्थेची स्थापना केली. दलितांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय करणे हे या संस्थेचे मुख्य ध्येय होते. माध्यमिक शिक्षणाची जबादारी पेलण्यास ही संस्था समर्थ नसल्याने दलित विद्यार्थांना वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मुंबई सरकारने या संस्थेस मदत करावी असे आवाहन बाबासाहेबांनी केले. त्यामुळे मुंबईच्या गव्हर्नरने ८ ऑक्टोबर १९२८ रोजी माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ५ वसतिगृहे मंजूर केली.तसेच गव्हर्नरने दरमहा रु ९०००/- अनुदानही वसतिगृहाना मंजूर केले. जेव्हा ही रक्कम खर्चासाठी कमी पडू लागली तेव्हा डॉ आंबेडकरांनी मुस्लिम व पारसी समुदायातील धर्मादाय संस्थांकडून व इतर काही देणगीदारांकडून आर्थिक मदत मिळवली.

CamScanner

पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना :

अस्पृश्यांसह निम्न मध्यमवर्गास उच्च शिक्षण देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या संस्थेच्या वतीने सन १९४६ मध्ये मुंबई येथे सिध्दार्थ कला व विज्ञान महाविद्यालय, सन १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरू केले. सन १९५३ मध्ये मुंबईत सिध्दार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय तर १९५६ मध्ये मुंबई सिद्धार्थ विधी महाविद्यालय सर्व समाजासाठी सुरू केले सध्या देशभरात या संस्थेची ३० पेक्षा जास्त महाविद्यालये आहेत.

निष्कर्ष:

हा लेख डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य या विषयासंदर्भात आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे योगदान आहे.

संदर्भ:

१) भीमपर्व : डॉ बाबासाहेब आंबेडकर - लेखक: शा. श. रेगे

२) डॉ बाबासाहेब आंबेडकर- लेखक: डॉ. वा. ना. कुबेर

◆ ◆ ◆

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार, रुपयाच्या प्रश्नांविषयी विचार एक अवलोकन

प्रा. दीपाली पडोळे

डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय

उत्तम नगर अमरावती

प्रस्तावना

भारताचे ऐतिहासिक अवलोकन केले असता भारतीय समाज व्यवस्थेमध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते .भारतातील समाज रचनेमध्ये वाईट परंपरा रूढी परंपरा याचा पगडा होता. समाजात परंपरेनुसार बलुतेदारी पद्धत अस्तित्वात होती यातून समाज बंदिस्त चाकोरीबद्ध झाल्यामुळे व्यक्तींना त्या विशिष्ट परिस्थितीमध्ये जीवन जगावे लागत होते. इतिहासामध्ये अनेक उदाहरणे दिसून येतात जसे वर्णव्यवस्थेमध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ही वर्णव्यवस्था अस्तित्वात होती त्यामुळे एका व्यवस्थेमधून दुसऱ्या व्यवस्थेकडे जाणे हे धार्मिक दृष्ट्या शक्य नव्हते. आणि अशा समाजाचा आर्थिक विकास साध्य होण्यास अनन्यसाधारण अडचणी निर्माण होत होत्या. परिणामी समाजातील सर्वच घटकांची प्रगती होऊ शकली नाही तसेच वर्णव्यवस्थेतील शेवटचा वर्ग जो इतक्या दयनीय अवस्थेत जीवन जगत होता समाज रचनेची अमानुष अवस्था अस्तित्वात होती. या परिस्थितीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी आपले संपूर्ण जीवन अर्पण केले यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही समावेश होतो.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर घेतले जाते. त्यांना आपण घटनाकार, कायदेतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ

CamScanner

पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना :

अस्पृश्यांसह निम्न मध्यमवर्गास उच्च शिक्षण देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ८ जुलै १९४५ रोजी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली.

डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांनी या संस्थेच्या वतीने सन १९४६ मध्ये मुंबई येथे सिध्दार्थ कला व विज्ञान महाविद्यालय, सन १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरू केले. सन १९५३ मध्ये मुंबईत सिध्दार्थ वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय तर १९५६ मध्ये मुंबई सिद्धार्थ विधी महाविद्यालय सर्व समाजासाठी सुरू केले सध्या देशभरात या संस्थेची ३० पेक्षा जास्त महाविद्यालये आहेत.

निष्कर्ष:

हा लेख डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य या विषयासंदर्भात आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे योगदान आहे.

संदर्भ:

१) भीमपर्व : डॉ बाबासाहेब आंबेडकर - लेखक: शा. श. रेगे
२) डॉ बाबासाहेब आंबेडकर- लेखक: डॉ. वा. ना. कुबेर

◆ ◆ ◆

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार, रुपयाच्या प्रश्नांविषयी विचार एक अवलोकन

प्रा. दीपाली पडोळे
डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय
उत्तम नगर, अमरावती

प्रस्तावना

भारताचे ऐतिहासिक अवलोकन केले असता भारतीय समाज व्यवस्थेमध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते .भारतातील समाज रचनेमध्ये वाईट परंपरा रूढी परंपरा याचा पगडा होता. समाजात परंपरेनुसार बलुतेदारी पद्धत अस्तित्वात होती यातून समाज बंदिस्त चाकोरीबद्ध झाल्यामुळे व्यक्तींना त्या विशिष्ट परिस्थितीमध्ये जीवन जगावे लागत होते. इतिहासामध्ये अनेक उदाहरणे दिसून येतात जसे वर्णव्यवस्थेमध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ही वर्णव्यवस्था अस्तित्वात होती त्यामुळे एका व्यवस्थेमधून दुसऱ्या व्यवस्थेकडे जाणे हे धार्मिक दृष्ट्या शक्य नव्हते. आणि अशा समाजाचा आर्थिक विकास साध्य होण्यास अनन्यसाधारण अडचणी निर्माण होत होत्या. परिणामी समाजातील सर्वच घटकांची प्रगती होऊ शकली नाही तसेच वर्णव्यवस्थेतील शेवटचा वर्ग जो इतक्या दयनीय अवस्थेत जीवन जगत होता समाज रचनेची अमानुष अवस्था अस्तित्वात होती. या परिस्थितीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी आपले संपूर्ण जीवन अर्पण केले यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही समावेश होतो.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर घेतले जाते. त्यांना आपण घटनाकार, कायदेतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ

CamScanner

म्हणून ओळखतो. भारतीय अर्थकारणामध्ये आर्थिक विचाराच्या विकासाचा जर सखोल अभ्यास करावयाचा असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लिखाणाचा अभ्यास करावा लागतो. त्यांच्या व्यासंगी व्यक्तिमत्वाचा एक पैलू म्हणजेच ते जागतिक कितींचे व्यासंगी अर्थतज्ज्ञ होते. भारतीय आर्थिक विचारांच्या पध्दतशीर मांडणीला खऱ्या अर्थाने सुरुवात १९ व्या शतकात झाली, त्यात आंबेडकरांचे नाव घ्यावे लागते. कारण त्यांची अर्थतज्ज्ञ म्हणून ओळख आहे. अर्थशास्त्र ही मानवाच्या, समाजाच्या व देशाच्या आर्थिक विकासाचा कणा आहे. हे त्याना माहित होते. त्यांच्या आर्थिक विचारांचे योगदान आपल्याला अनेक ग्रंथामधून होते. एम.ए. च्या पदवीसाठी त्यांनी १९१५ मध्ये 'ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी' हा शोध मध्यकालीन निबंध लिहिला आणि हेच १९१५ चे पहिले पाऊल अर्थक्रांतीतील वादग्रस्त वादळी पाऊल होते. आपल्या ४२ पृष्ठांच्या शोधनिबंधातून त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनिती यामधील फेर बदलाची कारण मीमांसाकरून ब्रिटिशांनी भारतीयांचे शोषण कसे केले याची मीमांसा केली.

इ.स. १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ कालखंडामध्ये ब्रिटीश अमदानीत केंद्रसरकार आणि घटकराज्ये यांच्यामधील आर्थिक संबंध कसकसे विकसित होत गेले याची ऐतिहासिक मीमांसा प्रा. सेलिगमन यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. साठी लिहिलेल्या 'The Evolution of Provincial Finance in British India' (ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेची उत्क्रांती) या ग्रंथामध्ये केली आहे.

लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये 'डॉक्टर ऑफ सायन्स' या पदवीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेला तिसरा आणि आर्थिक क्षेत्रातील महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे १९२३ मध्ये लिहिलेला 'The Problem of Rupee, its origin & its Solution' (रूपायाचा प्रश्न त्यांचे मूळ आणि समाधान) हा होय. (पृष्ठसंख्या सुमारे २८०) या ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चलन पद्धती कोणती असावी यावर मुलभूत विचार मांडलेत. इ.स. १८०० ते इ.स. १९२१ या कालंखडामध्ये भारतीय रूपयाचा एक विनिमयाचे साधन म्हणून कसकसा विकास होत गेला याचे मुलगामी विवेचन केले. यामध्ये सुद्धा सर्वसामान्य माणूस हाच त्यांच्या विश्लेषणाचा केंद्रबिंदू होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात, ब्रिटीश राजवटीपूर्वी मोगल साम्राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचा पाया अकबराने घातला या काळापासून भारतात चलन म्हणून सोने, चांदी किंवा धातूचा वापर होत असे. व्यापार हे सामाजिक चलनाचे मुख्य साधन आहे. तसेच ब्रिटीशपूर्व राजवटीत नोकरांना व सैनिकांना वस्तू स्वरूपात पगार मिळत

असे. परंतु ब्रिटीशांनी रोख पैसा देण्यात सुरुवात केल्यामुळे लोकांकडून किंवा इतर रोख पैशाच्या स्वरूपात ते स्विकारावी लागे. जेव्हा सोने चांदी ची नाणी विनीमयाचे माध्यम म्हणून व्यवहारात वापरत असतांना त्यांच्या परस्परावलंबी किंमतीसारख्या असतात तेव्हा व्यवहारात नुकसान होते. हे कुणाच्याही लक्षात आले नाही.

भारताचा कारभार जेव्हा ईस्ट इंडिया कंपनीकडे गेला तेव्हा कंपनीने स्वत:चे रूपयाचे नाणे अमलात आणले परंतु पुढे ते अपुरे पडल्याने चलनाच्या मागची पुरवठ्यामध्ये अस्थिरता निर्माण झाली. तो दूर करण्यासाठी १८६४ मध्ये कागदी चलन वापरात आणले यातून अनेक नवीन प्रश्न निर्माण झाले. भारतामध्ये रूपयाची जडणघडण सुवर्ण परिमाणात (Gold Standard) असावी याबाबत वाद निर्माण झाला. केन्सने सुवर्ण विनिमय परिमाणाचा पुरस्कार केला. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली भूमिका कणखरपणे मांडून प्रा. केन्स यांच्यावर कोरडे ओढले.

डॉ. आंबेडकर म्हणतात, सुवर्ण विनिमय परिमानात स्थिरता राहत नाही. त्यामध्ये लवचिकता जरी असली तरी चलननिर्मितीवर मर्यादा राहणार नाही. 'आवश्यकतेपेक्षा चलननिर्मिती झाली तर भाववाढ होऊन रूपयाची किंमत घसरेल व विनिमयाचे साधन म्हणून रूपयाचे स्थान अस्थिर होईल. त्यासाठी त्यांनी ऐतिहासिक पुरावे दिले त्यामध्ये सुवर्ण परिमाणामध्ये वस्तूच्या किंमती स्थिर होत्या, तर सुवर्ण विनिमय परिमाण स्विकारल्या नंतर किंमती वाढत गेल्या यांचे विवेचन केले अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी हिल्टम यंत्र कमिशनपुढे डॉ. आंबेडकांनी आपले मत मांडले प्रा. केन्स यांनी आपल्या विश्लेषणात एका महत्वपूर्ण मुद्यांकडे दुर्लक्ष केले. डॉ. आंबेडकरांच्या शब्दात "This difference proceed from the Fundamental fact which seems to be quite overlooked by professor Keynes, that nothing will stabling the rupee unless we दुसऱ्या शिफारशीमुळे पहिल्या शिफारशीवर म्हणजेच सुवर्ण प्रमाणाच्या शिफारशीवर घातक परिणाम होईल. हे त्यांनी विचारात घेतले नाही. म्हणूनच रूपयाच्या स्थैर्यासाठी फाकलर समितीच्या शिफारशी त्यागल्या पाहिजे असे डॉ. आंबेडकरांना वाटत यांच्याशी संबधित महत्वपूर्ण प्रश्न या फायदेशिर होता. भारताचा रूपया आणि इंग्लडचा पौड शोधप्रबंधात आत आहे. आंबेडकरांच्यामते सुवर्ण परिमाणात सुवर्णपीड रुपया हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असे दृढ मत होते की, जोपर्यंत रूपयाच्या सामान्य क्रयशक्तीमध्ये स्थिरता येत नाही. तोपर्यंत हे चलन स्थिर होणे शक्य नाही. आणि ही बाब सुवर्ण विनिमय प्रमाणामुळे शक्य होत नव्हती.

CamScanner

अशा प्रकारे अर्थशास्त्र म्हणजे केवळ तांत्रिक मार्गदर्शन नव्हे तर त्याला एक सामाजिक भूमिका असते असे सुत्र अर्थशास्त्रज्ञ म्हणूनत्यांनी मांडले त्यांचे विचार काळाची सिमा ओलांडणारे होते. त्यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा पाया हा मानवी हक्क व समतामय विकास हा होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने आर्थिक धोरणाची अंमलबजावणी ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेल्या अर्थिक धोरणावर झाली असती तर आज देशातील आर्थिक विषमतेला तोंड द्यावे लागले नसते. आणि त्या आर्थिक विकासाचा लाभ देशातील जनतेला निश्चितच मिळाले असते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचाराकडे दुर्लक्ष करून भारतीयांनी आपल्या पायावर धोंडा मारून घेतला आहे. हे नाकारता येत नाही. कारण डॉ. आंबेडकाचे आर्थिक तत्वज्ञान म्हणजे राष्ट्राला मानवाला त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी लाभलेला प्रकाश आहे. डॉ. आर्थिक आंबेडकरांचे तत्त्वज्ञान सर्वांची गरज आहे. हे सत्य नाकारता येत नाही. प्राश्चात्य विचारवंताचे विवेचन कसे सदोष आहे. हे पुराव्यासह स्पष्ट करण्याची धमक त्यांच्या मध्ये रूपयाचा प्रश्न या ग्रंथामध्ये होते.

संदर्भ :-

१) डॉ. आंबेडकर बी. आर 'रूपयापुढील समस्या उगम व उपाय' अनुवाद एम. एस. यादव गोदो प्रकाशन, प्रकाशनस्थळ नमुद नाही २०११

२) डॉ. कुलकर्णी बी.डी., डॉ. हमदेरे एम. बी. 'आर्थिक विचार व विचारवत' डायमंड पब्लीकेशन पुणे. २००८.

३) सूर्वा अनिल, 'डॉ. आंबेडकरांचे आर्थिक धार्मिक राजकिय क्रांतीसूत्र', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर-१२, १९

◆ ◆ ◆

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार

प्रा. सिम्रेला राजेश देशमुख

विनायक विद्यामंदिर, महाविद्यालय,

अमरावती

प्रस्तावना

प्राचीन संस्कृतीत स्त्रीला आदितत्त्व, आदिशक्ती, आदिमानव मानले जात होते. याच संस्कृतीच्या आदिपर्वात स्त्री ही सर्जनाची देवता मानली गेली. 'जन्म' ही बाब मानवजातीला पवित्र वाटत होती. त्यामुळे जिच्या उदरात जन्मरहस्य सामावलेले आहे, अशा स्त्रीविषयी तो काहीसा कृतज्ञ होता. मानवी जीवनाचे सातत्य राखणारी स्त्री ही पृथ्वीप्रमाणे सहनशील आणि नदीप्रमाणे सौम्य वाटत होती. समाजाने तिला सर्वधारक, सर्वपोषक, सर्वनियंत्रक मानले आणि तिचा गौरव केला; पण हळूहळू काळ पालटला. पुरुष सत्ताधारी बनल्यामुळे हिंसक आणि आक्रमक झाला. तो स्वामी झाला आणि त्याने तिला गुलाम केले. भोग्या बनली. तिची अशी विडंबनापूर्ण स्थिती बनण्याची कारणे अनेक आहेत. चातुर्वर्णासारख्या अनर्थकारी समाजरचना पद्धतीमुळे स्त्रीचे स्थान पार रसातळाला गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकोणीसशे छत्तीसच्या आपल्या 'जातीविच्छेद' या क्रांतिकारी अभिभाषणात म्हटले आहे की सामाजिक अधिकारासंबंधी मनु च्या मनुस्मृतीहून अधिक घृणास्पद आणि बदनाम धर्मशास्त्र या विश्वात नाही. जगाच्या कोणत्याही देशातील अन्यायासंबंधीचे उदाहरण या मनुस्मृतीच्या समोर ते फिके पडेल. वास्तविक हिंदू जातीमधील चालत आलेल्या भेदनीतीला ते तडा देऊ इच्छित होते. अस्पृश्यांच्या हलाखीच्या स्थितीची त्यांना जाण होती.

CamScanner

स्त्री जीवनाची जाणीव :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारानुसार माणसाने सुसंस्कृत होण्यासाठी त्याला कुसंस्कारांचे क्षण मिळावयला हवेत. स्वत चे पोट भरण्याच्या विवंचनेत त्याला वेळ तरी कुठून मिळणार? आणि संस्कारक्षम कसा होणार? पाठीमागे पोरवडा असलेल्या बाईला कष्ट करूनच त्यांच्या आणि स्वत च्या पोटाची खळगी भरावी लागतात. अशा वेळी तिचा विकास कसा होणार! तिच्या सर्वांगीण विकासाचा एक भाग म्हणून बाबासाहेबांनी कुटुंबनियोजनाचे महत्त्व सांगितले. तिच्यातील संकुचित वृत्तीला आवाहन करीत म्हणाले की 'गर्भवती असतांना तुमची दृष्टी चपराशाच्या जागेकडे आशाळभूत न होता न्यायाधीशाच्या रिकाम्या झालेल्या खुर्चीकडे लागायला हवी. अशी दूरदृष्टी ठेवूनच 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, त्याचा तिन्ही लोकी झेंडा' म्हणत कर्तबगार मुलांची माता व्हायला हवे. तुमच्या कुशीत जन्म घेताना आम्हाला अभिमान वाटायला हवा, धन्यता वाटायला हवी.' मुलीचा विकास व्हावा म्हणून त्यांनी आपल्या भगिनींना सांगितले की मुलगा-मुलगी असा भेद करू नका. दारिद्र्यामुळे आजदेखील मुलगी घराबाहेर पडू शकत नाही कारण पुरेशा वस्त्रांचा अभाव ! फाटक्या कपड्यांनी लज्जारक्षण होत नाही म्हणून ती उंबरठ्याबाहेर येऊ शकत नाही. अल्प स्वस्त मजुरीमुळे कशीतरी हाता-तोंडाची गाठ पडते. तिचे तिचा सर्वांगीण विकास कधी होणार? प्रत्येक चळवळीतील त्यांची जाण ही स्त्रीभोवती फिरत असे. आपल्या भाषणातून महिलांना उपदेश करताना ते म्हणायचे, 'आपल्या आयुष्याचा जोडीदार मुलीना निवडू द्या.' स्त्रीने स्वाभिमानाने जगावे असे म्हणत असताना तिच्याजवळ नीतिमत्ता असावी असा त्यांचा आग्रह होता म्हणूनच लग्न करून संसार करू इच्छिणाऱ्या वेश्यांची लग्ने त्यांनी करून दिली. चळवळीत प्रत्यक्ष सहभाग असणाऱ्या स्त्रियांना त्यांनी स्वतंत्र विचारमंच मिळवून दिला. त्यांनी चालविलेल्या वृत्तपत्रातून स्त्रियांच्या कार्याविषयीच्या तपशीलावरून हे समजते. 'जनता' वृत्तपत्राच्या कार्यकारिणीत दोन स्त्रिया कार्यरत होत्या. मजूर कामगार स्त्रियांसाठी सोयी उपलब्ध करून कामाच्या ठिकाणी पाळणाघरे असावीत असा त्यांचा आग्रह होता. मजूर स्त्रियांना बाळंतपणाची रजा दिल्यास आर्थिक विवंचनेच्या संकटातून त्या सुटाव्यात आणि त्यांचे स्वास्थ सुधारावे.

स्त्रीचे अधिकार :

आपल्या देशातील संस्कृतीला स्त्री शोषणाचे कोंदण असल्यामुळे ती निष्प्रभ ठरली आहे. अर्थव्यवस्थेचे केलेले शोषण आणि जातिव्यवस्थेने केलेले शोषण यातून जरी स्त्री बाहेर पडली तरी धार्मिक शोषणामुळे ती अंध झाली आहे. महात्मा फुल्यांनी

सामान्य शेतकऱ्याचे धर्माच्या निमित्ताने किती आणि कशा प्रकारे शोषण केले आहे याचे जे वर्णन केले आहे ते स्त्रीबाबत सुद्धा लागू होते. भारतातील विविध तीर्थक्षेत्री मंदिरे निर्माण करण्यासाठी खेड्यापाड्यातून पैसा कसा गोळा केला जातो याची हकीगत देऊन अशा माध्यमातून पुन्हा कसे शोषण होते हे सांगितले. मंदिर म्हणजे स्त्रीमनाचा कमकुवतपणा, याच्या विळख्यातून ती सुटलेली नाही. तिची अंधश्रद्धा तिच्या सगळ्या कर्तृत्वाला बाजा करीत आहे. निसर्गाशी समर्थपणे लढा देणारी स्त्री अंधश्रद्धेमुळे दुर्बळ बनते. मानवनिर्मित संकटाशी ती मुकाबला करू शकते; पण दैव या संकल्पनेपुढे मात्र हतबल होते. बाबासाहेबांच्या मते ईश्वरी योजनेचा सिद्धान्त तर्काच्या कसोटीवर उतरणारा नाही. म्हणून तो मान्य करता येणार नाही. इतिहास घडविण्यासाठी माणसाचा मोठा वाटा आहे असे सांगून त्यांनी माणसाचे महात्म्य सांगितले आहे. हे तत्त्वज्ञान सांगण्यामागचा त्यांचा हाच हेतू होता की पुरुषाबरोबर स्त्रीचा स्वाभिमान जागृत व्हावा. माणसाला धोरपणा येण्यासाठी त्याच्यात बुद्धिमत्ता आणि नीतिमत्ता जागृत व्हावी. सचोटी याचाही मिलाफ व्हावा असे ते म्हणायचे ,'बुद्धी हाच प्रकाश' असे त्याना वाटे

सामाजिक व राजकीय समता :

सामाजिक समतेच्या वाटचालीची ओळख स्त्रियांना झाल्यानंतर आपल्या भोगवटयाची जाणीव त्यांना झाली. आता प्रचलित व्यवस्थेला आव्हान द्यायचे मनात ठाणल्यामुळे बाबासाहेबांनी उभारलेल्या अनेक चळवळीत त्या सक्रिय झाल्यात. सर्व बाबींमध्ये निर्णय प्रक्रिया महत्त्वाची असते; पण त्याचे नियमन राजकारणातून होत असते; म्हणून आज स्त्रीला राजकारणात सहभाग महत्वाचा वाटतो. सर्व राजकीय पक्ष पुरुषी वर्चस्वाखाली आहेत. त्यामुळे राजकारणातील स्त्री-आरक्षणाचा प्रश्न म्हणजे बाहेरून पाठिंबा आणि आतून विरोध अशा स्थितीत आहे. बाबासाहेबांच्या मते स्त्रियांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर भर देणारी यंत्रणा अजूनही उपलब्ध झालेली नाही. आपल्या देशात निम्म्याहून अधिक समाज हा स्त्री-शूद्रांनी व्यापलेला असून त्यांना अत्यंत अवमानित आणि अमानुषपणे वागवले गेले. लोकशाही प्रणालीवर विश्वास ठेवणाऱ्या बाबासाहेबांना वाटत होते की या समाजातः प्रत्येकाला स्वतंत्र श्वास घेण्याची मुभा असावी. स्त्रीचा विकास झाला म्हणजे परिवार व्यवस्था मोडकळीस येईल अशी खुळचट कल्पना केली जाते; पण भगवान बुद्ध आणि बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मरण करून हे निश्चितपणे सांगता येईल की प्रेम, समता, सहकार्य आणि विश्वास या चार भींतीच्या उभारणीत कुटुंबव्यवस्था सुरक्षित राहू शकते निर्मिकाने निर्माण स्त्री गुणसंपन्न आहे

CamScanner

स्त्रीची गुणसंपन्नता :

तिचा सर्वांगीण विकास बाबासाहेबांना अभिप्रेत होता. निसर्गानी स्त्री - प्रधान संस्कृती मान्य केली आहे. गर्भावस्थेत बाळाचे संरक्षण करणारी नैसर्गिक यंत्रणाच सांगतेय की स्त्री ही सामर्थ्यशाली आहे. बाबासाहेबांच्या तत्त्वानुसार माणुसकी आणि तारतम्य यांची सांगड घालून यापुढे ती आपला विकास करील यात शंका नाही. कारण अन्यायाचा प्रतिकार करण्याची ऊर्जा तिच्यात आहे. विकसनशील स्त्री ही माणसासारखा जगण्याचा प्रयत्न करील. 'अरे मानसा मानसा; कधी होशील मानुस?' असा प्रश्न करणाऱ्या बहिणाबाई अजूनही उत्तराच्या प्रतीक्षेत आहेत. विकसित मानसिकता प्राप्त झालेली स्त्री स्वतःच्या बघण्याने, बोलण्याने आणि ऐकण्याने अर्थपूर्ण सक्षमतेचा मार्ग अधिक सुकरपणे चोखंदळणार आहे. आजच्या युगात मुक्त देहबोली, आधुनिक वेशभूषा आणि पाश्चात्त्य शैलीचे जगणे म्हणजे स्त्रीचा विकास झाला का? हे सर्व स्त्रीजवळ असणे म्हणजे भावनेचा आणि संवेदनशीलतेचा अभाव असणे का? काही वेळा जग हे चुकीची गृहीतकं बाबतीत राबवित असतं. म्हणूनच बुद्धी आणि भावना यांचं वैशिष्ट्यपूर्ण बळ एकवटत माणसासारखं जगायला हवं. भगवान बुद्धाच्या तत्त्वज्ञानानुसार जगण्यामध्ये तिची विवेकाशी नाळ जोडलेली असायला हवी. स्त्रीला परिवर्तनाच्या मार्गावर नेणाऱ्या सावित्रीबाई फुलेंशी कृतज्ञता व्यक्त करणारी विकासनशील स्त्री बाबासाहेबांना अभिप्रेत आहे.

संदर्भ

१) खरात शंकरराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार ,इंद्रायणी साहित्य २७३,शनिवार पेठ, पुणे ४११०३०

२) खरात शंकरराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, श्याम कोपर्डेकर, इंद्रायणी साहित्य, शनिवार पेठ,पुणे

३) सबाणे अरुणा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री आकांक्षा प्रकाशन २६५,मिलेनियम बिल्डिंग, वेस्ट हायकोर्ट रोड, बाजाजनगर

◆ ◆ ◆

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धम्म दीक्षा : एक विश्लेषण

डॉ. दिनेश सहदेवराव धाकडे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,

अमरावती

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराच्या माध्यमातून रेखाटलेले ते नवजीवनाचे स्वप्न... जीवनाच्या मूलभूत जाणिवेत बदल करविण्याचा तो संकल्प... त्यासाठीचा धम्मप्रवेश. लक्षावधी अनुयायांना बुद्ध धम्माची दीक्षा आणि नवजीवनाचे ते सूतोवाच... भारतीय जनतेचा सांस्कृतिक कायापालट करणारी ती क्रांती... जगातील क्रांतिकारकांनी वंदावे, अशी ही घटना १४ ऑक्टोबर १९५६ रोजी रक्ताचा एक थेंबही न सांडवता झाली. एक विचारक्रांती आणि त्यानंतर सुरू झाला आचारक्रांतीचा प्रवास. हा रथमागे जाणार नाही. याची जबाबदारी विश्वासाने अनुयायांच्या खांद्यावर देत, बाबासाहेबांनी जगाचा निरोप घेतला आणि आंबेडकरी जनता हादरली... त्यानंतर समाजाची अवस्था सुकाणू नसलेल्या जहाजासारखी झाली.

आज ५० वर्षांचा काळ लोटला. धम्मदीक्षेनंतरचे अर्धे शतक आंबेडकरी विचाराच्या आधारे घडले काय, हा प्रश्न अस्वस्थ करणारा असला तरी बाबासाहेबांनंतर या समाजाला पुढे नेण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले ते अत्यंत महत्त्वाचेच आहेत. आपल्या अस्मितेसाठी आणि अस्तित्त्वासाठी जे लढे दिले, त्याला तोड नाही. सत्तेचे बळ पाठीशी नसताना या देशामध्ये जी आंबेडकरी महाशक्ती उभी केली, ती अजोड आहे. देशभर असलेल्या बाबासाहेबांच्या पुतळ्यांच्या रूपाने आणि बुद्धविहारांच्या रूपाने या शक्तीच्या पताका फडकत आहेत. जनजाणीव, जीवनमूल्ये आणि दृष्टिकोन यात

CamScanner

बदल झाला, तो निश्चितच धम्मदीक्षेचा परिणाम आहे.

या अर्धशतकात आंबेडकरी समाजाची जी प्रगती झाली, ती जगातील अभ्यासकांना आकर्षित करणारी आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही ज्यांची जीवनमूल्ये आहेत, तो फक्त बौद्ध समाजाचा माणूस आहे. भारतीय संविधानाच्या मूल्यांना खऱ्या अर्थाने जोपासणारा बौद्ध समाज हे धम्मदीक्षेचे फलितआहे.

भारत देशाचा चेहरामोहराचा धम्मदीक्षेने बदलून टाकला. धम्मदीक्षेच्या स्त्रोतातूनच या चळवळीला विचारऊर्जा मिळाली. ही विचारऊर्जा घेऊन सामाजिक चळवळ प्रवाहित झाली. २२ प्रतिज्ञांच्या आधारे समाजाची जडणघडण झाली. त्यामुळे जगातील सर्व बौद्धांपेक्षा वैचारिक दृष्टीने भारतीय बौद्ध समाज अतिशय विकसित आहे. कार्ल मार्क्सला पर्याय देण्याची क्षमता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाला दिली. 'बुद्ध ॲण्ड हिज धम्म' या ग्रंथाच्या आधारे जगातील सर्व बौद्धांनी आपली तात्विकता तपासून पाहावी, असा हा विचारक्रांतीचा दिग्दर्शक ग्रंथ आहे. बौद्धांच्या आचारक्रांतीसाठी बाबासाहेबांनी २२ प्रतिज्ञा दिल्या. या आधारे प्रत्येकाने आपले बौद्ध असल्याचे अस्तित्व तपासून पाहावे. हा आचार-विचारांचा दीपस्तंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षेच्या माध्यमातून दिला.

ब्राह्मणशाही आणि बुद्ध धम्म यांच्या संघर्षाचा इतिहास हाच भारताचा इतिहास आहे. यालाच क्रांती-प्रतिक्रांतीचा इतिहास म्हणतात. ब्राह्मणशाही ही प्रतिक्रांतीचे प्रतिनिधित्व करते आणि बुद्ध धम्म हा क्रांतीचे प्रतिनिधित्व करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षेच्या आधारे बुद्ध धम्माच्या क्रांतिकारी इतिहासाला उजागर केले. ज्या ब्राह्मणशाहीने हजारो वर्षांपासून विविध समाजांना एकमेकांपासून तोडून ठेवले. त्यांच्यामध्ये इर्षा, मत्सर, उच्च-नीचता ठासून भरून ठेवली. त्या समाजामध्ये एकसंधतेची भावना निर्माण करण्याचे काम धम्मदीक्षेने केले. फुटीरवृत्तीचे नाव हिंदू धर्म आहे, तर संघवृत्तीचे नाव बुद्ध धम्म आहे. हाच धर्म आणि धम्म यामधील फरक आहे. ब्राह्मणवाद आणि बौद्ध धम्म या वैचारिक संघर्षात सच्च्या भारतीयाने कुणाच्या शामियानात जावे, याचा निर्णय प्रत्येकाने घ्यावयाचा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अगाध बुद्धिमत्तेने आणि अव्यभिचारी कर्तृत्वशक्तीने जे मन्वंतर या देशात घडवून आणले, त्याला इतिहासात तोड नाही. या मन्वंतराचा आधार धम्मशक्तीच आहे. याचे पडसाद आता बहुजन समाजावर आणि दलित, आदिवासी समाजावर पडत आहेत. जो समाज ब्राह्मणशाही साहित्याच्या आधारवडावर विसंबून होता, तो आता बहुजन वा जनसाहित्याचा विचार पिंपळपानाने

पल्लवित करतो आहे. मातंग समाज आणि भटक्या जमाती धर्मांतरासाठी पुढे सरसावल्या आहेत. याचा स्पष्ट अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्धशतकाच्या प्रारंभी जी समतेची ज्योत प्रज्वलित केली होती, ती योग्य होती. याची जाणीव इतर समाजांना आता होत आहे. या परिवर्तनाचे आपण स्वागत केले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक धम्मशक्तीचे नाव आहे. या नावाच्या आधारे बौद्ध समाज या देशातील ईश्वरवादी विरोधकांशी सामना करीत एकाकीपणे अर्धशतकापर्यंत झुंजत राहिला. हा समाज काही बाबतीत मोडला गेला असला, तरी तुटला गेला नाही. या समाजाच्या भीमसैनिकांत आजहीविजिगीषूता तशीच तेवत आहे. या समाजाला नाउमेद करता येणार नाही इतकी या समाजाने वैचारिकता धम्मशक्तीच्या आधारे सशक्त केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वैचारिक दिशा आपल्या धम्मानुयायांसाठी आदर्शवत आहे. तरी पण 'बोधिसत्व', 'विपश्यना' यावर सवंग चर्चा करणारे महाभाग आमच्यात काही कमी नाहीत. यावर चर्चा करण्यापेक्षा बौद्धांच्या आरक्षणाचा प्रश्न, बौद्ध विवाह कायदा, बौद्ध विद्यापीठ, बौद्धांवरील अन्याय-अत्याचार, बौद्ध विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, बौद्ध विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी पाठविणे, बौद्धांसाठी खासगी उद्योग, बौद्धांसाठी संरक्षण कायदा या प्रश्नांवर जनमत चेतविण्यासाठी आपली लेखणी उगारण्याची गरज आहे.

धम्मदीक्षेनंतर बौद्ध समाजाची जी अवस्था आहे, तिचे मूल्यमापन खऱ्या अर्थाने झाले पाहिजे. बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारासाठी ज्या योजना हाती घ्यायला पाहिजे होत्या, त्याकडे राजकारणाच्या धुमश्चक्रीत आपण साफ दुर्लक्ष केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३० ऑक्टोबर १९५३ रोजी महाबोधी सोसायटीचे वलीसिंह यांच्या नावाने एक पत्र लिहिले होते. त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे लिहिले की, 'माझ्या सांगण्यावरून ज्या जनसमामाने बौद्ध धम्माचा स्वीकार केला व पुढेही करीत त्याला बौद्ध ज्ञान उपलब्ध करून देण्याच्या योग्य मार्गाचा आणि साधनांचा विचार झाला पाहिजे. लोकांना धम्म शिकविण्याकरिता आपण मोठ्या संख्येने कार्यकर्ते प्रशिक्षण देऊन तयार केले पाहिजेत. परंतु भिक्खू हेच त्याचा प्रचार करण्याचे सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी होत.' (प्रबुद्ध भारत, दि. २८ सप्टेंबर १९६३) आज धम्मप्रचारक आणि भिक्खूंची अवस्था पाहिली की धम्मदीक्षेच्या अर्धशतकात आपण काय प्रगती केली, ते लक्षात येईल.

आपल्या विकासाचा अग्रक्रम मार्ग हा धम्म आहे, हे लक्षातच घेतलेले नाही. त्यामुळे राजकारणाच्या गोळा-बेरजेच्या नादात समाजाची वजाबाकी होत गेली. या राजकारणात आपण पोटजातीचाही विचार केला. त्यामुळे त्याचा दोष बौद्ध धम्माला

CamScanner

देता येणार नाही. आपली हिंदी धर्मातून पूर्णत: मुक्तता झाली नाही, हे त्यातून ध्वनित होते. त्यामुळे २२ प्रतिज्ञांपैकी पहिल्या १० प्रतिज्ञांची गरज आजही आम्हाला तितकीच महत्त्वाची वाटते.

या देशातील बौद्धांनी जी काही प्रगती केली ती खऱ्या अर्थाने नवी मूल्ये, जाणिवा व दृष्टिकोनाच्या आधारे केली आहे. हा राष्ट्रीय उन्नयनाचा विचार आहे. त्यामुळे या समाजाचे संवर्धन करणे हे भारतीयांचे इतिकर्तव्य ठरावे. राष्ट्रसमोर येणाऱ्या प्रश्नांमुळे हादरून न जाता त्याला सामोरे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ प्रतिक्रिया व्यक्त करून राष्ट्राचा विकास साधता येणार नाही. मुक्त व्यापार, जागतिकीकरण आणि बाजारीकरण या नव्या आर्थिक नीतीमुळे संपूर्ण जग हादरून गेले आहे. जागतिकीकरणाचा तात्त्विक विरोध तर आपणास करावयाचा आहे; परंतु या प्रश्नाची एक दुसरीही बाजू आहे, ती लक्षात घेतली पाहिजे. जागतिकीकरणाच्या माध्यमातून या देशातील बौद्धांना विदेशात जाण्याची एक संधी प्राप्त झालेली आहे. त्याचाही विचार गांभीर्याने करावा लागेल. जगातील बौद्ध राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करून भारतातील बौद्धांना आपला विकास घडवून आणण्यासाठी काय योजना आखता येतील, हा कळीचा प्रश्न आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षेनंतर जगातील बौद्ध राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करून आपला विकास घडवून आणण्यासाठी आणि जागतिक स्तरावर बंधुत्वाची भावना विकसित करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती. त्याचा आता तरी गांभीर्याने विचार करावा. त्यातच आपल्या विकासाचे रहस्य अनुस्यूत आहे. या देशातील बौद्धांचा विकास हा नव्या समाजाच्या दृष्टीचा, जाणिवेचा आणि मूल्यांचा विकास होय. बाबासाहेबांना अपेक्षित सामाजिक लोकशाही अर्थात न्याय-स्वातंत्र्य-समता, बंधुता यावर अधिष्ठित समाजनिर्मिती ही बौद्ध तत्त्वज्ञानाशिवाय शक्य नाही. धम्म स्वीकाराची चळवळ ही नवजीवनाची चळवळ आहे. सर्वांच्या कल्याणाची चळवळ आहे. याची जाणीव प्रत्येकात येणे यातच भारतीयांचे महामंगल आहे.

संदर्भ सूची –

(१) राजकीय तत्त्वज्ञान - प्रा. राम मुठाळ, अंशुल पब्लिकेशन.
(२) राज्यशास्त्रीय सिद्धांत - प्रा.शेख हाशम, प्रा.डॉ.राजेंद्र गवई, विश्व पब्लिकेशर्स, नागपूर.
(३) आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत - प्रा. आर.एम.गोखले.
(४) राजकीय विचारवंत (पाश्चिमात्य आणि भारतीय) - श.गो.देवगावकर, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
(५) भीमराव अम्बेडकर - डब्ल्यू एन. कुंबेर.
(६) राजकीय विश्लेषण आणि तत्त्वज्ञान - ए. जी. सोमवंशी.
(७) भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार - डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्र विचाराचे महत्त्व

डॉ. राजेश एम. देशमुख
वाणिज्य विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
अमरावती

प्रास्ताविक :

आयुष मेहरोत्रा यांच्या मते, बाबासाहेबांची आर्थिक व्यवस्थेबद्दलची समज त्यांच्या DSc प्रबंधाचा भाग म्हणून लिहिलेल्या 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी: इट्स ओरिजिन अँड सोल्युशन' या त्यांच्या पुस्तकातून स्पष्ट होते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ची स्थापना करताना विचारात घेतलेल्या हिल्टन यंग कमिशनसमोर त्यांनी आपले युक्तिवाद देखील मांडले. त्या काळात गोल्ड स्टँडर्ड विरुद्ध गोल्ड एक्स्चेंज स्टँडर्ड वरील वादविवाद जोरात सुरू होते आणि आंबेडकरांनी त्या काळातील सर्वात प्रमुख अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनार्ड केन्स यांना विरोध केला. आंबेडकरांनी सुधारित सुवर्ण मानकांच्या बाजूने युक्तिवाद केला तर केन्स हे सुवर्ण-विनिमय मानकांचे समर्थक होते. आंबेडकरांचा मूळ युक्तिवाद असा होता की सुवर्ण मानकाने भारतासारख्या विकसनशील देशासाठी चलनात एक प्रकारची स्थिरता प्रदान केली होती आणि पैशाचा पुरवठा सोन्याशी जोडण्याच्या कल्पनेच्या विरोधात होता. गरीब लोकांच्या मोठ्या फायद्यासाठी त्यांनी विनिमय दराच्या स्थिरतेपेक्षा किंमत स्थिरतेच्या महत्त्वावर जोर दिला. तसेच बी. आर. सूर्यवंशी यांच्या मते डॉ. बी. आर. आंबेडकर हे एक युगप्रवर्तक मानव मुक्तीकर्ते, समाजसुधारक, पुरोगामी राजकारणी, विद्वान कायदेतज्ज्ञ, प्रसिद्ध संसदपटू, महान घटनाकार आणि अतिशय उल्लेखनीय म्हणजे ते एक प्रख्यात कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञ होते. ते मुळात भारताचे

CamScanner

पहिले प्रशिक्षित अर्थतज्ञ होते. १९२७ साली त्यांनी कोलंबिया युनिव्हर्सिटी मुलभूत आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून अर्थशास्त्रातील संशोधन अभ्यास केला. राजकीय अर्थव्यवस्था आणि कृषी औद्योगिक विकास हे त्यांचे संशोधनाचे प्रमुख क्षेत्र 'पब्लिक फायनान्स' होते. अर्थशास्त्रातील त्यांचे विषयाचे योगदान 'पब्लिक फायनान्स' या विषयातील शिस्तीत उद्बोधनीय आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की डॉ. आंबेडकर हे मूलत: शैक्षणिक प्रशिक्षणाने अर्थशास्त्रज्ञ होते आणि सार्वजनिक वित्त आणि कल्याणकारी अर्थशास्त्राशी संबंधित समस्यांचे एक सातत्यपूर्ण संशोधक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थशास्त्राच्या विचारांचे महत्त्व :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रमुख भारतीय न्यायशास्त्रज्ञ, समाजसुधारक आणि भारतीय राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार होते. त्यांचे आर्थिक विचार आणि योगदान खालील अनेक कारणांसाठी महत्त्वपूर्ण आहे.

सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता:- आंबेडकरांचे आर्थिक विचार सामाजिक न्याय आणि आर्थिक समानतेच्या तत्त्वांभोवती खोलवर रुजलेले होते. आर्थिक विषमता हा सामाजिक न्याय मिळवण्यात मोठा अडथळा आहे असे त्यांचे मत होते. आर्थिक सुधारणांसाठी त्यांनी केलेल्या वकिलीचा उद्देश समाजातील उपेक्षित आणि शोषित वर्ग, विशेषत: दलित यांचे उन्नती करणे हा होता.

जमीन सुधारणा:- आंबेडकर हे खालच्या-जातीतील समुदायांमधील भूमिहीनता आणि जमिनीच्या मालकीचे प्रश्न सोडवण्यासाठी जमीन सुधारणांचे जोरदार समर्थक होते. त्यांनी जमीन हा उपेक्षित समुदायांसाठी आर्थिक सक्षमीकरणाचा एक महत्त्वाचा स्रोत म्हणून पाहिला आणि भूमिहीनांना जमीन उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना प्रस्तावित केल्या.

आरक्षण धोरण:- आंबेडकरांनी भारतातील आरक्षण प्रणालीच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, ज्याचा उद्देश ऐतिहासिकदृष्ट्या वंचित गटांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी प्रदान करणे हा होता. हे धोरण ऐतिहासिकदृष्ट्या दुर्लक्षित राहिलेल्या लोकांना शिक्षण आणि सरकारी नोकऱ्या उपलब्ध करून देऊन आर्थिक असमानता दूर करण्याचे एक साधन होते.

औद्योगिकीकरण आणि आर्थिक विकास:- आंबेडकरांनी आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरणाचे महत्त्व ओळखले. रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आणि उपेक्षित समुदायांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी औद्योगिकीकरणाच्या गरजेवर त्यांनी भर दिला. आर्थिक विकासाची त्यांची दृष्टी सामाजिक उन्नतीशी घट्ट जोडलेली होती.

कामगार हक्क:- आंबेडकर हे कामगार हक्कांचे आणि कामगारांच्या हिताचे संरक्षण करणारे होते. आर्थिक न्याय सुनिश्चित करण्यासाठी आणि कामगार वर्गाचे आर्थिक कल्याण सुधारण्यासाठी कामगार सुधारणा, किमान वेतन आणि चांगली कामाच्या परिस्थितीच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

आर्थिक समावेश:- आंबेडकरांनी उपेक्षित समुदायांसाठी आर्थिक समावेशाचे महत्त्व देखील अधोरेखित केले. आर्थिकदृष्ट्या वंचित लोकांना सशक्त करण्यासाठी कर्ज आणि आर्थिक संसाधनांपर्यंत पोहोचण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला.

आर्थिक लोकशाही:- आंबेडकरांनी आर्थिक लोकशाहीच्या स्वरूपाची कल्पना केली जिथे आर्थिक संधी आणि संसाधने अधिक न्याय्यपणे वितरित केली गेली आणि आर्थिक निर्णय घेणे हे सर्वसमावेशक आणि सहभागात्मक होते. सामाजिक न्याय मिळवण्यासाठी आर्थिक लोकशाही महत्त्वाची आहे, असे त्यांचे मत होते.

स्वावलंबन आणि स्वाभिमान:- आंबेडकरांचे आर्थिक विचार देखील अत्याचारित समुदायांच्या आत्मनिर्भरता आणि स्वाभिमानाच्या कल्पनेभोवती केंद्रित होते. त्यांचा असा विश्वास होता की व्यक्ती आणि समुदायांना त्यांचा स्वाभिमान आणि प्रतिष्ठा परत मिळवण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्य आवश्यक आहे.

औद्योगिकीकरणाला पाठिंबा:- डॉ. आंबेडकरांचा आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरणाच्या महत्त्वावर विश्वास होता. नोकऱ्या निर्माण करण्यासाठी आणि आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी औद्योगिकीकरणाच्या गरजेवर त्यांनी भर दिला, ज्याचा समाजातील सर्व घटकांना फायदा होईल.

कामगार हक्क आणि सामाजिक सुरक्षा:- आंबेडकरांनी कामगारांसाठी कामगार हक्क आणि सामाजिक सुरक्षा यांचे महत्त्व देखील अधोरेखित केले. कामगारांच्या आर्थिक कल्याणाचे रक्षण करण्यासाठी आणि कामाच्या ठिकाणी न्याय्य वागणूक सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी कामगार सुधारणा आणि सामाजिक सुरक्षा उपायांवरील महत्त्वपूर्ण योगदान दिले.

आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन:- आंबेडकरांचे आर्थिक विचार भारतापुरते मर्यादित नव्हते. भारताच्या अनोख्या संदर्भाला अनुकूल अशी धोरणे तयार करण्यासाठी त्यांनी आंतरराष्ट्रीय विचारांत आणि आर्थिक सिद्धांतांकडून प्रेरणा घेतली.

शिक्षण आणि आर्थिक गतिशीलता:- डॉ. आंबेडकरांनी व्यक्ती आणि समुदायांना आर्थिक गतिशीलता प्राप्त करण्याचे साधन म्हणून शिक्षणाचे महत्त्व सांगितले. गरिबी आणि भेदभावाचे चक्र तोडण्यासाठी शिक्षण हे एक शक्तिशाली साधन आहे, असा त्यांचा विश्वास होता.

चलन आणि बँकिंग सुधारणा:- डॉ. आंबेडकर यांनी चलन आणि बँकिंग क्षेत्रातही योगदान दिले. त्यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या चलनविषयक धोरणावरील सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून काम केले. भारताचे चलनविषयक धोरण आणि बँकिंग प्रणाली तयार करण्यात त्यांच्या अंतर्दृष्टीने भूमिका बजावली.

श्रमाचा आदर:- डॉ. आंबेडकरांनी श्रमाच्या सन्मानावर भर दिला. त्यांचा असा विश्वास होता की सर्व प्रकारच्या श्रमांचा आदर आणि मूल्य असले पाहिजे, जात किंवा सामाजिक पार्श्वभूमी विचारात न घेता. हा दृष्टिकोन त्यांच्या व्यापक आर्थिक आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वज्ञानात रुजलेला होता.

जमीन आणि जलसंपत्ती व्यवस्थापन:- त्यांनी कार्यक्षम जमीन आणि जलसंपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले, जे त्यांना आर्थिक विकास आणि गरिबी निर्मूलनासाठी अविभाज्य मानले गेले.

घटनात्मक सुरक्षा:- भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून, डॉ. आंबेडकरांनी हे सुनिश्चित केले की त्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या सुरक्षेसह आर्थिक न्यायाच्या तरतुदी आहेत आणि आर्थिक आणि सामाजिक कल्याणाला चालना देण्याच्या उद्देशाने राज्य धोरणाची दिशानिर्देशक तत्त्वे आहेत.

महिला सक्षमीकरण:- ते लैंगिक समानता आणि महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी देखील एक वकील होते. महिलांचे हक्क आणि आर्थिक स्वातंत्र्यावरील त्यांच्या कार्याने महिलांच्या उन्नतीसाठी भविष्यातील धोरणांचा पाया घातला.

सार्वजनिक वित्त आणि वित्तीय धोरण:- आंबेडकरांनी सार्वजनिक वित्त आणि वित्तीय धोरणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. कर आकारणी, खर्च आणि आर्थिक नियोजन यातील त्यांच्या अंतर्दृष्टीने स्वातंत्र्योत्तर भारताच्या आर्थिक धोरणांवर परिणाम झाला.

नियोजन आणि विकास:- आंबेडकरांनी नियोजित आर्थिक विकासासाठी भारताच्या दृष्टिकोनाला आकार देण्यात भूमिका बजावली. औद्योगिकीकरण, पायाभूत सुविधांचा विकास आणि आर्थिक नियोजन यावरील त्यांच्या कल्पनांचा स्वातंत्र्योत्तर भारताच्या आर्थिक धोरणांवर प्रभाव पडला.

कृषी आणि जमीन सुधारणा:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय शेतीचा सखोल अभ्यास केला होता, संशोधन लेख लिहिले होते, शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी चर्चासत्रे आणि परिषदा आयोजित केल्या होत्या, तसेच शेतकरी चळवळीचे नेतृत्व केले होते. शेतीविषयीचे त्यांचे विचार त्यांच्या

'भारतातील लहान वस्तू आणि त्यांचे उपाय' (१९१७) आणि 'स्थिती आणि अल्पसंख्याक' (१९४७) या लेखात आढळतात. त्यांनी नमूद केले की, मोजक्या लोकांच्या जमिनी धारण करणे ही भारतीय शेतीची एक गंभीर समस्या आहे ज्याचे विविध तोटे आहेत, जसे की लागवड आणि बाजार आणि संसाधनांमध्ये अडचणी, वाढती किंमत, कमी उत्पादकता, अपुरे उत्पन्न आणि निम्न जीवनमान. डॉ. आंबेडकरांच्या मते, शेतीची उत्पादकता केवळ जमिनीच्या आकारमानाशीच नाही तर भांडवल, श्रम आणि इतर निविष्ठ यासारख्या इतर घटकांशीही संबंधित आहे. त्यामुळे भांडवल, किंवा श्रम इ. पुरेशा प्रमाणात आणि गुणवत्तेत उपलब्ध नसल्यास मोठ्या आकाराची जमीनही अनुत्पादक होऊ शकते. दुसरीकडे ही संसाधने मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्यास लहान आकाराची जमीन उत्पादक बनते. याच विचारातून स्वातंत्र्यानंतर 'जमीन मर्यादा कायदा' मंजूर झाला.

कर धोरण:- डॉ. आंबेडकरांनी १९३६ मध्ये 'स्वतंत्र मजदूर पार्टी'च्या जाहीरनाम्यात करप्रणालीबद्दल आपले मत व्यक्त केले. त्यांनी जमीन महसूल आणि त्याची व्यवस्था आणि त्यांच्या करांना विरोध केला कारण या करांचा बोजा समाजातील गरीब घटकांवर लक्षणीय आहे.त्यांचे खालीलप्रमाणे कर धोरणाबाबत विचार आढळून येतात.

- कर देणाऱ्याच्या क्षमतेवर लावला जावा, उत्पन्नावर नाही.
- कर गरीबांवर कमी आणि श्रीमंतांवर जास्त असावा.
- विशिष्ट मर्यादेपर्यंत कर सूट दिली जावी.
- कर आकारणीत विविध विभागांमध्ये समानता असली पाहिजे.
- करामुळे लोकांचे जीवनमान खालावता कामा नये.
- जमीन महसूल कर अधिक लवचिक असावा आणि तो शेतजमिनीवर आकारू नये.
- त्यांनी सुचवले की त्यावेळची भारतीय कर प्रणाली भेदभाव आणि असमानतेवर आधारित होती.

निष्कर्ष:-

वरील विवेचनावरून असा निष्कर्ष प्राप्त होतो की, डॉ.बी.आर. आंबेडकरांचा आर्थिक विचार हा त्यांच्या सामाजिक सुधारणा आणि न्यायाच्या व्यापक दृष्टिकोनाचा अविभाज्य भाग होता. आर्थिक असमानता दूर करण्यासाठी आणि भारतातील उपेक्षित समुदायांच्या कल्याणाला चालना देण्याच्या उद्देशाने त्यांच्या कल्पना धोरणे आणि उपक्रमांवर प्रभाव पाडत आहेत. सामाजिक न्याय आणि ऐतिहासिकदृष्ट्या वंचित

CamScanner

तसेच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या बचतीच्या उपयोगासाठी अर्थसाक्षरतेच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान मोलाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार हे आर्थिक असमानता दूर करण्यात आणि भारतातील उपेक्षित समुदायांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मदत करणारे होते. सामाजिक आणि आर्थिक न्यायासंदर्भात समकालीन चर्चांमध्ये त्यांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत.

संदर्भ :-

१. आनंद तेलतुंबडे (२०२०), बाबासाहेब आंबेडकर : द पॉलिटिकल इकॉनॉमिस्ट
२. बी. आर. सुर्वेकरी (२०१२), महाराष्ट्रातील वंचित घटकांच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास
३. डॉ. बी. आर. आंबेडकर (२०२१ पुनर्मुद्रण) रुपयाची समस्या: त्याचे मूळ आणि त्याचे निराकरण
४. एस. पवार आणि इतर (१९९९), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ

◆ ◆ ◆

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार संदर्भातील कार्य – एक आढावा

प्रा. एस. के. गेडाम
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
अमरावती

प्रस्तावना –

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार संदर्भातील कार्य :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक, राजकीय, घटना निर्मिती इत्यादी संबंधीचे कार्य हे असामान्य आहेच, पण हा कार्यबोजाचा कामगारांच्या उन्नतीसाठी केलेले कार्याचे व कामगार वर्गाच्या संबंधीचे इतर ही कार्य उल्लेखनीय व महत्त्वपूर्ण आहे. बाबासाहेबांच्या या अफाट कार्यासंबंधी भारतीय कामगार व कामगार संघटनेस अजूनही पुरेशी जाणीव झालेली नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे.

कामगारांसाठी बाबासाहेबांनी दिलेले योगदान खालील प्रमाणे आहे :-

• डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली, ते अध्यक्ष होते. पक्षाचा जाहिरनामा 'टाइम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी दैनिकात पहिल्यांदा प्रकाशित करण्यात आला होता. या जाहिरनाम्यात खेत - पोटाचे अतिशय सूक्ष्म पद्धतीने विचार करून तरतुदी होत्या.

• पक्षाचे धोरण ठरवण्यासाठी दरवर्षी सभेची परंपरा १२,१३ डिसेंबरची १९३८ ला मनमाड येथे झाली. स्वागतेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले होते, 'ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हे भारतीय कामगारांचे दोन शत्रू आहेत.'

• १७ मार्च १९३८ मुंबईच्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सर्वधारण सभेत डॉ. आंबेडकर म्हणाले - 'गरिबांच्या पक्ष गरिबांनी चालविला पाहिजे.' हा निर्लेप आशावाद क्षितिजाच्या पलीकडचा होता यात शंका नाही. सामाजिक अन्याय, अत्याचारा विरुद्ध, आर्थिक विषमते विरुद्ध कामगारांनी लढा दिला पाहिजे तेव्हाच कामगार संघटनेच्या बळावर प्रश्न सुटतील. तसेच 'परावलंबी असण्यापेक्षा स्वावलंबी व्हा' असा संदेश डॉ. आंबेडकरांनी दिला होता.

• १५ सप्टेंबर १९३८ च्या ट्रेड डिस्प्युट बिलाच्या संदर्भात कौन्सिल मध्ये डॉ. आंबेडकरांनी कामगाराचा अधिकार आणि मालकाने लादलेली बंधने याचा कडाडून विरोध केला. डॉ. आंबेडकरांच्या मताशी सहमती दर्शवून जमनादास मेथाने डिस्प्युट बिलाचा विरोध केला होता. याच पार्श्वभूमीवर ७ नोव्हेंबर १९३८ला स्वतंत्र मजूर पक्ष आणि गिरणी कामगारांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्याचा निर्धार केला होता. जमनादास मेथा यांच्या अध्यक्षते खाली श्रीपाद डांगे, परुळेकर, मिरजकर इत्यादी कामगार नेत्यांनी व डॉ. आंबेडकरांनी संप यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला होता. हा संप अयशस्वी व्हावा यासाठी गिरणी मालकाने पोलिस बळाचा वापर केला. त्यात ७२ कामगार जखमी झाले. ३५ कामगारांना अटक झाली. पण संप यशस्वी झाला. कामगार संघटनांचा विजय झाला. स्वतंत्र मजूर पक्ष बळकट झाला. या कामगारांच्या लढ्यामुळे मालक, भांडवलदार वर्गात प्रचंड खळबळ माजली होती.

• शेतकऱ्यांसाठी किमान वेतन दर असावेत अशी मागणी विधि मंडळात केली.

• १९३७ साली कोकणातील बहुजन कामगारांचे शोषण थांबविण्या संबंधी खोती पध्दत नष्ट करण्यासंबंधी बिल मांडले.

• १९३८ साली कोकणातील 'औद्योगिक कलह विधेयकानुसार' कामगारांचा संप करण्याचा अधिकार हिरावून घेतला गेला. पण बाबासाहेबांनी या बिलावर भाषण करतांना संप हा दिवाणी अपराध आहे, फौजदारी गुन्हा नव्हे असे मत दिले व पुढे कामगारांना संप करण्याचा कायदेशिर अधिकार मिळवून दिला.

• वरील बिलावर भाष्य करतांना मालकांनी आपले अंदाजपत्रक कामगारांसाठी जाहीर करण्याची मागणी केली.

• १९३८ मध्ये 'सावकारी नियंत्रण' विधेयक तयार केले.

• बिडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी बिडी कामगार संघ स्थापन केला.

• २ जुलै १९४२ ला ते व्हॉईसरॉय मंत्री मंडळात कामगार मंत्री झाले. ह्या कारकिर्दीत त्यांनी कामगारांसाठी बरेच कायदे निर्माण केले.

• २ सप्टेंबर १९४५ ला कामगार कल्याण योजना सादर केली. ही योजना लेबर वार्टर म्हणून प्रसिध्द आहे.

• युध्द साहित्य निर्माण करणाऱ्या कारखान्यात एक 'संयुक्त कामगार नियामक समिती' स्थापन केली.

• सेवा योजन कार्यालय (Employment Exchange) ची स्थापना केली.

• कामगारांना अगोदर भरपगारी रजा मिळत नव्हती. १४ एप्रील १९४४ ला बाबासाहेबांनी भरपगारी रजेचे विधेयक मंजूर केले.

• कामगारांना कमीत कमी वेतन ठरविण्याची तरतूद असलेले बिल मांडले. ह्यातूनच 'किमान वेतन कायदा १९४८' ची निर्मिती झाली.

• औद्योगिक कलह मिटविण्यासाठी समेट घडवून आणणारी यंत्रणा (लवाद यंत्रणा) उभारण्याची तरतूद केली.

• सप्टेंबर १९४३ रोजी भरलेल्या त्रिपक्षीय कामगार परिषदेचे बाबासाहेब अध्यक्ष होते. त्यात त्यांनी कामगारांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, सांस्कृतिक गरजा व आरोग्याचे उपाय तसेच कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी उपाय यावरील ठराव संमत केले.

• ३१ जानेवारी १९४४ रोजी खाण कामगारांसाठी 'कोळसा खाण कामगार फंडाची' स्थापना करणारे विधेयक मांडले.

• ऑगष्ट १९४५ मध्ये औद्योगिक वसाहतीचे नियम व मालकाच्या जबाबदाऱ्या यावर विचार विनिमय करणाऱ्या स्थायी समितीचे अध्यक्ष पद भूषविले. त्यात त्यांनी उद्योगासाठी मौलिक सूचना केल्या.

• ८ एप्रिल १९४६ ला 'मिका माईन्स लेबर वेल्फेअर फंडाची' स्थापना करण्या संबंधीचे बिल संमत केले.

• 'इंडियन्स माईन्स (अमेंडमेंड) ऑर्डिनन्स १९४५' नुसार स्त्री कामगारांच्या मुलांसाठी पाळणा घराची व्यवस्था करण्याचे व्यवस्थापनावर बंधन घातले.

• डॉ. आंबेडकर ब्रिटिश मंत्री मंडळात मंजूर मंत्री (१९४२ - १९४६) होते. त्यांनी सेवा योजन कार्यालयाची (एम्प्लॉयमेंट एक्सचेंज) स्थापना केली. त्याकाळी जे अनुभवी नि अर्धाशिक्षित तज्ज्ञ निरनिराळ्या योजनातून तयार होत होते. त्यांना नोकरीसाठी भटकावे लागू नये, त्यांना नोकरी मिळविण्याचे मार्ग मोकळे असले पाहिजे, हा सेवा योजन कार्यालय स्थापण्याचा मुख्य उद्देश होता. भारतीय खाणी मध्ये भारतातील कामगारांना काम करण्यासाठी फारशी संधी दिली जात नसे. इंग्लंड मधून कामगार आयात

CamScanner

केले जात. डॉ. आंबेडकरांनी या आयातीवर प्रतिबंध लावला. भारतातील कामगारांना खाणी मध्ये कामावर घेतले जाऊ लागले. अस्पृश्यांना डावलले जायचे. डॉ. आंबेडकरांच्या कायद्यामुळे त्यांनाही खाणीत काम करता येऊ लागले. काही जिगरबाज स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून खाणीत काम करू लागल्यात. ते पाहून डॉ. आंबेडकरांना आश्चर्याचा धक्का बसला. मजूर मंत्री म्हणून खाण महिला आणि कामगारांसाठी कायद्यात विशेष तरतुदी केल्या. 'भारतिय खाण कायदा १९४६' तयार करून स्त्री कामगारांना खाणीत जमिनीच्या आत मध्ये काम करण्यास व रात्रपाळीस बंदी केली.

• १३ मार्च १९५४ ला कोळसा उत्पादन आणि स्त्री खाण कामगार या दोन्ही बाबींचा विचार मांडून कामगारांचा महागाई भत्ता, नुकसान भरपाई, असमान महागाई भत्त्याला मजूर संघटना जबाबदार, बेकारीच्या काळातील नुकसान भरपाईची पद्धत, कामगाराचा राजीनामा, खाण कामगारांचे वेतन व सबलती, मजूर खात्याचा नोकर वर्ग, कोळशाच्या उत्पादनाचा प्रश्न, स्त्री खाण कामगार आणि महिला परिषद यावर डॉ. आंबेडकरांनी भाष्य केले. ज्याप्रमाणे पुरुष खाण कामगारांबद्दल डॉ. आंबेडकरांनी विचार व्यक्त केले त्याच प्रमाणे स्त्रियांबाबत ही २९ मार्च १९४० ला विधेयक आणून चर्चा केली. स्त्री कामगारांचे हित जोपासले. प्रसुतीच्या काळात विश्रांतीची तरतूद, रोख मदत इत्यादी तरतुदी केल्या. किमान चार आठवडे प्रसुती भत्ता मिळावा तसेच कामगार गैरहजर असताना त्यांना पगारी सुट्ट्या मिळाव्यात त्याच बरोबर कायद्याखाली नियम करण्याचा अधिकार आणि खाण कामगारांना शॉवर बाथची योजना सुद्धा अंमलात आणली होती. युद्ध काळात ही मजुरांना योग्य न्याय मिळावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्यातील नोकरीच्या अट शर्तीचा लवाद, मजुराचे प्रश्न व मजूर खाते, स्त्री पक्ष मजूर परिषदेचे महत्व, मजुराचे बहुरंगी पुढारी, पगारी सुट्यांचे वर्गीकरण केले. 'दि. माईन्स मॅटरनिटी बेनिफिट ॲक्ट' नुसार खाणीतील स्त्रीयांना बाळंतपणाची (प्रसूती पूर्वी व प्रसूती नंतर) रजा देण्याची शिफारस केली.

• 'दि फॅक्टरी अमेंडमेंट बिल' संमत करून कामगारांना १० दिवसाची पगारी रजा आणि बाल कामगारांना १४ दिवसाची पगारी रजा देण्या संबंधी कायद्यात दुरुस्ती केली.

• १९४६ च्या बजेट सेशन मध्ये आठवड्याचे कामाचे तास ५४ वरुन ४८ व दिवसाला १० तास ऐवजी ८ तास करण्याचे बिल मांडले.

• अपघात ग्रस्त कामगारांना मोबदला मिळावा म्हणून 'कामगार भरपाई कायद्याची' निर्मिती केली.

• २१ फेब्रुवारी १९४६ साली मध्यवर्ती कायदे मंडळात 'दि इंडियन ट्रेड युनियन्स (अमेंडमेंट) ॲक्ट' आणून ट्रेड युनियनला मान्यता देणे व्यवस्थापनाला मनिषेध करण्या संबंधीचे विधेयक मांडले.

• १९ एप्रिल १९४६ ला मध्यवर्ती कायदे मंडळात कमीत कमी मजुरी आणि कामगारांची संख्या किती असावी या संबंधी बिल मांडले व त्याचेच १९ फेब्रुवारी १९४८ ला कायद्यात रुपांतर झाले.

• बाबासाहेबांनी भारतीय घटनेची निर्मिती केली. त्यातील 'मार्गदर्शक तत्व' आर्टिकल ३९ (ड) नुसार पगारदार पुरुष इतकाच पगार त्याच पदावर काम करणाऱ्या स्त्रियांना ही मिळावा अशी घटनात्मक तरतूद केली.

• घटनेच्या कलम ४३ नुसार गर्भवती व बालंत स्त्रियांसाठी कामाच्या ठिकाणी योग्य व सुरक्षित व्यवस्था देण्याची तरतूद केली.

• कलम ४३ (अ) नुसार शासनाने कामगारांना व्यवस्थापनात सहभागी करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी तरतूद केली.

• कलम ४३ नुसार शासनाने कामगारांचे जीवन मान उंचावण्यासाठी सामाजिक व सांस्कृतिक संधी देण्यासाठी प्रयत्न करण्याची तरतूद केली.

• 'स्टेट्स ॲण्ड मायनॉरिटीज' या ग्रंथा मध्ये वेठबिगार कामगारांच्या प्रश्नाला हात घालतांना बाबासाहेब 'वेठबिगार हा गुन्हा आहे' असे मत मांडले आहे.

• कामगारांचे आर्थिक जीवन मान उंचावण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीर नाम्यात आर्थिक धोरण स्पष्ट केले. त्यातील आर्टीकल २ सेक्शन २ (४) मध्ये आर्थिक शोषणाच्या विरोधात स्पष्टीकरण केले. त्यात कामगारांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी संपत्तीची जास्तीत जास्त समान वाटणी करण्याबद्दल राज्याने प्रयत्न करावेत अशी सुचना केली.

• शेतीच्या प्रगतीसाठी व शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी सॅड मॉर्गेज बँक, शेतकऱ्यांची पतपेढी, खंडेरी विक्री संघ इत्यादी स्थापण करण्याविषयी धोरण व्यक्त केले.

कामगार मित्रांनो,

डॉ बाबासाहेबांनी भारतीय संविधान लिहिले जी एक महान गोष्ट आहे. संविधानात डॉ. बाबासाहेबांनी ज्या कायदेशीर तरतुदी केल्यात त्या संपूर्ण भारतीय समाजासाठी आहेत, त्याचाच हा घेतलेला आढावा. बाबासाहेबांचे वरील बहुमूल्य योगदान पाहता

आज कामगारांची जी सुस्थिती दिसत आहे, त्यात बाबासाहेबांचा निश्चितच सिंहाचा वाटा आहे. म्हणून बाबासाहेब हे सर्व कामगारांचे आदर्श आहेत. ही बाब सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

सारांश –

आज तर काही कामगारांची स्थिती वाईट आहे. नव्या कामगार धोरणाचा फारसा लाभ नाही. साम्राज्यवाद फोफावत आहे. जागतिकीकरण आले. यांत्रिकीकरण सुरू झाले. त्यामुळे सामान्य माणूस भरडला जात आहे. साम्राज्यवाद, नव वसाहतवाद, सांस्कृतिक दहशतवाद, बहुराष्ट्रीय कंपन्या इत्यादीमुळे माणसाच्या घामाचा दाम कमी आणि भांडवलदाराला जास्त नफा या दोहोंच्या फरकामुळे गरीब हा दिवसें दिवस गरीब तर श्रीमंत हा अधिकाधिक श्रीमंत होत आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांची घसरण होत आहे. माणसाचे अवमूल्यन होत आहे. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना घडत आहेत. अशा बुर्ज्वा व्यवस्थे विरुद्ध तसेच शासक समाज व्यवस्थे विरूद्ध आपण प्रतिरोध केला तरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातला भारत घडवू शकू. तेव्हाच प्रत्येकाचे जीवन सुंदर होईल. प्रगती करता येईल आणि चळवळ ही पुढे नेता येईल.

संदर्भ ग्रंथसूची –

कामगार चळवळ, प्रभाकर देशमुख

डॉ. बाबासाहेब आंबेडकर - मजुर कायदे

औद्योगिक कामगार कायदे व श्रमिक चळवळ - वा. सी. काळे

दैनिक लोकसत्ता व वृत्तपत्र आणी लोकराज्य मासिक - आग्रलेख

◆ ◆ ◆

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानातील योगदान

प्रा. दिलीप सुखदेवराव वानखडे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,

उत्तम नगर, अमरावती

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एक श्रेष्ठ संविधान तज्ज्ञ होते. त्यांनी जगातील अनेक देशांच्या संविधानाचा अभ्यास केला होता सोबतच जगभरातील प्रमुख धर्माचा देखील त्यांनी अभ्यास केला होता. ज्यावेळी भारतीय संविधान निर्माण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली त्यावेळी भारतातील विविध जाती, धर्म, पंथ, प्रदेश, भाषा, संस्कृती, परंपरा, लिंग इत्यादींना संविधानाच्या माध्यमातून समान न्याय, अधिकार, हक्क, प्रगती व त्यांच्या विकासाच्या संधी त्यांना उपलब्ध करून देणे हे फार आव्हानात्मक होते पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या सर्वांशी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्त्वमूल्यांची सांगड घातली त्यामुळे भारतीय संविधान हे सर्वसमावेशक झाले आहे. आज इतक्या वर्षानंतरही भारतीय संविधानाचे महत्त्व तसूभरही कमी झाले नाही. उलट जागतिक स्तरांवर ते आपले स्वातंत्र्य अस्तित्व घेऊन उभे आहे.

प्रस्तुत अभ्यासकाला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानातील योगदान' या विषयाच्या अनुषंगाने अधिकाधिक प्रकाश टाकावयाचा आहे. यास्तव या शोधनिबंधातून धांडोळा घेतला आहे.

भारतानी त्यांची स्वतंत्र राज्यघटना तयार करावी यास्तव इग्लंडमधून भारतात आलेल्या कॅबिनेट मिशन योजनेनुसार दिल्ली येथे १९४६ रोजी घटना परिषदेची निर्मिती करण्यात आली. या परिषदेवर प्रांतीय विधिमंडळाद्वारे २९२ सदस्य निवडून आले. यापैकी २११ सदस्य काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधित्व करणारे होते तर ७३ सदस्य मुस्लिम

CamScanner

जिला पश्चिमी प्रतिनिधित्व करणारे होते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बंगाल विधिमंडळातून महाजेच जिंकून आणि स्वतःचा पराभूत निवडणूक लढवून जोगेंद्रनाथ मंडल यांच्या सहकार्याने आणि आपल्या जोरावर काहर केलेल्या मतदारसंघातून १७ डिसेंबर १९४६ रोजी घटना परिषदेत सदस्य म्हणून प्रवेश केला परंतु पुढे कॉंग्रेस आणि मुस्लिम लिग या दोन्ही पक्षांचे संबंध विकोपास गेले त्यातूनच मग मुस्लिम लिगने स्वतंत्र पाकिस्तानची मागणी रेटून धरली शेवटी कॉंग्रेसने मुस्लिम लीगची ही मागणी मान्य केली. ब्रिटीश संसदेने दिनांक १५ जुलै १९४७ रोजी स्वतंत्र पाकिस्तानचा ठराव समंत केला त्यामुळे डॉ. आंबेडकर ज्या बंगाल प्रांतातून घटना परिषदेवर निवडून गेले होते तो बंगाल प्रांतच पाकिस्तानात गेल्याने डॉ. आंबेडकरांचे घटना परिषदेची सदस्यत्व रद्द झाले.

पण तत्पूर्वी घटना परिषदेत पंडित जवाहरलाल नेहरूंनी दिनांक १३ डिसेंबर १९४६ रोजी राज्य घटनेचे ध्येय आणि उद्दिष्ट यांचा ठराव मांडला होता या ठरावावर घटना परिषदेत खूप जास्त मुद्दाम चर्चा झाली. शेवटी घटना परिषदेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पंडित नेहरूंच्या ठरावावर भाषण देण्यास पाचारण केले त्याप्रमाणे बाबासाहेबांनी केलेले उपरोक्त भाषण त्यांच्या कायदेविषयक पांडित्याची, सर्व समाजाप्रती असलेल्या सदभावनेची, देशभक्तीची आणि देशाच्या दीर्घकालीन हितचिंतनाची साक्ष देणारे होते, इतकेच नाही तर त्यानंतरच्या विविध प्रसंगावेळी त्यांनी केलेली घटना परिषदेतील भाषणे आणि त्यातील राष्ट्रहितैषी विचार आणि सूचना ऐकून डॉ. राजेंद्र प्रसाद आणि सरदार वल्लभ पटेल यांना वाटले की, डॉ. आंबेडकरांशिवाय राज्यघटनेचे काम पूर्णत्वास जाऊच शकणार नाही. म्हणून त्यांनी मुंबई प्रांतातून घटना परिषदेवर निवडून गेलेले बी. एम. आर. जयकर यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर डॉ. आंबेडकर यांना पुन्हा कॉंग्रेसच्या वतीने निवडून आणले. यासाठी मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी त्यांना खूप सहाय्य केले. त्यामुळे घटना परिषदेचे दार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खुले झाले.

घटना परिषदेच्या झालेल्या बैठकीत श्री. सत्यनारायण सिन्हा यांनी ठराव मांडून २९ ऑगस्ट १९४७ रोजी सात सदस्यीय मसुदा समितीचे गठन केले आणि ३० ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीच्या सदस्यांनी मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची एकमताने निवड केली ज्या व्यक्तीला आजपर्यंत भारतातील सवर्णांचे पुढारी कॉंग्रेसजन शत्रू मानत होते. त्यानाच अशा रीतीने देशाच्या संविधानाचे जिवंत शिल्प तयार करण्यासाठी आमंत्रण दिला यामागे डॉ. बाबासाहेबांची विश्व विख्यात विद्वत्ता, जाज्वल्य राष्ट्रप्रेम, निष्कलंक सचोटी आणि समस्त मानवतेप्रती अमर्याद करुणा पैशी

आणे

घटना परिषदेची / घटना समितीचे सल्लागार सर बी. एन. राव यांनी दिनांक २७ ऑक्टोबर १९४७ रोजी २४३ कलमे आणि १३ परिशिष्टे असलेला राज्यघटनेचा कच्चा मसुदा समितीकडे विचारार्थ सादर केला. त्यानंतर या मसुद्यात सुधारणा करण्यासाठी व त्यास पक्का मसुदा समितीच्या एकूण ४४ बैठका झाल्या. या समितीमध्ये वाद विवादाचे कामकाज सुरू होते पण या बैठकांमध्ये मसुदा समितीच्या सदस्यांची उपस्थिती फारच नगण्य, अत्यंत रहिनेती आहे त्यामुळे बाबासाहेबांना या मसुद्यात दुरुस्त्या व सुधारणा करण्यासाठी खूपच परिश्रम घ्यावे लागल्याचे या मसुदा समितीतील सदस्यांची उपस्थिती लक्षात घेतली तरी हे आपल्या लक्षात येईल डॉ. बाबासाहेब कर्मवे यांच्या 'डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' या पुस्तकात याचे विवेचन आले आहे. 'या मसुदा समितीच्या कामकाजाच्या पहिल्या बैठकीला सहा सदस्य हजर होते त्यातील हुसेन इमाम आणि बी. एल. मित्तर सतराच्या ४३ बैठकांना उपस्थित राहिले नाहीत. हुसेन इमाम ऐवजी मौलाना सादुल्ला यांची निवड झाली. त्यांनी मसुदा समितीच्या ४४ पैकी फक्त ३० सभांना हजेरी लावली. अय्यर कृष्णा स्वामी अय्यर यांनी २७ तर के. एम. मुंशींनी फक्त २६ सभात भाग घेतला. देवीप्रसाद खेतान यांनी अवघ्या ३ सभांना हजेरी लावली त्यांच्या निधनानंतर एन. माधवराव यांची त्यांच्या जागी नेमणूक झाली त्यांनी २५ सभांना हजेरी लावली आणि एन. गोपाळ स्वामी अय्यंगार यांना काश्मीर प्रश्नासंबंधीची भारताची बाजू संयुक्त राष्ट्रसंघात मांडण्यासाठी जावे लागल्यामुळे ते मसुदा समितीच्या ४४ पैकी फक्त १० सभांना हजर राहू शकले दिनांक ११ ते २६ जानेवारी १९४८ या कालखंडात मसुदा समितीच्या ७ सभा झाल्या त्यात आंबेडकरांच्या बरोबर फक्त एन. माधवराव एकटेच उपस्थित होते.'

घटना परिषदेचे सल्लागार सर बी. एन. राव यांनी सादर केलेला मसुदा आणि घटना परिषदेच्या सर्व उपसमित्यांचे अहवाल अभ्यासल्यानंतर त्यात दुरुस्त्या केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक २१ फेब्रुवारी १९४८ रोजी संविधानाचा ३१५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टे असलेला अंतिम/ सुधारित मसुदा संविधानसभेत / घटना परिषदेत कलमवार चर्चेस घेण्यासाठी सादर केला हा मसुदा राजपत्रात प्रसिद्ध करून ८ महिनेपर्यंत जनतेच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला व ४ नोव्हेंबर १९४८ रोजी या सुधारित मसुद्यावर घटना परिषदेत पुन्हा चर्चेला सुरुवात झाली. घटना परिषदेत प्रत्येक सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर तिखटपणे ताकदीने, कमावलेल्या कायद्यांच्या भाषेत उत्तरे द्यायचे पण विचलित होत नव्हते. त्यामुळे घटना परिषदेतील सदस्यांचे समाधान व्हायचे चर्चेनंतर अनुच्छेदाची संख्या ३८६ पर्यंत वाढली

झाले होती सुमारे ७६.३५ दुरुस्त्या घटना परिषदेने सुचविल्यात आल्या त्यापैकी २४७३ दुरुस्त्या स्वीकारण्यात आल्यानंतर अनुच्छेदांची ३९५, २२ भाग, ८ परिशिष्टे आणि एक जोडपत्र इतकी संख्या झाली आणि अशा प्रकारे भारतीय राज्यघटना/संविधान आकारास आले.

भारतीय राज्यघटना निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खूप मोठे योगदान आहे. हे घटना परिषदेतील सर्वच सदस्य मान्य करतात आणि त्यांच्याबद्दल स्तुतीसुमने सुद्धा उधळतात. मसुदा समितीतील एक सदस्य टी. टी. कृष्णमाचारी यांचे दिनांक ५ नोव्हेंबर १९४८ चे घटना परिषदेतील भाषणांवर दृष्टिक्षेप टाकल्यास डॉ. आंबेडकर हेच राज्यघटनेचे खऱ्या अर्थाने शिल्पकार ठरतात. टी. टी. कृष्णमाचारी म्हणतात, 'अध्यक्ष महाशय, मी या सभागृहातील त्या सदस्यांपैकी एक सदस्य आहे की, ज्यांनी आंबेडकरांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकले आहे. राज्यघटनेचा मसुदा तयार करताना आंबेडकरांनी किती उत्साह दाखविला आणि किती कष्ट घेतले यांची मला कल्पना आहे. आपल्याला आता या क्षणाला या मसुद्याकडे लक्षपूर्वक बघावे असे वाटते. परंतु हा मसुदा जेव्हा तयार होत होता, तेव्हापासून समितीचे मात्र त्यांच्याकडे तिकडे लक्षपूर्वक पाहिलेले नव्हते याची मला जाणीव आहे. या सभागृहाला कदाचित हे ज्ञात असेल की, मसुदा समितीसाठी आपण ज्या ७ सदस्यांची नियुक्ती केली होती त्यापैकी एकाने आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आणि त्याची रिकामी जागा भरली गेली, दुसऱ्यांचे या कामात निधन झाले, तिसरे सदस्य अमेरिकेला गेलेले असल्यामुळे त्यांची जागा रिकामीच राहिली, चौथे सदस्य त्यांच्या राज्याच्या राज्यकारणात इतके गुंतले की, त्यांची पोकळी सतत जाणवत राहिली, पाचवे व सहावे सदस्य दिल्लीपासून खूप दूर राहत होते आणि मसुदा समितीचे काम करण्यासाठी त्यांना त्यांची प्रकृती साथ देत नव्हती, त्यामुळे या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याचे काम शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर पडले डॉ. आंबेडकरांनी हे कार्य ज्या चोखपणे पार पाडले ते निश्चितच प्रशंसनीय आहे. म्हणून त्यांच्या कार्याबद्दल आपण सर्वजण त्यांच्यासाठी कृतज्ञ आहोत'

डॉ. आंबेडकर हे घटना परिषदेतील सर्व सदस्यांची भाषणे खूप मन लावून ऐकत होते त्यांच्यातील विद्वत्ता तात्काळ जागृत झाली. आयुष्य जगताना सदैव विवेक जोपासणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'तुम्ही मला दिलेले श्रेय वास्तविक पाहता सर्वस्वी माझे नाही ते घटना परिषदेचे सल्लागार सर बी. एन. राव यांचे अंशतः आहे त्यांनी मसुदा समितीच्या विचारार्थ राज्यघटनेचा कच्चा मसुदा तयार केला होता. या श्रेयाचा काही भाग १४१ दिवस परिश्रम घेणाऱ्या मसुदा समितीच्या सदस्यांना आहे या श्रेयातील फार मोठा भाग राज्यघटनेचे प्रमुख मसुदाकार श्री. एस. एन. मुखर्जी यांच्याकडे

जाते.'

राज्यघटनेचा तयार झालेला मसुदा घटना परिषदेचे / घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सादर करण्याच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे २५ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना परिषदेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे झालेले अभ्यासपूर्ण भाषण सर्व सदस्यांचे लक्ष खेचणारे होते. लोकशाहीच्या भवितव्याची चिंता, काळजी त्यांच्या तोमारोमांत होती. 'संविधान सभेतील डॉ. आंबेडकरांची भाषणे' या छोटेखानी पुस्तिकेत समाविष्ट डॉ. आंबेडकरांच्या घटना परिषदेतील शेवटच्या भाषणातील काही अंश येथे उद्धृत करत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "माझ्या मते संविधान कितीही चांगले असले, ते राबविण्याची जबाबदारी ज्याच्यावर आहे ते जर अप्रामाणिक असतील तर, ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही तसेच संविधान कितीही वाईट असो ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही.'

'आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गाचीच कास धरली पाहिजे याचा अर्थ हा की, क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णतः दूर सारला पाहिजे.'

'केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुद्धा परिवर्तन करायला हवे राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही.'

'भारतात जाती आहेत जाती या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती जातीमध्ये तिरस्कारांची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे राष्ट्रनिर्मितीनंतरच बंधूत्व व वास्तवात पाहावयास मिळेल. बंधूत्वाशिवाय असलेली समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या बरवरच्या बरासारखा केवळ बाह्य देखावा असेल.'

नंतर दुसऱ्या दिवशी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान घटना परिषदेचे / घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सोपवले त्यांनी ते आदरपूर्वक सन्मानपूर्वक स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० पासून प्रत्यक्षात त्या संविधानाची अंमलबजावणीस प्रारंभ झाला तेव्हापासून खऱ्या अर्थाने भारतात प्रजेचे राज्य सुरू झाले म्हणूनच आपण २६ जानेवारी हा दिवस 'प्रजासत्ताक दिन' म्हणून उत्साहात साजरा करतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कष्टाने लिहिलेले संविधान वाचल्यानंतर या

संविधानावर बौद्ध धम्माचा खोलवर प्रभाव जाणवतो. खरे तर विद्यार्थी दशेपासूनच डॉ. बाबासाहेबांवर गौतम बुद्ध चरित्र आणि त्याच्या मानवतावादी धम्माचा प्रभाव राहिलेला आहे घटना निर्मितीचे काम करत असताना या प्रभावापासून ते अलिप्त राहू शकले नाही स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही तत्त्वेसुध्दा त्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीपासून नव्हे तर धम्मापासून उचलली आहेत. डॉ. वसंत मनोहर लोकराज्य, 'धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक' ऑक्टोबर २००६ मधील आपल्या 'धम्म म्हणजे भारतीय संविधानाचे प्राण तत्त्व' या लेखातून धम्म प्रभावाची मांडणी सविस्तर करतात डॉ. वसंत मनोहर म्हणतात, 'संविधानातून अधोरेखित झालेले मूलभूत कर्तव्य आणि मार्गदर्शक तत्त्वे या भागातील संपूर्ण आशयावर धम्माचा प्रभाव पडलेला आहे. इतकेच नव्हे तर संविधानातील विविध कलमावर धम्माचा प्रभाव स्पष्ट जाणवतो.'०८

पुढील कलमे ते उद्धृत करतात :-

कलम १५ :- संविधान कोणताही भेद मानत नाही.०९

कलम ७ :- संविधानाने अस्पृश्यता नष्ट करून टाकली आहे.१०

कलम ४४ :- संविधान एकरूप समान नागरी संहितेचा पुरस्कार करते.११

कलम ४६ :- दुर्बळ घटकांचे हित संविधानाला महत्त्वाचे वाटते.१२

कलम ४७ :- संविधान मादक पेयांचा निषेध करते.१३

कलम ५१ झ :- हिंसाचाराचा संविधान त्याग करते.१४

कलम ५१ ज :- विज्ञान दृष्टी, मानवतावाद, शोधक बुद्धी आणि सुधारणा वादाचा पुरस्कार संविधान करते.१५

अशाप्रकारे मानवतावादी मूल्यांची प्रतिस्थापना करताना डॉ. आंबेडकरांनी संविधानात माणूस केंद्रीविचार रूजविला बुद्धिप्रामाण्य, तर्कशुद्धता, विज्ञाननिष्ठता यांच्या मुशीतूनच भारतीय संविधानाची त्यांनी निर्मिती केली. राष्ट्राचे अखंडत्व आणि सार्वभौमत्व त्यांनी श्रेष्ठ मानले. त्याला धक्का पोहोचेल अशा सर्व प्रवृत्तीचा बिमोड करूनच संविधान लिहिले. या संविधानाचे / राज्यघटनेचे मोल कदापिही आपणांस विसरता येणार नाही.

संदर्भ ग्रंथ :-

१) डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना - डॉ. राजाराम कदम.

२) लोकराज्य, धम्मचक्र प्रवर्तनदिन, सुवर्णमहोत्सव, विशेषांक, ऑक्टोबर २००६.

३) संविधान सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, १५ ऑगस्ट २०२३

४) वृत्तान्त साप्ताह शतकोत्तर रौप्यमहोत्सवी महाविशेषांक २०१६, मुंबई .

५) आपला आदर्श, आपली प्रेरणा महात्मागण - प्रकाशन, महिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई १४ एप्रिल २०१७.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

डॉ. सुधीर बाळकृष्ण सांगोले

प्रपाठक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २०व्या शतकात मांडलेले मूलभूत आर्थिक विचार आज २१व्या शतकात खूप महत्त्वाचे वाटतात. त्यांचे विचार वाचताना लक्षात येते की त्यांचा दृष्टिकोण 'रुपयाचे विश्लेषण' या कठीण विषयावर त्यांचा प्रबंध वाचला की, त्यांची अर्थशास्त्रीय प्रतिभा लक्षात येते समाजशास्त्र, राज्यशास्त्र, धर्म, इतिहास, नागरिकशास्त्र, कायदेशास्त्र इ. जीवनोपयोगी विषयाचे विस्तृत ज्ञान असलेल्या बाबासाहेबांना अर्थशास्त्रीय विचार सामाजिक व राजकीय अंगानी मांडता आले. डॉ. अमर्त्य सेन यांनी गरिबांसाठीचे अर्थशास्त्र मांडले. बाबासाहेबांनी हेच गरिबांसाठीचे अर्थशास्त्र तिन्ही अंगानी आपल्यासमोर ठेवले. राजकीय, अर्थशास्त्र, सामाजिक अर्थशास्त्र व धार्मिक (आध्यात्मीक) अर्थशास्त्र असे तीन पैलू बाबासाहेबांनी चर्चिले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक क्रांतीसूत्र बहुआयामी आणि विविध लक्षणीय स्वरूपाचे आहे. डॉ. बाबासाहेबांचे ग्रंथ, कार्य आणि कर्तव्याच्या आर्थिक सूत्रातून विचार केला तर डॉ. आंबेडकर हे विश्वाला प्रकाश देणारा आर्थिक क्रान्ती सूत्राचा कणीही न थांबणारा सूर्य हे प्रकर्षाने जाणवते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे गाढे व्यासंगी होते कोलंबिया विद्यापीठात एम. ए. साठी 'प्राचीन भारतीय व्यापार' व पीएच. डी. साठी ही 'ब्रिटिश

हिंदुस्थानातील प्रतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती' असे त्याचे विषय होते. तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये डी. एससी. साठी त्यानी 'रुपयाचे प्रश्न' हा प्रबंध लिहिला. हिल्टन यंग कमिशन पुढे त्यानी दिलेली साक्ष चलनाच्या प्रश्नाच्या दृष्टिने अत्यंत महत्वाची होती.

भूमीहीन मजुर, लहान जमिनी, खोतपद्धती, महार वतन, सामुदायिक शेती, जमीन महसुल आणि जमिनदाराचे उच्चाटन या विषयांवर त्यांनी वेगवेगळ्या वेळी विचार प्रकट केले. भारतीय घटनेवरील भाषणात प्रसंगानुरूप त्यांनी केलेले विवेचन यातून त्याच्या अर्थशास्त्रीय विचाराचा मागोवा घेता येतो.

भारताच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न हे स्वप्नच ठरत आहे. तर शोषणाची व्यवस्था कायम असून देशात गरिबी, बेकारी व विषमता उग्ररुप धारण करीत आहे. अशा स्थितित देशाचा, अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी आणि देशाला स्वयंभू व विकसीत करुन देशात आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी आजही देशाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचाराची नितांत गरज आहे. म्हणुनच त्यांच्या अर्थशास्त्रीय अभ्यासाची व विचाराची ओळख व्हावी या हेतुने हा लेख प्रस्तुत करीत आहे.

१. प्रबंधात्मक ग्रंथातील डॉ. बाबासाहेबाचे आर्थिक विचार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठाला एम. ए. च्या पदवीकरिता १५ मे १९१५ ला 'ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व अर्थव्यवस्था' या विषयावर प्रबंध सादर केला. यात त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त व्यवस्था कशी होती. त्यांची वैशिष्टे. महसुलाची पद्धत व प्रमाण मिळणाऱ्या महसुलाचा खर्च इत्यादी बद्दल सविस्तर माहिती दिली आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील महसुल धोरणाची चर्चा त्यांनी केली आहे. भारतातून वसुल केलेल्या महसुलातून मात्र कमी खर्च सर्वसाधारण लोकांच्या कल्याणासाठी केला जातो. त्यामुळे भारतीय लोक विकासापासुन वंचीत राहतात. ब्रिटीश सरकारच्या भारतातील कामगिरीचे विवेचन करतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'भारताने इंग्लंडसाठी केलेले आर्थिक योगदान हे जेवढे थक्क करणारे आहे. तेवढे इंग्लंडने भारतीयासाठी केलेले योगदान विस्मयकारक आहे.'

१९२४ मध्ये डॉ. बाबासाहेबांनी पीएच. डी. पदवी प्राप्त करण्यासाठी कोलंबिया विद्यापीठाला सादर (१) केलेल्या "The Evolution of provincial Finance in british India" या ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेबांनी स्थानिक स्वराज्य संस्था, त्यावेळेची घटक

राज्ये व ब्रिटिश केंद्र सरकार यांच्यातील आर्थिक व्यवहाराची मीमांसा केली आहे.

डॉ. बाबासाहेबांनी "The problem of Rupee" हा प्रबंध डीएस (D.Sc) साठी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला सादर केल्यानंतर १९२३ला प्रकाशित करण्यात आला. सदर प्रबंधात्मक ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेबांनी सन १८०० ते १८९३ या कालखंडातील भारतीय चलनाची जडण-घडण कशी होत गेली यांची मिमांसा डॉ. बाबासाहेबांनी केली. सन १८७३ नंतर सोने आणि चांदी विनिमयाचा दर स्थिर ठेवणे कठीण झाल्यामुळे देशाचे कशे नुकसान झाले. याविषयी सविस्तर विश्लेषण डॉ. बाबासाहेबांनी यामध्ये केले आहे. आजच्या आर्थिक परिस्थीतीचे अवलोकन केले असता झालेली भाववाढ इत्यादी बाबीवर डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक दृष्टिकोनातून विचार होणे आवश्यक आहे.

२. डॉ. बाबासाहेबांचे आर्थिक स्वातंत्र्यता व आर्थिक विकास :

जातीव्यवस्थेच्या अंतर्गत प्रत्येक व्यक्ती आपल्या अनुवांशिक किंवा जातीगत व्यवसाय करण्यात कटीबंध राहतात. जरी त्यांना त्या व्यवसायामध्ये आवड किंवा आकांक्षा अनुरुप जरी नसले. यामुळे व्यक्तीमध्ये आर्थिक क्षेत्रात उदासिनता व अकार्यक्षमता निर्माण होते. त्यामुळे त्यांची कार्यकुशलता कमी होते. भिन्न-भिन्न व्यवसायावर भिन्न-भिन्न जातीच्या एकाधिकार असल्याने आर्थिक क्षेत्रात स्पर्धेमध्ये अभाव दिसुन येतो. तसेच आर्थिक क्षेत्रामध्ये अनुसंधान, उद्यम, प्रशिक्षण या गोष्टीचा मुद्दा विकास होत नाही.

अशाप्रकारे जातीव्यवस्था ही परंपरागत अर्थव्यवस्था आधुनिक अर्थव्यवस्थेत परिवर्तीत होण्याच्या प्रक्रियेमध्ये आड येते. आज भारतीय अर्थव्यवस्था विकसीत बनण्यामध्ये जो उच्चांक गाठत आहे. यामध्ये डॉ. बाबासाहेबांनी आर्थिक स्वातंत्र्य संदर्भात आपले विचार मांडुन नवी दिशा दिली आहे. यावरुन असे दिसुन येते की जर समतामुलक समाज रचना तयार करायची असेल तर डॉ. बाबासाहेबांनी मांडलेल्या आर्थिक स्वातंत्र्यातुन होवु शकते हे स्पष्ट होते.

३. डॉ. बाबासाहेबांचे शेती विषयक सुधारणा :

डॉ. बाबासाहेब यांचे शेती विषयक विचार व कार्य हे भारताला नवी दिशा देऊन आर्थिक बाबतीत सक्षम बनवणारे आहे. स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँण्ड देअर रेमीडीज' हा लेख सर्वप्रथम Journal of the Indian economic society, Vol I" यामध्ये १९१८ मध्ये प्रसिध्द झाला. यामध्ये डॉ. बाबासाहेबांनी शेती विषयक मुलभुत प्रश्न मांडले आहेत. बाहेर देशातील धारण क्षेत्रातील उदा. देतांना ते म्हणतात इंग्लंडमध्ये

क्षेत्रे धारण क्षेत्र आहे. फ्रान्स मध्ये लहान धारण क्षेत्र आहेत. तसेच हॉलंड आणि डेन्मार्कमध्ये आहेत. पूर्व प्रदेशाचे उदा. देताना ते म्हणतात, येथील धारण क्षेत्र २५.९ एकरापासून तर पुण्याजवळील फिरता सौदागर येथील १ ते २ एकरापर्यंत आहे. हि धारण क्षेत्रे भारतीय शेतीकरिता फारच गंभीर बाब आहे असे म्हटल्या जाते. लहान धारण क्षेत्राबाबत डॉ. बाबासाहेब म्हणतात. "The evils of small holdings are certain. The evil of fragmentation are very great and must be met by a comprehensive scheme of consolidation" जमीनीच्या आकारामुळे शेतीच्या उत्पादनावर परिणाम होतो. यावर उपाय सुध्दा डॉ. बाबासाहेबांनी सुचविला आहे. तो म्हणजे 'शेतीचे राष्ट्रीयकरण होय. सामुदायीक शेती संदर्भात त्यांनी आपले विचार मांडून आदर्श शेती व्यवसायामुळे शेतकरी हा आपले राहणीमान बदलू शकेल हे ते जाण होते. तसेच डॉ. बाबासाहेबांनी १७ सप्टेंबर १९३७ रोजी बॉम्बे विधिमंडळात खोती जमीनदारी पद्धती रद्द करणारे पहिले विधेयक सादर केले. त्यांच्या विचार आणि कार्यामुळे महार वतन व खोती पद्धत रद्द करण्यासंदर्भात सरकार दरबारी विचार मांडून रद्द करण्यास भाग पाडले.

४. डॉ. बाबासाहेबांचे कामगारांचे आर्थिक प्रश्नांबाबत कार्य :

भारतातील कामगार वर्गाचे आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी डॉ. बाबासाहेब हे सातत्याने संघर्ष करीत राहिलेत म्हणूनच कामगाराची स्वतंत्र संघटना असावी असे त्यांना वाटत होते. कारण कामगारामध्ये आपआपसातील वाद भयंकर होते. त्यात जातीवादाने शिरकाव केल्यामुळे अस्पृष्ट कामगाराची स्थिती दयनिय होती. सावकाराच्या तडाख्यात दलित समाज सापडला असल्यामुळे त्यांची परिस्थिती बाईट होती. त्या विरुध्द कामगार पुढाऱ्यांनी आवाज उठवला नव्हता. अस्पृश्य कामगाराचे दोन प्रमुख शत्रू होते भांडवलशाही व ब्राम्हणशाही म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, कापड विणण्याचे काम स्पृश्यांनी केले काय? किंवा अस्पृश्यांनी केले काय? मालकाला त्यात सुख-दु:ख नाही, त्यांचा माल विकाला त्याचा फायदा झाला म्हणजे झाले. "गिरणी कारखान्यात कामगारामध्ये जातीभेद असला तरी कारखानदारांचा उद्देश नफा कमावण्याचा आहे. मग तो माल कोणी तयार करत असो. तर गिरणी कामगारांना काहीच आक्षेप नसे. परंतु कामगारांमध्ये अंतर्गत भेदभावपुर्ण व्यवहार धोकादायक आहे. म्हणुनच अस्पृश्य कामगारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी न्याय मिळून देण्यासाठी आपले विचार मांडून कार्य केले.

५. डॉ. बाबासाहेबांचे चलनव्यवस्थेविषयी विचार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा रुपयाचा प्रश्न त्यांचे मुळ आणि सर्वात पहीलीतली लिहलेल्या प्रबंधात चलनाविषयी माहिती मिळते. हा ग्रंथ १९२३ मध्ये प्रकाशित करण्यात आला. डॉ. बाबासाहेबांनी चलनपध्दतीचा ग्रामीण अर्थव्यवस्था वस्तुची अदलाबदल करुन व्यवहार चालवण्यापासून ते सोने-चांदी या धातुचे चलन आणि आजचे कागदी चलन खाल्यापर्यंत सांगोपांग व जिज्ञासू प्रवृत्तीने अभ्यास करुन त्यांचा शोध घेवून ग्रंथात अचूक व विस्तृत माहिती दिली. डॉ. बाबासाहेब सांगतात की, ब्रिटीश राजवटी पुर्वी मोगल साम्राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचा पाया अकबराने घातला. त्या काळापासून भारतात प्रामुख्याने चलन म्हणुन सोने-चांदी किंवा इतर धातुंचा वापर होत असे. तसेच ब्रिटीश पुर्वी राजकीय नोकरांना आणि सैनिकांना वस्तु स्वरुपाने पगार मिळत असे. ब्रिटीशांनी त्या ऐवजी रोख पैसे देण्यात सुरुवात केली.

डॉ. आंबेडकरांचे तर्कनिष्ठ आणि दृढ मत होते, की जोपर्यंत रुपयाच्या सामान्य क्रयशक्ती मध्ये स्थिरता येत नाही. तोपर्यंत हे चलन स्थिर होण शक्य नाही आणि प्रामुख्याने ही बाब विनिमय प्रमाणामुळे शक्य होत नव्हती. या व्यवस्थेमुळे रोगाचा मूळ कारणाचा शोध घेण्याऐवजी फक्त लक्षणे विचारात घेवून उपाय केला जात होता. डॉ. बाबासाहेबानी हे सुचवलेले विचार सत्य आणि मुलगामी होते.

६. डॉ. बाबासाहेबांचे औद्योगिकीकरण्यासंबंधी विचार :

औद्योगिकीकरणा संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'औद्योगिक नीती अशाप्रकारे असली पाहिजे की, ज्याच्या परिणाम स्वरुप अधिकतम उत्पादनाची निपुणता आणि उत्पादना बरोबरच आंतरराष्ट्रीय औद्योगिक बाजारामध्ये देशी उद्योग व त्याच्या उत्पादनाची प्रतिस्पर्धा क्षमता प्रतियोगिता पुर्ण आणि लाभकारी असली पाहिजे. उद्योग क्षेत्रात अशी परिस्थिती कायम राहिल्याने देशाचा औद्योगिक आणि आर्थिक विकासामध्ये गुणात्मक संवर्धन होणे संभव आहे. ते पुढे म्हणतात, 'कोणतेही राष्ट्र भांडवलशाही असो वा समाजवादी त्यांना उद्योग क्षेत्रामध्ये प्रगती व विकासासाठी हा सिद्धांत वापरावा लागेल.'

डॉ. बाबासाहेबांना क्रांतीकारी औद्योगिक विचाराला अनुसरुन भारताची इंडस्ट्रियल रिजोल्यूशन पॉलिसी-१९५६ तयार करुन हे मानवी कल्याणावर त्याचा कोणता परिणाम होतो. या दृष्टीकोनातुन त्यांनी आर्थिक हालचालीचा अभ्यास केला होता. हा अभ्यास संपत्ती किंवा आर्थिक संबंध यांच्या बदलाचा नव्हता. तर माणूस व त्यांची निवड यांच्याशी होता. विशेष म्हणजे सामान्यात न्याय नितीने संपत्तीचे विभागणी करणे हा हेतू त्यांचा विचारा मागे होता.'

भारताला सावरायचे असले तर डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक विचारावर भर देणे कर्मप्राप्त ठरेल. त्यांच्या या विचार व कार्याला विचार वंदन.

संदर्भसूची

१. कुबेर, वा. ला. डॉ. आंबेडकर विचारमंथन, सुगावा प्रकाशन, पुणे, आ. १९९८, पृष्ठ क्र. २३६.

२. इंगळे, एम. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक व राजकीय विचार, नम प्रकाशन, अम, आ. २०११, पृष्ठ क्र. २०.

३. किता, पृष्ठ क्र. २८.

४. यादव, वीरेन्द्र सिंह, समता मूलक समाज एवंमय सामाजिक परिवर्तन के युग पुरुष: डॉ. भिमराव अम्बेडकर, ओमेगा पब्लिकेशन, दिल्ली, आ. २०११, पृष्ठ क्र. ३२९, ३३०.

५. इंगळे, एम. आर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक व राजकिय विचार, नम प्रकाशन, अमब, आ. २०११, पृष्ठ क्र. ३१,३२.

६. कुबेर, वा ला. डॉ. आंबेडकर विचारमंथन, सुगावा प्रकाशन, पुणे, आ. १९९८, पृष्ठ क्र. २०

७. सूर्या, अनिल, डॉ. आंबेडकरांचे आर्थिक, धार्मीक, राजकीय कान्तीसुत्र, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, आ. १९९८, पृष्ठ के २४.

८. पासवान सुकन, केवल दलितो के मसिया नही है अम्बेडकर, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली. आ. २०११ पृष्ठ के ६०.

◆ ◆ ◆

जातीव्यवस्था नष्ट केल्याशिवाय अस्पृश्यता नष्ट होणार नाही – सत्य की परिकल्पना

डॉ. प्रदीप लक्ष्मणराव अंबोरे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,

उत्तम नगर,अमरावती - ४४४६०६

प्रस्तावना :-

सर्वधर्मसमभाव
गुरूजी आम्हास सांगतात
शाळेत प्रवेश घेताना मात्र
दाखला जातीचा मागतात।

ह्या वास्तवदर्शी ओळींनी मन सुन्न होऊन आपल्या भारतीय समाजमनावर जातीची पकड किती घट्ट आहे, याची जाणीव होते.

शाळेमध्ये 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत' ही प्रतिज्ञा म्हणताना आपल्या देशाबद्दलच्या अभिमानाने मस्तक अधिक उंच होते. पण सारे भारतीय माझे बांधव आहेत हे केवळ बोलण्यापुरतेच मर्यादित आहे असे वाटते. कारण देशाला स्वातंत्र्य मिळून आज ७५ वर्षे लोटली, पण भारतीय समाजव्यवस्थेला लागलेली जातीय विषमतेची किड देशातून निघू शकली नाही ही शोकांतिका आहे.जिथे जातीजातीत उच्च-निच, श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद केला जातो तिथे आपण उच्चारतो सारे भारतीय माझे बांधव आहेत. किती विरोधाभास आणि वाणीतला फोलपणा आहे हा !

म्हणूनच जातीव्यवस्था नष्ट केल्याशिवाय अस्पृश्यता नष्ट होणार नाही. ही परिकल्पना नसून सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे.

भारतीय समाजातील जातीव्यवस्था :-

भारतीय समाजव्यवस्थेचा जातीव्यवस्था हा एक अविभाज्य घटक आहे. जगाच्या इतिहासात भारतीय संस्कृतीला श्रेष्ठ गणल्या जाते. पण भारतीय समाजसंस्था वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या चक्रव्युहात गुरफटल्यामुळे संस्कृतीची उदात्तता रसातळाला गेली आहे.

भारतीय सामाजिक संरचनेचे तत्व म्हणजे चार वर्ण. ब्राम्हण - वेदपठन आणि धार्मिक क्रिया करणारा, क्षत्रिय - लढवय्या, वैश्य - व्यापार करणारा, शुद्र - सेवा करणारा. ह्या चार्तुवर्ण व्यवस्थेन्तर्गत येणाऱ्या जातींमध्ये भारतीय समाजातील लोकांची विभागणी, जातीची श्रेणीबद्ध रचना, जातीची उतरंड मनुस्मृतीद्वारे करण्यात आली. प्रारंभीच्या काळात वरील चार वर्ण होते. परंतु नंतरच्या काळात चार जाती बनल्या आणि नंतर चार जातींच्या हजारो जाती बनल्या. जातीव्यवस्थेने श्रमिकांचे विभाजन केले. त्यांचे काम अथवा व्यवसाय हा जन्मावर आधारीत असल्याने व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य जातीव्यवस्थेने पूर्णत: अमान्य केले होते. जातीव्यवस्थेने केलेली ही उद्योगाची प्रतवारी अत्यंत घातक होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,'जात' हा शब्द समान दर्जाचा नाही. एक जात दुसऱ्या जातीच्या तुलनेत स्वत:ला श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मानते. म्हणूनच आज विभिन्न जातीव्यवस्थेमुळे देशात लोकशाही शासनप्रणाली अस्तित्वात असताना जातीय दंगली, जातीयतेवरून होणारे अन्याय, अत्याचार, अस्पृश्यता संपुष्ठात आलेली नाहित.

आपल्या देशातील जात हा बंद वर्ग आहे. मनुष्य ज्या जातीत जन्माला येतो त्याच जातीत त्याचा शेवट होतो. तो कितीही शिकला, पुढे गेला तरीही जातीचे लेबल काढू शकत नाही. म्हणतात ना 'जी जात नाही ती जात'. पाश्चात्य देशात गरिब-श्रीमंत अशी वर्गपद्धती असल्यामुळे मनुष्य आपल्या कार्यकर्तृत्वाने, बुद्धिमत्तेने गरीब हा श्रीमंत होऊ शकतो. त्यामुळे आपल्या देशाच्या तुलनेत पाश्चात्य देशांची प्रगती झपाट्याने होत आहे. आपण मात्र आपल्या आवडीनुसार कोणत्याही दिशेने पळालो तरीही जातीचा राक्षस आपला रस्ता रोखून बसला आहे. या राक्षसाला ठार मारल्याशिवाय सुधारणेचे प्रवेशद्वार उघडणे अशक्य आहे.

अस्पृश्यता भारतीय समाजाला लागलेला कलंक :-

भारतीय समाजव्यवस्थेची अस्पृश्यता एक अमानवीय समस्या आहे. कारण अस्पृश्यता अप्रत्यक्ष गुलामी असून गुलामीपेक्षाही सर्वात वाईट, घृणास्पद प्रकार आहे. शोकांतिका अशी की अस्पृश्यता पाळणे म्हणजे धर्मानुसार आचरण करणे अशी

समाजमान्यता असल्यामुळे अस्पृश्यता नष्ट होत नाही. अस्पृश्य म्हणजे स्पर्श करण्यास अयोग्य. मानवजातीस जे साधे अधिकार असतात त्या अधिकारांपासून अस्पृश्यांना वंचित ठेवल्या जाते. मानवी विकासाची झेप थोपविण्याचे काम ह्या स्पृश्यास्पृश्य भेदाने केले आहे. भौतिक प्रगतीच्या कुठल्याही क्षेत्रात भारतीय समाजाने प्रगती केली नाही. विज्ञान-तंत्रज्ञान केवळ पश्चिमी देशातच विकसीत झाले. भारतात नव-नवे शोध का लागले नाहीत ? याला कारण हे होते की येथील मानवी बुद्धी जाती संस्कारात, स्पृश्यास्पृश्य भेदांमध्ये बांधल्या जाऊन त्यांची शोधक बुद्धी मारल्या गेली.

आपल्या समाजात जातीला पवित्र, दैवी, धार्मिक असल्याची मान्यता दिल्यामुळे जातीव्यवस्थेत कोणत्याही प्रकारचे परिवर्तन होवू शकले नाही. तर ती अधिक मजबूत झाली.

डॉ. आंबेडकरांच्या मते जातीव्यवस्था आणि त्यातून उदयास आलेली अस्पृश्यता ही सामाजिक समता, बंधुता आणि स्वातंत्र्याला घातक आहे. मानवी मुल्यांच्या विरोधी आहे. जी व्यवस्था सामाजिक विषमतेचा पुरस्कार करते त्या व्यवस्थेकडून समता, बंधुत्व, स्वातंत्र्य आणि न्याय मिळेल अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे.

भारतीय समाजातील अस्पृश्यतेचे स्वरूप :-

भारतीय समाजात प्राचीन काळापासून अस्पृश्यतेचे स्वरूप महाभयंकर होते. आजच्या आधुनिक काळात संविधानाने अस्पृश्यता पाळण्यावर कायद्याने बंदी घातली असली तरीही सत्य पचवणं जड जाईल,पण देशातल्या अनेक भागात अस्पृश्यता आजही जिवंत आहे. युगानुयुगे धर्मपरंपरेने चालत आलेल्या अस्पृश्यतेत फारसा फरक आढळून येत नाही. रस्त्यावरून चालताना कमरेला खराटा आणि गळ्यात गाडगं बांधून चालणाऱ्या अस्पृश्याच्या पावलांनी आणि सावलीनेही रस्ता अपवित्र होईल, अशी धारणा असलेला आपला भारतीय समाज ! चुकून अस्पृश्य व्यक्तीचा स्पर्श सवर्णाला झाल्यास भयंकर अशी कठोर शिक्षा अस्पृश्यांना मिळत असे. कारण अस्पृश्यतेला हिंदू धर्मातील एक धर्ममान्य रूढी म्हणून मान्यता मिळाली होती. त्यामुळे अस्पृश्यांना प्रत्येक क्षेत्रात सापत्नभावाची वागणूक मिळत असे. शाळा, मंदिरे, विहीरी, सरकारी कार्यालये, बँका, पोलिस खाते, न्यायालये अशा प्रत्येक सार्वजनिक स्थळी अस्पृश्यांना अपमान, छळ, हल्ला, मारहाण सहन करावे लागत.

ही प्रस्थापित व्यवस्था म्हणजे स्पृश्यांनी तयार केलेला कायदा होय. त्याचे पालन करण्यापलीकडे अस्पृश्यांनी त्याची अधिक चौकशी करायची नाही. या व्यवस्थेचा त्यांनी आदर बाळगला पाहिजे. त्यांना स्पृश्यांविरुद्ध कोणताही हक्क नाही. समान अधिकार

CamScanner

नाहीत. दाद मागावी असा न्याय त्याच्या बाजूने नाही. हक्क मिळावा म्हणून अस्पृश्याने आग्रह देखील धरू नये. मानवजातीस जे साधे अधिकार असतात त्या अधिकारांपासून देखील अस्पृश्यांना वंचित ठेवले गेले. मानवजात म्हणूनही अस्पृश्य अयोग्य आहेत अशी हिंदूंची भावना होती.

अस्पृश्यांच्या जगण्याचं भिषण वास्तव पुढील ओळीतून जाणवतं:

रक्ताळलेल्या मनात
एक स्वप्न वाहून गेलं
मलाही माणूस म्हणून जगायच होतं
पण, एका अस्पृश्याचं
माणूस म्हणून जगणं राहून गेलं !

स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षातील अस्पृश्यता :-

यावर्षी आपण स्वतंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला.पण जातीचे भूत आपल्या मानगुटीवर अजूनही कायम आहे. जातीअंताबाबत आपण कोणतेही प्रयत्न करत नाही. किंबहुना येथील राज्यकर्ते तसे होऊ देत नाहीत. आर्थिक स्तर बदलला की आपोआप सामाजिक सुधारणा होईल ही आपली धारणा साफ चुकीची आहे. जातीयता किती अवैज्ञानिक आहे हे शिक्षणातून शिकविले जात नाही. मग अस्पृश्यता निवारण कसे होईल ?एका पिढीकडून दुस-या पिढीकडे संक्रमित होणारे संस्कारच मुळात चुकीचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुरस्कृत केलेल्या आंतरजातीय विवाहाला कुटूंबाची, समाजाची मान्यता मिळत नाही. कारण जातीबाहेर, धर्माबाहेर विवाह म्हणजे पाप अशी धारणा समाजाची आहे. अस्पृश्यता पाळण्यावर कायद्याने कडक निर्बंध लादले आहेत. पण समाजमनोवृत्तीचे काय ? लोकांच्या मानसिकतेतून अस्पृश्यता गेली नाही. त्याचे पडसाद आजही समाजात दिसून येतात.

कर्नाटकातील कोटपल जिल्ह्यात दोन वर्षाच्या दलित मुलाने मंदिर प्रवेश आणि मुर्तिला स्पर्श केल्याकारणानेत्याच्या वडीलांवर ६० हजार रुपयांचा जबर दंड ठोठविण्यात आला.

चुंदूरमध्ये आजही दलित विद्यार्थ्यांना शाळेत इतरांबरोबर बसू न देण्यावरून जातीयवाद आणि त्यातून भिषण हत्याकांड घडले.

दलित तरूणांना केस कापण्याच्या कारणावरून गावातून बहिष्कृत करण्यात आले. कारण लिंगायत समाजातील उच्च जातीचे लोक केस कापू शकतात अशी धार्मिक मान्यता चुंदूरमध्ये आजही कायम आहे.

धुळ्याच्या मोहरगाव येथे दलित तरूणांना बैलपोळा मिरवणुकीत आपले बैल मिरविण्यासाठी मज्जाव व मारहाण करण्यात आली.

बीडमधील पिंपळगाव येथे २०१६ मध्ये पाणी टंचाईने दलित वस्तीपर्यंत पाणी पोहोचले नसल्याने १० वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला.

२०१६ मध्ये वाशिम जिल्ह्यातील कोळंबेश्वरमध्ये एका दलित महिलेस सवर्ण व्यक्तीने विहिरीवरून पाणी भरू न देता अपमानास्पद वागणूक दिली.

नॅशनल कॅम्पेन ऑन दलित ह्युमन राइट्सच्या (NCDHSR) रिपोर्ट्सनुसार देशातील २० % दलितांना स्वच्छ प्यायचे पाणी मिळत नाही. ४८.४% दलितांना पाण्याचा स्त्रोत नाकारला जातो. तर केवळ १०% दलित घरांना स्वच्छतागृहाचा वापर करता येतो.

शहरामध्ये २०% लोक आणि खेड्यामधील ३०% लोक अस्पृश्यता पाळतात. अस्पृश्यता पाळणाऱ्यांमध्ये ब्राम्हणांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. हा भेदभाव शहरातले ६२% ब्राम्हण आणि ३९% ब्राम्हण अजूनही पाळतात. यानंतर इतर मागासवर्गीय आणि ब्राम्हणेत्तर उच्चवर्णीय यांचा क्रम लागतो.

अस्पृश्यता विरोधी चळवळी

महात्मा जोतिबा फुल्यांची चळवळ :-

फुले हे सामाजिक समतेच्या चळवळीचे प्रवर्तक होते. त्यांनी अस्पृश्यांना शिक्षण देऊन आपल्या हक्काची जाणीव करून दिली. क्षुद्रांचे अध:पतन होण्यास कारणीभूत घटक त्यांनी 'शेतक-यांचा आसूड' या ग्रंथात समर्पकपणे मांडले आहे.

विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्तविणा क्षुद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।

त्यामुळे अतिक्षुद्रांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करून 'महार-मांग इ. लोकांस विद्या शिकविण्यासाठी मंडळ' या नावाने संस्था काढली. जातीव्यवस्थेवर टिका करण्यासाठी 'गुलामगिरी', 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथांचे लेखन केले. समाजात समता, बंधुता व स्वातंत्र्य हे विचार रूजावेत याकरीता १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समतेचे कट्टर समर्थक होते. त्यांना बालपणापासून अस्पृश्यतेचे चटके सोसावे लागले. जे आपण भोगले ते आपल्या बांधवाच्या वाट्याला येवू नये यासाठी त्यांनी भारतातील दलित चळवळीचा चेहरा बदून अस्पृश्यता नष्ट करण्याकरीता कार्य केले. १९३० ते १९३५ या काळात नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रह, १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृतीचे दहन, १९३० मध्ये अस्पृश्य समाजाकरीता स्वतंत्र मतदार संघाची मागणी करून अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून दिले.

सन १९२४ ते ३५ अशी सलग ११ वर्षे बाबासाहेबांनी अनेक चळवळी केल्या. पण सवर्ण मानसिकता 'अधर्मेण धनप्राप्ती यो मन्यते तमस: वृता' या गीतापंक्तिप्रमाणे अधर्माला धर्म समजून विपरीत दुष्ट व्यवहार करण्यात धन्यता मानत होती. म्हणून १९३५ मध्ये येवला मुक्कामी 'मी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी घोषणा केली. समाजातील व्यक्तीचे संबंध बंधुत्व, न्याय आणि समता या मूल्यांवर अधिष्ठित असावेत या विचारसरणीला अग्रणी ठेवून माणूसपणाची शिकवण देणारा, विज्ञानवादी बौद्ध धम्म आपल्या लाखो बांधवांसह स्वीकारून दलित, शोषित समाजासमोर समतेचा आदर्श ठेवला. धर्मनिरपेक्ष लोकशाही तत्वावर आधारलेली राज्यघटना लिहून देशाला न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता अशी मौलिक विचारधारा दिली.

भारतीय संविधानातील तरतुदी :-

देशातून अस्पृश्यतेचे उच्चाटन व्हावे याकरीता १९५५ साली संसदेने अस्पृश्यताविरोधी कायदा मंजूर केला. भारतीय घटनेतील कलम १४ ते १८ या कलमात समानतेचा हक्क आहे. त्यानुसार कलम १७ हा अस्पृश्यता नष्ट करण्यासंदर्भात आहे. भारतीय समाजात निव्वळ कायद्याने अस्पृश्यता आटोक्यात येणार नाही. कायद्याचे उल्लंघन व्यक्तीकडून झाले, तर कायदा फार काही करू शकत नाही. सामाजिक भान हेच सा-या हक्कांचे रक्षण करते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय समाजात होणारे दलितांवरील अत्याचार व शासनकर्त्यांची उदासिनता :-

ज्यावेळी मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे नामकरण झाले त्यावेळी महाराष्ट्रात जी जातीय दंगल उसळली ती दंगल म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासाला लागलेला डाग आहे. २९ सप्टें. २००६ रोजी महाराष्ट्रातील जिल्हा भंडारा, ता. मोहाडी येथील खैरलांजी गावात एका दलित कुटूंबातील चार जणांची

जातीयवादातून निर्घृण हत्या करण्यात आली. १२ नोव्हे. २०१२ रोजी अस्पृश्यता निवारण्यात प्रगतीशील समजल्या जाणाऱ्या तामिळनाडू राज्यात धर्मापुरी येथील सवर्ण मुलीने दलित मुलाशी विवाह केल्यामुळे तिच्या वडीलांनी आत्महत्या केली. आत्महत्येचा बदला म्हणून सवर्णांनी तीन दलित वस्त्यातील २६८ झोपड्या जाळून बेचिराख केल्या. अशा एक नाही अनेक घटना दलितांवर होणाऱ्या अत्याचाराच्या आहेत, ज्या त्यांचा स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार हिरावून घेतात. दलित स्त्रीयांवर होणा-या अत्याचाराकडे पोलिस यंत्रणा आणि शासनकर्तेसुद्धा दुर्लक्ष करतात. तेच एखाद्या सवर्ण स्त्रीबाबत झाल्यास संपूर्ण समाज एकत्र येतो. मोर्चे, निदर्शने काढली जातात. गुन्हेगारास शिक्षा होईपर्यंत पाठपुरावा केला जातो. दिल्लीत घडलेले 'निर्भया' प्रकरण याची साक्ष आहे.

ह्या समाजविघातक घटना पाहता देशातील कायदा, सुव्यवस्था, तपासयंत्रणा, दलित अत्याचार प्रतिबंधक अधिनियमातील त्रुटी यासंदर्भात प्रश्न उपस्थित होतात. समाजातअसलेली जातीय असहिष्णुता किती गडद आहे, हे लक्षात येते.

अस्पृश्यता नष्ट होईल कशा ? :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, अस्पृश्यता ही हिंदूधर्माच्या तत्वज्ञानातच लपविष्ट आहे. म्हणून बाह्य आचरणात जरी नाईलाज म्हणून लोकांनी अस्पृश्यता पाळली नाही, तरी ती त्यांच्या मनातून निखळून पडली आहे असे समजू नये. यावरून लक्षात येते की अस्पृश्यतेची समस्या सहज नष्ट होणे शक्य नाही. जेव्हा हिंदू आपली मानसिकता बदलतील त्यावेळी अस्पृश्यता नष्ट होईल. त्यासाठी भारतीय समाजाच्या जीवनपद्धतीत बदल करण्याची मानसिकता हवी. अंधश्रद्धा, धार्मिक रूढी, परंपरांना फाटा देऊन आधुनिक आणि विज्ञानवादी विचारसरणी आणि दृष्टीकोन जोपासल्यास अस्पृश्यता नष्ट होण्यास मदत होईल. जातीप्रथा, अस्पृश्यता समूळ नष्ट करण्याकरीता जातीव्यवस्थेवर आघात करून समाजात समानतेची मूल्ये रूजवावी लागतील. समाजमनात शास्त्रे आणि धर्मग्रंथ पवित्र असल्याबद्दलची श्रद्धा नष्ट करावी लागेल. कारण लोकांच्या मनावर अंधश्रद्धा बिंबविण्याचे व त्यानुसार त्यांची मने घडविण्याचे कार्य धर्मग्रंथ करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारण्याबाबत जो इशारा दिला आहे, तो फार महत्वाचा आहे. देशातील प्रत्येक स्त्री- पुरूषास शास्त्राच्या दास्यातून मुक्त करा, शास्त्राच्या पायावर आधारलेल्या अपायकारक कल्पनांपासून त्यांची मने स्वच्छ करा, तेव्हाच ते कोणाच्याही उपदेशाशिवाय सामाजिक परिवर्तनास तयार होतील. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना मान्यता देवून त्यांचा प्रचार-प्रसार होणे आवश्यक आहे.

[illegible]

[illegible]

* * *

मराठा आरक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

स्वप्निल वि. मानकर
सहायक विद्यार्थी
वर्गणीय संशोधन केंद्र
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती

सारांश :

ओबीसी यादीतील जातींना महाराष्ट्रात १४% आरक्षण लागू होते. १९८० साली केवळ २ दिवस महाराष्ट्रात आलेल्या मंडल आयोगाने मराठा समाजाला पुढारलेला समाज ठरवून आरक्षण नाकारले. २२ फेब्रुवारी २००० रोजी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाला परत एकदा प्रतिष्ठित समाज ठरवून आरक्षण नाकारले. २३ ऑगस्ट २००४ रोजी खत्री आयोगाने मराठा कुणबी आणि कुणबी मराठा जोडी असलेल्या मराठ्यांना आरक्षण यादीमध्ये कुणबी पोट जाती म्हणून आरक्षण लागू केले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी बापट आयोगाची स्थापना केली. बापट आयोगाचा संपूर्ण अहवाल मराठा समाजाच्या बाजूने असला तरीसुद्धा एका सदस्याच्या अपूर्वसंचितीत बापट आयोगाच्या सदस्यांनी मराठा समाजाला आरक्षण नाकारण्याचा निर्णय दिला. २०१४ मध्ये मराठा समाजाला ५०% बाहेरच्या बेकायदेशीर आरक्षणाचे गाजर दिले गेले, त्यास न्यायालयाने स्थगिती दिली. भाजपचे सरकार आल्यानंतर त्यांनीही २०१८ मध्ये गायकवाड आयोगाचा अहवाल असतानासुद्धा मागासवर्ग यादीमध्ये आरक्षण न देता ५०% च्या बाहेरील बेकायदेशीर आरक्षण दिले. हे आरक्षण टिकविण्यासाठी मुंबई हायकोर्टातील मराठा वकिलाच्या अथक परिश्रमातून यश आले. तथापि सुप्रीम कोर्टाने ५०% च्या बाहेरचे आरक्षण

केवलवंशीय ठरवत ५ मे २०२१ रोजी मराठा आरक्षण फेटाळून लावले. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळण्याचा मार्गच बंद केला गेला. हे संशोधन पत्रिका सदरील मराठा आरक्षणाबाबत सर्वेक्षणात्मक विवेचन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दृष्टिकोन व विचार समजून घेण्याच्या हेतूने 'मराठा आरक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या संशोधन विषयाचा अभ्यासकेंद्रित आहे.

मुख्य शब्द:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठा आरक्षण, मराठा समाज, आरक्षण.

प्रास्ताविक :

महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी एकूण ५२% आरक्षण दिले आहे. ज्यामध्ये ओबीसींना २७% (VJNT यांच्यासह) आरक्षण दिले आहे, तर अनुसूचित जातींना १३% आणि अनुसूचित जमातींना ७% आरक्षण दिले आहे. आर्थिक दृष्टीने मागासवर्ग १०% EWS आरक्षण आहे. महाराष्ट्र शासनाचे राज्यातील शासकीय नोकऱ्यात अनाथ व्यक्तींसाठी १% आरक्षण लागू केले आहे. भुमिपुत्रांमधील ३७ जातींचा ओबीसीमध्ये समावेश आहे. इ.स २०१४ मध्ये आघाडी सरकारने १६% मराठा आरक्षणाचा अध्यादेश आणून आरक्षण लागू केले परंतु तो अध्यादेश विधिमंडळात पारित होऊ शकला नाही. नव्याने मराठा आरक्षणाचा कायदा आणताना उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार व राणे उपसमितीच्या शिफारशीने नोव्हेंबर-डिसेंबर इ.स २०१८ मध्ये महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला १३% आरक्षण देले होते. तत्पूर्वी राज्यात एकूण ५२% आरक्षण होते. मराठा आरक्षणाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात ॲड. डॉ. जयश्री पाटील यांनी याचिका दाखल केली. ५ मे २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारचा निर्णय रद्द केला आणि मराठा आरक्षण हे असंवैधानिक असल्याचे सांगितले व त्यास अवैध ठरवले. पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा निर्णय दिले होता. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संभाजीराजे छत्रपती यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापुरात १६ जुन २०२१ रोजी मराठा क्रांती मूक आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत राज्य सरकारने संभाजी राजेसह मराठा समन्वयकांना चर्चेसाठी बोलावले होते. मनोज जरांगे या तरुणाने अंतरवाली सराटी येथे सप्टेंबर २०२३ मध्ये आमरण उपोषण सुरु केले. तेथे मराठा आंदोलकांवर पोलिसांनी लाठीचार्ज व गोळीबार केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी न्या. संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षणासाठी मराठा कुणबी नोंदी तपासण्यासाठी व पुरावे गोळा करण्यासाठी समिती नेमली आहे. मनोज जरांगे व मराठा आरक्षण आंदोलन समितीने

मराठा समाजाचा मागासवर्ग ओबीसीत समावेश करण्यास अनेक ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळ यांनी मराठा समाजाचा ओबीसीत समावेशास विरोध केला आहे व तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. स्वतंत्र आरक्षण देण्याची महाराष्ट्र सरकारची भूमिका आहे. मराठा व ओबीसीत आरक्षण कुणबी एकच असल्याचे मनोज जरांगे व मराठा आरक्षण आंदोलन समितीचे म्हणणे आहे. मराठा आरक्षण मुद्द्यावर दोन्ही बाजूचे वर्गभाव पडल्याने सरकारला आज दिसत आहे.

आंबेडकरी दृष्टिकोनावर मराठा आरक्षण :-

ज्या धर्म आणि समाजव्यवस्थेने असमृश्य समाजास सर्व मानवी पुरस्कृत मानवी अधिकार नाकारून त्यांना विकासाची संधी नाकारली अशा सर्वांना जाती समूहास या आणण्यासाठी बाबासाहेबांनी आरक्षणाची तरतूद केली. मात्र मराठा समाजातील एक वर्ग सर्व प्रकारच्या संधी असतानाही मागे राहिला यास मराठा समाजाच्यांचा लोकशिक्षणाचा अभाव जबाबदार ठरला. कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी सरकारने राज्यात मराठा समाजासाठी १६% आणि मुस्लीम समाजासाठी ५% आरक्षण देण्याचा घेतलेला निर्णय राजकीय स्वरूपाचा आहे. शरद पवार यांनी म्हणूनच स्वरूपाचे सांगून टाकले कि, राष्ट्रवादी कॉंग्रेस हा काही साधु संतांचा पक्ष नसून आरक्षणामुळे जर आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला राजकीय फायदा होत असेल तर तो घेण्यात काहीही गैर नाही. त्याचबरोबर जाती धर्मनिरपेक्ष राजकारणाचा गजर करणारे सर्वच पक्ष सत्ताकेंद्र होण्यासाठी जातीयतीचा नेहमीच वापर करतांना दिसतात. यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री असताना कॉंग्रेस-रिपब्लीकन युती करून दलित समाजाचे प्रश्न मार्गी लावतांना धर्मांतरित बौध्द समाजास राज्य घटनेतील सवलती बौध्द म्हणून देण्यास मान्यता दिली होती पण असे करताना नवबौद्धांना राज्यात बौध्द म्हणून सवलती दिल्यामुळे बौध्द समाजाची मते कॉंग्रेसला मिळणार असतील तर तो राजकीय फायदा आम्ही घेणार असे यशवंतरावांनी म्हटले जाते. यशवंतराव चव्हाणांनी राज्य निर्मितीच्या वेळेस असे म्हटले होते की, महाराष्ट्र हे मराठी राज्य होईल पण यशवंतराव चव्हाण त्याकाळी द्विज्ञीत (१९६२) संरक्षण मंत्री म्हणून गेले व तेव्हापासून महाराष्ट्र हे मराठी राज्य न होता मराठा राज्य होत आले. याचा पुरावा म्हणजे विधानसभेत आजही २८८ पैकी १५२ आमदार मराठा समाजाचे आहेत तरीही मराठा समाजाचा आरक्षण मागण्याची वेळ येते हा राज्यकर्त्यांच्या सामाजिक जाण नसल्याचा या कार्यात राज्यकारभाराचाच धिक्कार नसुन म्हटले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मागासवर्गीयांसाठी शैक्षणिक व नोकरीविषयक जे घटनात्मक आरक्षण ठेवले त्याचा

विकास सामाजिक, शैक्षणिक मागासलेपणावरच्या जात हा केवळ आरक्षणासाठी आर्थिक मागासलेपणाची कसोटी त्यांनी नाकारली होती. म्हणजेच त्या वर्ग सामाजव्यवस्थेचे अस्पृश्य समाजास सर्व तऱ्हेचे मूलभूत मानवी अधिकार नाकारून त्यांचा विकासाची संधीच नाकारली असा सर्वसाधारण जाती समूहास वर आरक्षणासाठी बाबासाहेबांनी मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची तरतूद केली. केवळ पारंपरिक अस्पृश्यांना शिक्षण घेता येत नव्हते, नोकरी-धंदा करता येत नव्हता म्हणून हा घोर अन्यायाचा एकमेव व्यवहार भिकसांग धंदा होता. अशा जाती समूहांना विकासाची संधी मिळावी म्हणून बाबासाहेबांनी मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची तरतूद केली. मुद्दा असा की, समाजव्यवस्थेचे मराठा समाजास मराठा म्हणून शिक्षण-धंदा-नोकरी नाकारली काय? गावकुसाबाहेरचे जे तत्कालीन भोग अस्पृश्यांच्या वाट्यास आले तसे ते इथ जातीच्या वाट्यास आले काय? नाही, तेव्हा मराठा समाजातील एक वर्ग सर्व प्रकारच्या सोयी असतानाही सारे राहिला बाप मराठा समाजाच्या लोकविरुद्ध कारभार जबाबदार होता. समाजातील प्रत्येक दुबळ्या घटकाचा विकास करणे हि जशी शासनाची जबाबदारी असते तद्वतच प्रत्येक समाजातील सधन वर्गाने कमी केडग्याची नैतिक जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असते. मराठा समाजातील सर्वोच्चांच्या हातात ज्या सहकारी व शैक्षणिक संस्था आहेत त्या संस्थांनी मराठा समाजातील तरुणांच्या शैक्षणिक विकासाची जबाबदारीमुख्या एक सामाजिक भान म्हणून स्वीकारली पाहिजे. मराठा समाजातील शिक्षण महर्षींनी मराठा समाजातील विद्यार्थ्यांस कमीत कमी शुल्कात होस्टेलशिवाय प्रवेश देऊन दिन दुबळ्यांच्या शिक्षणास हातभार लावला पाहिजे तसेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आपल्या संस्थांतून नोकऱ्याही दिल्या पाहिजेत.

मराठा आरक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-

ज्या वेळेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना लिहत होते त्या वेळेस सकाळी सकाळी पंजाबराव देशमुख हे बाबासाहेबांच्या घरी आले व बाबासाहेबांनी त्यांना पाहिल्याबरोबर बाबासाहेब म्हणाले,'देशमुख हा घटनेचा कच्चा मसुदा तयार केला जरा वाचून बघा व मला काय चुकले ते सांगा मी सकाळी फिरून येतो' व तो मसुदा पंजाबराव देशमुख यांच्या हातात दिला. काही वेळाने बाबासाहेब आले आणि पंजाबराव देशमुख रडायला लागले. बाबासाहेब म्हणाले, 'काय झाले देशमुख तुम्हाला आवडले नाही हे संविधान?' तेव्हा मराठा पाटील पंजाबराव देशमुख म्हणाले, 'बाबासाहेब धन्य आहे तुमची आणि तुमची लेखणी. अहो मी ज्या कामासाठी, ज्या मागण्यासाठी इथे आलो ते तुम्ही आधीच भारतीय संविधान या ग्रंथात लिहून ठेवले.' मराठा समाजाचे पंजाबराव

देशमुख यांनी बाबासाहेब विधेयक आणायची कॉन्स्टिट्यूशन सभेमध्ये विधेयक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्वीच्या प्रस्तावित आहे याचा बाबासाहेब म्हणतात, 'मला माझी कोणी गरज नाही, मला फेकायचा कधी देशमुख मला फेकणार नाही'. मराठा आरक्षण हे या बाबासाहेबांनी ७० वर्षांपूर्वीच घटित मांडून ठेवले आहे व ते संविधान जातीची (मराठा) १९५ कलम हे संविधान लिहिले आहे पण त्याचा कोणी हे समजून घेतले नाही म्हणून बाबासाहेबांची कायद्याची पदवी राष्ट्रीयत्व दिला. बाबासाहेबांची ही दूरदृष्टी होती कि आरक्षण हे काळाची गरज आहे पण त्या काळी मराठा मराठा बांधवांनी त्यांच्याच प्रतिनिधित्वाचा बाबासाहेबांच्या मागणी नाकारला व बाबासाहेबांना म्हणाले की, आम्ही काय तुलित नाही, ५८/१०० पक्षा जातीची आहेत आम्हाला. असे बोलून बाबासाहेबांचा अपमान केला परंतु बाबासाहेबांनी सांगत पत्रकार संरक्षणाचा प्रयत्न केला की, एक दिवस तुम्हाला आरक्षणाची गरज पडेल पण त्या दिवशी मी हे मागणार नाही, बाबासाहेबांचे मराठा बांधवांना आरक्षण देण्याचा स्वप्न पूर्ण झालेच पाहिजे व ती सांगत संविधानिक अधिकार आहे.

निष्कर्ष :-

घटनाकारांनी मागासवर्गीयांसाठी आर्थिक निकष हा जातीचे मागासलेपण हि कसोटी प्रमाण मानून शैक्षणिक सुविधा व आरक्षणाची तरतूद केली. महाराष्ट्रात आता आर्थिक मागासलेपण हा निकष ग्राह्य धरून मराठा समाजासही आरक्षण दिलाले पाहिजे, अशी मागणी होत आहे. तीपूर्वी मानून घेण्यासाठी आहे. मराठा समाजाचे प्रतिनिधी ग्रामपंचायती, जिल्हा परिषदांमधून राज्यसभांसंसदेत जी संख्या असले आणि सहकारी क्षेत्रात जी याच समाजाच्या नेतृत्वाचे प्रमुख असले तरी मूलभूत मराठा कुटुंबांचा विकास पाहता मोठा मराठा समाज आज दरिद्रतले ग्रस्त आहे हे नाकारता येत नाही. राजकीय नेतृ महाराष्ट्रांच्या परिवर्तनवादी चळवळीमुळे पश्चिम महाराष्ट्रात मराठा समाजात निर्माण झालेला प्रमाण उद्रेकवीय असले आणि सहकार चळवळीमुळे निर्माण झालेला मराठा समाज काहीसा सधन झालेला असला तरी विदर्भ-मराठवाड्यातील मराठा समाजाचे आर्थिक दुखणे कायम असून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण याच भागात अधिक आहे हे वास्तव आहे. मराठा समाज पूर्वापार शेती करीत आला आहे पण वाढत्या कुटुंबामुळे शेतजमिनीचे तुकडे होत गेले परिणामी एक-दोन एकर जमिनीवर गुजराण करणे मराठा कुटुंबास कठीण होऊन बसले. खत, बी-बियाणे यांच्या किमती वाढल्या, अवर्षण या अनिवृष्टीमुळे शेती पीक्षात आली. मराठा समाजासमोरच किमती शेतकरी जगत असलाच्या साठी, बंडाची या समाजाचीही आहे. खरे तर सर्व शेतकरी जातीची दरिद्रतची दुःखे सारखीच

[illegible]

संदर्भ :-

१. [illegible]

२. [illegible]

३. [illegible]

४. [illegible]

५. [illegible]

६. [illegible]

७. [illegible]

८. [illegible]

९. [illegible]

• • •

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

[illegible]

[illegible]

[illegible]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीयांच्या सबलीकरणा संबंधीचे विचार

डॉ. रजनी भीमराव गेडाम
पाली विभाग प्रमुख
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अमरावती

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जसे दलित अस्पृश्यांचे उध्दारक आहेत. तसेच ते स्त्रीयांचे ही उद्धारकते आहेत. तरी ही त्यांनी स्त्रियांच्या सुधारणेसाठी आणि सक्षमीकरणासाठी केलेल्या प्रयत्नांची फारशी दखल घेतल्या गेलेली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जे तीन गुरु आहेत तथागत गौतम बुध्द, महात्मा कबीर, आणि महात्मा ज्योतीराव फुले भौतीक अर्थाने या तिन्ही गुरुचा वेगवेगळा स्वतंत्र कालखंड आहे. तरीही डॉ. बाबासाहेबानी त्यांना गुरु मानले याचे कारण या तिन्ही गुरुंनी आपआपल्या काळामध्ये समाजासाठी आणि

स्त्रियांच्या उद्धारासाठी जे जे कार्य केले होते. तेच डॉ. बाबासाहेबांना प्रेरणादायी वाटले आणि म्हणूनच त्यांना आपले गुरु मानले. तथागत बुध्दाच्या काळातही स्त्रीयांना समतेचा, मानाचा आणि प्रतिष्ठेचा दर्जा होता. हे तथागत बुध्दांनी तत्कालीन श्रावस्तीचा कोसलराजा पसेनदी भेटावयास आला तेव्हा राजाची राणी मल्लीका प्रसूत होवून तिला कन्या रत्न झाल्याचे वृत्त कळताच राजा खिन्न झाला. मुलगी झाल्याने त्याला वाईट वाटले. त्याबेळी तथागत राजाला म्हणाले, हे राजा कन्याही पुत्रा पेक्षा चांगली होण्याचा संभव आहे. कारण स्त्री ही सदगुणी कन्या, पत्नी आणि माता अशी विविध भूमिका पार पाडून अशा होणारा पुत्र हा पराक्रमी सम्राट व देशाचा मार्ग दाता होतो.'

महात्मा फुलेनी तर सावित्रीबाई फुलेना सोबत घेवून सर्व जीवनच दलित आणि स्त्रियांच्या उध्दारासाठी घालविले. हाच विचार बाबासाहेबांनी आयुष्यभर जोपासला आणि वाढवला. भारतीय समाज व्यवस्था ही स्पृश्य-अस्पृश्य आणि वर्णव्यवस्थेने महिलांची स्थिती पशु-पक्षा पेक्षाही दयनिय होती. अशा पार्श्वभूमीवर १९२० साली मानगाव येथे परिषद बोलवण्यात आली आणि परिषदेला लोकराजे छत्रपती शाहू महाराजांनी या वेळी प्रमुख पाहूणे म्हणून केलेल्या भाषणात म्हटले की, अस्पृश्यांनो डॉ.बाबासाहेबआंबेडकरांच्या रुपाने तुम्हाला तुमचा नेता मिळालेला आहे. मला खात्री आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांचे नव्हे तर या देशाचे उज्वल भवितव्य घडविल्याशिवाय राहणार नाहीत. डॉ. बाबासाहेब आबेडकर हे देशाचे कायदामंत्री मजूर मंत्री आणि भारताच्या राज्य घटनेचे शिल्पकार होवून त्यांनी शाहू महाराजांनी दाखवलेला विश्वास सार्थ केला.

स्त्री समानतेसाठी हिंदु कोडबिलाची निर्मीती:-

स्त्रीयांना सामाजीक आणि कौटुबिक हक्क समानतेने देण्यासाठी जाणिवपूर्वक हिंदु कोडबिलाची निर्मीती केली. आपल्या प्रकृतीची परवा न करता कायदे मंत्री असतांना, ७ फफेब्रुवारी १९४९ ला हिंदू कोडबिलाचा मसुदा लोकसभेत मांडला. आणि २४ फेब्रुवारी १९४९ रोजी सरकार तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या बिला संबंधीचे विस्तृत विवेचन सतत दोन तास केले या वेळी त्यांचे भाषण ऐकण्यासाठी लोकसभेच्या गॅलरीत स्त्रीयांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. भारतीय लोकसभेमध्ये स्त्री विषयावर भक्कमपणे बाजू मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव नेते होते. पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसचे सरकार असले तरी ते कर्मठ हिंदुवादी होते. बिलाला डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल या सारख्या नेत्यांच्या दबावामुळे पंडित नेहरु ही नमले. त्यामुळे हिंदू कोड बिलाचे कायद्यात रुपांतर करण्याचे आश्वासन डॉ.आंबेडकरांना दिले होते त्याचबरोबर ही कोड बिल जर पास झाले नाही तर मी माझ्या प्रधानमंत्री पदाचा राजीनामा देऊन असे म्हणणारे नेहरू जेव्हा आपली खुर्ची जाते की काय? या संभ्रम अवस्थेत होते परंतु दिलेला शब्द जर पंतप्रधान पाळत नसतील तर अशा सरकारात राहण्यात काही अर्थ नाही म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मजूर मंत्री पदाचा राजीनामा देऊन मंत्रिमंडळाच्या बाहेर पडले.

भारतीय संविधानात स्त्री-पुरुष समानता प्रस्तापित :-

डॉ. आंबेडकरांवर सोपविलेली घटना निर्मीतीची जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली आणि घटनेच्या कलम १४,१५,१६,१७, १८, १९ मध्ये स्त्री आणि

पुरुषात कुठलाही भेदभाव केला जाणार नाही अशा प्रकारची हमीच येथील स्त्रीयांना देवून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. विषेशतः कलम १४ व १८ स्त्री-पुरुषात कोणताही भेदभाव न करता समानता प्रस्थापित केली. गिरणी मजुर, बिडी मजुर, कष्टकरी, कामकरी, स्त्रीयांचे वेतन व स्त्रीयांचे शोषन थांबून संपूर्ण वर्गाला उच्च पदावर नेण्यासाठी घटनेत तरतुद केली आहे. म्हणून आज स्त्रीयाच्या विकासासाठी सरकार जे जे धोरण ठरवते त्यात अलीकडेच महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५०% आरक्षण देवून शिक्षा मार्तबच केले या सर्व तरतुदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळी करून ठेवल्या त्याचेच फळ आपल्याला स्त्रियांच्या सबलीकरणतून स्पष्ट होताना दिसते

डॉ. आंबेडकरांचा स्त्री शक्तीवरील विश्वास :-

मुळातच डॉ.बाबासाहेब आबेडकर, हे समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय मानवीहक्क या मुल्यांचे पुरस्कर्ते होते. जात, धर्म, वर्ण आणि लिंग या भेदाविरुध्दचे ते कड्वे लढवये होते. स्त्री वर्गाला नाकारलेले हक्क हे येथील वर्णाभिमानी लोकांची आणि पुरुष वर्गाची चालाखी आहे. ती नष्ट झाली पाहिजे स्त्रियांना त्यांचे हक्क स्वांतत्र्य मिळाले पहिने या मताचे ते होते. त्यांनी जातीयतेविरुध्द उभारलेल्या सर्व ल लढ्यामध्ये स्त्रीयांना आग्रहक्रमाने सहभागी करुन घेतले. महिला वर्गाना त्याच्या हक्कासाठी प्रेरित केले. त्याना मार्गदर्शन केले. महाडच्या सत्याग्रहाच्या वेळेस त्यानी जवळपास पाच हजार स्त्रीयांची सभा घेतली हाती. १९४२ साली नागपूरला दलित स्त्रीयांची परिषद (सभा) आयोजित केली हाती. त्या सभेत २०-२५ हजार स्त्रिया उपस्थतीत होत्या. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीयांना मार्गदर्शन करताना म्हणाले स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरुन एखादया समाजाची प्रगती मी मोजत असतो याचा अर्थ असा कि कोणत्याही समाजाच्या विकास तेथील स्त्रीयांचा उन्नतीवर अवलंबून असतो ते म्हणतात स्त्री व पुरुष यांनी मिळून समाजाचा संसाराचा अडचणी सोडवल्या पाहिजेत पुरुषानीच हे काम अंगावर घेतले तर ते पार पाडण्यास त्यांना फार अवधी लागेल तेच काम स्त्रियांनी जर अंगावर घेतले तर त्यांना त्या कामात लवकर यश प्राप्त होईल असा स्त्री शक्ती वरील विश्वास व्यक्त करतात

स्त्रियांची गुलामगिरी संपली पाहिजे :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकाचवेळी स्त्रियांत स्वाभीमान जागवण्याची व प्रबोधनाची भूमिका बजावत. त्याचा ठाम विश्वास होता की स्त्रियांची हजारो वर्षाच्या धार्मीक गुलामगिरीतून मुक्तता झाल्या शिवाय त्याचा उध्दार होणे अशक्य आहे. धर्मनि

CamScanner

लांच केलेली धार्मिक गुलामगिरीतुन ती अबला बनली आहे. तिची सुटका यातुन व्हली पाहिजे तर हा समाज खऱ्या अर्थाने समतेच्या आणि स्वातंत्र्याच्या पायावर उभा राहु शकेल १९३६ साली लाहोरच्या जातपात तोडक मंडळाच्या अधिवेशनासाठी डॉक्टर आंबेडकर यांनी लिहिलेले भाषण या नावाने प्रकाशित झाले त्यात डॉक्टर आंबेडकर म्हणतात की प्रत्येक स्त्री पुरुषात शास्त्राचा दासातून मुक्त करा शास्त्रद्वारा प्रतिपादित हानिकारक धारणापासून त्यांचे मन स्वच्छ करा कारण या धारणा स्त्रियांना ज्ञान, समता आणि स्वातंत्र्य मिळवण्याचे नाकारतात स्त्रिया केवळ ही एक उपभोग्य वस्तू यापेक्षा वेगळी स्थान देत नाहीत समाजातील चालीरीती प्रथा परंपरा या स्त्रियांचे शोषण करण्याची हत्यार बंदी आहेत ते बंद झाले पाहिजे स्त्रियांना माणूस म्हणून मानणी दिली पाहिजे ते सतत चळवळीना मार्गदर्शन करताना म्हणणार म्हणत व्यक्तीच्या उन्नतीसाठी आत्म स्वातंत्र्य महत्वाचे असते ते संघर्षाने मिळवावे लागते भिक्षेने गुलामगिरी मिळते स्वातंत्र्य नाही याचाच अर्थ असा की स्त्रियांनी त्यांनी संघर्ष करून हक्क अधिकार मिळवावे असे होय.

स्त्री मुक्तीसाठी उभारलेले लढे :-

खरतर डॉक्टर बाबासाहेबांचा लढा हा येथील जाती विषमता वर्णव्यवस्थाविरुद्धचा लढा होता शुद्रातिशुद्र स्त्री पुरुषांच्या हक्काचा लढा होता. मनुस्मृती सारखा ग्रंथ येथील बहुजन स्त्री पुरुषांचे हक्क नाकारतो. त्यांना गुलाम करते. तो धर्मग्रंथ जाळून एकापरीने ते माणुसकी नाकारणाऱ्या हजारो वर्षाच्या नियमाचा निषेध करतात. एक प्रकारे समाजाला बंधमुक्त करतात. मुळातच स्त्रीया एवढी पवित्रता, सहनशीलता पुरुषांच्या अंगी सुध्दा नसते. परंतु पुरुष प्रधान देश व्यवस्थेने तिला तिचे सर्व हक्क नाकारले. क्षुद्रक कारणावरुन तिला जागो जागी मज्जाव केला. त्यामुळे ती जागचेजागी खिजून गेली. म्हणून डॉ बाबासाहेबांनी या व्यवस्थेवर घाव घालण्यास सुरवात केली. हे आपल्याला काळाराम मंदीर सत्याग्रह मावत सत्याग्रह. १९५६ साली त्यांनी केलेले धर्मांतर यात प्रकर्षाने दिसुन येते. हिंदू स्त्रियाची उन्नती व अवनतीइया महाबोधी सोसायटीच्या मासिकातील (१९५२) लेखामध्ये त्यांनी गौतम बुध्दानी आणि त्याच्या संघानी स्त्रीयांच्या ज्ञानर्जनासाठी आणि अध्यात्मीक उन्नतीसाठी कसे प्रयत्न केले. यांचे विवेचन केले आहे. गौतमबुध्द हे भारतीय समता, स्वांतत्र्य, बंधुत्वाचे पहिले उद्गाते होत. त्याची समतावादी शिकवणच समाजाला तारु शकेल म्हणून डॉ बाबसाहेबांनी आपल्या लाखो स्त्री-पुरुष अनुयायासह बौध्द धर्मात प्रवेश केला खऱ्या अर्थाने समताधिष्ठित समाज निर्माण करण्याकरीता त्यांनी प्रयत्न केला. स्त्रीयांना हजारो वर्षापुर्वी समतेन वावरणारे

गौतम बुद्ध यांचे गुरु बनले एक प्रकारे स्त्रियाच्या व्यक्तिमत्व विकासाला यामुळे धार्मिक आधारही मिळाला.

स्त्री हक्काची जपवणूक भारतीय संविधानात केली :-

डॉ. बाबासाहेबाचे राज्यघटनेच्या निर्मितीतील योगदान म्हणजे हजारो वर्षाच्या गुलामगिरीत पडलेल्या स्त्रियांच्या उत्थानाचे अधिष्ठानच. राज्यघटनेच्या सरन्यायालयच विषमतेला तिलांजली देण्यात आली आहे

4. One often seeks power and position in business but is unable to enjoy them because of the negative effect they create through inflation of the ego. The ego stops us from developing the human qualities of love, compassion, peace and equanimity. Vipassana is beneficial in business, but more importantly, it helps us experience true peace of mind and happiness through a reduction of the ego. This comes with the understanding of the impermanence of both mind and matter.

References

1. "Krisharmurti on Education," Krushnamurti Foundation, 1992.
2. "Swami Vivekananda on Education, complied by T.S. Avinashilingam, Sri. Ramakrishna Mission Vidyalaya, Coimbatore, 1993.
3. A New Education," All India Magazine, Sri Aurobindo Society, Oct 1990 : and On Education, All India Magazine, Sri. Aurobindo Society, Nov. 1990.
4. P.L. Dhar and R.R. Gaur: "Appropriate Engineering Education," paper presented at National Workshop on Technology Assessment, a Futuristic Viewpoint, IIT, Delhi, 1988.
5. Report of Education Commission (1964-66) : Education and National Deve1opment, Ministry of Education, Govt. of India, 1966.
6. Venerable Nyannpouikn Thcia: "Tliv Henrt o Meditulinn," Kidcr, London iy
7. Amadeo Sole-Leris : "Traaquillity and Insight, Shambala, Boston 1986.
8. Sayagyi U Ba Khin Journal, Vipassana Research Institute, Igatpuri, India, 1991.
9. Mahasatipauhana Suttam, Vipassana Research Publications, Igatpuri, India, 1993.
10. A. Maslow: "Motivation and Personality," New York; Harper Press, 1954.
11. Pradeep N. Khandwala, "Fourth Eye: Excellence Through Creativity;" A.H. Wheeler and Co., Allahabad, 1984.
12. P.L. Dhar and R.R. Gaur: "Science and Humanism - Towards a Unified World View," Commonwealth Publishers, New Delhi, 1992.

CamScanner

B.Aadhar International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

बौद्ध तत्त्वज्ञानातील मानवतावाद

प्रा. पी.एल. अंबोरे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, असरावती.

प्रस्तावना -

ऐतिहासिक दृष्टिकोनातून बौद्ध धर्म हा भारतातील एक अतिप्राचीन धर्म आहे आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून हा जगातील सर्वात महान धर्म आहे. कारण बौद्ध तत्त्वज्ञान हे मानवतावादी आणि विज्ञानवादावर आधारलेले आहे. भारतात बौद्ध धर्माचा विकास इ.स.पूर्व ६ ते इ.स. ६ व्या कालावधीत झाला. बौद्ध संस्कृतिचे सर्वात मोठे योगदान मौर्य कला, गांधार कला व मथुरा कला यामध्ये आढळते. बौद्ध धर्माचा व तत्त्वज्ञानाचा प्रसार भारतासोबतच अनेक आजूबाजूच्या देशांमध्ये झालेला आहे. बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव जगाच्या आणि भारतीय जीवनाच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व धार्मिक बाजूंवर पडलेला आहे.

संशोधन विधान - "बौद्ध तत्त्वज्ञानातील मानवतावाद"

संशोधन पद्धती व साधने -

प्रस्तुत शोधनिबंधात बौद्ध तत्त्वज्ञानातील मानवतावादाचा मागोवा घेण्याच्या दृष्टीने तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यात आला असून त्यात प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे तसेच इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टये -

१) भगवान गौतम बुद्धाचे विचार अभ्यासणे.
२) बौद्ध तत्वज्ञान वस्तुनिष्ठपणे अभ्यासणे.
३) बौद्ध तत्त्वज्ञानातील मानवंतावाद अभ्यासणे.

शोधनिबंधाची गृहितके-

१) बौद्ध तत्त्वज्ञान हे समाजाभिमुख होते.
२) बौद्ध तत्वज्ञान सत्य, समता, अहिंसा या तत्वावर होते.
३) बौद्ध तत्वज्ञान विज्ञाननिष्ठ, मानवतावादी व मध्यम मार्गाचे होते.

माहितीचे विश्लेषण :-

भगवान गौतम बुद्धाचे तत्वज्ञान :-

गौतम बुद्धाचे तत्वज्ञान हे अत्यंत साधे व सरळ होते. त्यांनी आपले तत्त्वज्ञान लादण्याचा प्रयत्न केला नाही. कोणताही विधी, व्रत वा संस्कार यावर जोर दिला नाही. त्यांनी जीवनातील दु:खाच्या निरोधाचा मार्ग दाखविला. सदाचाराने विमुक्ती प्राप्त होते यावर त्यांचा विश्वास होता. ईश्वराचे अस्तित्व शोधणे म्हणजे बौद्धिक कसरत असून त्याची उत्तरे म्हणजे अर्धसत्य होय असे त्यांना वाटे. गौतम बुद्धांनी सरळ व साध्या शिकवणीतून सर्व सामान्यांना दु:खमुक्तीचा मार्ग सांगितला. बुद्ध ही ज्ञानाची उपाधि आहे. बुद्ध या शब्दाचा अर्थ आकाशाएवढा प्रचंड ज्ञानी असा आहे. भगवान बुद्धांनी पाली या लोकभाषेतून अत्यंत साध्या आणि सोप्या पद्धतीने बौद्ध धम्माची शिकवण, आचार-विचार सांगितले. त्यामध्ये चार आर्यसत्य, अष्टांग मार्ग (मध्यम मार्ग) व पंचशिल सांगितले.

चार आर्यसत्य -

भगवान बुद्ध म्हणतात, मानवी जीवन हे दु:खमय आहे. दु:खाची निर्मिती तृष्णेतून (वासना, इच्छा, आसक्ती, आवड) होते. म्हणून या तृष्णेवर म्हणजे आपल्या इच्छांवर नियंत्रण ठेवले पाहिजे. यासाठी मध्यम मार्गाचा अवलंब केला पाहिजे. मानवी व्यवहाराच्या मुळाशी चार आर्यसत्ये आहेत. ती अशी -

१) दु:ख - मानवी जीवन हे दु:खमय आहे.
२) तृष्णा - मनुष्याच्या न संपणाऱ्या इच्छा हे दु:खाचे कारण आहे.
३) दु:ख निरोध - दु:खाचे निराकरण वा अंत सर्व प्रकारची आसक्ती सोडण्याने होते.
४) प्रतिपद - दु:ख निवारण्यासाठी सदाचारांचा मार्ग (अष्टांग मार्ग) आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते या चार आर्यसत्यांपैकी पहिले व शेवटचे हे दोनच आर्यसत्य महत्वाची आहेत. पहिले म्हणजे जीवन दु:खमय आहे तर शेवटचे प्रतिपद - दु:ख निवारण्याचा मार्ग आहे.

अष्टांगिक मार्ग -

CamScanner

तथागत बुद्धांनी सारनाथ येथे धम्मचक्र प्रवर्तनाचे विवेचन करताना नीती व सदाचाराला महत्व देवून मानवाचे जीवन सुखकर होण्यासाठी सहज मार्ग सांगितला.

अष्टांग मार्ग हा सदाचाराचा मार्ग होय. या आठ गोष्टींच्या पालनामुळे मानवाचे जीवन सुखमय होवू शकते. त्या गोष्टी पुढीलप्रमाणे -

१) सम्यक दृष्टी - जिवनी नियमाविरुद्ध कोणतीही गोष्ट होवू शकते ही गोष्ट न मानने.
२) सम्यक संकल्प - म्हणजे योग्य निर्धार, विचार
३) सम्यक वाचा - करुणायुक्त व सत्यपूर्ण वाचा ठेवण्याचा प्रयत्न करणे.
४) सम्यक कर्मान्त - उत्तम कर्म म्हणजे योग्य कृत्ये करणे
५) सम्यक आजीविका - वाईटमार्गाने आपली उपजीविका न करता ती सन्मानीनेच करणे.
६) सम्यक व्यायाम - वाईट विचार निर्माण झाल्यास त्याचा त्वरीत नाश करणे.
७) सम्यक स्मृती - तात्त्वीक गोष्टीचे स्मरण करून मनाला जागृत ठेवणे.
८) सम्यक समाधी- कोणत्याही वाईट विचारांचा स्पर्श होवू न देता दुष्प्रवृत्तीपासून मन अलग ठेवून चित्त प्रसन्न आणि शांत ठेवणे.

बुद्ध धम्माची तीन अंगे -

१) शील - धम्माची पहिली शिकवण होती शील म्हणजे सदाचार. त्या काळातील जवळपास सर्व तत्त्वज्ञांनी शीलाचे महत्व स्वीकारीत असत. जेंव्हा कोणी व्यक्ती मनाला निर्मल ठेवून वाणी अथवा शरीराने कोणतेही कर्म करते तेंव्हा सुख तिच्या सावलीप्रमाणे तिच्या मागे असते.
२) समाधी - शरीर आणि वाणीच्या कर्मांना सुधारण्यासाठी मनाला नियंत्रित करणे आवश्यक आहे. मन ताब्यात असेल तरच तो दुराचारापासून वाचू शकतो व सदाचाराकडे वळू शकतो. यासाठी समाधी आवश्यक आहे. आपल्या मनाला वश करण्यासाठी येणाऱ्या - जाणाऱ्या सहज स्वाभाविक श्वासाची जाणीव ठेवून मन भरकटल्यास त्याला श्वासाच्या जाणीवेवर घेवून येणे यालाच समाधी असे म्हणतात.
३) प्रज्ञा - सहज स्वाभाविक श्वासावर ध्यान केंद्रीत केल्याने जी संवेदना प्राप्त होते त्यास प्रज्ञा म्हणतात.

पंचशील -

१) मी जीव हिंसेपासून अलिप्त राहण्याची शपथ घेतो.
२) मी चोरी करण्यापासून अलिप्त राहण्याची शपथ घेतो.
३) मी कामवासनेच्या अनाचारापासून अलिप्त राहण्याची शपथ घेतो.
४) मी खोटे बोलण्यापासून अलिप्त राहण्याची शपथ घेतो.
५) मी मद्य, मादक गोष्टी तसेच इतर मोहात पाडणाऱ्या सर्व मादक वस्तुंच्या सेवनापासून अलिप्त राहण्याची शपथ घेतो.

या बौद्ध तत्त्वांचा जीवनात अंगीकार केल्यास मानवाचे जीवन नक्कीच दु:खमुक्त होवून आदर्श जीवन जगू शकतो. अशा पद्धतीने बौद्ध तत्त्वज्ञान समाजाभिमुख असल्याचे दिसते.

बौद्ध तत्त्वज्ञानातील मानवतावाद -

मानवतावादाचा अर्थ सर्व मनुष्यप्राण्यांप्रती मानवीय दृष्टिकोनातून विचार करणे, कोणत्याही भेदभावाशिवाय त्यांच्या कल्याणाची इच्छा करणे, त्यासाठी प्रयत्नरत राहणे. मानवतावादाचा दैववादाला विरोध आहे. मानवतावाद मनुष्याच्या कल्याणाचा वाद आहे. त्याचा केंद्रबिंदू मनुष्य आहे. मानवतावाद अलौकिक, दैवी शक्तीवर विश्वास न ठेवता मनुष्याच्या कर्मावर विश्वास ठेवतो. तथागत बुद्धांचे विचार मनुष्याला प्रत्येक प्रकारच्या विकारांपासून मुक्त करण्यासाठी आहेत. बुद्धांच्या मूळ उपदेशाचा आधारच मानवतावाद आहे. बुद्ध, आत्मा आणि परमात्म्याच्या अस्तित्वाला नाकारतो. मानवतावाद हा समतेचा पुरस्कार करतो.बुद्धाचा मानवतावाद लिंगभेद करीत नाही. बुद्धाच्या मानवतावादाला भारतातील जातीव्यवस्था मान्य नाही. कारण या विषमतामुलक जातीव्यवस्थेमुळे समाजाचा विकास खुंटतो. बुद्धाच्या दृष्टीने सर्व प्राणीमात्र समान आहेत. त्यामुळे सर्व मनुष्यांसोबत समान व्यवहार केला गेला पाहीजे. तथागताचे तत्त्वज्ञान हे मानवाला जीवनाचा योग्य मार्ग दाखविण्यासाठी आहे. सर्व प्रकारच्या आसक्तीपासून मुक्त होवून दु:खाचा त्याग करता येतो व परमसुख प्राप्त करता येते, हा संदेश त्यांनी दिला. यावरून हे स्पष्ट होते की व्यक्ती आपल्या विशुद्ध आचरणामुळेच विकारापासून मुक्त होवून स्वत:च स्वत:चे कल्याण करू शकतो.

निष्कर्ष -

बौद्ध तत्वज्ञान हे वैचारिक स्वातंत्र्य, सद्गुणांचा विकास, समता, वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिकता शिकवणारे, शिक्षणाला प्रोत्साहन देणारे, मानवतावाद निर्माण करणारे असेच होते. हिंदू धर्मातील कर्मकांड, हिंसा, यज्ञ यांना झुगारून संपूर्ण जगाला मानवतेचा, सत्याचा, समतेचा आणि शांतीचा संदेश देणारे होते.

संदर्भग्रंथ -

१) मोरे मा.शं., जगातील बुद्ध धम्माचा इतिहास, औरंगाबाद प्रकाशन.
२) गायधनी रं.ना., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे-३०
३) डॉ.आंबेडकर बी.आर., भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म । सिद्धार्थ प्रकाशन, मुंबई-२००६.
४) पांडे, गोविंद चंद्र, बौद्ध धर्म के विकास का इतिहास, लखनऊ, १९६३.
५) भदन्त धर्मकिर्ती महाथेरो : भगवान बुद्ध का इतिहास एवं धम्मदर्शन, प्रकाशक, भारतीय बुद्ध धम्मज्ञान विद्यालय संस्था, नागपूर.

CamScanner

B.Aadhar' *International Multidisciplinary Research Journal*
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

धर्म प्रार्थनास्थळात बंदिस्त धम्म : एक विश्लेषण

डॉ. दिनेश स. धाकडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावतीजि. अमरावती, महाराष्ट्र (भारत)
Email : dinudhakade123@gmail.com मो.नं. 9307928580

मानव आणि प्राणी यात अनेक भेद असतील, पण मुख्य भेद विवेक हा आहे. उन्हाळ्यात चारा मिळणार नाही या विचाराने चाऱ्याची साठवणूक करण्याचा विवेक प्राण्यांकडे नसतो. तद्वतच, पेप्सी-कोलाच्या रंगढंगी जाहिरातीला भूलून पेप्सी-कोलाचा फॅन बनण्याचा अविवेकही प्राण्यांजवळ नसतो. निसर्गाने प्राण्यांची बुद्धी 'कन्डीशन्ड' केलेली असते. यालाच 'नॅचरल इन्स्टिंक्ट' असे म्हणतात. मानवाच्या बुद्धीला मात्र निसर्गाने खुले ठेवले आहे. म्हणूनच अहिंसा, प्रेम, करुणा, शांती, न्याय अशी विवेकाची भाषा मानव बोलू शकतो आणि उलट टोकाला दुसऱ्याच्या पोटात सुरा भोसकण्याचा अविवेकही करू शकतो.

धर्माने श्रद्धेच्या आडून खुल्या विचारांची गळचेपी केली. शब्दप्रामाण्य स्वीकारले व अंतिम सत्य सापडल्याचा अहंकार बाळगला. या उलट विज्ञानाने 'आम्हाला अंतिम सत्य सापडलेले नाही' ही नम्र भूमिका घेऊन सत्याच्या शोधाची प्रक्रिया अव्याहत सुरू ठेवली, सातत्याने चिकित्सा करण्याचे विज्ञानाला प्रवाहीपण प्राप्त झाले, तर चिकित्सा नाकारल्यामुळे धर्माला एक बंदपणा आला, साचलेपणा आला. त्यामुळे धावतो तो झरा असतो, थांबतं ते डबकं. डबक्यावर डास येतात, झऱ्यावर राजहंस! या न्यायाने विज्ञानाने नवनवीन शिखरे पादाक्रांत केलीत; धर्म मात्र रुढी, परंपरा, कर्मकांड, पुराहितशाही, पारलौकिकता यामध्ये रुतून बसला, धर्म बदलत्या तर्कबुद्धीच्या सहाय्याने स्वत:चे अस्तित्व प्रस्थापित करते, त्याप्रमाणे धर्मानेही तर्कबुद्धीचा आधार घ्यावा काय? विज्ञान आणि बाह्य सृष्टी यांचा शोध घेण्यासाठी जी साधने आणि ज्या पद्धती उपयोगात आणल्या जातात, त्याच धर्मशास्त्राला लागू कराव्यात काय? यावर माझे उत्तर आहे, होय. जे जेवढ्या लवकर घेऊ तेवढे बरे. जर असे केल्याने तो धर्म कोसळून पडणार असेल तर तो धर्म नसून एक निरर्थक, निरुपयोगी अंधश्रद्धा होती, असे मानावे लागेल. अशी अंधश्रद्धा कोसळून पडणे ही सर्वोत्तम गोष्ट आहे, याबद्दल काडीइतकी शंका नाही. सगळे बांडगूळ काढून टाकले पाहिजे आणि धर्माचे खरे सत्व या शोध प्रक्रियेत तावून सुलाखून उजळून निघाले पाहिजे. त्यामफळे तो अधिक सामर्थ्यशाली बनेल. गौतम बुद्ध तर एक महान बुद्धिप्रामाण्यवादी दार्शनिक होय. चिकित्सा, पुनर्विचार, पुनर्परीक्षण यांचे तो समर्थन करतो. बुद्ध म्हणतो, विचार स्वातंत्र्य हेच सत्याचा शोध घेण्याचा मार्ग होय. धर्माचा आधार ईश्वरीय नसावा तर तो सामाजिक असावा. ईश्वराची पूजा आणि प्रार्थना यासंबंधीच्या मिथ्या धोरणांचा त्याग करावा. म्हणजेच धर्माने श्रद्धेचा आधार न घेता चिकित्सेची पद्धत अंगीकारली पाहिजे, असेच बुद्धाचे मत होते. बुद्धाने तर आपल्या धम्मामध्ये स्वत:चे विशेष स्थानही निर्माण केले नाही. कारण वलयांकृत व्यक्तिमत्वाभोवती श्रद्धा गोळा होऊ लागते व ही प्रक्रिया खुल्या विचारांना व चिकित्सेला मारक ठरते, हे गौतम बुद्ध ओळखून होते. धम्माचे अस्तित्व तत्त्व आणि विचाराने जिवंत रहावे, असे बुद्धाचे मत होते.

भारतीय राज्यघटना सेक्युलर आहे. सर्वधर्मीयांना आपल्या धर्माप्रमाणे आचार-विचार ठेवण्याचे स्वातंत्र्य घटनेने दिले आहे. पण त्याचबरोबर कलम ५१ मध्ये नागरिकांची कर्तव्येदेखील घटनेत नमूद केली गेली आहेत. यातील अनुच्छेद ए(एच) म्हणतो की, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद, चौकसवृत्ती व सुधारणावृत्ती यांचा विकास करणे, हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य होय. म्हणजेच धर्माबाबत पूर्ण स्वातंत्र्य देताना आपला भरतीय समाज जुनाट रुढी, परंपरा, निरर्थक कर्मकांड आणि अंधश्रद्धेच्या चिखलात बुडून राहू नये, म्हणून राज्यघटनेने योग्य ती दखल घेतलेली दिसते. जुनाट रुढी, परंपरांना आणि अवैज्ञानिक विचारांना चिकटून राहिल्यामुळे भारतीय समाजाने याआधी आपले अतोनात नुकसान करून घेतले आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जगातील एकमेवाद्वितीय असलेली जाती व चातुर्वर्ण्य संस्था. या संस्थांनी समता, न्याय, लोकशाही ही सर्व मानवतावादी मूल्ये पायदळी तुडविलीत व अमानवीयतेचे एक हिडीस उदाहरण जगापुढे ठेवले. ज्या काळात मानव चंद्रावर पाय ठेवण्याच्या तयारीत होता, त्या काळात अमेरिकन डुकरांचे खाद्य 'मिलो' मिळविण्यासाठी आम्ही कंट्रोलच्या दुकानात रांगा लावीत असू! याबाबत भारतीयांमध्ये फारशी खेदाची किंवा अपमानाची भावना दिसून येत नाही.

आज सर्वच धर्मांमध्ये अनावश्यक कर्मकांड आणि अंधश्रद्धा फोफावलेल्या दिसतात. विवेकाला आधार मानणाऱ्या बुद्धाच्या धम्मामध्येही कर्मकांडांचा आणि अंधश्रद्धांचा शिरकाव झालेला दिसून येतो. पारलौकिक बाबींमध्येही बौद्ध बांधव रस घेताना दिसून येतात. तेरवीसारखे कर्मकांड याची साक्ष आहे. सत्यनारायणसारख्या भंपक कर्मकांडावर गाडगे महाराजांनी कडाडून हल्ला चढविला. परित्राणपाठासारख्या कर्मकांडामध्ये आज बौद्ध बांधव आकंठ बुडालेला आहे. 'धम्म मार्गाचे ईश्वर आणि आत्मा

CamScanner

यांच्याशी काहीही देणेघेणे नाही. मृत्यूनंतरच्या जीवनाशी या धम्माला काहीही कर्तव्य नाही. या धम्माचे धर्मविधी आणि कर्मकांडाशी काहीही सोयरसुतक नाही' हे बुद्धाचे कथन आहे. बुद्ध म्हणतो, या धम्माचा केंद्रबिंदू मनुष्य आहे. या पृथ्वीवर जिवंतपणी माणसा-माणसातील संबंध हा या धम्माचा केंद्रबिंदू आहे. अशा या भौतिकवादी व विज्ञानवादी धम्मामध्ये ज्या अंधश्रद्धा आज घुसलेल्या आहेत. त्यांना वेळीच आवर न घातल्यास बाबासाहेबांनी ज्या धर्माला विज्ञानवादी मानले, त्या बुद्ध धम्मात व इतर धर्मात फरक राहणार नाही. बुद्धाच्या दाताचे थायलंडमधील मंदिर (हा दात बुद्धाचा आहे, याविषयीही वाद आहेच), बौद्ध स्तुपामध्ये चालणारे पूजापाठ, बुद्धाला 'भगवान' म्हणून संबोधणे, त्याच्यासमोर नैवद्य ठेवणे, त्याच्या नावाने नवस बोलणे, बुद्ध मंदिरांची निर्मिती, तेरवी, परित्राण पाठ, विक्कुबाबासारख्या बुद्धिमंद व्यक्तीला देवपुरुष (म्हणजे बुद्ध भगवानाचा अवतार) मानून त्याला बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत स्थान देणे, अशी अनेक उदाहरणे देता येतील. या बाबी चिकित्सा आणि विवेकाच्या कसोटीवर घासून बघणे आवश्यक आहेत. प्रसिद्ध बुद्धिप्रमाण्यवादी डॉ. अब्राहम कोवूर म्हणतात, सध्या अस्तित्वात असलेल्या आणि आजपर्यंत होऊन गेलेल्या धर्मामध्ये खरा बुद्ध धर्म हा अत्यंत बुद्धिप्रामाण्यवादी धर्म आहे. विश्वनिर्माणकर्त्या ईश्वराचा नकार, आत्मा न मानणे आणि उत्क्रांतीच्या तत्त्वाचा स्वीकार ही बुद्ध धम्माची विज्ञानवादी वैशिष्ट्ये होत. पूजापाठाचे स्तोम माजणे व विज्ञानवादी तत्त्वांचा विसर पडणे हा बुद्धाच्या बुद्धिप्रामाण्यवादाचा पराभव होय, स्वतः गौतम बुद्धाने सांगितलेल्या मार्गापासून हे ढळणे होय. विपश्यनेच्या वाढत्या स्तोमापासूनही आपण सावध झाले पाहिजे. कारण 'ध्यानधारणा आत्मज्ञानाकडे नव्हे, तर वेडेपणाकडे नेते' असे डॉ. अब्राहम कोवूर यांचे म्हणणे आहे. डॉ. कोवूरांचे मत आपण आंधळेपणाने स्वीकारण्याची गरज नाही; परंतु ध्यानधारणेमध्ये संपूर्ण समाज गुंतून पडण्याआधी आपण याबाबतीत सावध होणे आवश्यक आहे.

'जर प्रत्येक वेळी धम्म शासनाच्या प्रस्थापनेसाठी धम्म संस्थपकांच्या नावाचा घोष करणे आवश्यक असेल तर तो धम्मच नव्हे.' 'बुद्ध मार्गदाता आहे, मोक्षदाता नाही', 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथातीला वरील वचनांचा अर्थ हाच आहे की, बुद्धाची पूजा मांडून नव्हे, तर बुद्धाने दाखविलेल्या मार्गाने जाणे म्हणजे बुद्ध धम्माचा अंगीकार होय. धम्माचा अर्थच मार्ग असा आहे. बाबासाहेबांनी हा शब्द जाणीवपूर्वक योजला आहे. 'भगवान' बुद्धाची पूजा मांडून त्याला मोक्षदाता बनविणे, हा बुद्धासारख्या बुद्धिप्रामाण्यवादी व्यक्तीचा अपमान होय.

मानवी समाजात श्रद्धा आणि चिकित्सा यांची सतत रस्सीखेच चालू असते. जेव्हा श्रद्धा वाढते, तेव्हा चिकित्सा लंगडी पडते. ज्या समाजात चिकित्सेचे पारडे जड असते, तो समाज प्रगतिपथाकडे जातो. आपण कोणत्या पारड्यात वजन टाकायचे याचा समस्त बौद्ध धम्म बांधव आणि जगातील समस्त मानव जातीने विचार करायला पाहिजे.

संदर्भ :-

१. 'बुद्ध आणि त्याचा धम्म', डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, २.२.२.१४
२. 'बुद्ध आणि त्याचा धम्म', डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, २.२.२.१५
3. On Budhism- Dr. Abraham T. Kovoor, Skeptic Club Book No.8, Published by ISCOP, P.80.
4. On Budhism- Dr. Abraham T. Kovoor, Skeptic Club Book No.8, Published by ISCOP, P.80.
५. 'बुद्ध आणि त्याचा धम्म', डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, ३.१.१
६. 'बुद्ध आणि त्याचा धम्म', डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, ३.१.१.३०
७. 'बुद्ध आणि त्याचा धम्म', डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, ३.१.१.३२
८. 'बुद्ध आणि त्याचा धम्म', डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, ३.१.२

CamScanner

B.Aadhar International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

बौद्ध धम्म : एक वास्तविकता

डॉ. पी. जी. राठोड
मराठी विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, उत्तम नगर, अमरावती., मो. ९४२३४२४५९२

प्रस्तावना :

बौद्ध एक धर्म नसून धम्म आचरणप्रणाली आहे. या बौद्ध धम्मामध्ये सर्वांना समान दर्जा व अधिकार प्राप्त झालेला आहे बौद्ध धम्म एक जीवनमार्ग आहे. या धम्मामध्ये सामाजिक अहिंसेचा पुरस्कर्ता आहे. भगवान बुद्धाला ज्ञान प्राप्ती झाल्यानंतर त्यांनी धम्मामध्ये स्वतंत्रता, बंधुभाव आणि प्रेम आदी तत्त्वाचा स्वीकार केला. बौद्ध धम्माचे संस्थापक तथागत गौतम बुद्ध यांनी धम्मक्रांती बरोबरच सामाजिक क्रांतीची विचारधारा निर्माण केली. वैदिक परंपरेमध्ये हजारो वर्षे जखडलेल्या समाजबांधवाना बाहेर काढून नवविचार आणि आचार रुढ करण्याचा प्रयत्न केला. धम्म सर्वच मानवजातीला समृध्द बनविते, एक जीवन मार्ग शिकविते. या धम्माची संकल्पना मानवी विचारधारा याने युक्त आहे. धम्माच्या इतिहासामध्ये तथागत गौतम बुद्धाचे स्थान अद्वितीय आहे. बुद्धांनी आपल्या ज्ञानाने सर्व समाजाला दु:खमुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. विश्वामध्ये शांती प्राप्ती होण्यासाठी बुद्धाचा विचारच दु:ख मुक्त करुन शांती मिळून देवू शकतो असा हा तथागतांचा जीवनमार्ग म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन होय.

बौद्ध धम्म नसून एक जीवन मार्ग आहे. या धम्माची संकल्पना अत्यंत व्यापक आहे. बौद्ध धम्माचे संस्थापक व प्रवर्तक तथागत गौतम बुद्ध असून या बौद्ध धम्माचा इतिहास २७०० सालाचा आहे. भगवान बुद्धाच्या धम्माच्या प्रारंभ काळापासूनच 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय, ... ' यावर आधारीत आहे. भगवान बुद्धांनी बौद्ध धम्माची स्थापना लोकांच्या कल्याणासाठी केली असून हा धम्म मानवतावादी, लोककल्याणकारी धम्म (धर्म) आहे.

विश्वात अनेक धर्म असून त्यापैकी ख्रिश्चन, हिंदू, मुस्लिम, शिख, ईसाई, जैन, आदी धर्माचे अस्तित्व आहे. त्यांची वैचारिक चळवळ मानवतावादी दृष्टीकोनाचा विचार पाहावयास मिळतो. प्रत्येक धर्माची संकल्पना पवित्र आणि आध्यात्मिक असून सर्व मानव जातीच्या एकूण जीवनावर धर्माचा पगडा व परिणाम दिसून येतो. बौद्ध धम्म हा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा मानवतावादी कल्याणकारी आहे. साधारणपणे धर्म म्हणजे धारण करणे. एका विशिष्ट प्रकाची जीवन पद्धती व जगण्याची शैली आहे. धम्म म्हणजे धारण करणे, धम्माचा अंगिकार व स्वीकार करणे होय. मानव समाजात जन्मापासून ते मृत्यूपर्यंत प्रत्येक व्यक्तिच्या जीवनात अनेक संस्कार त्या धार्मिक पध्दतीने घडत असतात. मानव जातीचा जेवढा प्राचीन इतिहास आहे, तेवढाच जुना धर्माचा इतिहास पण आहे.

बौद्ध धम्म एक ज्ञान मार्ग आहे. धम्माच्या मार्गाने पुढे चालल्यास तुमच्या पावलोगणती माणुसकीचे मूल्य दिसून पडते. भगवान बुध्द स्वत:ला देवाचा अवतार मानित नव्हते. म्हणजे अवताराची मूळ संकल्पना बौद्ध धम्मात नाही. परंतु कार्हीनी बुध्दाचे महात्मे वाढवीत बुध्दाला देवाचा अवतार समजू लागले. या देवाच्या संकल्पनेला बौद्ध धम्मात अजिबात थारा दिलेला नाही. भगवान बौद्धाचा आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचा व क्रांतीचा केंद्रबिंदू देव-दैव नसून 'माणूस' हाच आहे. बुध्दाने पारमार्थिक कल्याणापेक्षाही माणसाचे मूलभूत भौतिक कल्याण साधाणारा आहे. म्हणूनच नितीधम्म जगात कोणी रुजविला असेल तर तथागत गौतम बुद्धांनी सर्व प्रथम भारतात रुजविला आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानात त्यांनी प्रज्ञेवर भर दिला आहे. प्रत्यक्ष समाजकार्यात महाकरुणेला म्हणजे मानवतावादाला केंद्रस्थानी मानले आहे. माणसाचा विकास महाप्रज्ञा व महाकरुनेनेच होतो. हे त्यांनी विज्ञानाच्या दृष्टिकोनातून सिद्ध करुन दाखविले आहे.

माणसाने माणसाची केलेली पिळवणूक भगवान बुद्धाला तत्कालीन काळात प्रत्यक्ष दिसून आली. ही होत असलेली पिळवणूक धर्माच्या व अंधश्रद्धेच्या नावाखाली झाली. ही पिळवणूक बुद्धांनी पाहिली. पुढे भगवान बुद्धाने मानविय दु:खाची खरी मिमांसा केली. मानवाच्या सर्वांगिण मुक्तीचा सिध्दांत मांडला. आध्यात्मिक व धार्मिक मुक्तीपेक्षा अमानुष व्यवस्थेतून भौतिकदृष्ट्या माणूस मुक्त झाला पाहिजे. याविचाराच्या सिंद्धांतावर भगवान बुद्धाने आपल्या धम्मप्रसाराचे कार्य मानवकल्याणासाठी पुढे नेले.

CamScanner

बौद्ध धम्माची महानता त्यांच्या करुणा, मानवता व समतेच्या विचारधारेत आहे. तो दैववादाच्या ऐवजी मानवतेचा पुजारी आहे. पाप कर्म न करणे, कुशल कार्याचा संचय करणे व चित्त शुद्ध ठेवणे हे बुद्धाचे आदर्श मुलतत्त्व आहे. बौद्ध धम्म हा प्रज्ञा-शील-करुणा व सम्यक समाधी यावर आधारीत आहे. जगात ज्या ज्या ठिकाणी बौद्ध धम्माचा विचार आत्मसात केला आहे त्या-त्या ठिकाणी मानवी संस्कृतीचा व मानवी कल्याणाचा विकास झालेला दिसून येईल. बौद्ध धम्म जेथेही गेला त्या ठिकाणची वास्तुकला, मूर्तिकला, चित्रकला व संस्कृतीचा इतिहास दैदिप्यमान दिसून येते. अनेक राष्ट्रात हिंसेचा इतिहास होता. परंतु ज्या ज्या ठिकाणी बौद्ध धम्माचा विचार आत्मसात केला. त्या त्या ठिकाणी बौद्ध धम्माच्या प्रभावाने शांती निर्माण झाली. म्हणजे विश्वात विश्वशांतीच्या निर्मितीत बौद्ध धम्माचे अमूल्य योगदान आहे. बौद्ध धम्माचा इतिहास हा रक्तरंजित इतिहास नाही. या जगात वैर किंवा युध्दाची शांती ही वैर किंवा युध्दाने होत नाही, तर ती प्रेमानेच होते. हा बुद्धाचा आदर्श संदेश आहे. बुद्धाचा शांतीचा अर्थ म्हणजे ती एक मानसिक अवस्था आहे, जी द्वेषरहीत आहे. बौद्ध धम्म विश्वशांतीसाठी एक महान आदर्श ठरला आहे. बौद्ध धम्माचे प्रतिक असलेले अशोक स्तंभावरील चार सिंह जगाच्या चारही दिशेला भयमुक्त मानवतेची घोषणा करतात. बर्टांर्ड रसेल यांनी म्हटले की, जर कोणत्या धर्माचा स्वीकार करण्यास म्हटले तर ज्या धर्माचा स्वीकार केला जाईल तो म्हणजे बौद्ध धम्मच राहील.

भगवान बुध्दाने सर्वप्रथम मानसशास्त्रीय सिद्धांताचा पुरस्कार केला. वंशपरंपरेतून मनुष्याचे चांगुलपण ठरत नाही तर, त्यांच्या चांगल्या आचाराने, विचाराने, वागण्याने, सम्यक मार्गाने व त्याच्या चारित्र्याने ठरत असते. हा नवा विचार संपूर्ण भारतीयांना प्रथम भगवान बुद्धाने दिला. पुढे जाती व्यवस्थे विरुध्द वर्धमान महावीरांनी प्रथम चळवळ निर्माण केली. पुढे भगवान बुद्धाने वेद प्रामाण्यवादी, जन्मजात श्रेष्ठतावादी आदी नाकारुन जात व वेद हे दैवी नाहीत हे ठासून सांगितले. आपल्या विचाराच्या अनुभवाला जे येते व जे वैज्ञानिक कसोटीवर टिकते, ते सत्य सिद्धांत बुद्धाने सांगितले. माणसाने धर्मग्रंथावर अजिबात विश्वास ठेवू नये, ते नाकारावे, त्यांच्याशी विद्रोह करावा अशी शिकवण बुद्धांनी दिली. माणसाला सर्व प्रथम बुद्धिवाद शिकविला. माणसाच्या मन स्वातंत्र्यापासूनच विचार स्वातंत्र्य येते. ही विचारधारा भगवान बुध्दाने पिडीत, शोषित ग्रांच्या लक्षात आणून दिली. अन्याय ग्रस्तांना लढण्याची उर्मी बुद्ध विचाराच्या प्रेरणेने दिली.

समतेसाठीच भगवान बुद्धाने संघनिर्मिती केली. बौद्ध भिक्षु हे जीवनापासून पलायन करणारे साधू नसून ते धम्मरक्षक, शिक्षक, प्रसारक आहेत. त्यांच्यावर संघमाध्यमातून सामाजिक समता स्थापण्याची मोठी जबाबदारी आहे. बुद्धाने सांगितले की, तृष्णा म्हणजे वासना हे सगळ्या दु:खाचे मूळ कारण आहे. व्यक्तिला अनेक गोष्टीचा लोभ असतो. भौतिक जीवन सुखी करण्यासाठी त्याला अनेक गोष्टी पाहिजे असतात. त्या मिळविण्यासाठी तो सतत धडपड करु लागतो. या धडपडीतूनच दु:खाची उत्पत्ती होत असते. यावर उपाय म्हणजे अविद्येचा नाश करुन चार आर्य सत्य व अष्टांगिक मार्ग याचे ज्ञान प्राप्त करुन व्यक्ति निर्वाण करुन शकतो. असे भगवान बौद्धांनी सांगितले. दु:खाचे रहस्य गौतम बुद्धाने आपल्या शेवटच्या उपदेशात महानिर्वाणाच्या वेळी समजावून सांगितले होते. जन्म, जरा, रोग, मृत्यू, इष्ट वस्तूचा वियोग, सिद्धीचा अभाव ही सगळी दु:ख होती. हा सगळा जन्मच दु:खमय आहे. हे रहस्य पहिले आर्य सत्य आहे.

समारोप व निष्कर्ष :

बौद्ध धम्मातील तत्त्वज्ञान वास्तविकतेवर आधारीत आहे. बौद्ध धम्माची विचारधारा मानवीकल्याणासाठी आहे. बौद्ध धम्मातील तत्त्वज्ञान त्रिशरण, पंचशील हे तत्त्व बुद्धापूर्तेच मर्यादित नसून सर्व मानव जातीच्या कल्याणाकरिता आहे. बौद्ध तत्त्वज्ञानाचे एकूणच सार खालील दोन ओळीत सामावलेले आहे.

सब्ब पापस्य अकरणं, कुसलस्स उपसंपदा
सचित परियोदपनं एतं बुध्दस्य सासनं ।।

बुद्धाच्या तत्त्वज्ञानानुसार वाईट गोष्टी वर्ज करणे, चांगले करावे आणि चित्त शुद्ध करावे. या बुद्धाच्या आज्ञा आहेत. बौद्ध एक धम्म नसून एक विचारधारा आहे. बौद्ध एक विचारधारा नसून एक वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारीत धम्म आहे. बौद्ध हा एक जीवन मार्ग आहे. या धम्माची वस्तुनिष्ठता व वैज्ञानिक दृष्टिकोन सर्वकाळासाठी लागू पडणार आहे. तथागत बुद्धाने धम्माची शिकवण देतांना असे सांगितले होते की, प्रत्येकाने स्वत:च्या तर्क बुद्धिने विवेचन करुन तत्त्वज्ञान अंगीकारावे. केवळ मी सांगतो म्हणूनच ते स्वीकारु नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक धर्माचा सखोल अभ्यास करुन बौद्ध धम्म

CamScanner

स्वीकारला. त्यांच्या विचारात ते म्हणतात. 'बौद्ध धम्म' हा विज्ञानवादी असल्यामुळे तो कोणत्याही काळात टिकून राहू शकतो. तो नित्य परिवर्तनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरच नाही तर आईनस्टाईन, ओशो, रसेल या सारख्या अनेक महान विचारवंतानी बुद्ध धम्माची वास्तविकता, वस्तुनिष्ठता व वैज्ञानिक दृष्टिकोन सर्व काळासाठी लागु पडणारा आहे असे सांगितले.

आधारभूत ग्रंथ :

१) भगवान बुद्ध व त्यांचा धम्म- डॉ. बी. आर. आंबेडकर, धम्म शासन, बल्लारपूर, १९९७.
२) बौद्ध संस्कृती- राहूल सांस्कृत्यायन, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.
३) भगवान बुध्द का प्रेरणादायी जीवन - डॉ. विमल किर्ती, परमेश्वरी प्रकाशन दिल्ली, २०१०.
४) सर्वोत्तम भूमिपुत्र : गौतम बुद्ध,- डॉ. आ. ह. साळुंके, राकेश साळुंके, प्रकाशन सातारा,२००७.
५) जगातील बुध्द धम्माचा इतिहास- मा. श. मोरे, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद. २००६
६) बौद्ध धम्म आणि तत्त्वज्ञान- सिंधु डांगे, म. वि. ग्रंथ निर्मिती मंडळ, पुणे १९८०.

CamScanner

B.Aadhar International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

प्राचीन बौद्ध वास्तुकला आणि आधुनिक महत्त्व

(विशेषत: महाराष्ट्राच्या संदर्भात)

डॉ.ओमप्रकाश सा.बोबडे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती, मो.९८६०८८२४५६
Email : omprakashbobade@gmail.com

सारांश :

बौद्ध धर्म हा जागतिक धर्म असून जागतिक स्तरावर चौथ्या क्रमांकाचा धर्म आहे. भारतीय बौद्ध वास्तुकला ही भगवान बुद्धाच्या मरणोपरांत (महापरिनिर्वाणानंतर) स्मृतींची जपणूक तसेच धर्माचा प्रचार व प्रसाराची प्रतिके या स्वरुपात निर्मित केलेली आढळून येते. स्तुप, चैत्य, लेणी (लयण) व विहार या प्रमुख चार वास्तू प्रकारांत बौद्ध वास्तुकला विभागलेली आढळून येते. स्तुप हा बौद्ध अवशेषावर निर्मित वास्तुप्रकार होय. सांची भारतात अमरावती येथील स्तुप हे सर्वाधिक प्रसिद्ध स्तुप आहेत. चैत्य, लेणी हा वास्तुप्रकार (पहाडातील दगडांना कापून विशिष्ट आकार देवून निर्मित केलेला प्रार्थना स्थळाचा वास्तुप्रकार होय. बारबल पहाडी अजिंठा, वेरुळ येथील बौद्ध लेण्या जगप्रसिद्ध असून जागतिक वारसा म्हणून मान्यता प्राप्त आहेत. विहार हा प्रकार सुद्धा निवासस्थान तसेच प्रार्थनागृह वास्तू प्रकार होय. बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार यासाठी प्रामुख्याने विहार ही वास्तू महत्त्वाची मानली गेली आहे. बौद्धवास्तुकलेत विहार या वास्तूंचीच सर्वाधिक निर्मिती झाल्याचे आढळून आले. प्राचीन काळात निर्मित वास्तुकला ही कालौघात क्षतीग्रस्त झालेली असून आज आधुनिक पद्धतीने संरक्षण करण्यात येवून त्यांचे नुतनीकरण करण्यात येत आहे. अजिंठा, वेरुळ येथील लेण्यांचे संरक्षण हे जपान सरकारच्या सहकार्याने करण्यात येत आहे. जगप्रसिद्ध बौद्ध वास्तू ह्या जागतिक वारसा म्हणून मान्यता पावलेल्या आहेत. काही वास्तूंना मध्ययुगीन कालखंडात मुस्लिम आक्रमकांनी क्षतिग्रस्त केल्याचे दिसून आले. आधुनिक काळात बौद्ध वास्तू ह्यांना बौद्ध तीर्थस्थळाचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे त्यांचे आधुनिक महत्त्व वाढलेले दिसून आले. बौद्ध वास्तू जगप्रसिद्ध असल्यामुळे जागतिक व स्थानिक पर्यटनाला चालना मिळालेली दिसून आली.

आर्य संस्कृतीच्या प्रसारानंतर संपूर्ण भारतात १६ महाजन पदांची निर्मिती झाली. वैदिक संस्कृती स्थीर झाल्यावर त्या संस्कृतीमध्ये अनेक बदल झालेत तसेच अनेक दोषही निर्मित झालेत. वेद – ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, आरण्यके, ब्राह्मणके, उपनिषदे, महाकाव्ये, १६ संस्कार, सहा वेदांगे इत्यादी वैदिक साहित्याची निर्मिती झाली. निसर्गाविषयी कुतूहल, कृतज्ञता व भिती ह्यातूनच मानवी संस्कृतीच्या इतिहासात निसर्गपुजेचा प्रारंभ झाला. त्यामुळेच वैदिक कालखंडात पुजा पद्धतीमध्ये आमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. मुळात आर्यांचा धर्म हा धर्मसंस्थेभोवती केंदित झालेला होता. विविध देवतांना प्रसन्न करण्याच्या हेतूने यज्ञ संस्था वाढत गेली. उत्तर वैदिक कालखंडात यज्ञ संस्थेत अनेकविध बदल झालेत. मोठ्या प्रमाणात यज्ञ होवू लागलेत आणि यज्ञात आहुती म्हणून पशुंचा बळी देण्याची प्रथा सुरू झाली. यज्ञ संस्था आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्य लोकांना परवडणारी नव्हती. यज्ञ संस्थेचा विरोध होण्यास सुरुवात झाली. वैदिक धर्माचा सुद्धा विरोध सुरु झाला. अशातच वेगळे तत्त्वज्ञान सांगणारे पंथ सुद्धा ६ व्या शतकात निर्मित झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अशा परस्पर विरोधी परिस्थितीमध्ये सर्वसामान्य जनतेच्या भाषेत भगवान बुद्धांनी जनतेला मुक्तीचा नवा संदेश दिला तो म्हणजेच बौद्ध धर्म होय.

बौद्ध धर्म :

बौद्ध धर्म हा एक जागतिक धर्म म्हणून मान्यता पावलेला धर्म आहे. या धर्माचे संस्थापक भगवान गौतम बुद्ध उर्फ शाक्यमुनी उर्फ सिद्धार्थ शुद्धोधन शाक्य होते. बौद्ध धर्म हा सर्वथा भ.गौतम बुद्धाचा विज्ञानवादी शिकवणीवर आधारीत आहे. आधुनिक विहारासह संपूर्ण भारतामध्ये भ.बुद्धाच्या कालावधीच हा धर्म प्रचारीत आणि प्रसारीत झालेला आहे. ६ व्या शतकात स्थापित ह्या धर्माचा प्रसार मौर्य सम्राट अशोकाच्या कारकिर्दीत भारताबाहेर झालेला दिसून येतो. इ.स.पू. ३८१ मध्ये वैशाली येथे दुसऱ्या धर्मपरिषदेत बौद्ध धर्म महायान आणि हिनयान या दोन पंथामध्ये विभागला गेला. या दोन पंथाअंतर्गत विविध विषयावर बौद्ध तत्त्वज्ञानावर विपूल अशी ग्रंथसंपदा निर्माण झाली. या दोन पंथातील तत्त्वज्ञान हेच महान बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान होय. या दोन पंथाव्यतिरीक्त ही बौद्ध धर्माच्या विविध शाखा आहेत. त्या शाखा अंतर्गतही विविध विषयांवर ग्रंथसंपदा निर्मित झालेली दिसून येते. या धर्माचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण जगभर झालेला असून हा धर्म लुंबिनी, सारनाथ, बोधगया, कुशीनगर तसेच महाराष्ट्रातील अजिंठा, एलोरा, कार्ले, भाजे, बेडसा इत्यादी तीर्थ स्थळी महत्त्वपूर्ण आहेत.

CamScanner

बौद्ध स्थापत्यकला :

प्रसिद्ध अशा बौद्ध वास्तुकलेचा विकास भारतासह संपूर्ण भारतीय उपखंडात झालेला दिसून येतो. या वास्तुकलेअंतर्गत प्रामुख्याने स्तुप, विहार, चैत्य व लेणी (लयण) यां प्रमुख चार प्रकारांचा समावेश होतो.

१) स्तुप :



भगवान गौतम बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या अवशेषावर स्मृती वास्तूच्या स्वरुपात निर्मित झालेला वास्तुप्रकार होय. इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून स्तुप निर्मिती केली जात आहे. कालौघात मात्र स्तुपांच्या प्रकारात बदल झालेले दिसून येतात. शारीरिक स्तुप, स्मारक स्तुप, प्रतीक स्तुप, प्रार्थना स्तुप इत्यादी प्रमुख प्रकार आहेत. स्तुप या राष्ट्राचा शब्दशः अर्थ मातीचा ढिगारा असा होतो. भारतातील सर्वात प्राचीन स्तुप हे चौथ्या शतकात निर्मित झालेले आहेत. सांची, भरहूत, अमरावती, पिपरवा, सारनाथ, भोन, नागार्जुन कोंडा तसेच नालासोपारा, काण्हेरी लेणीतील स्तुप भारतातील सर्वात प्राचीन स्तुप आहेत. स्तुपाला भगवान बुद्धाच्या सजिव देहस्वरुप वर्णिले जाते. ध्यानस्थ बुद्धाचे प्रतिक म्हणून स्तुप ह्या वास्तुला पाहिले जाते. शिखर, चौकाणाकार आकार-आधार, अंगे आणि पाययऱ्या तसेच प्रतिवेदिका म्हणजेच सिंहासन होय. थोडक्यात हर्मिका, वेदी आणि वेदिका हे स्तुपाचे प्रमुख अंग आहेत.

बौद्ध धर्मात स्तुप ही वास्तू सर्वांगिण पूजनिय आहे. या वास्तूची निर्मिती माती, लाकूड व विटा या द्वारा निर्मित केलेले आढळून आली आहे.

१) विहार :





Buddha Vihar, Gulbarga NammaGulbarga.com

विहार या शब्दशः अर्थ राहण्याचे स्थान असा होतो. वर्षावासामध्ये बौद्ध भिख्खूंच्या निवासाचे स्थान म्हणजे विहार होय. कालौघात विहाराचा उपयोग राहण्याचा स्थानाकरीताच होऊ लागलेला दिसून येतो. मुळात दिक्षारंभ व अध्ययन प्रक्रिया यासाठी प्रथमतः या वास्तूंची निर्मिती झाली. सद्यस्थितीत बौद्ध प्रार्थनागृह म्हणून विहार ही वास्तू ओळखली जाते. विहार गोलाकार असतात. मधोमध बुद्ध मूर्ती आणि सभोवताल भिख्खू निवासस्थान अशी रचना केलेली असते. ८४००० विहारांची निर्मिती मौर्यकाळात केल्या गेल्याचे दिसून येते. बोधगया विहार हे संपूर्ण बौद्ध जगतात प्रसिद्ध विहार आहे.

CamScanner

चैत्य :



चैत्य म्हणजे शुद्ध प्रार्थना गृह होय. यास मंदिर असेही म्हणतात. या वास्तूमध्ये मधोमध स्तुप निर्मित केलेला असतो. या वास्तूमध्ये अनेक भिख्खू एकाच वेळी प्रार्थना तसेच ध्यानधारणा करु शकत असत. काही चैत्य आयताकार, चौकोनाकार निर्मित केलेले दिसून येतात. दगडांना कापून वास्तूंची निर्मिती केलेली आढळून आली. काही चैत्य अर्धगोलाकार सुद्धा आहेत. वेरुळ येथील लेणी क्र.१० मधील चैत्यगृह, अजिंठा येथील चैत्यगृह, काण्हेरी लेणी चैत्यगृह तसेच कार्ले येथील चैत्यगृह महाराष्ट्रातील प्रमुख चैत्यगृह आहेत.

लेणी (लयण) :



ही वास्तू मुळात दुर्गम जंगलामध्ये, पहाडी प्रदेशात दगडांना कापून निर्मित केलली वास्तू होय. लेणी मध्ये विविध चित्रे चितारलेली असून ती बुद्धाच्या जीवनातील विविध घटनांशी संबंधित आहेत. अजिंठा, वेरुळ येथील लेण्या जगप्रसिद्ध आहेत. ह्या लेण्यामध्ये दगडात कोरलेला बुद्ध मूर्ती आणि चित्रे चित्रीत केलेली आहे. राजाश्रयामुळे लेण्यातील चित्रे, मूर्ती या अलंकारीक झालेल्या दिसून येतात.

प्राचीन बौद्ध वास्तुकलेचे आधुनिक महत्त्व :

प्राचीन बौद्ध वास्तुकलेअंतर्गत येणाऱ्या वास्तू ह्या स्तुप, विहार, चैत्य व लयण ह्या प्रमुख प्रकारात विकसित झालेल्या आहेत. सद्धस्थितीत विविध बौद्ध वास्तूंना जागतिक, राष्ट्रीय तसेच राज्यसंरक्षित वास्तूंचा दर्जा प्राप्त झालेला असून संशोधनाच्या व पर्यटनाच्या दृष्टीने ह्या वास्तूंचे महत्त्व वाढलेले असून स्थानिक नागरिकांना रोजगार प्राप्तीची साधने उपलब्ध झालेली आहेत. बौद्ध वास्तू बौद्ध धर्मातील धार्मिक तीर्थस्थळे आहेत. त्या अनुषंगाने तीर्थस्थळे धार्मिक पर्यटनाचे केंद्र झालेली आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तसेच शास्त्रशुद्ध पद्धतीने संरक्षण केल्यामुळे आधुनिक काळात वास्तुकलेच्या संशोधनास चालना मिळालेली दिसून येते.

निष्कर्ष :

१) बौद्ध वास्तू आणि वास्तू कलेची निर्मिती ही भगवान बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर झालेली दिसून येते.

२) वास्तू निर्मिती ही भव्य स्वरुपात व अंलकारिक करण्यात आलेली दिसून येते.

CamScanner

३) तत्कालीन परिस्थितीत राजाश्रय मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्यामुळेच संपूर्ण भारतभर बौद्ध वास्तूकला निर्मित झालेली आढळून आले.
४) बौद्ध वास्तू ह्या शास्त्रीय आधारावर तसेच तंत्रज्ञानाचा सर्वाधिक वापर करून निर्मित करण्यात आलेली आढळून येते.
५) बौद्ध वास्तुकला ही माती, चुनागारा-वीटा तसेच लाकडी साधनांचा उपयोग करून निर्मित करण्यात आली आहे.
६) चैत्य, लेणी हा वास्तू प्रकार पहाडातील मोठमोठ्या दगडांना कापून निर्मित करण्यात आलेल्या दिसून येतो.
७) भारतीय बौद्ध वास्तुकला ही संपूर्ण भारतभर स्तुप, चैत्य, लेणी, विहार या स्वरुपात निर्मित झालेली आढळून आली. स्तुप हा वास्तुप्रकार सर्वात प्राचीन वास्तुप्रकार होय.
८) स्तुप हा वास्तुप्रकार भगवान बुद्धाच्या अवशेषावर आधारीत असून ध्यानधारणा करीत असलेले भगवान बुद्ध वा ध्यानस्थ अवस्थेत भगवान बुद्ध ही संकल्पना सामोरे ठेवून स्तुप हा प्रकार निर्मित केलेला आढळून येतो.
९) बौद्ध वास्तुकलेवर हिंदू वास्तुकलेचा वा तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो.
१०) सद्यस्थितीत बौद्ध वास्तुकला निर्मित स्थळे ही आधुनिक काळात पर्यटन स्थळांचा तसेच बौद्ध तीर्थस्थळाचा दर्जा प्राप्त ठिकाणे झालेली आहेत.
११) भारताबाहेर चीन, श्रीलंका, भूतान, अफगाणिस्तान, मंगोलिया, कोरिया, इंडोनेशिया, जपान तथा अन्य देशांमध्ये सुद्धा बौद्धवास्तुकला विविध स्वरुपात निर्मित झालेली आढळून आली.
१२) मध्ययुगीन कालखंडात मुस्लिम आक्रमणकाऱ्यांच्या आक्रमणाद्वारा बौद्धवास्तुकलेची तोडफोड, भग्नता झाल्याने अपरिमित हानी झाल्यानचे आढळून आले.
१३) पगोडा नावाचा परदेशस्थ बौद्ध वास्तुप्रकार हा भारतीय स्तुपाचा विकसित प्रकार होय.
१४) बौद्धवास्तुकला ही विविध राजवंशाच्या काळात तसेच विविध कालावधीत निर्मित झाल्याचे आढळून आले.
१५) आधुनिक काळात बौद्ध वास्तूंना तीर्थस्थळांचा दर्जा प्राप्त झालेला दिसून येतो. त्यामुळे त्यांचे धार्मिक महत्त्व वाढलेले दिसून आले.
१६) जगप्रसिद्ध बौद्ध वास्तू ह्या जागतिक राष्ट्रीय वारसा मान्यता प्राप्त वास्तू आहेत. त्यामुळे त्यांचे पर्यटनाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व वाढलेले आढळून आले.
१७) सांप्रत स्थितीमध्ये बौद्ध वास्तुकला केंद्रे ही सांस्कृतिक दृष्टीकोनातून महत्त्वाची असून आर्थिक उलाढालीचे केंद्रे झालेली आहेत.

संदर्भग्रंथ सूची :

१) डि.एन.झा आणि के.एम. श्रीमाली (संपा); प्राचीन भारत का इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वयन निर्देशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली
२) मौर्य साम्राज्य का इतिहास, सत्यकेतू विद्यालंकार
३) दक्लांसिकल अकाऊंट ऑफ इंडिया, आर.सी.मुजूमदार
४) प्राचीन भारत मे जनतंत्र, देवीदत्त शुक्ल
५) भारतीय शिल्प, प्रदिप सिंह
६) जोशी, महादेवशास्त्री; भारतीय संस्कृती कोष, खंड-३, प्रकाशन भारतीय संस्कृतीकोष मंडळ
७) जी व्यंकट (रेड्डी); आलयम, द हिंदू टेम्पल अँड पिरोमी ऑफ हिंदू कल्चर
८) उपाध्याय, वासुदेव; प्राचीन भारतीय स्तुप, गुहा एवं मंदिर, हिंदी ग्रंथ अकादमी, पटना
९) गुनपेडेल, बुद्धिस्ट आर्ट इन इंडिया
१०) पांडे, गोविंदचंद; बौद्ध धर्म के विकास का इतिहास
११) शेज डेविडस; बुद्धिस्ट इंडिया
१२) दि स्तुप ऑफ भरहूत, दि ग्रेट बुद्धिस्ट टेंपल ॲट बोधगया, निंघम
१३) शोधपत्रिका, इंडियन आर्किओलॉजि, नई दिल्ली
१४) इंडियन कल्चर, कलकत्ता
१५) कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया, रामकृष्ण मिशन, कलकत्ता
१६) गुगल सर्च इंजिनवरून चित्रे साभार

CamScanner

DALIT LITERATURE
PAST, PRESENT & FUTURE

Editors
- Dr. Balasundari
- Dr. Shuddhodhan Kamble



Scanned with ACE Scanner

Published by

© **Vidhan Publishing Company**
Nalanda Colony, Bhimtekadi,
Amravati. 444 606
Mo. 9284733513
Email : vidhanpublishing@gmail.com

DALIT LITERATURE PAST, PRESENT & FUTURE

First Edition
2024

ISBN -
9788196520830

Price :
Rs.299/-

Printer and Typist
Atharv Graphics
Amravati, Maharashtra

Cover Design
Mr. Gajanan Dhole

Disclaimer
Concerned authors are solely responsible for their views, opinions, policies, copyright infringement, legal action, penalty or loss of any kind regarding their articles. Neither the publisher nor the editors will be responsible for any penalty or loss of any kind if claimed in future. Contributing authors have no right to demand any royalty amount for their articles.



Scanned with ACE Scanner

EDITORS' NOTE

Dalit literature is a significant body of literature that emerged in the mid-20th century, written by authors who identify as Dalits, a term used for socially and economically marginalized groups in India. It is a powerful medium that gives voice to the historically oppressed and marginalized Dalit communities, challenging the mainstream narratives and offering a platform for their unique experiences and perspectives. It is not just about the representation of the Dalit experience. It is a radical form of literature that questions, critiques, and challenges the social order and the established systems of oppression. It confronts the traditional caste-based social structure and its inherent injustices, and advocates for equality, dignity, and social justice.

Dalit literature's significance lies in its ability to subvert the dominant discourse and to redefine the literary and cultural landscape. It provides a counter-narrative to the mainstream, often upper-caste, literature and offers a profound critique of the social, political, and economic structures that perpetuate inequality and discrimination. Dalit literature is a form of cultural and political expression aimed at the liberation of Dalits and the oppressed in India. It serves as a means of protest and aims to challenge the dominant caste narratives. Dalit literature emphasizes the importance of representing the historical struggles and deep psychological aspects of the oppressed community.

Dalit literature enriches the diversity and inclusivity of the Indian literary landscape by introducing alternative narratives, voices, and aesthetic sensibilities. It challenges dominant literary norms and expands the boundaries of literary expression, fostering a more pluralistic and inclusive literary canon and has played a pivotal role in inspiring social movements, activism, and advocacy for Dalit rights and social justice. By raising awareness and empathy among readers, Dalit literature mobilizes collective action and solidarity, contributing to broader movements for social change and equality. In short, Dalit literature occupies a central place in contemporary Indian literature by amplifying marginalized voices, challenging dominant narratives, and advocating for social justice and equality. Its significance lies not only in its artistic and literary merit but also in its transformative potential to catalyze social change and foster a more inclusive and just society.

The present book *Dalit Literature: Past, Present and Future* consists of 18 articles from authors across different parts of the country, each bringing a unique perspective to the table. These articles delve into diverse themes, reflecting the rich tapestry of experiences, struggles, and triumphs of the Dalit community. They explore the historical roots of Dalit literature, its evolution over time, and its significance in the contemporary socio-political landscape.The diversity of themes in these articles underscores the multifaceted nature of Dalit literature. From poignant narratives of caste-based discrimination to inspiring stories of resilience and resistance, these articles offer a comprehensive understanding of the Dalit experience.

One of the primary purposes of this book is to document the historical contexts and evolution of Dalit literature. By tracing its origins, development, and key milestones, the book provides readers with a deeper understanding of the socio-political conditions that gave rise to Dalit literary movements and the challenges faced by Dalit writers over time. The book also serves as a platform for envisioning the future of Dalit literature. Through discussions on emerging trends, potential challenges, and opportunities for innovation, the book stimulates dialogue and debate about the trajectory of Dalit literary movements and the possibilities for further growth, diversification, and impact in the years to come. By bringing together scholarly insights, critical analyses, and creative expressions from diverse voices within the field of Dalit literature, the book fosters greater awareness and understanding among readers. It encourages readers to engage with Dalit literary texts, themes, and perspectives, thereby promoting empathy, solidarity, and cross-cultural dialogue.



Scanned with ACE Scanner

The book *Dalit Literature: Past, Present, and Future* fulfills a vital need by documenting the history, analyzing the contemporary relevance, and envisioning the future trajectory of Dalit literature. It promotes awareness, understanding, and empowerment while advocating for greater recognition and appreciation of Dalit voices within Indian literary and social contexts.

We are deeply grateful to all the authors for their valuable contributions. Their insightful perspectives have enriched this edition, making it a treasure trove of knowledge and understanding about Dalit literature.

We hope that this edition will serve as a valuable resource for scholars, students, and anyone interested in Dalit studies. It is our sincere hope that these articles will inspire thoughtful discussions, foster empathy, and contribute to the ongoing struggle for social justice.

- Editors



Scanned with ACE Scanner

INDEX

1) Dalit Literature Today : Some Critical Musings 1
Dr. Amar Nath Prasad

2) Caste Puzzle In Bama's *Vanmam* 8
Dr. M. Charmaigne Owenita

3) Representation Of Dalit Identity In Cinema with Special Reference to *Masaan* 17
Dr. Nirmala S. Padmavat

4) The Representation Of Exploitation And Self Assertion In Urmila Pawar's Autobiography *The Weave of My Life: A Dalit Woman's Memoir* 24
Prof. Dr. Ravi Prakash Chapke

5) An Elucidate Of Voiceless and Alienated in P. Sivagami's *The Grip Of Change* 29
Dr. V. Chithra Devi

6) Dr. B. R. Ambedkar's Perspective On Cultural And Social Values In Indian Society 33
Dr. Gautam Chandrabhan Satdive

7) A Panoptic Analysis On Discrimination Attitude with Reference To Meena Kandasamy's *The Gipsy Goddess* 38
Dr. S. Bala Sundari
K. Nithya

8) A Study of Dalit Feminism In Shantabai Kamble's Autobiography *Majya Jalmachi Chittarkatha* 43
Dr. Sidhartha B. Sawant

9) Social Realism: A Detailed Study Of Bama's *Karukku* 48
Ms.V. Ahilabai
Dr. R. Ananth Babu

10) Food Politics in Sharankumar Limbale's *The Outcaste* 52
Joe Vincila L
Dr. R. Ananth Babu

11) Through The Dalit Lens: Self-Reflection And Social Critique In Bama's *Karukku* 55
Dr.R.Kumara Balaji



Scanned with ACE Scanner

12) Giving Voice to the Marginalized : Emergence of Dalit Literature in India 59
Dr. Neelam Mulchandani

13) Marginalization of Dalit Women In Bama's *Sangathi* 64
Dr. S. Sudha

14) Navigating The Caste Cultural Marginalization: Urmila Pawar's Autobiography *Aaydaan - as a Memoir* of Intra - Culture and Inter - Cultural Discrimination 73
Mounita Roul

15) Evolution Of Dalit Literature : Past, Present and Beyond 77
Malavika M P
Dr.V.Tamil Selvi

16) Dalit Feminism 80
Dr. M. Manimozhi

17) Baburao Bagul – A Pioneer of Dalit Literature 84
Dr. Pavan Nagnath Emekar

18) Dr. Ambedkar's *Waiting For A Visa* : Plight Of Untouchable. 88
Dr. Archana Badne

19) *Fakira* : A Tale Of Resilience, Social Justice And Transformation 91
Dr. Asha Gangadhar Dhumal

20) Dr. Babasaheb Ambedkar and Dalit Literature 95
R. Ali

21) Dalit Literature and Social Values 98
Beula Ruby A
Kokilavani M

22) Celebrating the Aesthetics of Tribality from the Narratorial Discourses of Sowvendra Shekhar Hansdas Novels 101
Priyanko Sarkar
Dr. Anamika Ganguly

◆ ◆ ◆



Scanned with ACE Scanner

1

Dalit Literature Today : Some Critical Musings

Dr. Amar Nath Prasad
Professor and Head,
University Department of English,
Jai Prakash University, Chhapra, Bihar

Abstract :

The world is passing through several fundamental changes in almost every field. Dalit Literature seems to be the product of this root level changes in the society. It came into existence for raising the voice of the voiceless. Consequently we notice today that three types of prominent discourses are mostly being practiced and explored in the form of various seminars, conferences,workshops, and above all various teaching and reading courses of studies these days. They are: Women Empowerment, Tradition versus Modernity and Dalit Discourses. It's a great fact that from the time immemorial the dalit and the marginalized,the untouchables and the deserted have to bear the brunt of social disparity, inequality and injustice. These persecuted and miserable people of society had to suffer a lot both physically and mentally right from their cradle to grave. Now after several movements and constant demands ,almost all the governments of the world are being seen very cautious and caring for their causes and several new changes are on progress in the life of the dalit and the deserted; but in spite of several stern actions and acts, still we see today some unbecoming and very hateful incidents and occurrences of this section of society. The role of Dalit literature particularly the regional dalit literature can not be forgotten for uplifting and upgrading the miserable and corroding situation of the Dalit.

Key Words :

Dalit Literature, Miserable People, The Marginalized communities, Untouchability, B R.Ambedkar, Search for root, Protest literature.

Today the topic, "Dalit literature" is gaining its ground by leaps and bounds in literature as well as in social sciences. It has become a matter of literary and critical discussion all over the world. The non-brahmanical spiritual leaders like Kabir, Ravi Das, Valmiki, Vedvyas, Chokhamela brought a new change by hammering hard on the callous and rigid traditional rules and regulations meant for clutching the freedom of the Dalit and the deserted. The other eminent social reformers like Jyotiba Phule, Narayna Guru, E.V.Rama Swami Naicker and Dr. Bhim Rao Ambedkar have exposed and satrised the religious bigotry, hypocrisy and the callousness of the upper caste people. Social and revolutionary writers like Mulk Raj Anand, Premchand, Shiv Shankar Pillai, P.K.Atre, Durga Bhagwat, Vijay Tendulkar, Dilip Chitre, Namdev Dhasal, Baburao Bagul, Joseph Macwan, Harish Manglam, Pravin Gadhvi, Dalpat Chauhan M.B.Gaijan and some other modern Dalit writers have presented the real voice of the sufferings and the persecutions in their respective works. The present paper is a modest attempt to dive deep into the old and the new literature of Dalit sentiments and to churn out the real passion and proport of the Dalit literature. It also explores the various poetic tools used by the Dalit writers to turn their feelings into a great piece of the work of art.

From time immemorial, the Dalit have been suffering from the untold miseries. The seed of this brutal persecution and several other social and cultural bonds lies in the writings of Manusmriti in which the untouchable have been treated as an object. In the Manusmriti, the untouchable have been debarred from gaining knowledge particularly the Vedic knowledge. An untouchable, according to this book has no right to go to the temples; no liberty to listen to the incantations of the Vedas or other great scriptures. They are also deprived of the right of



Scanned with ACE Scanner

reading and studying the language, Sanskrit which is supposed to be the richest language of the world. And this resulted in the deterioration of this great language, So one of the causes of the degeneration of Sanskrit language is untouchability and perhaps this is why Mahatma Gandhi and Ambedkar, R.N.Tagore and Swami Vivekananda, Maharshi Dayanand and Bal Gangadhar Tilak—all have given a scathing attack on the castist mentality of India. Mahatma Gandhi went to the extent of saying the untouchable, 'Harijan', that is the man of God. But in spite of their best efforts and many constitutional provisions, untouchability is still seen somewhere in direct form and elsewhere in a subdued way. Mulk Raj Anand presents a truthful portrayal of untouchability in his famous novel, Untouchable. Bakha, the protagonist of the novel, has to suffer insult and abuse without any rhyme or reason. He suffers only because he is untouchable. In a fit of anger he bursts out:

> Why are we always abused? The sanitary inspector that day abused my father. They always abuse us. Because we are sweepers. Because we touch dung. They hate dung. I hate too; that is why I came here. I was tired of working on the latrines every day. That is why they don't touch us-the high castes.[1]

Thus, untouchability is that disease which creates contagion in our social structure. It is the evil which eats into the vitality of a healthy nation. E.M.Forster rightly observes:

> The sweeper is worse off than a slave, for the slave may change his master and his duties and may even become free, but the sweeper is bound forever, born into a state from which he can't escape and where he is excluded from social intercourse and the consolation of his religion. Unclean himself, he pollutes others when he touches them. They have to purify themselves and to rearrange their plans for the day. Thus he is a disgusting as well as a disquieting object to the orthodox as he walks along the public roads, and it is his duty to call out and warn them that he is coming. I remember on my visits to India noticing that the sweepers were more sensitive looking and more personable than other servants and I knew one who had some skill as a poet.[2]

The centre of Dalit literature and Dalit movement is the Mahar movement, the Buddhist conversion and the revolutionary thoughts of Dr. B.R.Ambedkar. It is Dr. Ambedkar whose bold assertions gave a new shape to Dalit literature. He was a great champion of the thoughts of Lord Buddha and Chokhamela, the great saint of Maharashtra. Chokhamela says:

The only impurity is in the Five elements
There is only one substance in the world
Then who is pure and who is impure?
The cause of pollution is in the creation of the body.
At the end,
There is nothing but pollution.
No one knows anyone who is born pure
Chokha asks, in wonder
who is pure?[3]

नोकरी करणाऱ्या महिलांना अनेक मानसिक आणि शारीरिक समस्यांचा सामना करायला लागतो. या समस्यांची कारणे विविध आणि संवेदनशील असू शकतात, ज्यामुळे समस्यांची प्रकृती आणि प्रमाण विविध महिला गटांमध्ये भिन्न असू शकतात. खासगी महिला नोकरीच्या क्षेत्रातील सामाजिक परिस्थिती, कार्यस्थळाचे वातावरण, अनैतिक वर्तन, लिंगात्मक उत्पीडन, आणि कामातील असलेले अधिकार नसलेल्या स्त्रियांच्या समस्या आढळून येतात. तसेच, कामातील ताण, कर्मचारीच्या संबंधातील संघर्ष, आणि कामातील अधिक दाब, स्वास्थ्य समस्या, वैयक्तिक – परिवारिक संताप, आणि सामाजिक समाधानांची कमी अशा समस्यांमुळे त्यांची मानसिक स्थिती आणि शारीरिक क्षमता धडकते.

भारत पुरुषप्रधान संस्कृतीवर आधारलेला आहे. पुरुषांना महत्त्व आहे, सर्व अधिकार पुरुषांच्या हातात एकवटलेले असे व त्यामुळे स्त्रियांना समाजात दुय्यम दर्जा देण्यात आला होता पूर्वीपासून स्त्रियांना आपला समाज दुर्बल कमकुवत समजत आलेला आहे व त्यातूनच स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारात वाढ झाली. पूर्वी स्त्रियांना चूल आणि मूल एवढ्यापुरतेच मर्यादित

ठेवले होते त्या त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता आणि या सर्वांचे कारण म्हणजे स्त्री ही पुरुषांपेक्षा कमी दर्जाच्या आहे, तिला कसे वागवावे, उपभोग कसा करावा ह्याचा उल्लेख अनेक वेदांमध्येसुद्धा केलेला आहे व त्यातूनच स्त्रियांवरील अत्याचाराला दिशा मिळाली आहे. महिलांच्या समस्यांची अध्ययनवस्तूत सामाजिक, आर्थिक, आणि राजकीयस्तरावर अनेक समस्यांचा सामना करण्याची गरज आहे. ह्या समस्यांमध्ये महिलांच्या अधिकारांच्या अभाव, गरोदरपण, लिंगात्मक शोषण, सामाजिक न्यायाची अभाव, व्यावसायिक असमानता, आणि आरोग्य संबंधित समस्या यासह त्यांच्या स्तिथीचे महत्त्वाचे कारक आहेत. बालविवाह, सती प्रथा, बेजोडविवाह, स्त्रीभ्रूणहत्या, छेडछाड, स्त्रियांनी विक्री, कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी अशा अनेक अत्याचारांना स्त्रियांना बळी ठरत होत्या. त्यांची स्थितीही अतिशय गंभीर होती तेव्हा काही समाजसुधारकांनी समाजातून ही प्रथा बंद करण्यासाठी, सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच आज स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळाला आहे. बहुतांश स्त्रिया चांगल्या नोकरीवर कार्यरत आहे व समाजात आपले अस्तित्व निर्माण करतआहे. मात्र आजही स्त्रियांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे जसे की, कौटुंबिक हिंसाचार, नोकरी करत असलेल्या स्त्रियांना या हिंसाचारांना बळी पडावे लागत आहे. पती – पत्नीचे भांडण, नोकरी असल्यामुळे तिच्यावर संशय घेणे, तिचा अपमान करणे या गोष्टी आजही घडताना दिसत आहे. आज जरी आपण अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती केली असती तरी आजही स्त्री सुरक्षित नाही आहे. मग ती कामाच्या ठिकाणी असो शाळेत असो महाविद्यालयात असो किंवा कुटुंबात असो तिच्यावर अनेक प्रकारच्या अत्याचार केले जाते लैंगिक छळ केला जातो.

आज गर्भात असलेली स्त्रीसुद्धा सुरक्षित नाही आहे. गर्भ चाचणीद्वारे माहिती करून स्त्री असेल तर तिला जगात येण्यापूर्वीच मारून टाकतात ही खरी शोकांतिका आहे आणि ह्याचा परिणाम म्हणजेच आज आपल्या भारतातले लिंग गुणोत्तर प्रमाण हे दरहजार पुरुषांमाग फक्त ९२७ स्त्रिया आहे. ह्या गोष्टीवर वेळीच आळा घालण्यात आला नाही तर येणाऱ्या काळात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

समाजरुपी रथ विकासाकडे दौडवायचं असेल तर पुरुषरुपी चाकासोबत स्त्रीरुपी चाकालाही तेवढीच चालना मिळणे गरजेचे आहे. याच विचाराने स्त्रियांना शिक्षणाचे दारे उघडी झाली व स्त्री शिक्षण घेण्यासाठी बाहेर पडली. बदलत्या काळाबरोबर बदलणारे जीवनमान आणि त्या अनुषंगाने नव्याने अनुकरण करणारे जगण्याची सुधारित जीवनपद्धती अंगीकारल्यामुळे कुटुंबप्रमुखावर आर्थिक ताण पडतो. त्यातच मुलांचे शिक्षण शारीरिक, उद्भवणाऱ्या आकस्मिक व्याधी व इतर घरगुती बाबींवर होणाऱ्या खर्चांची पूर्तता करताकरता कुटुंबप्रमुखांची उडणारी आर्थिक तारांबळ थांबवण्यासाठी व आपले आयुष्य सुखसमाधानकारक घालवण्याकरिता पतीबरोबर पत्नीही अर्थचरणासाठी घराबाहेर पडली कारण कुटुंबाच्या स्थैर्यासाठी आर्थिक प्राप्ती आवश्यक असते. परंपरागत समाजात ही जबाबदारी प्रमुखता पुरुषांची मानले जात असे, परंतु बदलत्या सामाजिक व्यवस्थेत स्त्रियासुद्धा अर्थाजन करू लागल्या आहे. डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, शिक्षक, संशोधक, वैज्ञानिक, शासकीय अधिकारी, उद्योजक, आर्किटेक, प्रशासक, व्यावसायिक, गुंतवणूकदार बँक व्यवस्थापक, राजकारणी, समाजसुधारक, विमानसेवा इ. अशा सर्व जबाबदारी तिने स्वीकारले आहे आणि यशस्वीरित्या पार पाडत आहे. आज एकही क्षेत्र सुटले नाही की जिथे स्त्री काम करत नाही. स्त्रियांनी यशाची उंच शिखरे सर्व क्षेत्रात पादाक्रांत केलेली आहे. स्त्रियांनी आज सामाजिक, आर्थिक, राजकीय, शिक्षण आणि सांस्कृतिक या सर्व क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवलेला आहे. तर काही स्त्रिया उच्चशिक्षित होऊन तर काही स्त्रिया कमी शिकूनसुद्धा कुटुंबात मुलांवर योग्य संस्कार करण्याचे काम करीत आहे.

नोकरदार महिलांना भेडसावणाऱ्या ५ आरोग्य समस्या :

शारीरिक आरोग्य समस्या :

आज स्त्रियांना ज्या काही महत्त्वाच्या शारीरिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामध्ये डायबिटीज, ओव्हेरियनसिंड्रोम, पोलिसिस्टिक ओव्हेरियनसिंड्रोम (PCOS), गर्भाशयातील किंवा स्तनातील किंवा अन्य स्त्रावाच्या संबंधित समस्या, गर्भपात, गर्भाची समस्या, प्रसवाच्या समस्या, अनियमित मासिक धर्म, अत्यंत अधिक स्तन संबंधित समस्या (Breast Cancer), कॉलेस्ट्रोल, हृदयरोग, मानसिक आरोग्य, डोळ्यांचे प्रॉब्लेम, रजोनिवृत्ती यांचा समावेश होतो. ज्यामुळे नियमित दैनंदिन कामांमध्ये थकवा येतो.

मानसिक आरोग्य समस्या :

निरोगी कार्य – जीवन समतोल राखण्यात सक्षम नसणे, अतिश्रम करणे, स्वतःला वेळ नसणे यामुळे चिंता, नैराश्य, उत्साहाचा अभाव आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. कामाचे वातावरण आणि सहकारी सहकाऱ्यांशी असलेले नाते हे विवाहित नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये मानसिक त्रासाचे कारण असल्याचे संशोधन देखील दर्शवते. मुलांची उपस्थिती, आजारी कुटुंबातील सदस्य आणि समवयस्क गटाचा अभाव यामुळे नोकरदार महिलांमध्ये सध्याच्या मानसिक आरोग्याच्या समस्या वाढतात.

झोपेचा त्रास :

झोप हा निरोगी जीवनशैलीचा एक आवश्यक घटक आहे. काम – जीवनाचा समतोल आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या अभावामुळे निद्रानाश, झोपेची आणि जागे होण्याची जास्त वेळ,

दिवसा झोप आणि रात्रीची चिंता यासारख्या झोपेचा त्रास होतो. झोपेच्या व्यत्ययामुळे कामाची कार्यक्षमता आणि उत्पादकता कमी होते. पती आणि सासरच्या लोकांकडून समजूतदारपणा नसल्यामुळे त्यांच्या त्रासात भर पडते.

हृदयाच्या समस्या :

नोकरदार महिलांमध्ये हृदयविकाराचे प्रमाण वाढत आहे. संशोधकांना स्त्रिया, विशेषत: नोकरदार महिलांमध्ये हृदयविकाराच्या दरामध्ये एकसमान आढळून आले आहे. या अभिसरणाची प्रमुख कारणे म्हणजे नोकरदार महिलांमध्ये तणाव आणि नैराश्य. नोकरदार महिलांना होणारा सर्वात सामान्य हृदयरोग हा उत्स्फूर्त कोरोनरीआर्टरी डिसेक्शन असल्याचे आढळून आले आहे. ही एक आणीबाणीची परिस्थिती आहे जिथे हृदयालारक्त पुरवठा करणारी धमनी फाटली जाते ज्यामुळे हृदयविकाराचा झटका येतो. तंदुरुस्तीचा अभाव हे महिलांमध्ये हृदयविकाराचे आणखी एक कारण आहे.

स्त्रीरोगविषयक समस्या :

नोकरीकरणाऱ्या महिलांना त्यांच्या मासिक पाळीत वेदनादायक मासिक पाळी, अस्वस्थता, जड रक्तस्त्राव यांसारख्या समस्या आढळल्या आहेत ज्यात सर्वातसामान्य समस्या म्हणजे पॉलीसिस्टिक ओव्हेरियन सिंड्रोम (PCOS).

या त्रासांमध्ये भर घालण्यासाठी, नोकरदार महिलांना लठ्ठपणा, थायरॉईड समस्या, ॲनिमिया, व्हिटॅमिन डी ची कमतरता, वंध्यत्व, मधुमेह आणि रक्तदाब समस्यांसारख्या जीवनशैली विकारांना देखील बळी पडतात.

आर्थिक हिंसा :

काही आर्थिक संकटांमुळे व्यक्तींना विचारलेल्या हिंसेची प्रेरणा होते. उदाहरणार्थ, काही लोकांना आर्थिक शासन प्रमुखांनी वाढवून लोकांच्या लिंगीय स्वतंत्रतेच्या हिंसेची दबाव अद्याप वाटत आहे.

कौटुंबिक हिंसा :

प्रकाराच्या हिंसेमध्ये कोणत्याही कुटुंबियांच्या सदस्यांवर शारीरिक, मानसिक किंवा आर्थिक हिंसा घडते. हे कुटुंबियांच्या सदस्यांमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक आधारे, आर्थिक वर्गांच्या, लैंगिक आणि धार्मिक धारांच्या संघर्षांमुळे होते.

लैंगिक शोषण :

या प्रकाराची हिंसा हे लैंगिक आधारावर विशेष दर्जाची आणि अशिक्षित सामाजिक स्थानाच्या व्यक्तिच्या प्रतिष्ठाचा उपयोग करते. लैंगिक शोषणात व्यक्तिचित्राचे दबाव, बेइज्जती, आणि आत्महत्या यासारख्या प्रकारातील प्रतिसादांचा सामावला जातो.

सेक्स ट्रॅफिकिंग :

व्यक्तींची भरती, वाहतूक, हस्तांतरण, आश्रय देणे किंवा प्राप्त करणे, धमकी किंवा बळाचा वापर करून किंवा इतर प्रकारची बळजबरी, अपहरण, फसवणूक, सत्तेचा दुरुपयोग किंवा असुरक्षिततेची स्थिती किंवा शोषणाच्या उद्देशाने, दुसऱ्या व्यक्तीवर नियंत्रण असलेल्या व्यक्तीची संमती मिळविण्यासाठी देयके किंवा लाभ देणे. शोषणामध्ये, इतरांचे शोषण किंवा वेश्याव्यवसाय किंवा लैंगिक शोषणाचे इतर प्रकार, सक्तीचे श्रम किंवा सेवा, गुलामगिरी, अवयव काढून टाकणे, फेरफार करणे किंवा रोपण करणे यासारख्या पद्धतींचा समावेश असेल.

हुंडाबळी :

हुंडयासारखी सामाजिक समस्या स्वातंत्र्यनंतर आजही ज्वलंत आहे. आजही आपण हुंडयापायी नववधुंचा छळ, हुंडाबळीच्या घटना ऐकतो. या पध्दतीचे निर्मूलन करणे म्हणजे प्रचलित रुढी, परंपराविरुध्द जनजगृतीची एकप्रकारची लढाईच आहे. हुंडापध्दतीही आपण पुरुष महिला समानतेचा जो नारा देत आहोत त्याच्याशी विसंगतच आहे. त्यातुनच स्त्रीचे समाजातील स्थान, स्त्रीला समाजात असणारी किंमत याविषयी समाजाची मानसिकता काय आहे हे कळून येते. हुंडापध्दतीचे निर्मूलन म्हणजे ही मानसिकता बदलण्याचे मोठे आवाहन सर्व समाजापुढे आहे.

नोकरी करणाऱ्या महिलांना मानसिक आणि शारीरिक समस्यांवर उपाय केल्यास त्यांच्याजीवनात संतुलन आणि समृद्धी साधू शकते. त्या उपायांचे अनुसरण खालीलप्रमाणे असू शकतात:

स्वास्थ आहार :

एक संतुलित आहार महत्त्वाचा आहे. त्यांना पूर्ण पोषण प्राप्त करण्यासाठी सकारात्मक आहार घ्यायला पाहिजे, ज्यात फळे, सब्जी, प्रोटीन, फिबर, अशी स्वस्थ खाणे समाविष्टकेले जातात.

व्यायाम :

नियमित शारीरिक व्यायाम करणे महत्त्वाचे आहे. योग, ध्यान, व्यायाम, डान्स, स्विमिंग अशी संरक्षित प्रक्रिया केली जाते, ज्यात शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य सुधारित होते.

स्वच्छता :

स्वच्छ आणि सुरक्षित पर्यावरण जगायला आवश्यक आहे. ह्यामध्ये स्वच्छ औषधे, पाणी, वातावरण, आणि स्वच्छतेचे उत्तम प्रवाह सांगितले जाते.

सामाजिक सुरक्षा आणि समर्थन :

खरोखरच, महिलांना समाजातील समस्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी समाजिक संघटनांचा समर्थन महत्त्वाचा आहे. या संघटनांनी खासगीत महिलांना समाजातील त्याग, अत्याचार, लष्करीकरण, लिंगभेद, वैवाहिक प्रतिबंध, आदिकांच्या समस्यांपासून संरक्षण देण्याचे कार्य केले जाते. त्यांनी महिलांना त्यागाच्या संकटांपासून संरक्षित ठेवण्यासाठी संघटनेचे विविध कार्यक्रम संचालित करतात. त्यांच्यामध्ये महिलांचे संघटन, सामाजिक संघटने, नारी प्रतिष्ठाने, महिलासहाय्या संस्था, आदिकांचे समावेश येते. या संघटनांच्या कामात विविध

विभागांचा समावेश असतो, जसे की विवाह विचाराची सल्ला, न्यायालयिक संरक्षण, त्यागाच्या परिस्थितीत साहाय्य देणे, शिक्षण, रोजगार सुविधा, स्वास्थ्य व सुरक्षा सेवा प्रदान करणे, आदि. त्यामुळे महिलांना समाजिक संरक्षणात सामील होऊन स्वतंत्रतेच्या आणि स्वाभिमानाच्या भावना स्थापित करण्यात मदत होते.

कामाचे स्तर आणि वातावरण:

महिलांना समान कामाच्या संधी देण्यासाठी न्याय्य आणि समानता अभियानातील सहभागीता आवश्यक आहे. समान कामाच्या संधी तयार करण्यासाठी, समाजातील लिंगीय विचारधारा आणि वैयक्तिक प्राधान्यांचा निर्मूलन आवश्यक आहे. महिलांना पुरुषांसोबत समान वेतन, समान पदस्थान, आणि समान कर्तव्यांसाठी मिळावं लागेल. संबंधित कंपन्यांनी महिलांना शारीरिक स्वास्थ्यासाठी सुविधांसह संघटन करावे. शारीरिक स्वास्थ्य सुधारित करण्यासाठी, कंपन्यांनी महिलांना फिटनेस केंद्र, योगा, व्यायाम, नियोजित आहार प्रोग्राम, आदि या प्रकारच्या सुविधा प्रदान करू शकतात. या संघटनांना महिलांना कामात आणि परिवारात समय देण्याची सहाय्य करण्याची गरज असू शकते, ज्यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याला मदत मिळवू शकते.

मानसिक स्वास्थ्य आणि समर्थन:

मानसिक स्वास्थ्य आणि समर्थन एक महत्त्वाचे आधार आहे, विशेषतः कामाच्या संदर्भात महिलांना. महिलांच्या मानसिक स्वास्थ्याचा काळजी घेण्याचे महत्त्व अद्याप अधिक वाढत आहे, कारण त्यांच्यावर दाब, तंत्रज्ञानाची कमतरता, वैवाहिक संबंधांची समस्या, आणि कामाच्या संबंधांमुळे त्यांच्या सामाजिक वातावरणातील दाब यांची अधिक प्रमाणात अनुभवले जाते. मेंटल हेल्थ समर्थन सेवा महिलांना मानसिक स्वास्थ्याच्या आवश्यकता असलेल्या किंवा संदेशांच्या शिकार झालेल्या किंवा अनुभवी माहिती देण्यात मदत करते. स्वास्थ्य चिकित्सासेवा महिलांना मानसिक स्वास्थ्याच्या संबंधित समस्यांसाठी उपचार प्रदान करते. त्यांच्यासाठी सांगडीची वातावरण आणि संघटनांच्या स्वागतपूर्वक संरक्षणाची प्राथमिकता असल्याने त्यांच्या समस्यांचा समाधान करण्यात मदत करते. परिवार योग्यता कार्यक्रमांचा प्रदान अधिक महत्त्वाचा आहे, कारण ते मानसिक स्वास्थ्याच्या समस्यांसाठी परिवाराचा संरक्षण आणि समर्थन प्रदान करते. परिवाराचे समर्थन महिलांना सुरक्षित आणि सामाजिकतात्मकतेत सहाय्य करते, ज्यामुळे त्यांच्या मानसिक स्वास्थ्याची काळजी घेण्यात मदत होते. मानसिक स्वास्थ्याची काळजी घेण्याचे महत्त्व अधिक महसूसले जाते कारण त्यामुळे महिलांना समाजातील स्थानावर अधिक स्वतंत्रता, सामाजिक समावेशन आणि समाजिक न्याय मिळू शकते.

स्वास्थ्य जीवन शैली :

स्वास्थ्य आहार, व्यायाम, आणि ध्यान योग्य जीवनशैली अवलंबून राहणे महिलांना मानसिक आणि शारीरिक समस्यांमध्ये मदत करण्यास मदत करू शकते.

शैक्षणिक संघटना आणि प्रशिक्षण :

शैक्षणिक संघटना आणि प्रशिक्षण महिलांना उच्चशिक्षण आणि कौशल्य विकसित करण्यात मदत करू शकते, ज्यामुळे त्यांच्या पेशेवर स्थिती सुधारित करण्यात मदत होऊ शकते. या कार्यक्रमांच्या माध्यमातून, महिलांना नवीन आणि ताज्या कौशल्ये शिकविण्याचा आणि त्यांच्या व्यक्तिगत विकासासाठी आवश्यक ज्ञान प्राप्त करण्यात मदत मिळते. उच्च शिक्षण या महत्त्वाच्या अवसरांचा उपयोग करून, महिलांना उत्तम करिअर विकसित करण्यात मदत होते. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वतंत्रता, समाजिक समावेशन, विचारशीलता, आणि आत्मविश्वास वाढते. संबंधित प्रशिक्षणांमध्ये कौशल्य विकसित करण्यात मदत केल्यास, महिलांना पेशेवर आणि व्यावसायिक स्थितीत सुधारण्यात मदत होते.

स्वावलंबन :

महिलांना स्वावलंबनात समर्थन देण्याची गरज आहे. स्वतंत्रतेच्या आणि स्वावलंबनाच्या जीवनशैलीच्या प्रोत्साहनाची आवश्यकता आहे. यासाठी, नोकरीकऱ्या या महिलांना समर्थन आणि सामाजिक संघटनांचा समर्थन प्रदान केला जाण्याची गरज आहे, आणि त्यांना आरोग्य आणि सुखाच्या नियमित मार्गांवर उभारण्यासाठी सामाजिक स्थिरता आणि संवेदनशीलता प्रदान केली जाण्याची गरज आहे.

निष्कर्ष:

समाजातील महिलांच्या शारीरिक आणि मानसिक समस्यांवर उपाय कशाच्या प्रमाणातीलच आहेत हे समजल्यास, त्यांना समर्थन आणि संबोधन होण्याची गरज आहे. समाजातील संरक्षण, सामाजिक सामाजिक संघटनांच्या समर्थनाची गरज आहे, आणि समाजातील विविध अंगांच्या जागरूकतेची गरज आहे. महिलांना त्यांच्या आत्मविश्वासात विश्वास ठेवण्याची गरज आहे आणि त्यांना त्यांच्या स्वतंत्रतेत समर्थन करण्याची गरज आहे. सामाजिक संरक्षण, शिक्षण, आणि आरोग्य विचाराच्या तत्पर मार्गांचे विकसन आणि संरक्षण महत्त्वाचेआहे. महिलांच्या सर्वांसाठी समाजातील समान अधिकार आणि संरक्षण महत्त्वाचे आहे, आणि याच्यातून योग्य आणि संवेदनशील प्रतिसाद देणे आवश्यक आहे. अखेरच्या मानसिक आणि शारीरिक समस्यांवर उपायांच्या प्रसंगात, समाजातील समर्थनाची गरज आणि महिलांना त्यांच्या पोषकाच्या स्वतंत्रतेत समर्थन देण्याची आवश्यकता आहे.

संदर्भ:

०१. कांचन जी.पाटील पी.एच.डी संशोधक पदवीधर शिक्षणशास्त्र विभाग कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक महाराष्ट्र भारत. आणि डॉ. इंदुमती भारंबे निवृत्त विभाग प्रमुख पदवीत्तर शिक्षणशास्त्र विभाग कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक महाराष्ट्र भारत.

०२. प्रो.कुमारी पल्लवी रमेशराव देशमुख, गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख, स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान, महाविद्यालय रिसोड, जि. वाशिम

०३. डॉ. संपदा संत, अधिष्ठाता, पोद्दार आयुर्वेद रुग्णालय आणि महाविद्यालय, मुंबई

०४. हींीं:/ /ु.लवल.सेीं/पळेीह/ेीळिली/ेाशप/

०५. हींीं:/ /ु.ींहशहळपर्वी.लेा/पशुी/परींळेपरश्र/ज्ञरीपरींरज्ञर/७५-लि-ेष-ेीज्ञळपस-ेाशप-ह...

०६. हींीं:/ /ु.पशेुशीषींश्रुीव.लेा/२०१०/१०/१८-लशपशषळीी-ेष-वशशि-लीशरींहळपस-रपव...

०७. हींीं:/ /ु.ारूेलश्रळपळल.ेीस/हशरश्रींहू-श्रळींळपस/षळींपशीी/ळप-वशींहि/शुशीलळीश/रींी-२...

०८. प्रा. पोकळे, एस. एम. समाज विभाग प्रमुख, टिळक महाविद्यालय वडवणीता, वडवणी. जि.बीड

♦ ♦ ♦

स्त्रियांचे उध्दारक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रा. डॉ. कल्पना त्र्यं. मेहरे
मराठी विभाग प्रमुख
नारायणराव राणा महाविद्यालय,
बडनेरा (रेल्वे), जि. अमरावती.



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे द्रष्टे युगपुरूष होते. ते कृतिशील समाजसुधारक होते. त्यांच्या विचाराची प्रेरणा ही 'माणूस' होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रैमूल्यांचा त्यांनी पुरस्कार केला. त्यांनी शोषणाविरूध्द आवाज उठविला. १९ व्या शतकात स्त्रीचे जीवन हे बंदिस्त होते. केवळ घरकाम, पतीसेवा, मुलांचे संगोपन, व्रतवैकल्ये एवढेच तिचे कर्तव्य राहिले होते. लेखन, वाचन व इतर सामाजिक कार्यात तिचा कुठलाही सहभाग नव्हता. मनुस्मृतीमध्ये 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हती' म्हणजे स्त्रियांना स्वातंत्र्य प्राप्तीची लायकी नाही. तिचे रक्षण पिता, पती, व पुत्रांनी केले पाहिजे. स्त्री दुर्बल आहे असे उल्लेख आहेत. या काळात समाजात स्त्रियांबाबत अनेक जाचक प्रथा, परंपरा, चालीरिती होत्या. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा, संपत्तीचा अधिकार नव्हता, विधवांना पूर्नविवाह करता येत नव्हता, अशा अनेक वाईट प्रथा दिवसेंदिवस समाजात वाढत होत्या. अशा परिस्थितीत स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी ज्या महामानवांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले त्यापैकी एक बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली पत्नी रमाबाई आंबेडकर यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, मी महिलांच्या प्रगती आणि मुक्तीसाठी लढणारा योध्दा आहे. बाबासाहेब दोन्ही हातात. शस्त्र घेऊन महिलांच्या अधिकारासाठी लढले. त्यांच्या एका हातात कायद्याचे शस्त्र होते तर दुसऱ्या हातात आंदोलनाचे शस्त्र होते. हिंदु समाजात ज्या अनेक विषमता आहे त्यापैकीच एक म्हणजे स्त्री–पुरुष विषमता आहे. या पुरूषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारापासून तिला दूर करण्यासाठी बाबासाहेबांनी कायद्याच्या शस्त्राचा उपयोग केला. समाजात स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार बघून बाबासाहेब चिंतीत झाले होते. इतिहास साक्षी आहे. हजारो वर्षापासून स्त्री ही कधी पिता तर कधी पती तर कधी पुत्र यांच्यावर अवलंबून राहिलेली आहे. परंतु कोणीच तिला आर्थिक बळ देऊन स्वतंत्र केले नाही. उलट तिच्यावर अनेक बाबतीत निर्बंध लादले.

अशा परिस्थितीतून महिलांना बाहेर काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांना समाजात मान, सन्मान आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी हिंदू कोड बिल तयार केले. १९४७ पासून ४ वर्षे१ महिना २६ दिवस त्यांनी अथक परिश्रम घेऊन हे हिंदू कोड बिल तयार केले. हे हिंदू कोड बिल बाबासाहेबांच्या जीवनाचे ध्येय बनले होते. स्त्री–पुरूष समानता प्रस्थापित करण्यासाठी जुन्या जाचक कायद्यांना पहिले बदलवून महिला केंद्रित कायदा बनविणे हा त्यांचा हिंदू कोडबिल तयार करण्यामागील मुख्य उद्देश होता. स्त्रियांना त्यांना सुरक्षा कवच देणे होते. त्यांचा शेवटचा उद्देश हा होता की,

कायद्याने महिलांना हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देणे. हे कोड बिल वेगवेगळया सात गोष्टी एकत्रित करून स्त्रियांना सन्मान तसेच अधिकार देणारे होते. १) स्त्रियांना घटस्फोट देण्याचा अधिकार २) पतीने घटस्फोट दिल्यानंतर पोटगीचा अधिकार ३) एक पत्नी विवाह ४) स्त्रियांना दत्तक वारसा अधिकार ५) वडीलांच्या संपत्तीवर अधिकार ६) आंतरजातीय विवाहाचा अधिकार ७) स्त्रियांना वारस निश्चित करण्याचा अधिकार.

एवढया महत्वाचे हे विधेयक सत्राच्या शेवटी चर्चेकरिता सभागृहाच्या समोर ठेवण्यात आले. स्त्री स्वातंत्र्याचा हा जाहिरनामा म्हणजेच हे विधेयक सभेत मंजूर होऊ शकले नाही. यामधील घटस्फोट तथा बहुपत्नी विवाहाला निर्बंध करणाऱ्या कलमाला विरोध करणाऱ्यांची संख्या खूप होती. या बिलाला विरोध करणाऱ्यांना बाबासाहेबांनी २० सप्टेंबर १९५१ ला दिलेल्या भाषणातून अत्यंत जोरदार उत्तर दिले. त्यांचे म्हणणे हे होते की, आजच्या आधुनिक युगात स्त्रियांना समान हक्क देण्याकरिता आपण विरोध का करता? पुरूषांसाठी संपत्तीत कितीही वाटे होऊ शकतात पण स्त्रियांसाठी नाही. ही हिंदु पुरूषांची मानसिकता या नव्या विचाराला त्रासदायक आहे. बहुपत्नी विवाह प्रतिबंधक कायद्याला खूप विरोध झाला. झाला. त्यासाठी त्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांना खूप मानसिक त्रास सहन करावा लागला. स्त्रियांना केव्हाही घरात आणताना पुरूष आपले वय बघत नव्हता. लग्नानंतर घरात स्त्रियांना पायपुसण्याच्या इतकी किंमत होती. बाबासाहेबांनी एवढया परिश्रमाने तयार केलल्या हिंदू कोडबिलाला सर्व बाजूने विरोध झाला एवढेच नव्हे तर ज्यांच्यासाठी बाबासाहेबांनी हे बिल तयार केले त्या महिला देखील पतीच्या दबावात येऊन त्यांच्या पतींनी बाबासाहेबांच्या विरूध्द जे निषेध म्हणून मोर्चेकाढले त्यात त्या सहभागी झाल्या. सत्र संपले तरी हिंदू कोडबिलाचे फक्त चार कलम मंजूर झाले. यामुळे दुःखी आणि निराश होऊन बाबासाहेबांनी कायदेमंत्री पदाचा २७ सप्टेंबर १९५१ ला राजीनामा दिला. त्यांनी एवढा मोठा त्याग स्त्रियांच्या हक्कासाठी केला. पुढे १९५२ च्या नंतर केंद्र सरकारने त्यांच्या मसुद्यातील ४ स्वतंत्र कायदे केले ते पुढील प्रमाणे

१) हिन्दू विवाह कायदा १९५५

२) हिन्दू सेक्सन ॲक्ट १९५६ (जून)

३) हिन्दू मायनॉरिटी ॲण्ड गार्डीयनशिप ॲक्ट १९५६ (ऑगस्ट)

४) हिन्दू ॲडाप्शन ॲण्ड

५) मेन्टेनन्स ॲक्ट १९५६ (डिसेंबर)

आज या कायद्यांमुळे स्त्रिया स्वाभिमानाने जीवन जगत आहे. आपल्या हक्कांसाठी स्त्री सजग झाली आहे. स्त्रियांच्या समस्यांचे आकलन बाबासाहेबांना पूर्वीपासूनच होते. दि. २७/१२/१९२७ ला जी सभा झाली त्यावेळी बाबासाहेब कोणत्याही पदावर नसताना त्यांनी महाड सत्याग्रहाच्यावेळी जवळजवळ ५ हजार स्त्रियांना सभेत सहभागी केले होते. भारतीय समाजात स्त्रियांचा मोठा वर्ग आहे. स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे. ही गोष्ट बाबासाहेबांना ज्ञात होती. स्त्रियांच्या समस्या लक्षात घेऊन या सभेत त्यांनी मत व्यक्त करताना म्हटले की, स्त्री-पुरूष दोघांनी मिळून समाज आणि संसारातील अडचणी सोडविणे गरजेचे आहे. जर पुरूषांनी एकटयांनीच ही संपूर्ण जबाबदारी आपल्या डोक्यावर घेतली तर त्याला वेळ लागू शकतो. जर हेच काम स्त्रिया आपल्याकडे घेतील तर त्यांना लवकर यश प्राप्त होईल. दलित स्त्रियांना राहणीमानाच्या संदर्भात उपदेश करताना ते म्हणाले की, आपण स्वत:ला अस्पृश्य मानू नये. घरात स्वच्छता ठेवा. स्पृश्य जसे कपडे घालतात तसे कपडे घाला. कपडे फाटके असले तरी चालेल पण ते स्वच्छ असावे. गळयात मोठया माळा तसेच हातात चांदीच्या खूप साऱ्या बांगडया घालणे ही अस्पृश्यतेची खूण आहे. आभूषण घालायचे झाल्यास ते सोन्याचे घाला. कोणत्याही गोष्टीला अमंगल होऊ देऊ नका. मेलेल्या जनावरांचे मास खाणे बंद करा. दारू पिणारा पती, भाऊ वा मुलगा याना जेवण देऊ नका. मुलगा-मुलगी यांना शिक्षण शिकविण्याची महत्त्वकांक्षा ठेवून जगा.

१९३० ला काळाराम मंदिर सत्याग्रहात अटक झालेल्या स्त्रियांची तुकडी ही पहिली तुकडी होती. दि. २० जुलै १९४२ ला नागपूरला दलित स्त्रियांची सभा आयोजित केली गेली. या सभेला २०-२५ हजार स्त्रियांची उपस्थिती बघून बाबासाहेब खुश झालेत. त्यावेळी राधाबाई कांबळे, जाईबाई चौधरी, अंजनीबाई देशभ्रतार, गीताबाई गायकवाड, सुलोचनाबाई डोंगरे, शांताबाई दाणी, मीराबाई आंबेडकर, किर्तीबाई व इंदिराबाई पाटील या महिला नेता आंबेडकरांच्या आंदोलनात सहभागी होत्या. आजही सार्वजनिक क्षेत्र हे पुरूष प्रधान आहे, अशी परिस्थिती असतानाही बाबासाहेबांनी त्याकाळात चूल, मूल, घर एवढ्यापुरतेच स्त्रियांचे क्षेत्र मर्यादित असताना गावातील दलित वर्गातील स्त्रियांना सर्वसामान्य स्त्रियांना, शोषित वर्गातील स्त्रियांना घराचा उंबरठा ओलांडून प्रत्यक्ष लढाईत सक्रिय केले. त्यावेळी बाबासाहेबांनी सांगितले की, स्त्रीची प्रगती समाजात ज्या प्रमाणात होते, त्याच प्रमाणात त्या समाजाची प्रगती मोजली जाते. याच भाषणात त्यांनी विवाह योग्य युवतींना संदेश दिला की, प्रत्येक विवाहित स्त्रीने स्वत:ला पतीची मैत्रिण समजून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य केले पाहिजे, परंतु त्याने जर तिला गुलाम म्हणून वागणूक दिली तर तिने पतीला सडेतोड उत्तर दिले पाहिजे आणि समानतेसाठी आग्रह धरला पाहिजे.

धनबाद येथील कोळसा खाणीला भेट दिली त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या अधिकाऱ्यासोबत खाणीत ४०० फूट खोल उतरले. त्या ठिकाणी काम करणाऱ्या मजूर स्त्रियांना त्यांनी काही प्रश्न विचारले. त्यांच्या बरोबर चर्चा केली. गर्भवती

महिलांना काम करताना बघून त्यांना खूप राग आला. त्यांना वाटत होते की, गर्भवती स्त्रियांना वेगळे काम द्यायला हवे. प्रसूतीच्या पूर्वी दहा आठवडे आणि त्यानंतर चार आठवडे त्यांना पूर्णपगारी सुट्टी द्यावी हा निर्णय त्यांनी घेतला. या निर्णयाला भविष्यात त्यांनी कायद्याचे रूप दिले.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री झाले. भारतीय राज्यघटनेचे महत्वपूर्ण काम म्हणजे मसुदा समितीचे ते अध्यक्ष झाले. समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता या चार मुद्यांवर त्यांनी घटनेमध्ये जोर दिला. जगभरातील ही सर्वात मोठी लिखित भारतीय राज्यघटना आहे. या भारत देशात हजारो वर्षापासून चालत आलेली विषमतेची परंपरा असताना समतेवर आधारित स्वतंत्रतेची इच्छा असणे व्यर्थ होते. व्यक्तिचे मूल्यमापन धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान यावरून होत होते. हा भेदभाव नष्ट करण्यासाठी संविधानाचे १४ वे कलम तयार केले. कोणत्याही व्यक्तीसाठी भारताच्या राज्यक्षेत्रात कायदा एकच आहे. त्यातून त्याची सुटका नाही. कलम १५ -१ राज्याचे केवळ धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान अथवा यामधील कोणत्याही कारणासाठी कोणत्याही नागरिकाला प्रतिकुल राहिल असा भेदभाव केला जाणार नाही.

कलम १५-३ स्त्रिया तथा बालकांसाठी विशेष तरतूद. कलम १६- १ व २ सेवा योजनासाठी महिलांना आरक्षण इ. धर्म, जात, वंश लिंग, कुळ, जन्मस्थान, निवास इ. कारणाने भेदभाव केला जाणार नाही. सर्व नागरिकांना समान अधिकार मिळेल. परंपरागत कायद्यात बंदिस्त असलेली स्त्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने मिळालेल्या अधिकारांच्या कारणांमुळे विकासाच्या समानतेच्या संधी मिळाल्याच्या कारणामुळे कौटुंबिक जबाबदारी सांभाळून सर्व क्षेत्रात गुणवत्तेच्या बाबत पुरूषांपेक्षा पुढे जात आहे. आज जागतिकस्तरांवर महिला एका ठिकाणी यायला लागल्या आहेत. १९९५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित केले गेले. स्त्रियांच्या संदर्भातील प्रश्नांना सर्व ठिकाणी स्थान मिळायला लागले. १९९८ मध्ये चीनच्या बिजिंग येथे आंतरराष्ट्रीय महिला परिषद आयोजित केली गेली. तेथे १८९ देशातील महिला प्रतिनिधी सहभागी झाल्यात, त्यांनी जागतिक स्तरावर महिलांच्या समस्यांना समोर आणले.

निष्कर्ष :-

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महिलांच्या प्रगती व मुक्तीसाठी लढणारा योध्दा आहे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांना समाजात मान, सन्मान, हक्क व प्रतिष्ठा मिळवून दिली आहे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांसाठी केलेल्या कायद्यांमुळे स्त्रिया आपल्या हक्कांसाठी सजग झालेल्या आहे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सविधानाने मिळालेल्या अधिकारांमुळे विकासाच्या समानतेच्या संधींमुळे स्त्रिया सर्व क्षेत्रात गुणवत्तेच्या बाबत आज पुरूषांपेक्षा पुढे जात आहे.

५) जागतिक स्तरांवर महिला आज एका ठिकाणी यायल्या लागल्या आहे.

६) स्त्रियांच्या संदर्भातील प्रश्नांना आज सर्व ठिकाणी स्थान मिळायला लागले आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - धनंजय कीर
२) हिंदू कोड बिल - डॉ. बी. आर. आंबेडकर
३) डॉ. आंबेडकर लेखन व भाषणे - हरि नरके
४) डॉ. आंबेडकर आणि स्त्री - अरूणा सबाणे
५) हिंदू संस्कृती आणि स्त्री - डॉ. आ. ह. साळुंखे
६) भारतीय स्त्री जीवन - डॉ. लिला पाटील

♦ ♦ ♦

आदर्श व्यक्तिमत्व : महाप्रजापती गौतमी थेरी

प्रा.डॉ. रजनी भीमराव गेडाम
प्राध्यापक व पाली विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तक्षशीला महाविद्यालय अमरावती



प्रस्तावना:

भारताच्या इतिहासात गौतम बुद्ध आणि बौद्ध साहित्य संस्कृतीचा इतिहास अतिशय महत्त्वाचा आहे. मनातील उदात्त भावना सतत जागृत ठेवण्याचे काम ही संस्कृती करते कुणाही विचारशील माणसाला बुद्ध संस्कृतीची भुरळ पडावी असेच हे तत्त्वज्ञान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी निर्माण केलेला नवसमाज हे सारे अद्भुत आहे. याबद्दल आपण नेहमी बोलतो. पण जिथे जिथे गौतम बुद्ध हा शब्द उच्चारला जातो, तिथे तिथे मला महाप्रजापती गौतमीची, त्यांच्या कार्याची आठवण येते. एक विचार असाही मनात येऊन जातो की गौतमी नसती तर बाळ गौतमाचे काय झाले असते ?

बुद्ध काळामध्ये अनेक प्रज्ञावान स्त्रिया होऊन गेल्या. कारण भूतकाळात सामान्य माणसावर बौद्ध धम्माचा प्रचंड प्रभाव होता त्यामुळे बुद्धाने स्त्रियांना दिलेल्या प्रतिष्ठेचा जनतेवर निश्चित परिणाम झाला होता. भिक्षू संघामार्फत समाजाच्या सर्व स्तरात बुद्धाचे विचार पोहोचत असत. राजाच्या राजकारणात अथवा परदेश प्रवासात जरी त्यांना स्थान नव्हते तरी स्त्री सन्मानपूर्वक आपले जीवन घालवीत असलेली आपणास दिसते. तिचे स्थान आदराचे व बौद्ध विचारानुसार मित्रत्वाचे आणि सहधर्मचरणीचे होते. प्राण्यांप्रमाणे निव्वळ प्रजोत्पतीचे साधन म्हणून असलेले तिचे गौण स्थान नष्ट झाले. पतीपेक्षा कनिष्ठ असलेली तिची भूमिका आता समानतेची समजली गेली आणि स्त्रियांनी देखील आपल्या चारित्र्य व त्यागाने भारतीय इतिहासात एक अद्वितीय स्थान निर्माण केले आहे. बुद्ध काळातील अशाच एका प्रज्ञावान, शीलवान, धनवान अशा आदर्श व्यक्तिमत्व महाप्रजापती गौतमी थेरी आहे .

पाली साहित्यामध्ये ज्या स्त्रियांची जास्तीत जास्त माहिती उपलब्ध आहे त्यामध्ये महाप्रजापती गौतमी थेरीचे स्थान फार मोठे व आदरणीय व श्रेष्ठत्वाचे असल्याचे दिसून येते.

महाप्रजापती गौतमी थेरी जी माहिती उपलब्ध आहे त्यावरून ती प्रज्ञा, शील, करूणा, ममता यांची मूर्तीमंत प्रतिमा असल्याची दिसून येते. उपासिकात तिचे स्थान यामुळेच अग्रगण्य आहे. बौद्ध धम्माने सर्व स्तरातील, सर्व जातीतील स्त्रियांना समान पातळीवर आणले होते. स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली व त्यांच्या आत्मसन्मान स्वाभिमान आणि स्वावलंबन भाव जागृत केला होता. बौद्ध धम्मात पंचशीलास अत्यंतिक महत्त्व आहे. 'भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथात बाबासाहेब स्पष्ट बजावतात की, शील हे प्रारंभी असते व ते शेवटीही असते. सर्व सद्गुणांची शील हीच जननी आहे. सर्व चांगल्या गुणांचा प्रारंभ शिलापासून होतो म्हणून आपले शील स्वच्छ ठेवा. अशा स्त्रीचा आदर्श आजच्या काळातील समाजाला घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

राजकुमारी गौतमीचा एक बौद्ध भिक्खूनी होण्यापर्यंतचा

प्रवास हा स्त्रीचा मुक्तीच्या दिशेने झालेला प्रवास होता. धम्मात येऊन बौद्ध विचारांचा प्रचार प्रसार करण्यासाठी भिक्खू होण्याची परवानगी असल्याने नाकारणाऱ्या गौतम बुद्धांना कि हे काम करू शकते हे पटवून देणान्या त्यांच्या माता गौतमीच होत्या. त्यासाठी त्यांनी स्वतंत्र भिक्षुणी संघ स्थापन केला. या स्त्रियांनी लिहिलेल्या अनुभवांतून भारतीय वाङ्मयात श्रीवादाची मांडणी करणाऱ्या पहिल्या साहित्यकृतीची, 'थेरीगाथा'ची निर्मिती झाली. सहाव्या शतकात स्त्रियांची चळवळ गौतमर्मोच्या माध्यमातून सुरूच नव्हे तर गतिमान झाली. सिद्धार्थचा जन्म झाला आणि हे बाळ अवघे ७ दिवसांचे असताना त्यांची आई राणी महामाया यांचा मृत्यू झाला. पण या सात दिवसांच्या बाळाला पोरके होऊ न देता राणी महामाया यांची धाकटी बहीण– कोशाल राज्याची राजकुमारी गौतमी यांनी त्या बाळाला हृदयाशी कवटाळले. ते आजन्म पुढे त्यांनाही मुले झाली, पण त्यांचे पहिले आणि लाडके अपत्य राहिले ते सिद्धार्थच. गौतमी यांनी सिद्धार्थना आपले बाळ म्हणूनच वाढवले. त्या अतिशय प्रेमळ जरी असल्या, तरी योग्य ठिकाणी कडक शिस्त बाळगण्यात कचरल्या नाहीत. पुढे जेव्हा सिद्धार्थ गौतम बुद्धत्वास पोहोचले आणि त्यांनी बुद्धधम्माचा स्वीकार करून प्रचार आणि प्रसार सुरू केला, तेव्हा त्या अरहंत पद प्राप्त करणाऱ्या एक भिक्खूनी होत्या. राजकुमारी गौतमी! एक भिक्खूनी होण्याचा हा प्रवास एका दिवसाचा नाही, त्यामागे त्यांचे दीर्घ चितन होते. विचार होता. त्या अतिशय हुशार, कुशाग्र बुद्धीच्या होत्या. शाक्य संघात झालेल्या घडामोडीवर त्या त्यांचे पती राजा शुद्धोदन आणि तरुण सिद्धार्य यांच्याबरोबर संवाद करीत असत. राज्यकारभारात जरी त्या हस्तक्षेप करीत नसल्या, तरी महालात राजा शुद्धोदन आणि राजपुत्र सिद्धाथाच्या चर्चेत त्या भाग घेत आणि योग्य ठिकाणी आपली मतेही ठामपणे सांगत या चर्चेतूनच त्यांना कपिलवस्तूचे शाक्य आणि देवदह रामग्रामचे कोलीय या दोन गणराज्यांत रोहिणी नदीच्या पाण्यावरून चालत असलेल्या वादाची पूर्ण कल्पना होती. राजा शुद्धोदन त्यांना प्रेमाने रागावू लागले. निर्णय बदलण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न करू लागाने आईची मायाही अश्रूवाटे वाहू लागली 'इतका कठोर निर्णय तु आमच्याशी चर्चा न करता कसा घेऊ शकतोस'? म्हणून गौतमी यांनी सिद्धार्थला कवटाळले. गौतमाची पत्नी यशोधरेचे दुःख बघवत नव्हते. कुणीच कुणाचे सांत्वन करण्याच्या मनःस्थितीत नव्हते पण काही वेळाने माता गौतमीच भानावर आल्या आणि राजा शुद्धोदनाला व यशोधरेला समजावत त्या म्हणाल्या, 'महाराज, आपण तिचे असतो, तर आपणही पाण्यासाठी होणाऱ्या युद्धाला विरोधच केला असता. युद्धात काय होते. किती रक्तपात होतो, किती घरे उजाड होतात, कित्येकांच्या आयुष्यात अंधार पसरतो, हे आपण जाणतोच. गौतमाचा निर्णय मानवजातीच्या आणि शाक्यांच्या कल्याणाचा आहे. आपल्या शोकाने त्याचे पाय मागे खेचणे बरोबर नाही तो एका उदात्त हेतूसाठी परिव्रजक (संन्यासी) होतो आहे.' गौतमी यांचे बोलणे ऐकून सारेच अवाक झाले. एवढे धारिष्ट्य, इतका मनाचा मोठेपणा कुठून आला असेल गौतमर्मीमध्ये? यातूनच आपल्याला गौतमी यांच्या मोठ्या मनाची, उदात्त विचारांची कल्पना येते. प्रचंड दुःख झालेले असतानाही मानवकल्याणासाठी परिव्रजक या देशात की, शुतिमुद्रांच्यातील पहिले त्यांच्याच बरोबरीने, किसा गौतमी आणि यशोदरा आहे. भगवान बुद्धाने आपल्या प्रगतिशील आणि तिकारी विचारांतून वातिशील कालील पहिले तत्वज्ञानी मानले जातात ज्यांनी यांचा अधिकार मान्य केला तौलमोचा सहभाग महत्त्वाचा आहे. गौतम बुद्धांनी भिक्षु संस्थापन केल्या सतत फिरत असत त्यांचे शिष्यही भरपूर हा त्याने फक्त पुरुषांना त्यात प्रवेश होता

गौतमी यांनी बुद्ध धम्मात प्रवेश परवानगी मागताच बुद्ध म्हणाले भिक्खू जीवन है गृहहोन जीवन असते. तो कुठे ही झाडाखाली राहतो. अरण्यात झोपडी बांधून जगतो. पाच घरे भिक्षा मागून खातो. नदी – विहिरीवर स्नान करतो एकटाच फिरतो आणि माझ्या ज्ञानाचा प्रसार करतो. पुरुषप्रधान समाजात स्त्री कडे पाहण्याचा दृष्टिकोन चांगला नाही. गौतमीचे मात्र या उत्तराने समाधान झाले नाही. त्यांच्या मनात तर बुद्ध धम्मात येऊन त्या धम्माचा प्रचार करण्याचा विचार ठाण मांडून बसला होता. त्यांनी बराच विचार केला, यशोधरा आणि इतर सहकारी स्त्रीयांसोबत चर्चा केली आणि प्रत्यक्ष कार्याला सुरुवात केली. त्या वेगवेगळया गावी जाऊन स्त्रीयांना भेटत होत्या, त्यांच्याशी चर्चा करत होत्या, त्यांना बुद्ध धम्माचे महत्व पटवून देत होत्या 'पुरुषांना जशी भिक्यू होण्याची संधी तथागतांनी दिली, तशी आम्हाला का नको, याबद्दल आपणास काय वाटते?' असे विचारून त्या स्त्रियांना बोलते करीत होत्या. हळूहळू अनेक स्त्रीया बोलायला लागायचे आणि समाजाचे मानसिक परिवर्तन चांगल्याने काही आहे विषादी समाज बदलून समतावादी समाज पाया ही स्त्री आहे या विचारात आपणही सहभागी झाले पाहिजे.' असे गौतमी सभांमध्ये सांगत होत्या स्त्री या तयार होत होत्याग स्त्री या एकत्र करणे, त्यांना आपला गुहा पटवून देणे आणि स्वेच्छेने येणाऱ्या स्त्री यांना आपल्या समुदायात सामावून घेणे हे क्रांतिकारी कार्य गौतमी यांनी केले आणि शेवटी सर्वानी मिळून एक दिवस निश्चित करून यशोधरा व इतर शाक्य खियांना बरोबर घेऊन त्या वैशालीला जिये बुद्ध मुक्कामी होते, लिये निघाल्या, वैशालीला पोहोचल्यावर सर्वप्रथम त्यांनी बुद्धाचा आवडता शिष्य आनंद याच्याशी चर्चा केली. आपली मते त्याला पटवून दिली आणि आनंदच्या मदतीने स्त्री यांचा भिक्षुणी संघ स्थापन करण्याची परवानगी गौतम बुद्धांकडून मिळवली. जगातील स्त्रीयांचे पहिले संघटन हे महाप्रजापती गौतमीचेच आहे. कपिलवस्तु ते वैशाली हा प्रवास केवळ खियांना तोही ५०० स्त्रियांना घेऊन करणे सोपे नव्हते. पण हा प्रवास करण्याचे साहस आणि भिक्षुणी संघ स्थापन करण्याचे

प्रयत्न दोन्ही त्यांनी यशस्वी करून दाखवले.

महाप्रजापती गौतमी यांचे हे कर्तृत्व वाचल्या ऐकल्यावर माझ्या मनात एक प्रश्न नक्कीच येतो, बुद्धासारख्या समान वागणूक देणाऱ्या महान तत्त्ववेत्त्याच्याही मनात श्री सामर्थ्याबद्दल शंका का यावी ? गौतमीवर, आपल्या माय-मावशीवर त्यांनी लगेच विश्वास का टाकू नये? त्यासाठी आनंदच्या मध्यस्थीची गरज का भासावी? ते म्हणतात, 'सध्याची सामाजिक परिस्थिती स्त्रियांसाठी अनुकूल नाही.' पण गौतमी, यशोधरा आणि इतर स्त्रियांनी ती शक्य करून दाखवलीच. निवडलेला मार्ग त्यांनी चोखपणे पुढे हाताळला आणि यशस्वीही करून दाखवला. महाप्रजापतीने ज्ञानप्रक्रियेत, समाजनिर्मिती प्रक्रियेत स्वतः सामील होण्याचे आणि इतर श्रियांना सामील करण्याचे शिक्षण दिले. एक स्वतंत्र भिक्षुणी संघ स्थापन केला. पुढे या स्त्रियांनी हे नवे आयुष्य जगत असताना आलेले अनुभव लिहून काढले आणि त्यातूनच 'थेरी गाया या स्त्री वादी वाययाची निर्मिती झाली भारतीय वाङ्मयात स्त्री वादाची मांडणी करणारी पहिली साहित्यकृती ही थेरीगाथा'च मानली जाते. सहाव्या शतकात हो स्त्रीयांची चळवळ गौतमीच्या माध्यमातून सुरूच नव्हे तर गतिमान झाली, यशोधरेमुळे ती विकसित झाली. त्यातून अनेक स्त्रिया पुढे गुरुपदी पोचल्या विचारवंत, कवयित्री झाल्या. सम्राट अशोकाने आपली मुलगी संघमित्रा हिला श्रीलंकेत बौद्धभिक्षुणी म्हणून पाठवले. ती जागतिक पातळीवर पहिली स्त्री गुरू उपदेशक म्हणून इतिहासात प्रसिद्ध झालेली आहे, हे आपण पाहतोच महणूनच मी म्हणते. की आजच्या स्त्रीवादी चळवळीला महाप्रजापती गौतमी आणि यशोधरेच्या प्रयत्नांचे योगदान आहे ते अनन्यसाधारण आहे हे आपण विसरता कामा नये. यात यशोधरेचे नाव घेण्यास सबळ पुरावा आहे तो स्वयभू खी होती, हे तिने सिद्ध करून दाखवले. ती जेव्हा बुद्धाला भेटायला येते तेव्हा बुद्धला म्हणते, 'मीच माझे आश्रयस्थान आहे' (संदर्भ, भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म', लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर) हे यशोधरेचे वाक्य म्हणजे, खियांनी स्वतःच स्वतः च्या जीवनाच्या शिल्पकार झाले पाहिजे आपणच आपले आश्रयस्थान असले पाहिजे दुस?यांवर अवलंबून राहणे योग्य नव्हे हे बोधवाक्य आजच्या अनेक सुशिक्षित, बुद्धिवादी विचारसरणी स्वीकारणा-यांनी घेण्यासारखे आहे 'बेरगाया' या पुस्तकात अनेक स्त्रियांच्या दुःखमुक्तीची साक्ष सापडते. हा स्त्री सुधारणेचा इतिहास कालपर्यंत पडद्याआड होता तो आता आता पुढे आला

गौतमी यांनी अनेक स्त्रियांना श्रीमुक्तीचा मार्ग दाखवला त्या काळात यशोधरा, गोपी, भद्रा , काच्यायना अशा विदुषी होऊन गेल्या. गौतमी तर या श्रेष्ठ संस्कृतीच्या जडणघडणीसाठी झटणारी एक सांस्कृतिक स्त्री म्हणून दया, क्षमा, शांती, संघर्ष आणि संयम या तत्त्वांची साक्षात मूर्तिमंत मूर्ती म्हणून माझ्या डोळयासमोर उभी राहते.

महाप्रजापती, यशोधरा, संघमित्रा किवा बुद्धाने हा विचार केला असता, तर 'थेरीगाथा ' निर्माणच झाली नसती. भिक्खुनी संघही निर्माण झाला नसता कोण कोणत्या जातीत जन्माला येतो, हे महत्त्वाचे नाही, तर तो कोणते विचार आयुष्यात पेरतो, हे महत्त्वाचे आहे.

संदर्भ ग्रंथ:

१. वसंत मून; बुद्धकालीन स्त्री जीवन; सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे; प्रथम आवृत्ती ऑक्टोबर १९८९

२. डॉ. विमलकीर्ती; नारी जातीकी स्वतंत्रता का ऐतिहासिक दस्तावेज थेरीगाथा; सम्यक प्रकाशन, नई दिल्ली; तृतीय संस्करण २००८

३. डॉ. भरत सिंह उपाध्याय; पाली साहित्य का इतिहास; हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग, इलाहाबाद, शक १९३५ सन २०१३ संस्करण सातवा

४. सुनील हेतकर, थेरीगाथा ,स्त्रीमुक्ती ,समाज आणि तत्वज्ञान , ,सुगावा प्रकाशन ,पुणे ,२०१७

५. डॉ. भाऊ लोखंडे व प्रा. रत्नमाला लोखंडे; थेरी गाथा; करुणा प्रकाशन,नागपूर; प्रथम आवृत्ती इसवी सन १९८४

६. डॉ .अनिल सूर्या ,प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री ,सुगावा प्रकाशन पुणे ,२०१०

♦ ♦ ♦

महिला सक्षमीकरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व योगदान

डॉ.संदिप भिकाजी खंडारे
ग्रंथपाल
रामकृष्ण महाविद्यालय,दारापूर



प्रस्तावना:

असे म्हणतात की, प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एका स्त्रीचा हात असतो, परंतु स्वतंत्र भारताच्या संपूर्ण स्त्रियांच्या प्रगती मागे एका महान महापुरुषाचा हात आहे. आणि तो म्हणजे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ....

स्त्री मुक्तीचे कैवारी असर्णा ?या या प्रकांड पंडिताला असे कळून चुकले की, कोणत्याही समाजाची जर उन्नती करायची असेल तर त्या समाजात शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक आहे. शिक्षणाचा हा प्रसार फक्त केवळ पुरुषातच होवून चालणार नाही तर तो सर्वत्रिक रित्या पुरुषासोबतच स्त्रियातही होणे आवश्यक आहे. प्रत्येक समाजातील स्त्री चा दर्जा हा त्या समाज सुधारण्याचा मापदंड असतो. म्हणूनचडॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री स्वातंत्र्याच्या पुरस्कार करताना अनेक सभा-समेलांनातून, परिषदातून, महिला परीसंवादातून तसेच आपल्या लिखाणातून, हिंदू कोड बिलच्या माध्यमातून, भारतीय राज्यघटनेतून स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करून स्त्री शिक्षणावर भर दिला.

भारतीय राज्यघटनेच्या कलम १५ नुसार स्त्री-पुरुष समानता आहे. म्हणून शिक्षण हे पुरुषाप्रमाणेच स्त्रियांचाही हक्क आहे आणि तो हक्क तीला मिळायलाच हवा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रखर मत होते व त्याप्रमाणे त्यांनी राज्यघटनेत तरतूद सुद्धा केलेली आहे. त्याचेच एक फलित म्हणून आज प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढत आहे. समाजकारण, अर्थकारण, राजकारण, कृषि, उद्योग, लघूद्योग, शिक्षण, मनोरंजन , व्यापार जगत प्रसार माध्यमे इ. या सर्वच क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येतो. शिवाय, विज्ञान-तंत्रज्ञान, सामाजिक चळवळी आदि क्षेत्रामध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्वत:ला सिद्ध करीत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षण बाबत स्पष्ट असे विचार आहेत. त्यांच्या मते मुलगा शिकला तर फक्त त्याचा एकट्याचा विकास होतो परंतू जर मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंबाचा विकास होतो. स्त्रिया जर शिकल्या तर त्या त्यांच्यावर होत असलेल्या सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवू शकतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो हे प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहत नाही यालाच अनुसरून स्त्री जर शिकली तर ती तिच्यावर होत असलेल्या अन्याय व सामाजिक विषमता विरुध्द्ध आवाज उठवेल. बाबासाहेबांचे महिला सक्षमीकरण बाबतचे काम फक्त जन जागृती पर्यन्त मर्यादित नव्हते तर त्यांनी ते प्रत्यक्ष कायदे निर्मितीत पण स्त्रियांच्या हक्कासाठी लढा दिला. हिंदू समाजातील स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी संसदेत आणलेले हिंदू कोड बिल हा त्याचाच एक भाग होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांकडे आर्थिक स्वायत्तता,क्षमता, परिपूर्णता असेल तर ती स्वावलंबी होवू शकते. स्त्रियांच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीमुळे त्यांना स्वत:चाशोध घेता येईल त्यातून त्या स्वत:च्या विकासा बरोबरचकुटुंबाचा आणि देशाच्या विकासात भर घालतील. स्त्रियांची शैक्षणिक प्रगती झाली तर त्या परावलंबितातून स्वत:ची सुटका करून घेऊन त्यांचा आत्मविश्वास, आत्मबल वाढेल असाही मानसडॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि कृतीत होता. (जाधव, सचिन)

महिलांनी शिक्षण घ्यावे याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः पुढाकार घेतला होता.भारतातील पन्नास टक्के महिला कष्टाचे जीवन जगतात,त्यांनी शिक्षित व्हावे,आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे अशी त्यांची तळमळ होती.स्त्रियाच विकास हा समाज व त्या राष्ट्राचा प्रगतीचा आरसा असतो.स्त्रियांनी किती प्रगती केली यावरून त्या समाजाच्या व राष्ट्राच्या प्रगतीचे मोजमाप होते अशी त्यांची भूमिका होती.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुंबई विधान परिषदेचे सदस्य असतांना १९२८ साली त्यांनी भारतीय महिला कामगारासाठी ङ्कमेटरनीटी बेनेफिट बिलङ्क पहिल्यांदा चर्चेसाठी आणले व त्यांच्याच प्रयत्नामुळे ते मंजूर झाले.त्यांच्याच प्रयत्नामुळे स्त्री-पुरुष समान कायदा,समान वेतनाचा कायदा, स्त्रियांना शिक्षण,प्रसूतीपूर्व काळात ठराविक विश्रांती आणि सेवा प्रसूती रजा, इ.असे अनेक स्त्रीविषयक कायदे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले.(इंगळे,नरेश)

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महिलांविषयी योगदान:

- महिलांना मतदानाचा अधिकार
- महिलांना शिक्षण घेण्याचा अधिकार
- महिलांनी पुनर्विवाह करण्याचा अधिकार
- महिलांना व पुरुषांना समान अधिकार
- घटस्पोटघेण्याचा अधिकार
- पोटगी मागण्याचा अधिकार
- स्त्रियांना वारसा हक्क
- समान वेतनाचा अधिकार
- महिलांना बाळतपन रजा

इत्यादीअधिकार मिळून देण्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मोलाचे योगदान आहे.

स्त्री-पुरुष समतेचा विचार करतांना, स्त्री शिक्षणाचा विचार हा मुलभूत विचार आहेअशी त्यांची भूमिका होती. डॉ. बाबासाहेबांच्या मते,शिक्षणच सुक्षीर न्यायाचीजाणीव देते, बुद्धिवादाची दारे मुक्त करते आणि अस्मितेची पायाभरणी करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्त्री स्वातंत्राचा विचार फक्त विशिष्ट वर्गातल्या,विशिष्ट थरातल्या स्त्रीयांपुरातच मर्यादित नव्हता तर तो सर्व थरातील स्त्रियांसाठी होता.म्हणूनच मजूरमंत्री असतांना कामगार स्त्रियांनाही पुरुषांइतकेच वेतन असावे, त्यांचे कामाचे तास ठराविक असावे,कामाचे ठिकाण सुरक्षित असावे,बाळंतपणाची रजा मिळावी, कामगार स्त्रियांच्या लहान मुलांसाठी पाळणाघराची सोय असावी,त्यांना माताधीकाराचे स्वातंत्र्य असावे अशा प्रकारे स्त्रियांना विविध क्षेत्रात स्वातंत्र्य मिळवून देण्याचा बाबासाहेबांनी प्रयत्न केला. (मुलजाधव, सुशीला)

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे भारतात स्त्रीला नेहमीच दुय्यम स्थान देण्यात आले आहे.अगदी वैदिक व मध्ययुगीन कालखंड सुद्धा स्त्री वर्गाच्या दृष्टीने अत्यंत भयंकर समजला जातो.आधुनिक काळातही पुरुष वर्चस्वाची मानसिकता पूर्णपणे संपलेली नाही.हि मानसिकता तोडण्याचे कार्य हे स्त्री शिक्षणामुळे प्रभावीपणे घडून येत आहे.हा शिक्षणाचा अधिकार महिलांना मिळवून देण्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मोलाचे योगदान आहे.शेवटी एवढे मात्र खरे कि,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणाचे धोरण महिलांच्या सर्वांगीण विकासाकरीता अत्यंत महत्वपूर्ण ठरले आहे.म्हणूनच त्यांना खऱ्या अर्थाने महिलांचे कैवारी म्हणून संबोधले जाते.

संदर्भ:

१. महिरे, आर.डी., डॉ.आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार व कृती. संपादक, अहिरे, सुनंदा व साळुंके, उषा, स्त्री अभ्यासाच्या दिशा, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१२,प.न.१०६.

२. शिंदे, राजू., महिलांच्या सशक्तीकारणात शिक्षणाची भूमिका. संपादक,अहिरे,सुनंदा व साळुंके,उषा, स्त्री अभ्यासाच्या दिशा, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१२,प.न.१४३.

३. मुलजाधव,सुशीला., भगवान बुद्ध,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री. कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.२०१२.

४. सावरकर, तुषार., रूपगंध:महिला सक्षमीकरण आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार.प्रभात ई-पेपर https://www.dainikprabhat.com/roopgandh-women-empowerment-and-dr-thoughts-of-babasaheb-ambedkar.इथे उपलब्ध.

५. विकिपीडिया, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रियांबाबतचा लढा. https://mr.wikipedia.org/wiki.इथे उपलब्ध.

६. जाधव सचिन बा., महिला सबलीकरण आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर. सामना ई-पेपर, https://www.saamana.com/article-on-women-empowerment-and-dr-babasaheb-ambedkar/इथे उपलब्ध.

७. इंगळे नरेश शं., महिला साक्षमिकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान. पुरोगामी संदेश ई-पेपर साप्ताहिक, https://www.purogamisandesh.in/news/27247#google_vignette इथे उपलब्ध.

८. विसपुते, आर. सी., स्त्रियांचे सबलीकरण. संपादक,अहिरे,सुनंदा व साळुंके,उषा, स्त्री अभ्यासाच्या दिशा, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१२,प.न.१५२.

९. वर्मा, मृदुला., महिला सक्षमीकरण युग कि आवश्यकता. संपादक,अहिरे,सुनंदा व साळुंके,उषा, स्त्री अभ्यासाच्या दिशा, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१२,प.न.१६४.

१०. Narayan, Badri. Women Heroes and Dalit Assertion in North India Culture, identity and politics. SAGE Publication, New Delhi, 2006.

११. बेचैन, श्यौराजसिंह,. स्त्री विमर्श और पहिली दलित शिक्षिका. साहित्य संस्थान, गाजियाबाद, २०१२.

♦ ♦ ♦

शाश्वत विकास आणि महिला सक्षमीकरण

प्रा. खेमानंद सुखदेव फुलझेले
अर्थशात्र विभाग
रामकृष्ण महाविद्यालय दारापुर



प्रस्तावना

बदल हा निसर्गाचा नियम आहे आणि त्याच्या गतिमान स्वभावामुळे, आपण लोकांच्या काळानुसार आणि गरजेनुसार घडामोडी पाहतो, परंतु, आजच्या आधुनिक जगात या घडामोडी फार कमी किंवा कोणत्याही खंडित होत नाहीत. प्रत्येकासाठी वापरण्यासाठी सर्व काही पुरेसे आहे परंतु भावी पिढ्यांसाठी काहीही शिल्लक नाही याचा अभिमान बाळगण्यासारखे काहीही नाही, म्हणूनच शाश्वत विकास चित्रात येतो. १९८७ मध्ये ब्रुंडलँड अहवालात शाश्वत विकासाची व्याख्या करण्यात आली होती ज्याचा सराव हवामान बदलामुळे उद्भवलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी देशांनी केला पाहिजे. नवीन तांत्रिक उपाय, जसे की मोबाइल सोशल आणि ट्रेड सोल्यूशन्स, डेटा ॲनालिटिक्स आणि मॅन्युफॅक्चरिंग आणि कृषी उत्पादनाचे डिजिटलायझेशन, लोक, सरकार आणि व्यवसायांसाठी नवीन संधी देतात. या तंत्रज्ञानामध्ये व्यक्तींना नवीन ज्ञान, कौशल्य आणि पुनर्कौशल्य विकसित करण्याची, नवीन नोकऱ्या शोधण्याची, सामाजिक आणि व्यावसायिक नेटवर्कची स्थापना करण्याची, राष्ट्रीय आणि स्थानिक प्राधिकरणांशी संवाद साधण्याची आणि विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवांमध्ये प्रवेश करण्याची क्षमता आहे ज्यांना अलीकडे शारीरिक आवश्यकता होती. जवळीक डिजिटायझेशन सरकारांना नागरिक आणि व्यवसायांना पुरवत असलेल्या सेवांची गुणवत्ता आणि गती वाढवण्यास अनुमती देते, परिणामी सार्वजनिक अधिकारी आणि समुदाय यांच्यातील घनिष्ठ संबंध आणि जबाबदारी वाढते. डिजिटलायझेशनमध्ये व्यवसायांसाठी मोठी क्षमता आहे, नवीन बाजारपेठेच्या संधी उघडून आणि संभाव्यत: वर्धित उत्पादकता आणि नफा, अधिक टिकाऊ उत्पादन पद्धती आणि अधिक स्पर्धात्मकता. कोविड-१९ महामारीने अर्थव्यवस्था आणि समाजाच्या डिजिटल परिवर्तनाला गती दिली आहे. डिजिटल विभाजने, तथापि, विकासाच्या वेगवेगळ्या स्तरांवर असलेल्या देशांमध्ये राहतात आणि दीर्घकाळापर्यंत लिंग अंतरांमध्ये नवीन लिंग डिजीटल अंतरांमध्ये वाढ होण्याचा धोका असतो. अशा तफावतींकडे लक्ष न दिल्यास, जागतिकीकरण आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मार्जिनवर असलेले देश आणि लोक मागे जाण्याच्या जोखमीसह, मानवी आणि आर्थिक विकासासाठी डिजिटलायझेशनच्या संभाव्यतेचा सर्वांना समान फायदा होणार नाही.

शाश्वत विकास :

शाश्वत विकास आज आणि भविष्यासाठी संसाधनांच्या समान वितरणावर अवलंबून आहे. स्त्री-पुरुष समानतेशिवाय ते साध्य होऊ शकत नाही. शाश्वत आर्थिक वाढ, सामाजिक विकास आणि पर्यावरणीय शाश्वतता साध्य करण्यासाठी महिला

सबलीकरण हा महत्त्वाचा घटक आहे. शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढ्यांच्या त्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता सध्याच्या गरजा पूर्ण करणारा विकास अशी स्थूलमानाने व्याख्या केली जाते. शाश्वत विकास हे सर्व धोरणे आणि कृतींचे मुख्य तत्व असले पाहिजे, जे स्वातंत्र्य, लोकशाही आणि मूलभूत हक्कांचा आदर, संधीची समानता आणि पिढ्यांमध्ये एकता वाढविणारा समाज निर्माण करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. शाश्वत विकास संतुलित आर्थिक वाढ आणि किंमत स्थिरता, उच्च स्पर्धात्मक सामाजिक बाजार अर्थव्यवस्था, पूर्ण रोजगार, उच्च शिक्षण आणि सामाजिक प्रगती आणि उच्च पातळीचे संरक्षण आणि पर्यावरणाची गुणवत्ता सुधारणे यावर आधारित असावा. शाश्वत विकास हे सर्व राष्ट्रीय धोरणांचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे आणि सध्याच्या आणि भावी पिढ्यांच्या पृथ्वीवरील जीवनाचा दर्जा सतत सुधारणे हे उद्दिष्ट असले पाहिजे. हे पृथ्वीच्या सर्व विविधतेमध्ये जीवनास समर्थन देण्याच्या क्षमतेचे रक्षण करण्याबद्दल आहे. हे लोकशाहीच्या तत्त्वांवर आणि कायद्याचे राज्य आणि स्वातंत्र्य आणि सर्वांसाठी समान संधींसह मूलभूत अधिकारांचा आदर यावर आधारित आहे. हे पिढ्यांमध्ये आणि त्यांच्या दरम्यान एकता आणते. सांस्कृतिक विविधतेचा आदर करत शांततापूर्ण आणि सुरक्षित जगात उच्च स्तरावरील रोजगार आणि शिक्षण, आरोग्य संरक्षण, सामाजिक आणि प्रादेशिक एकता आणि पर्यावरण संरक्षणासह गतिशील अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जातो.

उद्दिष्टे :

- सर्वत्र सर्व स्त्रिया आणि मुलींविरुद्ध सर्व प्रकारचा भेदभाव संपवा.
- तस्करी आणि लैंगिक आणि इतर प्रकारच्या शोषणासह सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील सर्व महिला आणि मुलींवरील हिंसाचाराचे सर्व प्रकार दूर करा.
  सर्व हानिकारक प्रथा काढून टाका, जसे की मूल, लवकर आणि सक्तीचे विवाह आणि स्त्री जननेंद्रियाचे विच्छेदन.
- सार्वजनिक सेवा, पायाभूत सुविधा आणि सामाजिक संरक्षण धोरणांच्या तरतुदीद्वारे आणि राष्ट्रीय स्तरावर योग्य म्हणून कुटुंब आणि कुटुंबातील सामायिक जबाबदारीच्या जाहिरातीद्वारे बिनपगारी काळजी आणि घरगुती काम ओळखणे आणि मूल्यवान करणे.
- राजकीय, आर्थिक आणि सार्वजनिक जीवनातील निर्णय घेण्याच्या सर्व स्तरांवर महिलांचा पूर्ण आणि प्रभावी सहभाग आणि नेतृत्वासाठी समान संधी सुनिश्चित करणे.
- इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन पॉप्युलेशन अँड डेव्हलपमेंट आणि बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन आणि त्यांच्या पुनरावलोकन परिषदांच्या परिणाम दस्तऐवजांच्या अनुषंगाने मान्य केल्यानुसार लैंगिक आणि पुनरुत्पादक आरोग्य आणि पुनरुत्पादक अधिकारांसाठी सार्वत्रिक प्रवेश सुनिश्चित करा.
- महिलांना आर्थिक संसाधनांवर समान अधिकार देण्यासाठी, तसेच राष्ट्रीय कायद्यांनुसार, जमीन आणि इतर प्रकारच्या मालमत्ता, आर्थिक सेवा, वारसा आणि नैसर्गिक संसाधनांवर मालकी आणि नियंत्रण मिळवण्यासाठी सुधारणा करा.
  महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी सक्षम तंत्रज्ञान, विशेषत: माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे.
- लैंगिक समानता आणि सर्व स्तरांवर सर्व महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठी योग्य धोरणे आणि अंमलबजावणी करण्यायोग्य कायदे स्वीकारणे आणि मजबूत करणे.

शाश्वत विकास आणि महिला सक्षमीकरण

शाश्वत विकास हा सामाजिक विकास, आर्थिक विकास, पर्यावरण संरक्षण आणि सांस्कृतिक विविधतेचे जतन या चार स्तंभांवर अवलंबून असतो. आम्ही महिला सक्षमीकरण किंवा लैंगिक समानता यांचा संबंध ज्याप्रमाणे सामाजिक विकास आणि महिलांसाठी जबाबदारी आणि जागतिक विकासासाठी नैसर्गिक संसाधनांचे योगदान या दोन्ही गोष्टींशी जोडण्याचा प्रघात आहे, त्यामुळे महिलांचे बेहिशेबी काम आणि नैसर्गिक संसाधने यांच्यात मला आढळणारी पहिली समानता आहे. एक देणारा म्हणून चित्रित केले जाते, परतावा न मागता किंवा अनंत सेवांचा स्रोत म्हणून दाखवले जाते ज्यांचा सहसा लेखाजोखा नसतो.

काम, अर्थव्यवस्था, पर्यावरण यांना स्त्रीलिंगी स्पर्शाची ओळख हवी नसून गरजेची आहे आणि असमानतेचा राष्ट्राच्या विकासावरच परिणाम होत नाही तर निसर्गाच्या समतोलावरही परिणाम होतो. त्याचप्रमाणे शाश्वत विकास हा हवा नसून गरजेचा आहे आणि लैंगिक समानता साध्य करण्यासाठी ध्येय ५, २०३० पर्यंत दारिद्र्य संपवण्याचे उद्दिष्ट १, त्याचप्रमाणे आरोग्य पायाभूत सुविधा सुनिश्चित करण्याचे लक्ष्य ३ आणि उत्पादक रोजगार आणि असमानता कमी करण्याचे लक्ष्य ८ आणि लक्ष्य १० सारखे उद्दिष्ट आहेत. चांगल्या भविष्यासाठी आवश्यक आहेत.

महिला आणि अर्थव्यवस्था

ग्रेटर लिंग समानता म्हणजे समाजातील सर्व घटकांना समान संधी, ती एखाद्या देशाशी संबंधित आहे म्हणजे उत्तम आरोग्य आणि शिक्षण, सर्वसमावेशक आर्थिक वाढ आणि अधिक आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता असलेला देश. अर्थव्यवस्थेतील महिलांच्या सहभागाचा आरोग्यसेवा, शिक्षण आणि पर्यावरणावर मोठा परिणाम होतो, महिलांच्या सहभागामुळे विकासाचे चक्र सुरळीत चालते. एक दिवसासाठीही महिलांनी मोफत घरगुती काम करणे बंद केले आणि त्यांच्या कुटुंबाची काळजी घेणे बंद केले, तर अर्थव्यवस्थेवर परिणाम होईल, म्हणून आपण घरगुती काम ही

महिलांसाठी स्वयंचलित निवड करू नये आणि महिलांसाठी अधिक जबाबदार आणि सन्माननीय व्यवस्था आवश्यक आहे. जे गृहनिर्माण करणारे आहेत. म्हणूनच, विकसनशील देशांमध्ये केवळ महिला सक्षमीकरण हा एक चांगला उपाय नाही तर एक स्मार्ट गोष्ट आहे. उदाहरणार्थ, सुमारे ५०% स्त्रिया जर कर्मचारी वर्गात सामील झाल्या तर भारत दरवर्षी १.५ टक्के गुणांनी ९ टक्के वाढ करू शकेल.

महिला आणि निर्णय घेणे

महिलांना प्राचीन काळापासून निर्णय घेण्याच्या अधिकारांपासून दूर ठेवण्यात आले होते आणि आरोग्य, शिक्षण आणि निर्णय प्रक्रियेत त्यांच्या असमान प्रवेश आणि प्रतिनिधित्वामुळे त्यांचे समाजातील स्थान खालावले आहे. जागरूकता आणि प्रवेशाच्या कमतरतेमुळे समाजातील कोणताही घटक सोडला जाऊ नये, म्हणून निर्णय घेण्याच्या अधिकाधिक महिलांच्या कल्पनेला चालना दिली पाहिजे कारण त्या सुविधांचा संभाव्य वापरकर्तेआहेत आणि धोरणांच्या अंमलबजावणीत एक मोठा भाग आहेत.

महिला आणि पर्यावरण

जगभरातील स्त्रिया पाणी, इंधन, अन्न आणि जंगले यांसारख्या नैसर्गिक संसाधनांच्या वापरकर्त्या आणि व्यवस्थापक आहेत आणि हे त्यांच्या घरगुती कामात आणि अर्थव्यवस्थेच्या अनौपचारिक क्षेत्रांमध्ये मोठ्या सहभागामुळे आहे आणि आजच्या जगात, कधीकधी घरगुती काम पाहिले जाते. एक कमकुवतपणा म्हणून परंतु साधर्म्य खूपच चुकीचे आहे कारण या कामात मोठ्या संख्येने महिलांच्या सहवासामुळे निसर्गावर महान शक्ती येते

लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यास मदत करू शकणाऱ्या कुटुंब नियोजनात योगदान देण्यासाठी महिला सर्वोत्तम स्थितीत आहेत. दुसरे म्हणजे, स्त्रिया त्यांच्या घरातील सहवासात स्वच्छता सुनिश्चित करू शकतात आणि आपल्याला माहित आहे की अस्वच्छता आणि अस्वच्छ वातावरणामुळे आरोग्य आणि संपत्ती खराब होते. मुद्दा असा आहे की पुरेशा पर्यावरणीय शिक्षण आणि जागरूकतामुळे स्त्रिया पुरुषांच्या तुलनेत ऊर्जा संसाधनांचे अधिक कार्यक्षमतेने संरक्षण करू शकतात.

कमी महिलांच्या सहभागाची कारणे

महिलांना पुरुषांपेक्षा कमी मोबदला दिला जातो, हे अज्ञात तथ्य नाही आणि महिलांच्या कमी सहभागाचे एक प्रमुख कारण आहे. पगारातील तफावत स्त्रिया त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांपेक्षा कमी पात्र असण्याची वस्तुस्थिती निश्चितपणे प्रस्थापित करते आणि महिलांच्या मनात तडजोड करून काम करणाऱ्यांपेक्षा पुरुषांपेक्षा अधिक स्थायिक होण्याची धारणा पसरली आहे. २०१७ च्या लैंगिक अंतराच्या अहवालानुसार, वेतनातील तफावत २३ टक्के राहिली आणि २०१९ आणि २०२१ मध्ये ती अपरिवर्तित दिसली. आणि हे लक्षात घेतले पाहिजे की या आकडेवारीवर पूर्णपणे विसंबून राहता येणार नाही कारण विकसनशील देशांमध्ये लिंग-मजुरीतील तफावत अस्तित्वात आहे जेथे महिलांचा कल आहे. अनौपचारिक क्षेत्रात आणि स्वयंरोजगारात काम करण्यासाठी आणि त्यांच्यासाठीची संख्या अहवालात विचारात घेतलेली नाही.

महिलांना कमी सामाजिक आणि कौटुंबिक आधार मिळतो ज्यामुळे त्यांना मानसिकदृष्ट्या मागे खेचले जाते, रोजगारातील लैंगिक असमानतेमुळे पेन्शनची उपलब्धता, कामाची सुरक्षा, आणि बेरोजगारीचे फायदे किंवा मातृत्व भरपाई आणि संरक्षण यासारख्या रोजगाराच्या विविध क्षेत्रांमध्ये अवांछित तोटे निर्माण होतात. कमाईचा मार्ग शोधत असलेल्या एका सरासरी स्त्रीला या संघर्षांचा सामना करावा लागतो परंतु कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुली आणि स्त्रियांना त्यांच्या कुटुंबाचे एकमेव ध्येय त्यांच्याशी लग्न करणे असते तेव्हा त्यांना आदर्शातून बाहेर पडणे अधिक कठीण होते. समाजाचा पोकळ संकुचितपणा आणि स्त्रियांच्या पूर्वनिर्धारित भूमिकांमुळे राष्ट्रांच्या विकासात महिलांचा सहभाग कमी होतो.

निष्कर्ष

शाश्वत विकासात महिलांचे योगदान ओळखले पाहिजे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर आणि संरक्षणाबाबत त्यांना काळजी आणि जबाबदारी शिकवण्यासह त्यांच्या मुलांना शिक्षण आणि सामाजिकीकरणामध्ये महिलांची भूमिका मजबूत असते. पर्यावरणविषयक निर्णय घेण्यामध्ये महिलांचा आवाज वाढवण्यासाठी आणि महिलांना 'हरित अर्थव्यवस्थेत' संधी मिळविण्यास सक्षम करण्यासाठी आणखी काही केले पाहिजे. महिलांच्या गरजेनुसार अधिक क्षमता निर्माण कार्यक्रम आणि प्रशिक्षण आवश्यक आहे. शाश्वत विकासासाठी महिलांना उत्प्रेरक म्हणून तयार करण्यासाठी, कुटुंब, समाज आणि समाजातील त्यांची भूमिका सामाजिक-सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांपासून मुक्त असणे आवश्यक आहे जे महिलांच्या सहभागास प्रतिबंध करतात. मानसिकता बदलण्याची गरज आहे.

संदर्भ

१. यशी बाजपेयी (विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल स्टडीज, दिल्ली) UN आर्थिक आणि सामाजिक परिषद (२०१७), शाश्वत विकास उद्दिष्टांच्या दिशेने प्रगती: महासचिवांचा अहवाल (ए/२०१७/६६)

२. रमेशचंद्र दास, :-जागतिकीकरण, उत्पन्न वितरण आणि शाश्वत विकास: एक सैद्धांतिक आणि अनुभवजन्य तपासणी /

३. बर्नाडेट अँड्रोसो-ओ'कॅलाघन, सर्ज रे आणि रॉबर्ट टेलर:-आशियातील शाश्वत विकास : सामाजिक-आर्थिक, दृष्टीकोन

४. प्रोफेसर ज्योती के. पारिख यांच्या सन्मानार्थ निबंध / पीयूष तिवारी, किरीट पारीख यांनी संपादित.:- भारतातील शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यात महिला खासदारांची भूमिका : पोषण, कुटुंब नियोजन आणि लैंगिक आणि पुनरुत्पादक आरोग्य / भूमिका मोध .भारतातील शाश्वत विकास आणि वाढीची धुरा इलेक्ट्रॉनिक संसाधनें

सामाजिक क्षेत्रातील महिलांसमोरील आव्हाने आणि महिला सक्षमीकरण

प्रा. प्रकाश वामनराव म्हस्के
रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर
ता. दर्यापूर, जि. अमरावती



प्रस्तावना:

महिलांनी समाजात नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली आहे, मग ती कुटुंबात असो, मुलांचे संगोपन असो, आरोग्य, शिक्षण, समाज बांधणी, राजकारण किंवा सामाजिक क्षेत्र असो. शिक्षण, लैंगिक समानता, आरोग्यसेवा आणि समुदाय विकास यासारख्या कारणांसाठी काम करताना , सहानुभूती, लवचिकता आणि कारणाप्रती बांधिलकी यासारख्या त्यांच्या जन्मजात सॉफ्ट स्किल्समुळे स्त्रिया सामाजिक कार्याच्या सरावात नैसर्गिक नेते आहेत. महिलांनी तळागाळात काम करून आणि लोकांना थेट फायदा होणाऱ्या धोरणातील बदलांचा पुरस्कार करून, उपेक्षित समुदायांच्या उत्थानासारख्या जटिल सामाजिक समस्यांचे निराकरण करणारे अनेक उपक्रम चालवले आहेत.

सामाजिक क्षेत्रात महिला शक्तीचा आधारस्तंभ आहेत. डॉ. किरण बेदी, अरुणा रॉय आणि सुधा मूर्ती या त्यांच्यापैकी काही आहेत ज्यांनी देशभरात पुढाकार घेतला आणि समाजात परिवर्तनवादी बदल घडवून आणले. मात्र, त्यांचा प्रवास साधा राहिला नाही. सामाजिक कार्यातील त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका, त्यांना आलेले अडथळे आणि त्यांनी समाजात कशी प्रगती साधली यावर प्रकाश टाकला आहे.

सामाजिक क्षेत्रातील महिलांसमोरील आव्हाने:

सामाजिक क्षेत्रातील महिलांना त्यांच्या करिअरमध्ये प्रगती करण्यापासून रोखणारे अनेक अडथळे आहेत. समाजातील लिंगभेद आणि भेदभावामुळे महिलांना नेतृत्व आणि निर्णय घेण्यास अडथळा निर्माण झाला आहे. नोकरी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझे हे आणखी वाईट करते. हे देखील लक्षात येते की व्यवस्थापनाच्या कामांऐवजी काळजी घेण्याची जबाबदारी मुख्यतः महिलांना दिली जाते. संस्थात्मक पाठबळाचा अभाव, निधीची कमतरता आणि अपुरी संसाधने यामुळे सामाजिक क्षेत्रातील महिलांच्या संघर्षात वाढ होते.

महिलांसह सामाजिक कार्याच्या सरावाच्या जटिलतेवर नेव्हिगेट करणे:

स्त्रिया सामान्यतः सामाजिक क्षेत्रात आघाडीवर असलेल्या कामगार असतात. ते अत्यावश्यक सेवा देतात आणि असुरक्षित लोकसंख्येला आधार देतात. त्यांचे कार्य सकारात्मक बदलांना चालना देत आहे, जसे की कौशल्य-निर्माण कार्यक्रमांद्वारे महिलांचे सक्षमीकरण करणे, महिलांच्या हक्कांचे समर्थन करणे आणि घरगुती हिंसाचारातून वाचलेल्यांचे समुपदेशन करणे. तथापि, लैंगिक असमानता कायम ठेवणारे आणि महिलांच्या एजन्सीला प्रतिबंध करणारे सांस्कृतिक नियम हे अडथळे आहेत ज्यांना सामाजिक क्षेत्रात प्रगती करण्यासाठी महिलांना नेव्हिगेट करावे लागत आहे. स्त्रिया या विद्यमान शक्ती रचनेला आव्हान

देऊ शकतात आणि सामाजिक कार्य पद्धतीमध्ये स्त्रीवादी दृष्टिकोन स्वीकारून सर्वसमावेशकता आणि सामाजिक न्यायाला प्रोत्साहन देऊ शकतात असे म्हणता येते.

सामाजिक क्षेत्रातील महिलांचा विजय आणि लवचिकता साजरी करणे:

सामाजिक क्षेत्रातील महिलांनी उल्लेखनीय विजय संपादन केले आहेत आणि कायमस्वरूपी प्रभाव निर्माण केला आहे. असंख्य आव्हानांना तोंड देत असतानाही, अर्थपूर्ण बदल घडवून आणण्याच्या त्यांच्या मजबूत मोहिमेने लवचिकता, दृढनिश्चय आणि अटूट बांधिलकी याद्वारे इतरांना प्रेरणा दिली आहे. तळागाळातील आयोजक आणि समुदायाच्या नेत्यांपासून ते धोरणकर्तेआणि वकिलांपर्यंत महिलांनी सामाजिक क्षेत्राची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध भूमिका बजावल्या आहेत. लवचिक समुदाय तयार करण्यासाठी आणि अधिक न्याय्य आणि समावेशक समाजाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचे योगदान आवश्यक आहे. सामाजिक क्षेत्रात असंख्य महिला नेत्या झाल्या आहेत, तर त्यांच्यापैकी काहींनी त्यांच्या कार्यातून लाखो लोकांच्या प्रगतीला मदत केली आहे.

१. अरुणा रॉय:

अरुणा रॉय यांनी वंचित आणि उपेक्षित गटांच्या हक्कांसाठी प्रयत्नांचे नेतृत्व केले आहे. याव्यतिरिक्त, त्यांनी २००५ च्या माहिती अधिकार कायद्याच्या प्रवक्त्या म्हणून काम केले, ज्याला भारतीय संसदेने मान्यता दिली. गेली अनेक वर्षेलोकांसाठी अथक परिश्रम घेऊन त्या नॅशनल फेडरेशन ऑफ इंडियन वुमनच्या अध्यक्षा आणि मजदूर किसान शक्ती संघटनेच्या संस्थापक म्हणून कार्यरत आहेत .

२. डॉ. किरण बेदी:

युनायटेड नेशन्स पोलिस आणि युनायटेड नेशन्स डिपार्टमेंट ऑफ पीस ऑपरेशन्सच्या प्रमुखपदी नियुक्त झालेल्या त्या पहिल्या भारतीय आणि पहिल्या महिला आहेत. त्या नवज्योती इंडिया फाऊंडेशनच्या संस्थापक आहेत, जे दिल्लीच्या विविध भागांमध्ये अंमली पदार्थांच्या गैरवापराच्या समस्यांचे निराकरण करते. त्यांनी १९९४ मध्ये इंडिया व्हिजन फाउंडेशनची स्थापना केली, पोलिस सुधारणा, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण आणि समुदाय विकास या क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे.

३. रोहिणी नीलेकणी:

रोहिणी निलेकणी हया पाणी आणि स्वच्छतेच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या अराघ्यम या ना-नफा संस्थेच्या संस्थापक आहेत आणि त्या अक्षरा फाऊंडेशनच्या अध्यक्षा आहेत जे सर्वांना प्राथमिक शिक्षण देण्याचे काम करते. स्वभावाने परोपकारी, त्या रोहिणी नीलेकणी परोपकारी संस्थेच्या अध्यक्षा आहेत.

४. सुधा मूर्ती:

सुधा मूर्ती हया कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) द्वारे योगदान देणाऱ्या इन्फोसिस फाउंडेशनच्या त्या अध्यक्षा आहेत. इन्फोसिस फाउंडेशनने देशातील पूरग्रस्त भागात २३०० हून अधिक घरे बांधली आहेत तसेच ग्रंथालये आणि स्वच्छता सुविधा निर्माण करण्यासाठी योगदान दिले आहे. ग्रामीण सशक्तीकरण आणि महिलांच्या उन्नतीसाठीही त्या काम करतात.

सामाजिक क्षेत्रातील महिलांना सक्षम बनवण्यात शिक्षण आणि प्रशिक्षणाची भूमिका:

सामाजिक क्षेत्रात महिलांना सक्षम बनवण्यात शिक्षण आणि प्रशिक्षणाची महत्त्वाची भूमिका असलेली दिसून येते. ISDM मधील पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम इन डेव्हलपमेंट मॅनेजमेंट (PGP-DM) सारखे अभ्यासक्रम महिलांना केवळ सर्वसमावेशक प्रशिक्षणच देत नाहीत तर त्यांना धोरणात्मक विश्लेषण, नेतृत्व कौशल्य, ज्ञान आणि जटिल सामाजिक बदलांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी साधनांनी सुसज्ज करतात. शिवाय, सामाजिक क्षेत्रात लैंगिक समानता वाढवणे, निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत महिलांच्या सहभागास आणि या क्षेत्रातील महिलांच्या विकासास प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. सामाजिक क्षेत्रातील महिला वेबिनार, चर्चा आणि विविध सोशल प्लॅटफॉर्मवर कामाचे प्रदर्शन यासारख्या मार्गदर्शक उपक्रमांद्वारे इतरांना प्रेरणा देत आहेत. यामुळे इतर महिलांना केवळ सामाजिक कार्यात करिअर करण्यासाठी प्रोत्साहन मिळत नाही तर सामाजिक क्षेत्रालाही चालना मिळते असे दिसते.

सामाजिक कार्यात महिलांसाठी एक सहाय्यक परिसंस्था निर्माण करणे:

महिलांच्या अनन्य गरजा आणि आव्हानांना संबोधित करणारी एक परिसंस्था तयार करणे हे सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या क्षमतांचा खऱ्या अर्थाने उपयोग करण्यासाठी अत्यावश्यक आहे. ही परिसंस्था मुख्यत्वे अशी ठिकाणे विकसित करून तयार केली गेली आहे जिथे महिलांच्या दृष्टीकोनांचा आदर केला जातो आणि ऐकला जातो, नेटवर्किंग आणि मार्गदर्शनाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. लिंग-प्रतिसादात्मक धोरणाची वकिली करणे. अडथळे नष्ट करण्यासाठी आणि सामाजिक क्षेत्रात महिलांना यशस्वी होण्यासाठी मार्ग मोकळा करण्यासाठी देखील महिला नेत्यांच्या प्रगतीसाठी आणि लिंग-समावेशक धोरणांना प्रोत्साहन देण्यासाठी निधी आवश्यक आहे. या संदर्भात विविधता मोठी भूमिका बजावते; संस्कृतीमध्ये विविध मते आणि दृष्टीकोन आणणे संस्थांना त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत अधिक माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करते. हे नवकल्पना वाढवते आणि प्रत्येकासाठी त्यांचे विचार आणि दृष्टीकोन सामायिक करण्यासाठी सर्वसमावेशक इकोसिस्टम तयार करते असे म्हणता येते.

निष्कर्ष:

स्त्रिया सामाजिक क्षेत्राचा अविभाज्य भाग आहेत, त्या समाजात बदल घडवून आणतात आणि सामाजिक न्यायाची प्रगती करतात. त्यांच्या समोर असंख्य अडचणी असूनही, त्यांची दृढता, इच्छाशक्ती आणि जगभरातील समुदाय सुधारण्यासाठी सर्वांसाठी त्या एक आदर्श आहेत. त्यांच्या समोरील अडथळ्यांचा पद्धतशीरपणे सामना करून, लैंगिक समानतेला पाठिंबा देऊन आणि महिलांच्या शिक्षणात आणि नेतृत्व विकासामध्ये गुंतवणूक करून, आम्ही महिलांसाठी अधिक न्याय्य आणि सर्वसमावेशक सामाजिक क्षेत्र तयार करू शकतो. जिथे महिलांचे योगदान स्वीकारले जाईल, ओळखले जाईल आणि त्यांचा सन्मान राखून त्याने सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीने वाटचाल केली जाईल असे म्हणता येते.

सन्दर्भ–ग्रन्थ सूची

१. सिंह, इंद्रराज, महिला सशक्तिकरण, अल्फा इद प्रकाशन, प्रथम आवृत्ती २०२०

२. डॉ. सूर्यवंशी, सुवर्णा, महिला सबलीकरण, ऑरेंज बुक पब्लिकेशन्स, आवृत्ती पहिली २६ जानेवारी २०२१

३. बेदी, किरण, मजल दरमजल, मेहता पब्लिकेशन्स हाउस दिल्ली, डिसेंबर २०१३

४. मूर्ती, सुधा,(अनु. उमा कुलकर्णी), महाश्वेता, मेहता पब्लिकेशन्स हाउस दिल्ली, जून २०१२

♦ ♦ ♦

बुद्ध धम्म व स्त्री – पुरुष समानता

सहा. प्रा. गंगाधर पांडे
रामकृष्ण महाविद्यालय दारापूर
पाली – प्राकृत विभाग



भगवान बुद्धाचा जन्म भारतातच झाला होता. त्या कारणाने बौद्ध धम्म हा भारतीय धम्म आहे. कि ज्या धम्माने संपूर्ण जगाला भारताची संसकृती, सभ्यता चे वास्तविक स्वरूप प्रदान केले आहे. संपूर्ण मानव जाती साठी दया, करून, मैत्री चा संदेश तथागतांनी आपल्या धम्माच्या माध्यमातून संपूर्ण विश्वाला दिला. याच धम्मामुळे भारताला विश्व गुरु समजण्याचा मान सन्मान प्राप्त झाला. भारताला विश्व गुरु म्हणून गौरव प्राप्त झाला. तथागताना याच भूमीत सम्यक साम्बोधीचे ज्ञान वैशाख पौर्णिमेला प्राप्त झाल्यामुळे आपण असी सुद्धा म्हणू शकतो कि, भारत देश बुद्ध धम्माचे शरीर आहे तर बिहार राज्य हे जणू काही बुद्ध धम्माचे हृदय असावे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण याच बिहार च्या धरतीवर तथागतांच्या थोर भिक्षु – भिक्षुणी संघाने घोर तपाचरण करून स्वतः अर्हत पद प्राप्त करून संपूर्ण जगाला मार्ग दर्शन करून ज्ञानाची गंगा घराघरा पर्यंत पोहचवली म्हणूनच या बिहार राज्याला खास गौराव प्राप्त झाला आहे. या राज्यामध्ये बुद्ध कालापासूनच विहारांची संख्या जास्त असल्यामुळे या राज्याला बुद्ध काळातच बिहार असे नाव प्राप्त झाले आहे. त्या मध्ये प्रामुख्याने बौद्ध धम्मामध्ये तथागाताद्वारे प्रवज्जा प्राप्त करण्याचा मान प्रत्यक्ष तथागताची मावशी जिने शिद्धार्थ गौतमाचे संगोपन केले होते. त्यानंतर आम्रपाली, क्षेमा, चला, उपचाला, शिर्शोपचाला, रोहिणी, पटाचारा, किसागोतमी, धम्मदिन्ना, पुर्निका आदि एकूण ७३ स्त्रियांनी बौद्ध धम्मामध्ये आपले वेगळे स्थान निच्छित केले होते भगवान बुद्धांनी आपल्या धम्मामध्ये कुठेही विषमता रुजू दिली नाही. बुद्धाचा धम्म हा परिपूर्ण समतावादी विचारांनी प्रेरित आहे, इथे कुणीही श्रेष्ट किवा कुणीही कनिष्ट नाही, सर्व मानव प्राणी समान आहेत, एवढेच नव्हे तर, पुरुषांप्रमाणे स्त्रिया सुद्धा समान आहेत, बौद्ध धम्मामध्ये स्त्रियांना सुद्धा मनाचे स्थान आहे.

बौद्ध धम्मामध्ये जाती – पाति, उच्च – नीच, अमीर – गरीब भेदभाव सुद्धा नाही. बौद्ध धम्म म्हणजे संपूर्ण संसार सागरासोबत भारताला विलीन करणारा धम्म होय. याच कारणाने भारतामध्ये हजारो धर्म असून सुद्धा, हजारो विचाराचे लोक असून हि जगातील अनेक सुखी संपन्न देश्यांमध्ये आजही पंचशील ध्वज फडकत आहे. याच कारणाने तेथे सर्व लोक मिळून मिसळून आपले जीवन सुखासमाधानाने जगात आहेत. याच बुद्ध धम्माचा वारसा जपत असताना जगातील चीन, भूतान, बांगलादेश, थायलंड, इंडोनेशिया, जपान, म्यानमार, ब्रम्हदेश, बर्मा, श्रीलंका, तिबेट, वियतनाम, कोरिया इत्यादी देश्यासोबत भारत देशाचे समंध अतिशय मजबूत आहेत. भगवान बुद्धाचा धम्म अहिंसावादी असल्यामुळे इथे हिंसेला किंचितही थारा नाही. त्यामुळे बौद्ध धम्मामुळे संपूर्ण जगात शांततेचे वातावरण निर्माण होऊन जगात सुख शांती निर्माण होऊ शकते, यात शंका नाही. जगात कटुता, हिंसा, घृणा, विषमतेचा अंत होऊन सुख

शांती बहाल करता येईल. आज भारता मध्ये भगवान बुद्धाचा धम्मा किंबहुना लुप्त झाला असल्यामुळे नैराश्य, अस्थिरता, हिंसा तथा अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. देशाचे तुकडे – तुकडे पडत आहेत. अंतर्गत विषमता उग्र रूप धारण करत आहे. शासन व्यवस्थेमध्ये बेईमानी निर्माण झालेली आहे. आपली शक्ती वाढविण्यासाठी काही अदृश्य शक्ती साम, दाम, दंड, भेद या वाईट गोष्टींचा वापर करतांना दिसत आहेत. खुलेआम नरसंहार होताना दिसत आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे. या परिस्थितीवर एकच मार्ग आहे तो म्हणजे तथागतांचा अहिंसावादी धम्म. भगवान बुद्धानी जेव्हा आपला धम्म लोकांना सांगण्यास सुरुवात केली तेव्हा सुद्धा समाजाची अशीच स्थिती होती. चोहीकडे अन्याय, अत्त्याचार, बेबंदशाही, पशुबळीव नैतिकतेचे पतन झालेले होते. मनुष्य हतबल झाला होता. अश्या वेळी भगवान बुद्धाच्या उपदेश्याने लोकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले होते.

भारताला अशी चमत्कारिक आध्यात्मिक शक्ती तथागतांनी दिली होती कि, ज्याच्या प्रभावाने संपूर्ण संसार सागर पावन झाला. परंतु आजही या जगाला भगवान बुद्धाच्या धम्माची आवश्यकता आहे. बुद्ध धम्म जीवन जगण्याचा मार्ग आहे. समाजामध्ये समता, बंधुभाव, न्याय, करूणा विश्व बंधुत्व निर्माण करायचे आहे. सुख शान्ति स्थापन करून समग्र मानवतेचा विकास करायचा आहे आणि त्यावरील एकमेव उपाय म्हणजे बुद्धाचा धम्म होय. समस्त भारता वासी पुन्हः पंचशील, सत्य, अहिंसा, करूणा मैत्री अस्तेय्य, अपरिग्रह ग्रहण करतील आणि सम्यक, समबुद्ध भगवान बुद्धाच्या मार्गावर मार्गक्रमण करून समस्त दुःखातून मुक्ती मिळवतील. भगवान बुद्ध म्हनंतात मनुष्यांची मानसिक शान्ति तथा निर्वाण प्राप्ती चा मार्ग हा मनुष्यांद्वारा केल्या गेलेले कर्मच आहेत. जसे कर्म आपण करू तसे फळ आपणास मिळते. कर्म फळ प्राप्ती साठी सैरा – वैरा भटकण्याची कुणालाही आवश्यकता नाही. त्यासाठीच तर तथागत भगवान बुद्धांनी संसारातील दुःख चक्रातून मुक्त होण्यासाठी तृष्णेचे मुळ शोधून तथागतांनी मानवाला निर्वाणाचा मार्ग उपलब्ध करून दिला.

भगवान बुद्ध म्हनंतात कि, मनुष्य हा स्वतःच स्वतःचा मार्गदाता आहे, दुसरा गुरु होऊच शकत नाही. 'अत्तदिपा विहरथ अत्तसरंना' म्हणजेच तुम्ही आपल्या प्रकाशानेच प्रकाशित व्हा, आणि तुम्ही आपल्या स्वतःच स्वतःला शरण जा. मि केवळ मार्गदाता आहे, मुक्ती दाता नाही. माझी आणि तुमची भेट या घनदाट जंगलात झाली आहे, परंतु तुम्ही माझ्यावर अवलंबून राहू नका, तुम्हाला तुमचा रस्ता स्वतःच निवडायचा आहे. अश्याप्रकारे भगवान बुद्धांनी स्वावलंबी जीवन जगण्याचा मार्ग मनुष्य प्राण्याला दाखवलेला आहे. त्यामुळे जनतेमध्ये जागृती निर्माण झाली आहे व सामाजिक व्यवस्थे मध्ये अचानक परिवर्तन घडून आले. जनता ईश्वर, देव , ब्रह्मा अश्या मनोवैज्ञानिक दबावातून मुक्त होऊन समाज परिवर्तन झाले. वर्ण मुक्त समाज निर्माण झाला व सामाजिक समरसता आणि समता, स्वतंत्र, बंधुता पुरस्कृत समाजाचा माहोल निर्माण झाला. त्यामुळे समाजातील अनेक जातीतील, अनेक वर्णाचे, अनेक विचाराचे, जाती, धर्माचे लोक एका मंचावर एकत्र आलेत. हे खूप मोठे परिवर्तन भारतात घडून आले ते केवळ भगवान बुद्धांच्या समतावादी धम्मामुळे.

संदर्भ ग्रंथ –

भगवान बुद्ध व त्यांचा धम्म – डॉ . बाबासाहेब आंबेडकर

धम्म जीवन जिने कि कला –स . ना . गोयंका विपस्सना विशोधन विन्यास इगतपुरी प्रकाशन .

क्या बुद्ध दुःखवादी थे – स . ना . गोयंका विपस्सना विशोधन विन्यास इगतपुरी प्रकाशन .

थेरीगाथा – प्रा . डॉ . विमलकीर्ती सम्यक प्रकाशन नागपूर

♦ ♦ ♦

लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरण

डॉ. कुंदन अजाबराव अलोणे
सहयोगी प्राध्यापक, भूगोल विभाग
रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर



गोषवारा :–

लिंग ही संज्ञा पुरुष किंवा स्त्री असण्याशी संबंधित आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये आणि संधींचा संदर्भ देते. बहुतांश समाजात, पुरुष किंवा स्त्री असणे हा केवळ वेगवेगळ्या जैविक आणि शारीरिक वैशिष्ट्यांचा विषय नसतो. महिलांच्या सक्षमीकरणाचे वर्णन, महिलांची आत्मसन्मानाची भावना, त्यांच्या स्वतःच्या निवडी ठरवण्याची त्यांची क्षमता आणि स्वतःसाठी आणि इतरांसाठी सामाजिक बदलावर प्रभाव टाकण्याची त्यांची निवड वाढवणे असे केले जाऊ शकते. संयुक्त राष्ट्रांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की, आर्थिक विकासासाठी आणि गरिबी कमी करण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण हे एक सर्वोत्कृष्ट साधन आहे. हा पेपर महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लैंगिक समानते वर प्रकाश टाकतो.

मुख्य शब्द :–

लिंग, गुणधर्म, सक्षमीकरण, असमानता, आर्थिक विकास... इ.

परीचय :–

लैंगिक समानता ही महिला आणि पुरुषांसाठी समान असण्याची प्रक्रिया आहे. समता समानतेकडे नेत असते. लैंगिक समानतेसाठी महिला आणि पुरुषांना सामाजिकदृष्ट्या मौल्यवान वस्तू, संधी, संसाधने आणि बक्षिसे यांचा समान आनंद मिळणे आवश्यक आहे. जेथे लैंगिक असमानता अस्तित्वात आहे, तेथे सामान्यतः निर्णय घेण्याच्या आणि आर्थिक आणि सामाजिक संसाधनांच्या प्रवेशाच्या संदर्भात महिलांना वगळले जाते किंवा वंचित ठेवले जाते. त्यामुळे लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे महिलांचे सक्षमीकरण, ज्यामध्ये शक्ती असंतुलन ओळखणे. महिलांना त्यांचे स्वतःचे जीवन व्यवस्थापित करण्यासाठी अधिक स्वायत्तता देणे यावर लक्ष केंद्रित केले आहे. लैंगिक समानतेचा अर्थ असा नाही की पुरुष आणि स्त्रिया समान होतात, केवळ संधी आणि जीवन बदलांची उपलब्धता त्यांच्या लिंगावर अवलंबून नाही किंवा त्यावर निर्बंध नाहीत. लैंगिक समानता साध्य करण्यासाठी खासगी आणि सार्वजनिक स्तरावर निर्णय घेणे आणि संसाधनांची उपलब्धता यापुढे पुरुषांच्या बाजूने राहणार नाही हे सुनिश्चित करण्यासाठी महिला सक्षमीकरण आवश्यक आहे, जेणेकरून महिला आणि पुरुष दोघेही उत्पादक आणि पुनरुत्पादक जीवनात समान भागीदार म्हणून पूर्णपणे सहभागी होऊ शकतील.

कृषी क्षेत्रातील लैंगिक विषमता :–

राव, ई. कृष्णा (२००६) यांच्या अहवालानुसार ५० टक्क्यांहून अधिक भारतीय कामगार शेतीमध्ये कार्यरत आहेत. बहुसंख्य ग्रामीण पुरुष शेतकरी म्हणून काम करतात, तर

बहुसंख्य महिला पशुधन देखभाल, अंडी आणि दूध उत्पादनात काम करतात. हे लक्षात घेतले जाऊ शकते की सुमारे ७८ टक्के ग्रामीण महिला शेती करतात, तर ६३ टक्के पुरुष शेती करतात. सुमारे ३७ टक्के महिला शेतकरी आहेत, परंतु ते शेतीच्या सिंचन, तण काढणे, नांगरणी, लागवड आणि कापणीच्या टप्प्यात अधिक सक्रिय आहेत. भारतातील चहाच्या मळ्यांमध्ये महिलांचा कामगार सहभाग दर सुमारे ४७ टक्के, कापूस लागवडीमध्ये ४६ टक्के, तेलबियांच्या लागवडीमध्ये ४५ टक्के आणि फलोत्पादनामध्ये ३९ टक्के आहे. भारतात पुरुष आणि स्त्रियांमध्ये वेतनात विषमता आहे. सर्वात मोठी वेतनातील तफावत नांगरणीच्या कामांमध्ये आढळते. पेरणी, तण कापणी यासारख्या इतर कृषी कामांसाठी, पुरुष आणि महिला वेतनात भिन्नता आढळते.

व्यावसायिक विषमता :–

सशस्त्र दलात महिलांना लढाऊ भूमिका बजावण्याची परवानगी नाही. या मुद्द्यावर केलेल्या अभ्यासानुसार, जिथे शत्रूशी शारीरिक संपर्काची शक्यता जास्त असते अशा जवळच्या लढाऊ शस्त्रांमध्ये महिला अधिकाऱ्यांना समाविष्ट करण्यापासून वगळण्याची शिफारस करण्यात आली होती. महिला अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी कमिशन दिले जाऊ शकत नाही, कारण त्यांना कमांडसाठी प्रशिक्षण दिलेले नाही किंवा त्यांना आतापर्यंत जबाबदारी देण्यात आलेली नाही, असे अहवालात म्हटले आहे. भारतातील काही विशिष्ट व्यवसायांमध्ये महिलांच्या निःशक्ततेची चिकाटी यातून दिसून येते.

मालमत्तेचे हक्क :–

कायद्यानुसार महिलांना मालमत्ता बाळगण्याचा आणि वारशाचा समान हक्क मिळण्याचा समान अधिकार आहे, परंतु व्यवहारात, महिलांना तोटा होतो. याचा पुरावा असा आहे की ग्रामीण भागातील ७० टक्के जमीन पुरुषांच्या मालकीची आहे. १९७४ च्या विवाहित महिला मालमत्ता हक्क कायद्यासारखे कायदे महिलांना संरक्षण देतात, परंतु काही कायदे कायदेशीर निवारण मागतात. जरी २००५ चा हिंदू उत्तराधिकार कायदा पूर्वजांच्या आणि संयुक्त मालकीच्या मालमत्तेवर समान वारसा हक्क प्रदान करतो, तरी विशेषतः उत्तर भारतात या कायद्याची अंमलबजावणी कमी प्रमाणात केली जाते. मालमत्तेचे हक्क नाकारणे हे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात अडथळा आणते.

शिक्षणाची विषमता :–

शिक्षणात लैंगिक समानतेचे सहस्राब्दी विकास उद्दिष्ट साध्य करण्याचे भारताचे लक्ष्य आहे. युनिसेफचे उपस्थितीचे प्रमाण आणि शिक्षणातील लैंगिक समानता निर्देशांक (जी. ई. ई. आय.) हे शिक्षणाचा दर्जा दर्शवतात. काही लाभ असूनही, मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स अंतर्गत २०१५ पर्यंत ९५ टक्के जी. ई. ई. आय. स्कोअर गाठण्यासाठी भारताला त्याच्या सुधारणेच्या दराला तिप्पट करणे आवश्यक आहे. ग्रामीण भारतात मुलींचं शिक्षण मुलांपेक्षा कमी आहे. भारतातील मुलींच्या शैक्षणिक सक्षमीकरणाला नाकारले जात असल्याचे यातून दिसून येते.

साक्षरता :–

कल्याणी मेनन–सेन, ए. के. शिवकुमार (२००१) यांच्या अहवालानुसार भारतातील महिला साक्षरतेचे प्रमाण पुरुषांच्या साक्षरतेच्या दरापेक्षा कमी आहे. भारताच्या जनगणनेनुसार २०११ मध्ये महिलांचा साक्षरता दर ६५.४६ टक्के होता तर पुरुषांचा साक्षरता दर ८२.१४ टक्के होता. मुलांच्या तुलनेत शाळांमध्ये मुलींची संख्या खूपच कमी आहे आणि त्यापैकी अनेक शाळा सोडतात. १९९७ च्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण आकडेवारीनुसार, केवळ केरळ आणि मिझोराम या राज्यांनी सार्वत्रिक महिला साक्षरतेचे प्रमाण गाठले आहे. केरळमधील महिलांच्या सुधारित सामाजिक आणि आर्थिक स्थितीमागील प्रमुख घटक म्हणजे साक्षरता. २००६ – २०१० पर्यंत किमान माध्यमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या महिलांची टक्केवारी पुरुषांच्या तुलनेत जवळजवळ अर्धी होती. सध्याच्या तरुण पिढीमध्ये, प्राथमिक स्तरावर अंतर कमी होत आहे आणि माध्यमिक स्तरावर वाढत आहे असे दिसते. पंजाबमध्ये, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण–३ मध्ये दाखविल्याप्रमाणे शालेय नावनोंदणीत मुली आणि मुलांमधील अंतर वयानुसार लक्षणीयरीत्या वाढते, जिथे पंजाबमध्ये १५–१७ वयोगटातील मुलींमध्ये मुलांपेक्षा शाळा सोडण्याची शक्यता १० टक्के जास्त आहे. जरी ही तफावत लक्षणीयरीत्या कमी झाली असली तरी मुलींच्या शिक्षणाच्या गुणवत्तेत अजूनही समस्या आहेत, जिथे एकाच कुटुंबातील मुलांना उच्च दर्जाच्या खाजगी शाळांमध्ये पाठवले जाते आणि मुलींना गावातील सरकारी शाळेत पाठवले जाते.

विद्यार्थिनींना आरक्षण :–

बिगर औपचारिक शिक्षण कार्यक्रमांतर्गत, राज्यांमधील सुमारे ४० टक्के केंद्रे आणि केंद्रशासित प्रदेशांमधील १० टक्के केंद्रे केवळ महिलांसाठी राखीव आहेत. २००० सालापर्यंत, सुमारे ०.३ दशलक्ष एन. एफ. ई. केंद्रे सुमारे ७.४२ दशलक्ष मुलांना सेवा पुरवत होती, ज्यापैकी सुमारे ०.१२ दशलक्ष केवळ मुलींसाठी होती. ओडिशा सारख्या काही राज्यस्तरीय अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर महाविद्यालयांनी त्यांच्या ३० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. भारताच्या पंतप्रधानांनी आणि नियोजन आयोगानेही केवळ महिलांसाठी भारतीय तंत्रज्ञान संस्था स्थापन करण्याच्या प्रस्तावाला नकाराधिकार दिला. जरी १९९० च्या दशकापासून भारतात महिला साक्षरता आणि नावनोंदणी दरात लक्षणीय सुधारणा झाल्या असल्या तरी, देश अजूनही महिलांपेक्षा पुरुषांना अधिक महत्त्व देत असल्याने महिलांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेशी मोठ्या प्रमाणात तडजोड केली गेली नाही.

लिंग आधारित हिंसा :–

भारतातील गुन्हेगारीच्या (२०१२) अहवालानुसार भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनुसार दर १००,००० महिलांमागे सरासरी वार्षिक गुन्हेगारीचे प्रमाण आहे. बलात्कार, लैंगिक अत्याचार, विनयशीलतेचा अपमान, अपहरण, जिवलग जोडीदार किंवा नातेवाईकांकडून क्रूरता, मुलींची आयात किंवा तस्करी, हुंडा, हुंडा मृत्यू, अशिष्टता आणि भारतीय कायद्याने ओळखल्या गेलेल्या इतर सर्व गुन्ह्यांसारखे भारतीय दंड संहितेचे गुन्हे.

घरगुती हिंसाचार, बलात्कार आणि हुंडा संबंधित हिंसाचार हे लैंगिक हिंसाचाराचे स्रोत आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या २०१३ च्या वार्षिक अहवालानुसार, २०१२ मध्ये संपूर्ण भारतात २४,९२३ बलात्काराच्या घटना नोंदल्या गेल्यायापैकी २४,४७० प्रकरणे नातेवाईक किंवा शेजाऱ्यांनी केली होती; दुसऱ्या शब्दांत, ९८ टक्के प्रकरणांमध्ये पीडित कथित बलात्कारीला ओळखत होती.

राजकीय विषमता :–

लैंगिक असमानतेचे हे मोजमाप सर्वोच्च स्तरावर राजकीय निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत पुरुष आणि स्त्रियांमधील अंतर विचारात घेते. डेन्मार्क, स्वित्झर्लंड, जर्मनी, फ्रान्स आणि युनायटेड किंगडम यांच्या तुलनेत भारताच्या राजकीय सक्षमीकरणातील लैंगिक असमानता कमी दर्शविणाऱ्या या उपाययोजनांमध्ये, २०१३ मध्ये ९ व्या स्थानासह भारत अनेक वर्षांपासून जगभरातील पहिल्या २० देशांमध्ये आहे. पंतप्रधानांपासून ते विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत, भारतीय मतदारांनी अनेक दशकांपासून राज्य विधानसभा आणि राष्ट्रीय संसदेसाठी मोठ्या संख्येने महिलांना निवडून दिले आहे.

लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरण :–

लैंगिक समानता म्हणजे असा समाज ज्यामध्ये स्त्रिया आणि पुरुषांना जीवनाच्या सर्व क्षेत्रात समान संधी, परिणाम, हक्क आणि जबाबदाऱ्या आहेत. जेव्हा दोन्ही लिंग सत्ता आणि प्रभावाच्या वितरणात समान वाटा घेण्यास सक्षम असतात. कामाच्या माध्यमातून किंवा व्यवसाय सुरू करून आर्थिक स्वातंत्र्यासाठी समान संधी असतात. शिक्षणात समान प्रवेश आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षा विकसित करण्याची संधी मिळते तेव्हा पुरुष आणि स्त्रियांमध्ये समानता अस्तित्वात असते. लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे महिलांचे सक्षमीकरण, ज्यामध्ये शक्ती असंतुलन ओळखणे आणि त्याचे निराकरण करणे आणि महिलांना त्यांचे स्वतःचे जीवन व्यवस्थापित करण्यासाठी अधिक स्वायत्तता देणे यावर लक्ष केंद्रित केले आहे. शाश्वत विकासासाठी आणि सर्वांसाठी मानवी हक्कांच्या पूर्ततेसाठी महिला सक्षमीकरण महत्त्वाचे आहे. जिथे महिलांचा दर्जा कमी असतो, तिथे कुटुंबाचा आकार मोठा असतो, ज्यामुळे कुटुंबांची भरभराट होणे अधिक कठीण होते. जेव्हा ते महिलांच्या शैक्षणिक संधी, दर्जा आणि सक्षमीकरणाकडे लक्ष देतात तेव्हा लोकसंख्या आणि विकास आणि प्रजनन आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावी ठरतात. जेव्हा महिला सशक्त होतात, तेव्हा संपूर्ण कुटुंबाला फायदा होतो आणि या फायद्यांचा अनेकदा भावी पिढ्यांवर परिणाम होतो. समाजात पुरुष आणि स्त्रिया ज्या भूमिका बजावतात त्या जैविकदृष्ट्या निर्धारित नसतात, त्या सामाजिकदृष्ट्या निर्धारित, बदलत्या आणि बदलू शकणाऱ्या असतात. जरी ते संस्कृती किंवा धर्मानुसार आवश्यक असल्याचे न्याय्य असले तरी, या भूमिका स्थानिकतेनुसार मोठ्या प्रमाणात बदलतात आणि कालांतराने बदलतात.

प्रमुख समस्या आणि संबंध :–

प्रजननक्षम आरोग्यः शारीरिक आणि सामाजिक अशा दोन्ही कारणांमुळे स्त्रिया पुरुषांपेक्षा पुनरुत्पादक आरोग्याच्या समस्यांना बळी पडण्याची शक्यता जास्त असते. मातामृत्यू आणि विकृतीसह प्रजननक्षम आरोग्य समस्या, विकसनशील देशांमधील महिलांसाठी मृत्यू आणि अपंगत्वाचे एक प्रमुख परंतु टाळता येण्याजोगे कारण दर्शवतात. त्यामुळे महिलांना त्यांच्या पुनरुत्पादन आरोग्याचे रक्षण करण्यात मदत करण्यासाठी माहिती, सेवा आणि अटी प्रदान करण्यात अयशस्वी होणे हा लिंग-आधारित भेदभाव आणि महिलांच्या आरोग्य आणि जीवनाच्या अधिकाराचे उल्लंघन आहे.

नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन :–

भारतातील स्त्रिया सहसा पाणी, अन्न आणि इंधन सुरक्षित ठेवण्याची आणि कौटुंबिक आरोग्य आणि आहाराची देखरेख करण्याची जबाबदारी घेतात. त्यामुळे, ते पोषण आणि पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनाबद्दल जे काही शिकतात ते तात्काळ आचरणात आणतात.

आर्थिक सक्षमीकरण :–

भारतात पुरुषांपेक्षा महिला अधिक गरिबीत जगत आहेत. आर्थिक विषमता अंशतः कायम आहे कारण कुटुंबे आणि समुदायांमधील बहुतेक विनावेतन काम महिलांच्या खांद्यावर पडते आणि त्यांना आर्थिक क्षेत्रात भेदभावाला सामोरे जावे लागते.

शैक्षणिक सक्षमीकरण :–

भारतातील निरक्षर प्रौढांपैकी सुमारे दोन तृतीयांश महिला आहेत. महिलांच्या शिक्षणाचे उच्च स्तर हे कमी बालमृत्यू आणि कमी प्रजननक्षमता, तसेच त्यांच्या मुलांसाठी उच्च पातळीचे शिक्षण आणि आर्थिक संधी या दोन्हींशी दृढपणे संबंधित आहेत.

राजकीय सक्षमीकरण :–

सामाजिक आणि कायदेशीर संस्था अजूनही मूलभूत कायदेशीर आणि मानवी हक्कांमध्ये, जमीन किंवा इतर संसाधनांमध्ये प्रवेश किंवा नियंत्रणात, रोजगार, कमाईत,

सामाजिक आणि राजकीय सहभागात महिलांना समानतेची हमी देत नाहीत. घरगुती हिंसाचाराविरोधातील कायदे अनेकदा महिलांच्या वतीने लागू केले जात नाहीत.

निष्कर्ष :–

महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लैंगिक समानता अत्यंत आवश्यक आहे. आपल्याला देशातील सरकार आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांद्वारे संघटित दृष्टिकोनाची आवश्यकता आहे, जी योग्य दिशेने केंद्रित असेल जी केवळ महिलांना सर्व प्रकारच्या वाईट गोष्टींपासून स्वातंत्र्य देईल. आर्थिक विकास, उच्च शिक्षणाची कामगिरी आणि देश किंवा प्रदेशातील जीवनाच्या चांगल्या गुणवत्तेवर लिंग-संवेदनशील धोरणांचा थेट परिणाम झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय संस्था विकासाच्या हस्तक्षेपांमध्ये प्रमुख प्राधान्य म्हणून लैंगिक समानतेवर लक्ष केंद्रित करतात. अशा हस्तक्षेपांची प्रगती मोजण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय विकासातील मुख्य चिंता म्हणून लैंगिक समानता राखण्यासाठी प्रभावी तंत्रांची वाढती गरज आहे.

महिलांना विकासाच्या फायद्यांचा आनंद घेण्यासाठी विविध प्रकारचा भेदभाव आणि अपंगत्व सहन करावे लागले आहे. सामाजिक, आर्थिक विकासामध्ये लैंगिक समानतेला प्रोत्साहन दिल्यास महिलाचे सक्षमीकरण होऊन विकासीत भारत निर्माण होईल.

संदर्भ :–

- उहरपवी,. उी. ठरज्ञशीह, थेाशप एोंशिीाशपीं ळप खपवळर – चळश्रशींीपशी । उहरश्रश्रशपसशी.
- उीळाश ळप खपवळर २०१२ डींरींळींीळली, छरींळेपरश्र उीळाश ठशलेीवी ईीशरीं (छउठइ), चळपळींीूष केाश अषषरळीी, त्रेींीष खपवळर.
- त्रशपवशी एींरिश्रळीूं रपव थेाशप ी एोंशिीाशपीं ळप खपवळर, छरींळेपरश्र त्रराळश्रू कशरश्रींह डींींशू (छत्रक्रड-३) खपवळर २००५-०६, खपींशीपरींळेपरश्र खपींीळींींश षेी झेींश्रिरींळेप डलळशपलशी ऊशेपरी, चींीलरळ – ४०० ०८८
- त्रींींरि, चेपळलर ऊरी (१९८७), 'डशश्रशलींळींश वळीलीळाळपरींळेप रसरळपींीं षशारश्रश लहळश्रवीशप ळपींीरिश्र झींपक्षरल, खपवळर.' झेींश्रिरींळेप रपव वशींशश्रेशिपींीशींळशु.
- छरीरीरळरह, च. ङ. (२००४) एोंशिीाशपीं षेी थेाशप, ऊशश्रहळ झींलश्रळीहशी हेींीश, ऊशश्रहळ.
- ठरे, ए. घीळीहपर (२००६), 'ठेश्रशे ष थेाशप ळप असीळलींश्रींीीश: अ चळली डशींशश्र डींींवू.' गेींीपरश्रे ष त्रश्रेलरश्र एलेपेाू, तेश्र २

♦ ♦ ♦

महाराष्ट्रातील स्वातंत्रोत्तर स्त्रीयांची विविध क्षेत्रातील प्रगती विशेषत: साहित्य क्षेत्रातील सहभागाचा आढावा

डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे.
इतिहास विभाग प्रमुख
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती.



सारांश :–

समाजपरिवर्तनामध्ये प्रक्रिया अत्यंत सावकाशपणे होत असते. समाजाच्या कोणत्याही अंग उपांगामध्ये परिवर्तनाधी प्रक्रिया बाह्य व आंतरिक स्वरूपाने होते. स्त्रियांचा प्राचीन काळापासूनच्या विकासाचा आढावा घेतला असता महिला विकासाची प्रक्रिया आंतरिक व बाह्य अंगाने अत्यंत सावकाशपणे सुरू असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने महिला विकासाच्या प्रक्रियेत इंग्रजी राजवटीत खऱ्याअर्थाने वेग आला असलाचेही दिसून येते. महाराष्ट्रामध्ये महिला विकासाचा आढावा घेतला असता. असे दिसून येते की महाराष्ट्र राज्य महिला विकासांमध्ये स्वातंत्र्यपूर्व व तसेच स्वातंत्र्योत्तर कारकिर्दीत सर्वाधिक प्रगतीपथावर असून प्रगती चा वेग व महिला सहभागीतेची विविध क्षेत्रे यांच्यात लक्षणिय बाढ झालेली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये महिलांनी आपला सहभाग सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक, क्रिडा, कला व साहित्य इत्यादी क्षेत्रात दर्शविलेला असून त्या सहभागाची तीव्रता ही महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. महिलांनी केलेली विविधांगी क्षेत्रातील रचनात्मक कामे ही भावी पीढीतील महिलांसाठी प्रेरणादायी ठरलेली असून महिला विकासाच्या पुढिल वाटचालीस दिशादर्शक ठरणारी आहेत. तसेच विशेषतः महराष्ट्रातील महिलांनी केलेली साहित्य शेत्रातील प्रगती वाखानण्यासारखी आहे, साहित्याच्या विविधांगी क्षेत्रात महिला सतत व निरंतर प्रगती करीत आहेत, विविध साहित्य कृतीतून महिलांनी सद्यस्थितीतील समाज जीवनाचे चित्र रेखाटल्याचे आढळून येते.

भारत हा विविध संस्कृतीचा देश मात्र तो अनेक वर्षापासून विविध सत्तांचा गुलाम होता. गुलामीच्या काळात स्त्री पुरुष या दोघांचाही हवा तसा विकास झालेला दिसून येत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये खरे तर सर्वांगिन विकासच मुळात कमि जास्त प्रमाणात झालेला होता. यामध्ये ही महिलांचा विकास व विकासामध्ये महिलांची सहभागिता हि कमीच होती. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय क्षेत्रातील सहभागाव आढावा घेण्या आधी स्त्रियांचा ऐतिहासिक काळापासूनच्या वाटचालींचा थोडक्यात आढावा घेणे अत्यावश्यक आहे. उत्तर वैदिक कालखंडापासून स्त्रियांची स्थिती फारशी चांगली नव्हती एकोणविसावे शतक हेच खरे भारतीय उपखंडात स्त्रियांच्या प्रगतीची सकारात्मक वाटचाल करणारे शतक होय. ती वीसाव्या शतकापर्यदिन ऋवेदीक कालावधीपासून स्वातंत्र्य मिळेपर्यंत स्त्रियांचा पाहिजे तसा सहभाग सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक,साहित्य व क्रिडा क्षेत्रात नव्हता तर महिलांशी संबंधीत समस्या सुध्दा पूर्णतः २० व्या शतकापर्यंत नष्ट झालेल्या नव्हत्या. सतीप्रथा, पडदा प्रथा, बहुविवाह, बालविवाह, विधवा समस्या इत्यादी कुरिती

भारतीय समाजात होत्या. ब्रिटीश कालखंडात भारतीय उपखंडात खऱ्या अर्थाने आधुनिक व सामाजविकासास वाव देणारे शिक्षण देण्यास सुरवात झाली. इंग्रजी शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाल्यामुळे व कांही कर्तृत्ववान कर्त्या सुधारकांच्या प्रेरणेमुळे भारतीय उपखंडात महिलांचा विकास होण्यात व विकासामध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यास अत्यंत मोलाची भर पडली. स्त्रीयांची विविधांगी क्षेत्रात सहभागगिता वाढावी यासाठी प्रयत्न करणाऱ्या पुरुषांची संख्या महाराष्ट्रात सर्वाधिक दिसून येते. स्वातंत्र्योत्तर कालावधी पूर्व म. फुलेंच्या प्रेरणेने सावित्रिबाई फुलेंनी याची महर्त मेळ रोवलेली दिसून येते. सावित्रीबाई फुले ह्या सर्व प्रथम आद्यशिक्षिका होत. त्यांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये समाजाच्या सर्वचा क्षेत्रात आपला सहभाग नोंदविला होता. साहित्याच्या क्षेत्रात सावित्री आईचा मोलाचा वाटा आहे. कविता लेखन असो कि नाटक लेखन याची सुरवात सावित्री आईनेच केलेली दिसून येते. याच पठडीतील पुढचे पाऊल म्हणजे रमाबाई रानडेचे कार्य होय. यांचाही महिला उत्थानामध्ये मोलाचा वाटा आहे. परंतु खऱ्या अर्थाने महिलांचा विकास व विकासामध्ये महिलांचा सहभाग स्वातंत्र्योत्तर कालखंडात झालेला दिसन येतो. महिलांचा विकास व महिलांचा सर्वांगिन क्षेत्रात सहभाग याचा आढावा घेत असतांना ज्या महिलांनी महिला सक्षमीकरणामध्ये व साहित्य क्षेत्रामध्ये प्रामुख्याने सहभाग नोंदविला त्याचाही आढावा घेणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रातील साहित्य क्षेत्रामध्ये स्त्रियांच्या सहभागाचा आढावा –

साहीत्याच्या क्षेत्रात महाराष्ट्रातील स्त्रियांनी स्वतःच्या कतृत्वाच्या आधारावर प्रचंड झेप घेतली. संशोधक, समिक्षक, अभ्यासक, कवियित्री, कादंबरीकार, लेखिका, गजल गायिका व लघु कथा लेखिका म्हणून त्यांनी आपले स्थान निर्माण केलेले दिसून येते. स्त्रीयांची वाङमयीन दृष्टी विकासीत झाल्यामुळे स्त्रियांनी प्रतिकुल परिस्थीतीत विविधांगी स्वरूपाचे साहीत्य निर्माण करूण समाजापुढे एक आदर्श निर्माण केला. विषेशतः सावित्री बाई फुले यांचे कडून प्रेरणा घेऊन स्त्रियांनी लेखन केलेले दिसून येते. स्वातंत्र्यानंतर विवधांगी प्रकारातील साहित्याच्या क्षेत्रात स्त्रियांनी अतिशय प्रगती केली. स्त्रीवादी साहित्यकार, कथाकार कादंबरीकार, कवियीत्री म्हणून प्रतिष्ठा मिळवली. १९५० पर्यंत च्या व पुढील काळात काळात 'काव्यसंजीवानिकार' संजीवनी मराठे, शांता शेळके, इंदिरा संत, लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरी, ताराबाई मोडक, मालतीताई बेडेकर, विभावरी शिरुरकर, कमल देसाई, गौरी देशपांडे, शांता गोखले, कविता महाजन, प्रिया तेंडूलकर, सुनंदा कुलकर्णी, मेघना पेठे, निरजा, अरुणा ढेरे, रिता वेलिणकर, प्रज्ञा लोखंडे, अनुराधा परुळेकर, आसावरी काकडे, सिसिलिया कार्वालो, मलिका अमर शेख, आशा बघे, प्रभा गणोरकर, डॉ इरावती कर्वे, डॉ विजया राजाध्यक्ष, कुसुमवाती देशपांडे, डॉ अरूणा ढेरे, दुर्गाबाई भागवत, शांताबाई शेळके, बेबी कांबळे, मुक्त सर्वगोड, उर्मिला पवार, कुमुद पावडे, सिंधुताई सपकाळ इत्यादी अनेक स्त्रियांनी साहित्याच्या विकासात योगदान दिले आहे. त्यामुळेच स्त्री साहीत्याच्या क्षेत्रात मोठया प्रमाणात विकास घडून आला. या साहीत्यकृतीवर समाज व संस्कृतीचा परिणाम पडला असल्याचे दिसून येते अशाप्रकारे साहित्याच्या विकासात स्त्रियांचे माठे योगदान आहे.

निष्कर्ष :–

१९ व्या शतकामध्ये इंग्रजी राजवटीत पाश्चात्य शिक्षणाचा प्रचार व प्रसारामुळे स्त्री शिक्षणास सुरवात झाली. शिक्षणामुळे स्त्रियांचा विकास व विकासामध्ये सहभाग वाढण्यास मदत झाली. समाजातील सर्वच क्षेत्रात महिलांनी आपली सहभागिता दर्शविली आहे. आधूनिक महाराष्ट्रातल्या सर्वच क्षेत्रात महिलांचा सक्रिय सहभाग हे दिसून येतो. महिलांचा वास्तविक विकास स्वातंत्र्योत्तर कालखंडातच झालेल आहे. स्त्रियांमधील आत्मसन्मान जागृत झालेलया दिसून येतो. स्त्रियांमध्ये शिक्षणाविषयी जागृतीनिर्मित झालेली दिसून येते. स्त्री जागृतीमुळेच त्यांनी राजकारण, समाजसेवा, क्रिडा, संस्कृती, कला व साहित्य निर्मिती इत्यादी सारख्या विविधांगी क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करून सहभाग नोंदविलेला दिसतो. सध्यास्थितीत महाराष्ट्रमध्ये असे एकही क्षेत्र नाही की ज्या मध्ये महिलांनी सहभाग नोंदविलेला नाही. साहित्य क्षेत्रात तर स्त्रियांनी मोलाची भर घातलेली दिसून आली आहे. साहित्याच्या विविध प्रकारामध्ये स्त्रियांनी लेखन केल्याचे व अजरामर कृती निर्माण केल्याचे दिसून आले. स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर महिला विकासाच्या सर्वच क्षेत्रात तसेच साहित्य निर्मिती क्षेत्रात सतत व निरंतर प्रगती होत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील महिला विकासाचा आलेख चढता आहे. मात्र सर्वांगीण परिवर्तनाची प्रक्रिया बाह्य व आंतरिक स्वरूपात सावकाशपणे होत असल्याचे दिसून येते.स्त्री विकासाची दिशा शाश्वत असण्याची गरज असल्याचे दिसून येते. तसेच साहित्य क्षेत्रातील नवोदित कवयित्री, लेखिका, कादंबरीकार, स्तंभ लेखिका व मुक्त पत्रकार यांची सहभागीता वाढविण्यासाठी तसेच त्यांना अधिक सक्षम पणे वाव देण्यासाठी शासनाने, विविध अशासकीय संस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

संदर्भ :–

१) साखरे सीमा ; स्त्रीवाद
२) माधवनंदा, स्वामी ; ग्रेट वुमन इन इंडिया.
३) कर्वे, स्वाती ; स्त्री विकासाच्या पाऊलखुणा.
४) आपटे, शं. ज. ; भारतीय महिला विकासाची वाटचाल.
५) गाडे, सोपान ; महाराष्ट्रातील महिला राज.
६) देशमुख, प्रभाकर ; उद्योजकता विकास संकल्पना व विकास.
७) कवि, माधवी ; १०१ श्रेष्ठमहिला
८) भारद्वाज, निधी ; महिला सक्षमिकरण
९) ढेरे, अरूणा ; संस्कृती आणि स्त्री

१०) अहिरे, प्रतिभा ; समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून स्त्रियांची आत्मकथने
११) रानडे, प्रतिभा ; स्त्रीप्रश्नांची चर्चा ; एकोणविसावे शतक
१२) जोगळे, मृणालिनी स्त्री मुक्तीच्या उद्?गात्या.
१३) पाटिल, पद्मजा व जाधव, शोभना ; भारतीय इतिहासातील स्त्रिया.
१४) साळुंखे, आ. ह. ; हिन्दू संस्कृती आणि स्त्री.
१५) लोकराज्य जुन जुलै–२०११.
१६) पारधी, आर. एन. भारतीय स्त्री जीवन व कर्तृत्व
१७) देव, वि. रा. ; स्त्री चळवळीची वाटचाल.
१८) माळी, मा. गो ; क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले.
१९) कांबळे, गिता रिपब्लिकन नेत्या कु. शांताबाई दाणी
२०) कुमार, पंकज, प्रतिभा पाटील.
२१) प्रभू, सिताकांत, समिधा (साधना आमरे)
२२) नानिवडेकर (मेघा (संपा.) महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा
२३) आठवलेकर मंगला ; महर्षी ते गौरी, स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल.
२४) खडपेकर, विनया ; स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊल खुणा स्त्री स्वातंत्र्य वादिनी विसावब शतकातील परिर्वतन.
२५) दै. हिन्दुस्तान, ८ मार्च २०१३ महिला दिनाचा गोषवारा (अग्रलेख) एक आढावा – ओमप्रकाश बोबडे.
२६) महिला धोरण– २०१८ .

♦ ♦ ♦

मराठी कादंबरी साहित्यातील देवदासी स्त्री– जीवन

प्रा. डॉ. अनिल भीमराव भगत
प्राध्यापक तथा मराठी विभाग प्रमुख,
रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर.



प्रस्तावना :–

धार्मिक अधिष्ठान लाभलेली 'देवदासी' प्रथा फार प्राचीन काळापासून जगाच्या विविध भागात चालत आलेली आहे भारत, बाबीलोन, इजिप्त, ग्रीस तसेच युरोप राष्ट्रातूनही ही प्रथा पाहावयास मिळते. भारतामध्ये महाराष्टआणि कर्नाटक या राज्यांत आढळून येते.

'देवदासी' म्हणजे 'देवाला, देवीला वाहिलेली महिला किंवा नपुसंक' होय. तर 'उपभोगाची स्त्री' अशा धारणेने ज्या स्त्रियांकडे पाहिले जाते, अशा स्त्रियांचा समाज म्हणजे देवदासींचा समाज होय. असा समाज ख्रिस्तपूर्व १२२६, २००० या काळात अस्तित्त्वात होता. हे कल्याण पंडित यांनी लिहिलेल्या 'राजतरंगिनी' या ग्रंथावरून लक्षात येते. पुढे सहाव्या शतकात बुद्धकाळात गायन, वादन, नर्तन करणाऱ्या अनेक स्त्रियांचे उल्लेख आढळतात. उदा. वैशालिची आम्रपाली किंवा शालावती अशा स्त्रियांना 'नगरवधू' म्हणून संबोधले जाई. मात्र या स्त्रियांना 'देवदासी' म्हटले जात नव्हते. कारण त्या 'गणिका' होत्या. संस्कृत नाटककार शूद्रक यांच्या 'मृच्छकटिक' या सुप्रसिद्ध नाटकाची नायिका 'वसंतसेना' ही गणिकाच होती. तर देवल यांच्या 'संशयकल्लोळ' या नाटकातील 'रेवती' ही सुद्धा गणिकेचीच मुलगी होती.'देवदासी' हा शब्द कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात समाविष्ट केलेला दिसतो. त्याचप्रमाणे पाचव्या शतकातील बुद्धघोषानेही हा शब्द वापरलेला आहे. दक्षिण भारतात ही प्रथा नवव्या शतकात सुरु झाल्याचे

कर्नाटकमध्ये अशा स्त्रियांना 'जोगतिणी' या नावाने संबोधले जाते, तर भारतातील विविध भागातील देवदासींना वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. उदा. ओरिसामध्ये 'महारिस' कोईमतूरमध्ये 'कैकोलन' आंध्रमध्ये 'जोगिणी' महाराष्ट्रातील खंडोबा, जोतिबा या देवांना वाहिलेल्या मुलींना 'मुरळी' तर मुलांना 'वाघ्या', गोवा, कोकणमध्ये 'भाविनी' इत्यादी होय.

'देवदासी' म्हणजे देवाची सेवा करून गणिका वृत्तीने राहणारी स्त्री. देवालय स्वच्छ करणे, देवमूर्तीला वारा घालणे, देवापुढे नृत्यगायन करणे, देवाच्या मिरवणुकीत अग्रभागी नाचणे, ही तिची नित्याची कामे होत. मंदिरातील देवमूर्ती म्हणजे प्रत्यक्ष देव असे मानून त्याला स्नान, गंधपुष्प, अन्नवस्त्र इत्यादी मानवी भोग अर्पण करण्याची प्रथा 'देवपूजा' या नावाने रुढ झाली. त्यासाठी मंदिराचे व्यवस्थापक गणिकांना विकत घेत किंवा काही भाविक लोक आपल्या मुली देवाला दासी म्हणून अर्पण करीत. अशा या देवदासी मग देवस्थानाच्या परिसरात राहून देवसेवा आणि गणिकावृत्ती यांवर आपली उपजिवीका करीत. इ.स. १००० च्या सुमारास तंजावर मंदिरात ४०० देवदासी होत्या, याचा उल्लेख आधी केलाच आहे.

मराठी साहित्यामध्ये देवदासी, जोगतीण, भावीण, मुरळी इत्यादींवर लेखन झालेले आहे. प्राधान्याने याठिकाणी 'कादंबरी' यासाहित्य प्रकारातून झालेल्या देवदासींच्या चित्रणाचा काही कादंबऱ्यांच्या संदर्भात स्थूलमानाने आढावा घ्यायचा आहे.

मराठीमध्ये 'वर आभाळ खाली धरती' (महादेव मोरे), 'महानंदा' (जयवंत दळवी), 'जोगीण (सुभाष भेंडे)', 'नापत' (बळवंत कांबळे), 'भंडारभोग' (राजन गवस), 'झुलवा' (उत्तम बंडू तुपे), 'भावीण' (भा. वा. आठवले) इत्यादी कादंबरींचे लेखन आणि अनल अवचट, उत्तम कांबळे, बळवंत कांबळे, राजन गवस, उत्तम बंडू तुपे, विजयकुमार दळवी यांनी लेखन केले आहे.

वरील लेखकांपैकी बळवंत कांबळे, राजन गवस, अनिल अवचट, उत्तम कांबळे, इत्यादी लेखक देवदासी पुनर्वसन चळवळींमध्ये सक्रिय होते हे याठिकाणी नमूद केले पाहिजे.

बा.भ. बोरकर यांची 'भावीण' ही कादंबरी १९५० साली प्रकाशित झाली. ही कादंबरी गोमंतकाच्या परिसरात आकार घेते. 'भावीण' म्हणजे देवळातील दिवाबत्ती, साफसफाई, देवीच्या पालखीची व्यवस्था अशी कामे करणारी स्त्री. अशा स्त्रिया एकप्रकारे देवाचे वडिलोपार्जित सेवक असतात. 'भावीण' या कादंबरीत अंताशेठ, फुलवंती, केशव वर्दे, ऋषी, रंजना इत्यादी पात्रे असून 'शेवंती' हे केंद्रवर्ती पात्र आहे. बोरकर या कांदबरीतून शेवंतीच्या स्वप्नाळू भावविश्वातील कारुण्य संगवितात. शेवंतीचे आत्मबलिदान दाखवून तिच्या संदर्भात वाचकांची सुहानुभूति मिळवितात. वास्तवात 'भावीण' कादंबरीची नायिका शेवंती देवदासी आहे. देवदासींचा प्रश्न हा सामाजिक प्रश्न आहे. या कादंबरीतील केशव या पात्राच्या बोलण्यात या प्रश्नाची सामाजिक बाजू काही प्रमाणात येतेही. पण प्रस्तुत कादंबरीचा निवेदके यावर लक्ष केंद्रित करीत नाही. तर या कादंबरीतील निवेदक उदात्त प्रीतीभावना आणि भाविन जीवनाचे उन्नयन यांवर भर देतो. त्यामुळे कादंबरी कल्पनारम्यतेकडे आणि आदर्शवादाकडे झुकते.

प्रस्तुत कादंबरीतील निवेदक पात्रांची स्वीकारार्ह वृत्ती कल्पितो, यामुळे या व्यवस्थेतून बाहेर पडण्याचा मार्ग तो सूचवीत नाही. 'भावीणी'चे जीवन जसे आहे तसे मांडणे असाच निवेदकाचा दृष्टिकोन असल्यामुळे ही संस्था कायम टिकावी असेच यांतून प्रकट होते. म्हणून या कादंबरीत 'भावीण' या संस्थेकडे पाहाण्याचा निवेदकाचा दृष्टीकोन पारंपरिक आहे तो परिवर्तनवाद नाही असेच म्हणावे लागेल.

जयवंत दळवी यांची 'महानंदा' (१९७०) ही कादंबरीही भावीणीच्याच जीवनाला अधोरेखित करते. प्रस्तुत कादंबरीमध्ये बागूल, बागूलचे मामा व मामी, कल्याणी भावीण व तिची मुलगी महानंदा इत्यादी पात्रे आहेत. कादंबरीच्या केंद्रस्थानी बागूल व महानंदा यांची हळवी प्रेमकथा आहे. कादंबरीची नायिका 'महानंदा' ही कल्याणी भावीणीची मुलगी आहे. महानंदेचे बागूलवर प्रेम जडते. वास्तवात महानंदा बागूलच्या मामाची अनौरस संतती असते. बागूलला महानंदेशी विवाह करायचा असतो. पण भावीण परंपरेच्या विरुद्ध आपल्या मुलीने विवाह करावा हे कल्याणीला मान्य नाही. महानंदेनेही आपल्यासारखे देवदासी जीवन मनाने स्वीकारून समाधानाने जगावे असे तिला वाटते. देवदासी जीवनासंदर्भातील परंपरेवर तिची ठाम निष्ठा आहे. त्यामुळे 'महानंदा व बागूलचे लग्न झाले तर त्याचे वाटोळे होईल तर अशी भीतीही तिच्या मनात आहे. यांतूनच ती या विवाहाच्या आड येते. परंपरेने अवगुंठीत बनलेली माताच मुलीच्या विवाहातील अडचण ठरते असे कल्पून निवेदक या कादंबरीत देवदासीचे अंतर्विश्व साकारण्याचा प्रयत्न करतो. आणि अंधश्रद्धा, परंपरांचे जोखड मानवी मनाभोवती किती घट्ट रुतलेले आहे. यावर प्रकाश टाकतो.

महादेव मोरे यांची 'वर आभाळ खाली धरती' (१९७२) ही जोगतीणीचे वास्तववादी जीवनचित्रण करणारी कादंबरी होय. महादेव मोरे यांनी निपाणी परिसरात तमाखूच्या वखारीमध्ये काम करणाऱ्या जोगतीर्णीचे जीवन जवळून पाहिले होते. प्रस्तुत कादंबरीत चंपा, चंपाची आई, रामलिंग, तंगव्वा, तायव्व, पदुबाई, विडी फॅक्टरीतील दिवाणजी, बाळा इत्यादी पात्रे येतात. यांपैकी केंद्रवर्ती पात्र 'चंपा' असून, चंपाच्या अनुभवविश्वाला, दुःखाला ही कादंबरी साकार करते. चंपा 'देवदासी' हा आपला जीवनमार्ग बदलू पाहाते. पण तिला परिस्थितीला शरण जावे लागते. म्हणून एका अर्थाने ही कादंबरी म्हणजे चंपाच्या पराभूत जीवनाचा प्रवास आहे. देवदासी प्रथा, देवदासींचे विविध धार्मिक विधी, यांविषयीही वाचकांना माहिती पुरवितो. वास्तवात जसे बहुतांश देवदासींना देवदासी म्हणून जगताना भोगदासी म्हणून जगणे अपरिहार्य ठरते तसेच जगणे अपरिहार्यपणे चंपाच्याही नशिबी येते. यातून निवेदक धर्म, श्रद्धा, रुढी, परंपरा या नावाखाली समाजातील प्रस्थापित आणि आर्थिक समृद्धी लाभलेल्या वर्गाच्या स्वस्वार्थी वृत्तीवर प्रकाश टाकतो. आणि चंपाच्या जीवनप्रवासातून देवदासींचा जीवनप्रवास वाचकांसमोर साकारतो.

सुभाष भेंडे यांची 'जोगीण' (१९७४) ही कादंबरी गोवा प्रांतातील भावीणीचे जीवनदर्शन घडविते. 'बर्नी' हे या कादंबरीतील मध्यवर्ती पात्र आहे. बींचा भाऊ आजारी पडतो, त्याच्या आजारपणात देवीला नवस केला जातो. म्हणून जोगीन बनणे तिच्या नशिबी येते. मुलाच्या आयुष्यासाठी मुलीच्या आयुष्याचे दान देवीच्या पदरात टाकणाऱ्या अंधश्रद्धेला ही कादंबरी मुखरीत करते. आणि याचबरोबर कौटुंबिक व सामाजिक पातळीवरील मुलीचे स्थानही अधोरेखित करते.

बळवंत कांबळे यांची 'नापत' (१९८४) ही कादंबरी म्हणजे प्रत्यक्ष देवदासी जीवनाशी संबंधित व्यक्तीने लिहिलेली कादंबरी आहे. बळवंत कांबळे स्वतः देवदासी कुटुंबात जन्माला आलेले

असल्यामुळे देवदासींचे जीवन हा त्यांचा अनुभवाचाच विषय आहे. या कादंबरीत पारू, कुशापा, रावसाहेब, आबासाहेब इनामदार, जनाआक्का, रामराव, देसाय, बाळासाहेब पाटील इत्यादी पात्रे असून 'पारू' हे मध्यवर्ती पात्र आहे. 'पारू' या पात्राच्या दुःखाची कारुण्यमय कहाणी रंगविताना एकूण दलित समाजाच्या सामाजिक, आर्थिक स्तरांवरही प्रकाश टाकतो. आणि त्याचबरोबर देवदासींकडे विकृत दृष्टीने पाहाणाऱ्या समाजमनालाही अधोरेखित करतो. 'पारु' ही दलित समाजातील स्त्री आहे. परिस्थितीमुळे तिला देवदासींचे जीणे जगणे भाग पडते. पण पुढे ती देवदासी प्रथेला, व्यवस्थेला नाकारून स्वतःला बदलू पाहाते. निवेदक या कादंबरीत देवदासी प्रथेमागील परंपरा, रुढी, दारिद्र्य यांना अधोरेखित करतानाच अनिष्ट रुढी, परंपरांतून देवदासींनी स्वतःच मुक्त झाले पाहिजे, ही संदेश 'पारु' या पात्राच्या वर्तमानधर्मातून देतो.

राजन गवस यांची 'चौंडकं' (१९८५) ही कादंबरी बालजोगतीणीचा जीवनप्रवास रेखाटते. राजन गवस स्वतः प्रभाव क्षेत्रात काम करीत आहेत. देवदासी पुनर्वसन आणि देवदासी सुधार कार्यक्रमात ते सक्रिय सहभागी आहेत. 'चौंडकं' ही समूहचित्रणात्मक कादंबरी असून या कादंबरीत बायजा, सुभान्या, अक्कू, बबन्या, शेवंता, सुली इत्यादी पात्रे आहेत. 'सुली' हे या कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र आहे. शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या सुलीच्या नशिबी देवदासीपण प्रामुख्याने तिच्या आईच्या बायजाच्या अंधश्रद्धाळू वृत्तीमुळे येते. याकरिता सुलीच्या केसातील जट, आक्का जोगतीणीचा स्वार्थ, बायजाची अंधश्रद्धा, बायजाच्या घरासमोर पडणाऱ्या लिंबू, टाचण्या बायजाच्या डाव्या हाताचे दुखणे इत्यादी गोष्टी सुलीसारख्या निरागस मुलीला देवदासीच्या वळणावर घेऊन जातात. तिचा कारणविधी होतो. पुढेही घरातील अनेक संकटांच्यावेळी तिलाच कारण मानले जाते. अंधश्रद्धेने घेतलेल्या चुकीच्या निर्णयामुळे सुलीचे अवघे जीवनच नासून जाते.

प्रस्तुत कादंबरीतील निवेदक सुलीच्या शोषणाला तिची आई कारण ठरते असे चित्र वरवर कल्पून जनमानसाच्या मनात रुजलेल्या अंधश्रद्धेला व स्वार्थाला उघडे करतो. आणि हे दुष्टचक्र थांबविण्याकरिता मानसिक प्रबोधनाच्या गरजेचा आग्रह धरतो.

उत्तम बंडू तुपे यांची 'झुलवा' (१९८६) ही कादंबरी महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती प्रांतातील जोगत्यांच्या आयुष्याला अधोरेखित करते. प्रस्तुत कादंबरीत जगन, बेलू, भल्या, परसू, क्रिष्णा, रेणू, दारशी इत्यादी पात्रे असून 'जगन' हे केंद्रवर्ती पात्र आहे. ही कादंचरी संपूर्णतः देवदासी जीवनाचे, त्या जीवनातील समस्यांचे चित्रण करणारी कादंबरी आहे. देवदासी परंपरा सुरु रहाण्याला धर्मश्रद्धा व दारिद्र्य या गोष्टी जेवढ्या जनाबदार आहेत तेवढ्या प्रमाणात 'झुलवा' पद्धतही जबाबदार आहे, असा संदेश ही कादंबरी देते.

'जगन' ही येलू जोगतीणीची मुलगी आहे. ती जोगतीसीची मुलगी असल्यामुळे तिनेही जोगतीणीचाच वसा चालवावा असा समाजाचा आग्रह आहे. मात्र शिक्षणाने संस्कारित झालेल्या जगनला ही व्यवस्थाच मान्य नाही. तिला नर्स किंवा शिक्षिका म्हणून स्वतःला घडवायचे आहे. तिने स्वतःविषयी घेतलेला हा निर्णय समाजाच्या हीताचा नाही, त्यामुळे तिने पिढ्यानपिढ्या घराण्यात चालत आलेल्या देवदासीचा वारसा चालवावा असा समाज आग्रह धरतो. हा आग्रह गावातील प्रस्थापित समाजाचाच असतो असे नाही तर स्वस्वार्थासाठी येलूचा गुरु परसू आणि रेणुका यांचाही हाच विचार दिसतो. प्रस्तुत कादंबरीतील जगन संघर्ष करते, धडपडते पण शेवटी आईच्याच जीवनप्रवासाचा मार्ग पत्करावा लागतो. जयंता तिच्याशी प्रेमाचे नाटक करतो पण तिच्या शरीराचा उपभोग घेऊन झाल्यावर तिला दूर लोटतो. क्रिष्णा तिच्याशी झुलवा लावतो पण रखेलीचे जगणे तिच्या माथी मारतो.

राम शिर्केयांची 'यज्ञ' (१९८८) ही खजुराहोचे शिल्प ज्यांनी घडविले त्या शिल्पकार आनंद आणि देवदासी मालविका यांच्या विफल प्रेमाची कहाणी आहे. प्रस्तुत कादंबरीत आनंद, मालविका, कपालिक, महंत, शुभांगी, धंगदेव, गौरी, शिवदास, गंडदेव, इत्यादी पात्रे आहेत. ही एक ऐतिहासिक, सामाजिक स्वरुपाची कादंबरी आहे. या कादंबरीचा अर्ध्याहून अधिक भाग मध्ययुगीन देवदासींच्या जीवनदर्शनाने व्यापलेला आहे. या कादंबरीचा निवेदक शुभांगी व मालविका या माता-कन्येच्या जीवनप्रवासातून देवदासींच्या जीवनप्रवासाला मुखरीत करतो. 'यज्ञ' कादंबरीत शुभांगी-मदनराज व मालविका आनंद अशादोन प्रेमकथा गुंफलेल्या आहेत. या दोन्ही प्रेमकथांमध्ये देवदासीला भ्रष्ट केले, त्यांना पापाच्या कुमार्गाला लावले म्हणून त्यांच्या प्रियकरांना बळी दिले जाते. यामागे देवदासींशी प्रेमसंबंध ठेवणाऱ्यांना जरब बसावी हा हेतू आहे. त्याचप्रमाणे परंपरा नाकारून अशा वाटेने प्रवास करू इच्छिणाऱ्या देवदासींच्या मनात दहशत निर्माण व्हावी हाही उद्देश आहे. मालविकाची आई शुभांगी देवदासींचे जीवन निमूटपणे स्वीकारते. एवढेच नव्हे तर आपली जीवनकथा ती मालविकाला सांगते आणि देवदासींनी भोगदासी म्हणूनच राहावे असा समजूतीचा सल्लाही देते. पण मालविकाला हे जीवन मान्य नाही. मालविका सुंदर आहे, बुद्धीमान आहे व धीटही आहे. तिच्या कलानैपुण्यावर खूष झालेल्या राजाजवळ ती धीटपणे विवाहाची अनुमती मागते. यावेळी राजा धंगदेवने तिला दिलेले उत्तर बोलके आहे. 'धर्मक्षेत्रात आपण हस्तक्षेप करू शकत नाही' हे राजाचे उत्तर धर्मसंस्थेवर भाष्य करतेच आणि याचवेळी राज्यसत्तेच्या संदर्भातही विचार करायला प्रवृत्त करते. 'स्त्री' म्हणजे भोगदासी ! मग ती एकाची असो की अनेकांची...! हे मालविकाचे विचार स्त्रीच्या भोगरूपाला अधोरेखित करता. देवदासी म्हणजे भोगदासीच. मालविकाला भोगदासी बनने मान्य

नसल्यामुळे ती स्वतःपुरता यांतून मार्ग काढते. ती स्वतःला सर्पदंश करून घेते व आपला जीवन–प्रवास संपविते. प्रस्तुत कादंबरीतील निवेदक मालविकाला आत्महत्त्येची कृती करायला लावतो. यांतून तो देवदासींना या दुष्टचक्रातून बाहेर पडायचे असेल तर 'मृत्यू' हा एकमेव पर्याय आहे असे सूचित करतो. म्हणून या कादंबरीतील निवेदक परंपरावादी दृष्टीचाच स्वीकार करतो असेच म्हणावे लागेल.

बळवंत कांबळे यांची 'जोगव्याचे दिवस' (१९९३) ही कादंबरी आत्मचरित्रात्मक पद्धतीने लिहिलेली असली तरी ही कादंबरी देवदासीच्या जीवनाचा वेध घेणारी कादंबरी आहे. या कादंबरीत किसन, गंगा, परसूमामा, तानू मावशी, यल्लू मावशी, बंडू जाधव, भिमा मांगले, गोविंदा कांबळे, बागवान मास्तर, रघुनाथ सोनार काका, किसनबाई, बाळशिा, इत्यादी पात्रे येतात.प्रस्तुत कादंबरीची विभागणी दोन भागात असून पहिल्या भागात 'किसन'चे म्हणजे कांबळे यांच्या वडिलांचे आयुष्य कथन केले जाते. इथे निवेदक स्वतः वडिल आहेत. तर दुसऱ्या भागात स्वतः लेखकाच्या म्हणजे बळवंत कांबळे यांचा लहानपण ते सातवीनंतर मुंबईस जाणे, एवढा जीवनप्रवास आलेला आहे. असे असले तरी ही कादंबरी 'गंगाबाई' या पात्रासंदर्भात बोलताना दिसते आणि त्या अनुषंगाने देवदासी प्रथेसंदर्भात माहिती पुरविते. म्हणून या कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र 'गंगाबाई' हेच आहे. गंगाबाई ही साळवा जोगतीणीची मुलगी. जोगतीणीचे जीवन जगताना जे जे वाट्याला आले ते ते सर्व ती नीमूटपणे भोगते. किंबहुना किसनला भोगावी लागलेली परिस्थिती, दुःख, दारिर्द्य यावरील उपाय म्हणजे यल्लूआईला शरण जाणे अशी तिची अढळ श्रद्धा आहे. म्हणूनच ती किसनला डोंगरावर नेऊन त्याचे 'कारण' करायला प्रस्ताव मांडते. किसन जोगती व्हायचे नाकारतो. पुढे गंगाबाई किसनच्या मुलाला म्हणजे आपल्या नातवाला बळशिाला जोगता बनवायचे ठरविते. तिचा हा विचार किसनला समजल्यावर तो तिला विरोध करतो. गंगाबाईचा सर्व जीवनप्रवास देवदासी परंपरेने अवगुंठीत झालेल्या मानसिकतेला अधोरेखित करतो.

राजन गवस यांची 'भंडार भोग' (१९८८) ही कादंबरी धर्मकल्पनेने लादलेले खोटे नपुसंकत्व जगताना होणारी जोगत्यांची शारिरीक व मानसिक घुसमट या विषयसुत्राला साकारते. जोगत्यांच्या अनुषंगाने जोगतीणींच्या जीवनाचे चित्रणही या कादंबरीत येते.

प्रस्तुत कादंबरीत तायप्पा, कल्लवा, अकव्वा, गंगव्वा, शेवंतामावशी, बसप्पा, म्हादू गुरव, म्हादू जोग्या, रत्नव्वा, मोरे मास्तर, माने इत्यादी पात्रे असून 'तायप्पा' हे या कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र आहे. तायप्पाला मागावर काम करताना अचानक चक्कर येते, ही घटना त्याचे संपूर्ण जीवन विस्कटून टाकणारी ठरते. या घटनेचा परिणाम म्हणजे त्याच्या आईने कल्लवाने त्याला जोगता बनवायचा घेतलेला निर्णय होय. कल्लवाने घेतलेल्या या निर्णयामागे परंपरागत अंधश्रद्धा आहे पण त्याचबरोबरीने पुत्रप्रेमही आहे. मात्र मुलाचा जीव वाचविण्यासाठी तिने पत्करलेला मार्ग तिच्या मुलाला सर्वार्थाने जीवनातून उठविणारा ठरतो. आईने आपल्या जीवनासंदर्भात घेतलेला निर्णय तायप्पा स्वीकारतो. सुरुवातीला त्याला या जीवनाचा संताप येतो, पण काही काळानंतर जोगतीणींच्या मेळाव्याबरोबर राहून हळूहळू नाईलाजाने का होईना या जीवनाशी समरस होण्याचा तो प्रयत्न करू लागतो, तो रतनवर मनापासून प्रेम करतो पण याचवेळी विकृत वासनांचा तो बळी ठरतो. यातून त्याला परिस्थिती शरण बनावे लागते. तो स्वतः 'देव' करू लागतो. लोकांच्या अडचणींवर उपाय सांगू लागतो. हळूहळू त्याचे प्रस्थ वाढत जाते. विचारी आणि संवेदनशील तायप्पाला आपण जे करतो ते बरोबर नाही याची पूर्ण जाणीव आहे. यातूनच तो मोरे मास्तरांच्या 'जोगतीणी–जोगत्याच्या समस्या निर्मूलन' कार्याला सहकार्य करतो. पण येथेही काही कार्यकर्त्यांचा स्वार्थ पाहिल्यावर चांगूलपणावरील त्याची श्रद्धा ढासळते, परिणामी तो पुन्हा व्यसनाच्या आहारी जातो.

मनातील भय, जोगतीणींचे आंतरसंबंध, भक्तांचे शोषण, डोंगरावरील विवाहविधी, रांडपुनवेचा उत्सव, इत्यादीतून जोगत्यांच्या जीवनासंदर्भात वाचकांना माहितीही पुरवते. जोगत्यांच्या जीवनप्रवासासंदर्भात वाचकांना माहिती करून देणे हे या कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य नोंदविता येईल.

निष्कर्ष :–

'देवदासी' संदर्भात लिहील्या गेलेल्या वरील कादंबऱ्यांचा विचार केला तर यांतील भावीण, महानंदा, जोगीण इत्यादी कादंबऱ्यातील नायिका त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला विरोध करताना दिसत नाहीत. आयुष्याच्या वाटेवर जे जे भोग येतात, जी दुःखे येतात, वेदना होतात, त्या सर्व गोष्टी या नायिका मुकाट्याने सहन करतात. या कादंबरीतून निवेदक देवदासींचे दुःखमय, अपयशी जीवन रेखाटतो. या निवेदकांना देवदासींच्या संदर्भात सहानुभूती दिसते पण त्यांचा दृष्टीकोन मात्र पारंपरिक आहे, असेच म्हणावे लागते. उलट नापत, चौंडकं, झुलवा इत्यादी कादंबऱ्यांमधील पारु, सुली, जगन, इत्यादी स्त्रीपात्र किंवा नायिका जोगतिणीचे जीवन बदलायची आस बाळगतात. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न करतात. शिक्षण घेऊन, नोकरी पकडण्याचे स्वप्न पाहतात. म्हणून या नायिका परिवर्तनवादाची इच्छा बाळगताना दिसतात.

थोडक्यात देवदासींचा प्रश्न हा सरकारचा, समाजसुधारकांचा किंवा संघटनांचा नाही तर संपूर्ण समाजाचा आहे. सरकारी यंत्रणेने या संदर्भात कायद्याची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे. समाजसुधारकांनी आणि संघटनांनी व्यापक प्रमाणात समाजप्रबोधन केले पाहिजे. असे प्रबोधन करण्यासाठी सर्वांनीच

प्रसार माध्यमांचा म्हणजेच साहित्य, कला, नाटक, चित्रपट, वृत्तपत्रे, नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादी सर्व माध्यमांचा मोठ्या प्रमाणात व योग्य तन्हेने वापर करून घेतला पाहिजे. असे अव्याहत प्रबोधन झाल्यास या प्रथेविरुद्ध चळवळ करणे, लोकमत जागृत करणे सोपे जाईल. तरच देवदासी प्रथेच्या किडेतून समाजाला मुक्त करता येईल. आणि निरोगी व सुदृढ समाजाच्या दिशेने वाटचाल करता येईल. महाराष्ट्रातील प्रबोधनवादी चळवळींचा मागोवा घेतला तर महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या विविध चळवळींचे काही अपवाद वगळता देवदासींच्या प्रश्नांकडे दुर्लक्षच झाले असेच म्हणावे लागेल. 'देवदासी' हा वर्ग आजही सामाजिक न्यायापासून वंचित राहीलेला असा वर्ग आहे. अशा वर्गाच्या वेदनांचे चित्रण करताना समाज प्रबोधन आणि समाजजागृती ही उद्दिष्टे समोर ठेवून लेखन केले पाहिजे. तरच माणसाचे माणूसपण हिरावून घेणाऱ्या या परंपरेच्या संदर्भात समाजाला विचार करावासा वाटेल. म्हणून या विषयावरील कादंबऱ्यांनी लोकरंजनापेक्षा लोकजागरणाला, लोकशिक्षणाला आणि परिवर्तनाला महत्त्व दिले पाहिजे. वरील कादंबरीपेकी काही कादंबरी लेखनातून असा प्रयत्न केला गेला आहे. हा प्रयत्प स्तुत्य आहे असेच म्हणावे लागेल.

संदर्भ सूची :–

१) कांबळे उत्तम – देवदासी आणि नग्नपूजा, लोकवाययगृह, मुंबई– १९८८.
२) कांबळे बळवंत – भारतातील देवदासी प्रथा चळवळ आणि पुनर्वसन श्रीविद्या प्रकाशन, पुणे – २०००
३) कुलकर्णी मदन – देवदासी यल्लमा जोगतिणी, विजय प्रकाशन, नागपूर १९९४.
४) जोशी महादेवशास्त्री (संपा) मराठी विश्वकोश, खंड–३,
५) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिकमंडळ, १९७६ मराठी विश्वकोश खंड ७
६) डॉ. भोसले नारायण – महाराष्ट्रातील स्त्री विषयक सुधारणावादाचे सत्ताकारण, द ताईची प्रकाशन, पुणे माय मराठी (देवदासी विशेषांक) एप्रिल १९७६.

♦ ♦ ♦

१९ व्या शतकातील महात्मा फुले यांचे स्त्री सक्षमीकरणात्मक आर्थिक विचार.

सहा.प्रा दिपाली अतुल पडोळे.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अमरावती.



प्रस्तावना

अर्थव्यवस्थेच्या दिर्घकालीन आर्थिक विकासाकरिता देशातील ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा आर्थिक विकासाचा आलेख तपासताना भारतातील स्वातंत्र्यपूर्व कालावधीतील परिस्थिती अभ्यासणे आवश्यक आहे. स्वातंत्रपूर्व कालखंडाच्या आर्थिक विश्लेषणाकरता आर्थिक विचारांचे निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञ, व्यापारवादी अर्थशास्त्रज्ञ तसेच सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ अशी विभागणी केली जाते .इ.स.१७७६ मधील राष्ट्राची संपत्ती या ग्रंथामुळे ॲडम स्मिथ यांना अर्थशास्त्राचे जनक संबोधले गेले. जगातील विविध देशांमधली आर्थिक, सामाजिक, भौगोलिक परिस्थिती भिन्न असल्यामुळे वेगवेगळ्या देशांचा आर्थिक विकासाचा आलेख वेगवेगळा आहे .भारताच्या आर्थिक विकासाच्या अवलोकना करीता १९ व्या शतकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्वातंत्र्यपूर्व कालावधीत इंग्रजांच्या राजवटीमध्ये भारताची आर्थिक लूट करण्यात आली. संपत्तीचा ओघ इंग्लंडमध्ये गेला. तेथील औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली असे अनेक व्यक्तींचे मत आहे. व्यापार करण्याच्या दृष्टिकोनाणे हिंदुस्थानात केलेला प्रवेश आणि हळूहळू प्रत्येक संस्था उद्धवस्त करून त्या ठिकाणची प्रशासकीय जबाबदारी ईस्ट इंडिया कंपनीने मिळवली. ईस्ट इंडिया कंपनीचे नोकर खाजगी व्यापार करत तसेच व्यक्तींचे, राष्ट्राचे सर्वतोपरी शोषण करत. हिंदुस्थानातील गरीब शेतकरी, विणकाम करणारे, कला कुसरीचे काम करणारे व्यावसायिक इंग्रजांच्या मालासमोर आपला टिकाव धरू शकले नाही.

इग्रजांनी भारतावर सुमारे २००वर्ष राज्य केले. भारताच्या राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगतीस इंग्लंडने अंशतः हातभार लावला यात शंका नाही इंग्रजांच्या राजवटीमुळे भारताला कायदा व सुव्यवस्था लाभले. अन्य क्षेत्रातील प्रगतीसाठी कायदा व सुव्यवस्था या गोष्टी आवश्यक असल्याचे लक्षात आल्याने इंग्लंडने भारताला शिक्षण विषयक सुविधा, रेल्वे, या सुविधा निर्माण करून भारताचे सर्वतोपरी आर्थिक शोषण केले. या घटकांचा विचार करताना भारतातील १९व्या शतकातील काही निवडक समाज सुधारकांच्या स्त्री सक्षमीकरणात्मक आर्थिक विचारांचे अध्ययन महत्त्वाचे ठरते

संशोधनाचा उद्देश–

१– १९ व्या शतकातील महात्मा फुले यांचे स्त्री सक्षमीकरणात्मक विचार अभ्यासणे.

२. १९ व्या शतकातील समाज सुधारकांचे आर्थिक विचार अभ्यासणे.

वास्तविक पाहता मानवाच्या आर्थिक क्रियांचे अध्ययन करताना सभोवतालची आर्थिक ,सामाजिक ,सांस्कृतिक,

राजकीय, शैक्षणिक संसाधनांची उपलब्धता तिचा योग्य वापर उपलब्धता यावर आर्थिक वृद्धी व विकास अवलंबून असतो.सर्वांगीण परिवर्तनाच्या अध्ययनाच्या अनुषंगाने १९व्या शतकातील महान समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले इ.सन. १८२७ ते इ.सन १८९० तसेच विचार सदैव प्रेरणादायी व आर्थिक विकासासाठी आवश्यक ठरतात. १९ व्या शतकापर्यंत तसेच त्यापूर्वी शिक्षणाचा प्रचार प्रसार होण्यापूर्वी भारतात सामाजिक परिस्थिती अत्यंत भयावह होती. शिक्षणाचा अभाव, परिणामी वैज्ञानिक प्रगतीचा अभाव, जुन्या बुरसटलेल्या सामाजिक चालीरीती त्यांचा प्रभाव समाजावर होता स्त्रियांची अत्यंत दयनीय अवस्था होती. अशा समाजाच्या परिवर्तनाकरीता अत्यंत प्रखर विचारांच्या दृष्ट्या समाजसुधारकांची आवश्यकता होती. समाजाचा खालावलेला जीवनमानाचा दर्जा तसेच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी समाजातील असलेला जातीभेद , अस्पृश्यता नष्ट करण्याची आवश्यकता निर्माण झालेली होती, मानवाच्या सर्वांगीण उद्धराकरता जातीभेद , गरीब–उच्च वर्णभेद या समस्या दूर करण्याकरिता अनंतकाळ आदर्श जीवन जगण्यास प्रेरणादायी ठरणाऱ्या समाजसुधारकांची आवश्यकता होती. तत्कालीन समाजाच्या उद्धाराकरीता महात्मा ज्योतिबा फुले आपले विचार मांडून समाजातील स्त्रियांचे व समाजाचे परिवर्तन आणले आहे.

तत्कालीन समाजाच्या उद्धाराकरीता महात्मा ज्योतिबा फुले, संपूर्ण जीवन खर्च केले महात्मा फुलेंनी शिक्षणासाठी महत्त्वाचे कार्य केले .शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणास प्रोत्साहन तर दिले शिवाय स्त्रियांच्या नैसर्गिक हक्काचे संरक्षण करणारे अनेक कायदे केले. त्यामुळे स्त्रियांची आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थिती सुधारण्यास मदत झाली.

संशोधन लेखाचे महत्त्व व आवश्यकता –१– १९व्य शतकात भारतातील सामाजिक परिस्थिती अत्यंत दयनीय होती. शिक्षण, आरोग्य तसेच निम्न दर्जाचे राहणीमान ,स्त्रियांवरती होणारे अत्याचार या परिस्थितीला सुधारण्यासाठी समाज सुधारकांची आवश्यकता होत.

२– १९ व्या शतकात ई सन १८४८ साली महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्रियांसाठी शाळा काढल्या .. समाजातील समस्या बेरोजगारी कमी व्हावी जातीभेद नष्ट व्हावा यासाठी आरक्षण जाहीर केले .

१) ज्योतिबा फुले यांचे स्त्री सक्षमीकरण विषयक विचार–

स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्त्वांवरती वागणारे शेतकरी व कामकरी यांच्या दारिद्र्याचे समस्या स्रीयांच्या समस्या निवारण करणारे महात्मा ज्योतिबा फुले हे महत्त्वाचे व्यक्ती आहेत. इ. सन १८४८ साली मुलींसाठी पहिली शाळा काढली, दलित शोषित आणि पीडित तसेच सर्व जातीच्या लोकांना शासनाने प्राथमिक शिक्षणाची संधी उपलब्ध करावी अशी मागणी केली. तसेच नंतर तीन ते चार वर्षाच्या काळात एकूण बारा शाळांची सुरुवात केली. प्राथमिक शिक्षणासाठी त्रीभाषा सूत्राचा पुरस्कार केला. बहुजन समाजाच्या शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी शिष्यवृत्ती, वस्तीगृहाची सोय व्हावी याचा पाठपुरावा केला. महात्मा फुले यांनी मुलींसाठी अनेक शाळा काढल्या स्री शिक्षिका मिळावी म्हणून आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षिका बनविले.

२) महात्मा फुले यांचे आर्थिक विचार–

समाजातील दारिद्र्य, बेकारी आणि निम्न दर्जाचे जीवन या आर्थिक समस्यांचे निवारण करण्याकरिता महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला. तसेच आरोग्य विषयक सुविधा निर्माण करण्याचे आवाहन केले. भारतातील शेती क्षेत्रातील अनेक अडचणींना दूर करण्यासाठी व्यावसायिक शेतीला प्रोत्साहन दिले. ग्रामीण भागातील उद्योगांना द्यावे असे शासनाला आवाहन केले. हिंदुस्तानच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाकरिता राष्ट्राच्या निर्मितीसाठी शिक्षणाला महत्त्व दिले. समाजविकासाशी निगडित शिक्षण व्यवस्था असावी याकरिता शिक्षण पद्धतीची पुनर्रचना करण्याची मागणी केली. तसेच समाजातील बेरोजगारी नष्ट करण्याच्या अनुषंगाने व्यावसायिक शिक्षण देण्याची मागणी केली. ग्रामीण व शहरी भागात व्यवसायिक शिक्षण देण्या साठी तांत्रिक शाळांच्या निर्मितीला प्राधान्य द्यावे. समाजातील दारिद्र्य गुलामगिरी कर्जबाजारीपणा यातून शेतकऱ्यांची मुक्तता व्हावी याकरिता शेती व्यवसायाला सिंचन सुविधा, विपणन व्यवस्था असावी मागणी केली.

निष्कर्ष–

१९ व्या शतकातील भारतीय व्यवस्थेची खालावलेली आर्थिक स्थिती ,समाजाची सर्वागीण परस्थिती उंचावण्यासाठी दीर्घकालीन सुधारणाघडवून अनन्या करिता महात्मा फुले यांनी संपूर्ण जीवन खर्च केले. स्री सक्षमीकरण केल्याने समाजाचा विकास झाला. शेती ,लघु उद्योग, हातमाग, शेतीपूरकव्यवसाय .यांना चालना मिळाली. स्रियाना शिक्षण प्रवाहात आल्याने कुटुंबाची सर्वागीण विकास होण्यास मदत झाली.

संदर्भ ग्रंथ–

१) भांडारकर पू.ल (१९७६) सामाजिक संशोधन पद्धती. मरा. ग्रंथ निर्मिती मंडळ.

२) कीर धनंजय (१९०९) महात्मा ज्योतिबा फुले , पौपुलर प्रकाशन प्रा. लि..ताडदेव.मुंबई.

३) भोळे भास्कर लक्ष्मण (१९९६) महात्मा ज्योतिबा फुले साहित्य अकॅडेमी मुंबई.

४) घडीयाल रेहना, समकालीन भारतातील नागरी स्त्रिया(२००८) मराठी अनुवाद,मंजुषा गोसावी.

५) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले ज्योतीपर्व (२०१०) रुद्रायनी ऑफसेट औरंगाबाद.

बुद्धिझम व स्त्री सक्षमीकरण

प्रो. डॉ. आर. जे. वानखडे
तक्षशिला महाविद्यालय अमरावती



प्रस्तावना

भगवान बुद्धांचे विचार पाली साहित्यामध्ये संकलित केल्या गेलेले आहे. पाले ती रखती ती पाली पालीनी बुद्ध वचनाचे रक्षण केले आहे. जे बुद्ध वचन पूर्वी मागणी भाषेमध्ये होते, त्याचे जतन करून ठेवले म्हणून देखील मागधी ला पाली नावाने संबोधल्या जाते. भगवान बुद्धांनी सुरुवातीला ज्या भाषेमध्ये उपदेश दिले तिला सकाळी निवृत्ती असे म्हटले जाते ती मागधी भाषा होय, भगवान बुद्धांचे विचार पाली भाषेमध्ये अंतर्भूत आहेत आणि ते वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित आहे, ज्या काळामध्ये वर्णव्यवस्था प्रस्थापित होती संपूर्ण समाज विषमतेच्या जोखंडात जखडलेला होता त्या स्थितीमध्ये भगवान बुद्धांनी समतेचा संदेश दिलेला पाली साहित्यामधून दिसून येते मनुष्यामध्ये स्त्री आणि पुरुष अंतर्भूत आहेत. भगवान बुद्धांचा धम्म व्यक्तीला केंद्रबिंदू मानून उपदेशित केलेला आहे भगवान बुद्धांनी आपल्या संघामध्ये स्त्रियांना प्रथमता प्रवेशित करून, तिला एक व्यक्ति म्हणून सिद्ध होण्यास संधी उपलब्ध करून दिलेली आहे. पाली साहित्यातील थेरी गाथा या ग्रंथामध्ये आम्ही पाहतो उच्च प्रतीचे जीवन जगताना अतिशय हर्ष उल्हासामध्ये गीती काव्य गायलेली आहेत, ते थे री गाथांमध्ये अंतर्भूत आहेत. या थेरींची संख्या ७३ आहे थेरी गाथा या ग्रंथामधून या तेरी आपले अनुभव पूर्वीचे जीवन, दारिद्र्यता बंदिस्त जीवन आणि धम्मप्रवेश केल्यानंतर वाट्याला आलेले स्वातंत्र्य या साऱ्या इतर गोष्टी विस्तृत रूपात मांडतात आहे थे रीगाथा हा ग्रंथ स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामाच आहे. थेरी गातेतील भिक्षुनेचे उदान गीतिकाव्य गाथा या अतिशय मार्मिक आहेत त्यांच्या विमुक्त सुखाच्या आनंदाने त्या सहजपणे त्यांच्या तोंडून गाईला गेलेले आहेत त्यांची सुखाची स्थिती त्या स्पष्ट करीत आहे. निर्भीडपणे त्या भिक्षूनी त्या काळामध्ये पर्वत चढून जातात आणि साधनेच्य उच्च कोटीच्या पदांचा अनुभव घेतात, एक व्यक्ती म्हणून स्वतःला सिद्ध करतात त्यांचं हे वागणं आजच्या स्त्रीला प्रेरणादायी आहे मी माझ्या साधनेतील सातत्यपूर्णतेने अनंत पदापर्यंत पोहोचली आहे यात माझं स्त्री पण माझं काहीही बिघाडू शकलं नाही अशा प्रकारचे प्रेरणादायी उद्गार मार्मिक असून आज ते सर्वांनाच प्रेरणा देणारे आहे.

पूर्णिका थेरी ही अनाथपिंडीकाच्या घरची दासी होती भगवान बुद्धाच्या उपदेशामध्ये प्रतिष्ठित होऊन ती एका ब्राह्मणाला उद्देशून म्हणते आहे की मी माझ्या स्वामीच्या भक्तीमुळे सकाळी थंड पाण्यात उतरते आहे परंतु तू कुणाच्या भीतीमुळे एवढ्या सकाळी थंड पाण्यात स्वतःच्या शरीराला पीडा देतो आहेस, त्यावर ब्राह्मण म्हणतो आहे की, स्नान केल्याने पाप मुक्ती होते त्यावर पूर्णिका थेरी चे उत्तर मार्मिक आहे.

आंघोळीने शुद्धी केल्याने पापांपासून मुक्ती मिळते हे तुला कोणी सांगितले? हे अज्ञानी आणि मूर्ख लोकांसाठी उपदेश आहे.

जर पाणी शुद्धीकरणाचा स्त्रोत असेल तर बेडूक, कासव, पाण्याचे साप, मगरी आणि इतर जलचर स्वर्गात जाणे निश्चित आहे!

आम्रपाली थेरी गाथा :

आम्रपाली थेरी मध्ये आम्ही पाहतो की आपल्या आंतरिक सौंदर्याचे महत्त्व वर्णन करताना आम्रपाली खालील गाथा गाते आहे एके काळी माझे शरीर अतिशय सुंदर होते. कमानी सारख्या माझ्या भुवया होत्या कमळाच्या पुष्पासारखे माझे होठ होते वगैरे परंतु वृद्धत्वामुळे माझे शरीर जर जर होऊन अनेक दुःखाचे घर झालेले आहे जसे भिंती चे लेपन निघावे त्या प्रकारे हे शरीर थकले आहे जीर्ण झाले आहे काही दिवसात हे शरीर जमिनीवर पडेल, ज्या प्रकारे जीर्ण झालेले घर. सत्यवादी बुद्धांचे वचन कधी खोटे ठरत नाही अशा प्रकारचे उद्गार आम्रपाली आपल्या अनुभवातून गाते आहे.

भगवान बुद्धाच्या तत्त्वज्ञानामध्ये आम्ही पाहतो परिवर्तन हा जगाचा नियम आहे हे अतिशय स्पष्टपणे आपल्या व्याख्यानातून अनेक उदाहरण देऊन भगवान बुद्धांनी स्पष्ट केलेले आहे. हे परिवर्तन तत्व आज अभ्यासकरणे आवश्यक आहे. आम्ही विज्ञान वादी समजणारे आज स्त्रियांच्या प्रगतीकडे कुठल्या दृष्टिकोनातून पाहतो? आज स्त्रीला आम्ही एक व्यक्ती म्हणून स्वीकारले आहे का? तिची प्रगती तिने साध्य केलेली आहे त्यामध्ये किती पॉझिटिव्ह विचारधारा सर्वांच्या तिच्यासोबत आहेत? ती आज कुठेही कोणत्याही वेळी स्वतंत्रपणे संचार करू शकत आहे का? या सर्व प्रश्नांची उत्तरे आम्हास छाती ठोकपणे देता येत नाही आहेत. आज चाललेला वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या नावावर चेंगळवाद,

डायनासोर प्रमाणे लागलेला प्रगतीचा ध्यास, नीती मूल्याचा झालेला ह्रास त्या गोष्टी आमच्या अधोगतीला कारणीभूत आहेत. आज कुटुंबातील स्त्री पुरुष दोन्ही सुशिक्षित आणि नोकरदार आहेत. दोघांनाही एकमेकांसोबत सुसंवाद साधायला वेळ मिळत नाही. त्यातल्या त्यात स्त्रियांना ड्युटी करून घरामध्ये हातभार लावावा लागतो. स्त्रिया ते आनंदाने स्वीकारत आहे आमची कुटुंब पद्धती सध्या साबूत आहे. परंतु ती स्त्रियांच्या पुढाकारानेच टिकून आहे असं निदर्शनास येते.

आज वर्तमान युग, वैज्ञानिक युग म्हणू, मानव मुक्तीचे युग याला आम्ही म्हणतो आहोत परंतु जी स्त्री, भगवान बुद्ध म्हणतात की, ती पुत्ररत्न प्राप्त करून देणारी आहे तिच्यावर आज आम्ही पाहतो आहोत नाना प्रकारचे अत्याचार होत आहे आज हे स्त्रीच्या प्रगतीचे युग म्हणावं की? स्त्रीच्या अधोगतीचे युग म्हणावं.

अशा मनस्थिती मध्ये आम्ही आहोत असं का व्हावं ? यावर काय उपाय शोधावा तर एकच उत्तर आम्हाला सापडतं की आज आम्हाला मूल्ये शिक्षणाची आवश्यकता आहे. आमची राज्यघटना आम्हाला आमच्या नीतिमत्ते नुसार आमचे कर्तव्य व जबाबदारी पाडण्याची अनुज्ञा देते, असे वागल्यानेच आम्ही आमचे जीवन सुखकर बनवू शकतो. आम्ही पाहतो की पाली साहित्यामध्ये भगवान बुद्धाची वाणी ही मूल्यांनी ओत पोत भरलेली आहे सर्व समस्यांचा निराकरण भगवान बुद्धांच्या विचारधारेमध्ये सामावलेले आहे जर आम्हाला आमच्या सर्व समस्या सोडवायच्या असतील तर आम्हाला बुद्ध तत्त्वज्ञानाचे अध्ययन करणे आज आवश्यक आहे.

निष्कर्ष :

१) वैज्ञानिक दृष्टिकोन देणारे पाली साहित्य आहे.

२) पाली साहित्याचे रचनाकार भगवान बुद्धांनी समतेचा संदेश दिलेला आहे.

३) भगवान बुद्धांनी आपल्या संघामध्ये स्त्रियांना प्रवेशित करून घेतले, भगवान बुद्धाच्या काळातील स्त्री एक व्यक्ती म्हणून उभी राहिलेली व अपली संपूर्ण प्रगती साधलेली आपल्याला दिसून येते.

४) आजच्या आधुनिक विज्ञानिक युगामध्ये स्त्रिया सुशिक्षित आहेत, सर्वोच्च पद भूषविलेल्या आहेत परंतु आज समतेचे वातावरण सभोवताली दिसून न आल्यामुळे स्त्रिया भयभीत स्थितीत दिसून येतात.

स्त्रियांना मानव म्हणून जगण्याकरिता, निर्भयपणे जगण्याकरिताआज बुद्धाचा विचार स्वीकारणे आवश्यक झाले आहे.

संदर्भ :

१) पाली साहित्याचा इतिहास – भरतसिंह उपाध्याय

२) थेरी गाथा पाली–सत्यनारायण गोयंका – विपश्यना विशोधना विन्यासा इगतपुरी.

३) दिघनिकाय पाली–स्वामी द्वारिका दास शास्त्री– ग्रंथ आकरमाला.

४) माझिम निकाया–डॉ विमल कीर्ती–सुगम प्रकाशन नागपूर.

५) ु.सेसरश्र.लेा

♦ ♦ ♦

महिलांचे मानसिक आरोग्य

प्रा. डॉ. सारीका एस.बोदडे
रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर,
ता.दर्यापूर. जि. अमरावती



मानसिकआरोग्य हे शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे आहे आणि ही सर्वात मोठी संपत्ती आहे जी कोणत्याही परिस्थितीत जतन करणे आवश्यक आहे. शारिरीक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्य ही दुसरी संपत्ती आहे जी व्यक्तीने स्वतःला सुदृढ ठेवण्याची गरज आहे. आपण आपल्या दैनंदिन दिनचर्येत गुंतून जातो, काम आणि घर यांमध्ये अडकून जातो आणि आपण हे विसरून जातो की आत्म-मूल्याची जाणीव होण्यासाठी स्वतःवर प्रेम करणे आणि स्वतःला महत्त्व देणे खूप महत्त्वाचे आहे.

मानसिक आजार ही शारीरिक आजाराच्या विपरीत गोष्ट आहे. ज्याकडे बहुतेक लोक दुर्लक्ष करतात किंवा दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करतात मानसिक आजार म्हणजे लाज वाटण्यासारखे काही नाही. ही हृदयविकार, उच्च रक्तदाब किंवा मधुमेहासारखी वैद्यकीय समस्या आहे.

मानसिक आरोग्य म्हणजे स्वतःवर लक्ष केंद्रित करणे, तणाव मुक्त राहणे, पुरेशी झोप घेणे, स्वतःसोबत दर्जेदार वेळ घालवणे आणि चांगला वेळ घालवणे. फक्त तुम्ही आहात तसे. कदाचित तुमच्या नियंत्रणात नसलेल्या गोष्टींवर ताण न ठेवता तुमच्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाचाआनंद घेण्यासाठी तुम्हाला ऊर्जा मिळायला हवी.

जागतिक आरोग्य संघटनेच्या व्याख्येनुसार आरोग्य म्हणजे केवळ रोगाचा अभाव नव्हे तर शारीरिक मानसिक व सामाजिक स्वास्थ्याची परिपूर्ण स्थिती असणे म्हणजे आरोग्य होय. या व्याख्येवरून असे लक्षात येते की, मानसिक आरोग्याचे महत्त्व आपल्या जीवनात खूप मोठे आहे.

डब्ल्यू एच ओ म्हणजेच जागतिक आरोग्य संघटनेनुसार मानसिक आरोग्य म्हणजे अशी स्वास्थ्य स्थिती ज्यामध्ये प्रत्येक व्यक्ती आपल्यातील क्षमता ओळखून त्यायोगे पुरेपूर वागू शकेल, दैनंदिन जीवनातील ताण-तणावांचा सामना करू शकेल, सफल व उत्पादनक्षमरित्या कार्यरत राहील व समाजाप्रती योगदान देऊ शकेल. या व्याख्येत मानवाच्या जीवनातील मानसिक स्वास्थ्य याचे महत्त्व निश्चितच खूप जास्त आहे असेच दिसून येते. विविध मानसशास्त्रज्ञांच्या मानसिक आरोग्यामध्ये मनाची खूप मोठी भूमिका आहे. मन, मानसिकता आणि विचार, भावना व वर्तन या त्रिसूत्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण मानसिक आरोग्य ही संकल्पना समजून घेण्यास उपयोगी ठरते.

वेबस्टर यांच्यामते, मानसिक आरोग्य म्हणजे मनाची नैसर्गिकरित्या झालेली निकोप, सुदृढ वाढ व विकास होय.

शरीराच्या विविध अवयवांवरप्रमाणे मनाचेही अनेक पैलू आहेत ज्ञान, विचार, मन, मत, स्मरणशक्ती भावना, कल्पनाशक्ती, तर्कशक्ती, चेतना या गोष्टी ज्या ठिकाणी होतात त्या ठिकाणाला मन असे म्हणतात. हे मन कोठेही जाऊ शकते

काहीही करू शकते. मन हा शरीराचा एक भाग आहे म्हणून मानसिक स्वास्थ्याचा शारीरिक स्वास्थ्यावर परिणाम होते. म्हणून मानसिक स्वास्थ चांगले राहिल्यास शारीरिक स्वास्थ्य देखील उत्तम राहते नाहीतर मानसिक स्वास्थ्य बिघडते व त्यामुळे ताणतणाव व शारीरिक स्वास्थ्य त्याचे रूपांतर विविध आजारांमध्ये होते.

उद्दीष्टये

१. ताण येणाऱ्या कारणांचा शोध घेणे,

२. मानसिक आरोग्य उत्तम राहण्याकरीता व ताणतणावापासून दूर राहण्याकरीता उपाय सुचकव.

ताण येण्याची प्रमुख कारणे

अनुवांशिक घटकः–

आनुवंशिक घटक देखील मानसिक आरोग्य विकारांचे कारण असू शकतात. ज्या व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्याला मानसिक आजार आहे त्यांना मानसिक आरोग्य विकार होण्याची शक्यता वाढू शकते. तथापि, कुटुंबातील एका सदस्याला मानसिक आजार आहे याचाअर्थ इतरांना होईल असे नाही.

मादक पदार्थ आणि अल्कोहोलचा गैरवापर

जर नियमितपणे औषध सेवन केले तर मनोविकृतीचा एक भाग होऊ शकतो. मारिजुआना, कोकेन, गांजा आणि ॲम्फेटामाइन्स यांसारख्या ड्रग्जमुळे पॅरोनिया होऊ शकतो.

इतर जैविक घटक

काही वैद्यकीय परिस्थिती किंवा हार्मोनल बदलदेखील मानसिक आरोग्य विकारांचे कारण असू शकतात.

प्रारंभिक जीवन वातावरण

सुरुवातीच्या जीवनातील वातावरणामुळे मानसिक आरोग्य बिघडते. मुलांवर अत्याचार करणे किंवा दुर्लक्ष करणे यासारखे बालपणीचे नकारात्मक अनुभव काही मानसिक आजारांचा धोका वाढवू शकतात.

आघात आणि तणाव

तारुण्यात, जीवनातील क्लेशकारक घटना किंवा सतत तणाव जसे की सामाजिक अलगाव, नातेसंबंध तुटणे, घरगुती हिंसाचार, आर्थिक किंवा कामाच्या समस्या मानसिक आजाराचा धोका वाढवू शकतात. युद्धक्षेत्रात राहण्यासारखे आघातजन्य अनुभव चा धोका वाढवू शकतात.

व्यक्तिमत्त्वाचे घटक

परिपूर्णता किंवा कमी आत्मसन्मान यासारख्या काही गुणांमुळे नैराश्य किंवा चिंतेचा धोका वाढू शकतो.

मानसिक स्वास्थ्य उत्तम राहण्यासाठी ताणतणावापासून दूर राहण्याकरिता उपाय पुढीलप्रमाणे

- स्वहित व परहित जपा. आपण आत्मकेंद्री आहोत का तेव्हा आपण स्वार्थी आहोत का याचा विचार नेहमी करायला हवा तसा प्लास्टिक वापराबाबत नेहमी आढळून येते. आपण एकट्याने प्लास्टिक वापरल्याने कितीसे प्रदूषण होणार आहे की न वापरल्याने प्रदूषणाचे कितीसे नुकसान टाळता येईल असा विचार न करता आपण आपल्यापासुन सुरुवात करावी. सामाजिक नियम मोडणे चुकीचेच असते किंवा आपल्या भूमिकेचा आपण गैरवापर करू नये. उदा. सासूच्या भूमिकेत असताना सुनेचे बरोबर असले तरीसुद्धा तिचे चुकीचेच आहे असे म्हणणे चुकीचे आहे. म्हणूनच स्वतःच्या हिताचा सोबतच परहित जपणे आवश्यक आहे तरच तणाव टाळता येईल. पर्यायाने मानसिक स्वास्थ्य उत्तम राखता येईल.
- निर्णयाची जबाबदारी स्वीकारा किंवा निर्णयाची जबाबदारी घेणे माझा निर्णय ही माझी जबाबदारी आहे हे नेहमी लक्षात ठेवायला हवे. आपण केलेल्या कुठल्याही बदलाची जबाबदारी आपण स्वीकारली पाहिजे तरच तणावापासून निश्चितच दूर राहता येईल. उदा. श्रम बचतीच्या साधनांचा उपयोग करून वेळ आणि श्रमाची बचत करण्याचा निर्णय जर आपला असेल तर मिळालेल्या फावल्यावेळेचे योग्य नियोजन करणे, शारीरिक व्यायाम करणे यासारखे उपाय आपणच करावे नाहीतर मिळालेल्या फावल्यावेळेत टीव्ही बघणे, झोपणे यामुळे स्थूलपणा येते. डिप्रेशन यासारख्या समस्या उद्भवतात. त्यामुळे देखील तणाव निर्माण होऊन मानसिक आरोग्य बिघडू शकते. म्हणून आपण घेतलेल्या निर्णयाची जबाबदारी आपणच घेणे आवश्यक आहे.
- वैफल्य याचा स्वीकार करावा किंवा पराभवाचा स्वीकार करावा. अनेकदा थोड्या फार पराभवाने किंवा वैफल्य आल्याने ताण येतो. परंतु अपयश आले तर त्याचा स्वीकार केल्यास नको असलेला ताण कमी होईल. कुठलीही गोष्टही चांगल्यासाठीच होते. की मग काहीही जरी वाईट घडत असेल तरीसुद्धा त्यातूनही काही चांगले घडणार हे निश्चित अशी सूचना मनाला केल्यास पराभवाचे भांडवल केल्यास येणारा ताण टाळता येऊ शकतो किंवा मानसिक स्वास्थ्य देखील चांगले ठेवता येते.
- विचारांची लवचिकता असली पाहिजे. आपले विचार हे लवचिक असायला पाहिजे आपले. मत विचार हे काळाबरोबर कालबाह्य होणार आहेत पण प्रत्येकवेळी आपण आपल्या मतांवर किंवा विचारांवर ठाम राहिल्यास आपल्यावर ताण येऊ शकतो. वेळेनुसार, प्रसंगानुसार आपण आपल्यामतांमध्ये आपल्या विचारांमध्ये बदल करू शकलो पाहिजे. व्यवहारात किंवा इतर ठिकाणीही आपण इगो आणू नये. मी म्हणते तेच योग्य तेच बरोबर असे असल्यास देखील मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होतो. व ताण वाढीस लागतो म्हणून आपले विचार मत काळानुरूप प्रसंगानुरूप बदलवता आले पाहिजे.
- परिस्थितीचा स्वीकार करावा. कधीही काहीही घडू शकते. पण त्याचा स्वीकार आहे त्या परिस्थितीचा व प्रसंगांचा स्वीकार करता यायला हवा. असे झाले ताणतणाव कमी होतो.

● स्वतःविषयी चा स्वीकार मी माझा आहे तसा स्वीकार करणे. आज आपण आपल्या उंचीबद्दल, रंगाबद्दल, इतकच काय तर जेंडरबद्दलही उदासीन असतो. जे आपल्याजवळ आहे त्याचा स्वीकार आपण केला पाहिजे.

● न्यूनगंड किंवा स्वतः विषयीचा स्वीकार स्वतःच्या प्रत्येक दोषांचा स्वीकार करता यायला हवं. तिथे किंवा आपण स्वी आहोत किंवा मुलगी आहे त्याचाही स्वीकार करावा लागतो.

● नोकरी करणाऱ्या स्त्रिया स्वतःला सुपर वुमन्स व्हायचा अट्टाहास करतात. त्या आपल्या मर्यादांची जाणीव करून घेत नाही व मर्यादे पलीकडे करण्याची इच्छा व्यक्त करतात व त्यामुळे त्या जास्त तणावात असतात. आणि प्रत्येक गोष्ट त्यांना स्वतःला करायची असते. त्यामुळे सर्व आपण स्वतः करण्याचा अट्टाहास करू नये.

● दृष्टिकोन वस्तुनिष्ठ असायला हवा. एखाद्या आयडियालॉजी स्वीकारतो तेव्हा ती अभ्यास करून स्वीकारली पाहिजे. आदर्श हे लॉजिकल असलं पाहिजे. आपलं मत ते अभ्यास करून स्वीकारलं पाहिजे. ताणतणावापासून दूर राहण्याचे नैसर्गिक उपाय

● संवाद : बरेचदा केवळ औषधाने आणि बोलण्याने ताण कमी होतो. कारण त्यावरचे उपाय असतो तो म्हणजे आपल्या मनात नक्की काय चालू आहे दुसर्याला स्पष्ट सांगणे. मनात गोष्टी ठेवून त्या साठत जातात आणि त्यामुळे आपल्या मनावरील ताण वाढत जातो. परिणामी मानसिक आजारांना निमंत्रण असतं. त्यामुळे घडलेल्या वेळीच गोष्टीचा सोक्षमोक्ष लावणे हा सर्वात महत्त्वाचा नैसर्गिक उपाय यावर आहे. संवाद हा खरं तर सर्वांसाठी महत्त्वाचा आहे. संवादाशिवाय आयुष्यात काहीही घडू शकत नाही. त्यामुळे संवाद हा खूप महत्वाचा आहे.

● योगा : योगा हा मानसिक आजारावरील नैसर्गिक उपायच आहे. योगामुळे तुमची मानसिक शक्ती वाढते आणि त्यामुळे तुम्हाला मानसिक शांतता अधिक लाभून तुमच्या मनावरील ताण कमी होतो. त्यामुळे हा उपचार अतिशय चांगला आहे. लगेचआराम देणारा आहे. योगा हा बऱ्याच आजारावरील योग्य उपचारआहे. तुम्ही केलेल्या व्यायामामुळे तुमच्या शरीराला आणि मनाला योग्य राखण्यास योगाची मदत होतो.

● ध्यान साधना : ध्यान साधना हा देखील तितकाच महत्त्वाचा उपचार आहे. ध्यान साधनेमुळे तुमचं मनावर चांगलं नियंत्रण रहातं आणि त्यामुळेच मानसिक आजारातून बरे होण्यासाठी नेहमीं यांचा ध्यान साधनेचा आधार घेतला जातो. अगदी तज्ञांनी देखील ध्यान साधना करण्याचे सल्ले दिले आहे. त्यामुळे मानसिक आजाराची लक्षणे जर तुम्हाला जाणवत असतील तर अगदी नैसर्गिक उपचार करून त्याला ध्यान साधना अतिशय महत्त्वाचा उपचार आहे. यासाठी तुम्हाला महाराष्ट्र आणि महाराष्टबाहेरही अनेक विपश्यना केंद्र सापडतील तिथे जाऊन तुम्ही ध्यानसाधना करून आपल्या मनावर योग्य ते उपचार करून घेऊ शकता. महाराष्ट्रातील नाशिक आणि लोणावळा येथे खास यासाठी विपश्यना केंद्र निर्माण करण्यात आली आहे.

● फॉरेस्टबाथिंग : हे वाचून थोडे आश्चर्य वाटेल पण हे खरं आहे. तुम्ही तुमच्या रोजच्या तणावातून बाहेर पडून निसर्गाच्या सानिध्यातचा आनंद घ्या. जंगलातील धबधब्यामध्ये अंघोळ हा देखील एक नैसर्गिक उपाय आहे. त्यामुळे अतिशय हलकं वाटतं, इतकंच नाही तर, अगदी तुमच्या घरांमध्ये बागेमध्ये तुम्ही वेळ घालवलात तर तुम्हाला या आजारातूनबाहेर यायला मदत होईल.

● योग्य आहारविहार : विटामिन्स आणि मिनरल्स डोक्यामध्ये योग्य विचार असतील तर. तुमचं मनही चांगलं राहतं आणि त्यासाठी तुम्हाला शरीराला विटामिन्स आणि मिनरल्स आवश्यकता भासते. त्यामुळे तुम्ही अशा आजारातून बाहेर येण्यासाठी व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स त्यांचा वापर करू शकत.

● दिवसाची सुरुवात स्वतःला सकारात्मक स्वयंसूचना देणे. सर्वप्रथम देवाचे आभार मानावे.

● मी स्वतः आनंदी आहे. निरोगी आहे. अशा सूचना स्वतःला द्याव्यात सकाळी लवकर उठावे.

● छोट्याछोट्या चांगल्या गोष्टीची यादी करावी त्या चांगल्या गोष्टी तुम्हाला सकारात्मक ऊर्जा देतात. आपल्या जीवनातही वाईट गोष्टींची यादी देखील करावी.

● जे अडथळे आहेत त्यांचे संधीत रूपांतर करावे.

अशा प्रकारे मानसिकरित्या सुदृढ होवून ताणतणावापासून दूर राहण्यास मदत होते.

संदर्भ

१. पवार राजेश्वरी, ०७ सप्टें. २०१९, महाराष्ट्रटाइम्स
२. विकीपीडीया, उत.उ.पापचमकपं.वतह
३. कौशल्य विकास डॉ डेहलीवाल प्रा. कामथे
४. संघटनात्मक वर्तणूक– डॉ सुधीर बोधनकर

♦ ♦ ♦

आदर्श व्यक्तिमत्व : विशाखा थेरी

प्रा. डॉ. सारिका विष्णू केदार
सहयोगी प्राध्यापक व पाली विभाग प्रमुख
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव ता. गंगाखेड जि. परभणी



प्रस्तावना:

बुद्ध काळामध्ये अनेक प्रज्ञावान स्त्रिया होऊन गेल्या. कारण भूतकाळात सामान्य माणसावर बौद्ध धम्माचा प्रचंड प्रभाव होता त्यामुळे बुद्धाने स्त्रियांना दिलेल्या प्रतिष्ठेचा जनतेवर निश्चित परिणाम झाला होता. भिक्षू संघामार्फत समाजाच्या सर्व स्तरात बुद्धाचे विचार पोहोचत असत. राजाच्या राजकारणात अथवा परदेश प्रवासात जरी त्यांना स्थान नव्हते तरी स्त्री सन्मानपूर्वक आपले जीवन घालवीत असलेली आपणास दिसते. तिचे स्थान आदराचे व बौद्ध विचारानुसार मित्रत्वाचे आणि सहधर्मचरणीचे होते. प्राण्यांप्रमाणे निव्वळ प्रजोत्पतीचे साधन म्हणून असलेले तिचे गौण स्थान नष्ट झाले. पतीपेक्षा कनिष्ठ असलेली तिची भूमिका आता समानतेची समजली गेली आणि स्त्रियांनी देखील आपल्या चारित्र्य व त्यागाने भारतीय इतिहासात एक अद्वितीय स्थान निर्माण केले आहे. बुद्ध काळातील अशाच एका प्रज्ञावान, शीलवान, धनवान अशा आदर्श व्यक्तिमत्व विशाखाची प्रस्तुत शोधनिबंधातून माहिती अभ्यासणार आहोत.

शोधनिबंधाची उद्दिष्टे :

१.विशाखाची कौटुंबिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
२. विशाखाचे जीवन अभ्यासणे.
३.विशाखाचे बौद्ध धम्मातील कार्य अभ्यासणे.

विषय विवेचन:

पाली साहित्यामध्ये ज्या स्त्रियांची जास्तीत जास्त माहिती उपलब्ध आहे त्यामध्ये विशाखा या महिलेचे स्थान फार मोठे व आदरणीय व श्रेष्ठत्वाचे असल्याचे दिसून येते. मेंडक श्रेष्ठीचा मुलगा धनंजय आणि त्याची पत्नी सुमनदेवी या उभयतांना विशाखा हे कन्यारत्न प्राप्त झाले. अंग देशातील भद्दीय नगरातील हे श्रेष्ठीचे कुटुंब खूप श्रीमंत व आदरणीय समजले जाई. सुमनदेवी ही नगरच्या राज्याची एक सल्लागार होती. एकदा भगवान बुद्ध भद्दीय नगरामध्ये भिक्षू संघासोबत प्रवेश करणार होते. त्यावेळी राजाने विशाखा सोबत पाचशे स्त्रिया आणि पाचशे रथ देऊन बुद्धाचे स्वागत करण्यास पाठविले. नगरीत प्रवेश करीत असतानाच बुद्धाने विशाखाला जो उपदेश केला त्यामुळे ती अंतर्मुख झाली आणि तिने 'स्त्रोतापत्तीफळ' प्राप्त केले. त्यानंतर तिने बुद्धाला आपल्या वाड्यात भोजनाचे आमंत्रण दिले.

वयात आल्यानंतर वयाच्या सोळाव्या वर्षी तिचा श्रावस्तीच्या पुण्यवर्धन श्रेष्ठीशी विवाह झाला. ती पंचगुण संपन्न होती. तिला विवाहात मिळालेले संपूर्ण आंदण व भेटवस्तू तिने नगरातील लोकांना वाटून दिल्या त्यामुळे संपूर्ण नगरवासी तिला आपली कन्या व माता समजू लागले. तिचे सासरे दिगंबर पंथाच्या नग्न साधूंचे उपासक होते. परंतु विशाखा या नग्न साधूंचे दर्शनही घेत नसे. पुढे तिने आपल्या सासऱ्याला देखील बौद्ध

धम्माची दीक्षा दिली. तिला अतिप्रिय असलेला तिचा नातू जेव्हा मरण पावला तेव्हा दुःखातिरेकाने ती ओले वस्त्र व ओल्या केसांनीच बुद्धाला भेटायला गेली. बुद्धांनी तिला उपदेश केला व लोकमाता होण्यास सांगितले. तिने बांधलेल्या व भिक्षु संघाला दान केलेल्या पूर्वारामात भगवान बुद्ध विहार करीत असताना विशाखा जेव्हा भेटायला गेली तेव्हा भगवंतांनी सांगितले आर्य उपोसथ हे सर्वश्रेष्ठ उपोसथ होय. या उपोसथात बुद्ध, धम्म, संघ यावर ध्यान करणे, शिलाचे तंतोतंत पालन करणे, वगैरे गोष्टींचे पालन करावे लागते. दुसऱ्यावर अवलंबून राहणे दुःखकारक आहे असेही त्यांनी सांगितले.

विशाखाने बुद्धा करिता सुवर्णाचे जलपात्र तयार केले होते. श्रामणेर सुमनने त्यात अनुतत्त सरोवरातून बुद्धासाठी पाणी आणले. बुद्धाला जल पात्राप्रमाणेच एक झाडू आणि एक पामपर्णाचा विणलेला पंखा तिने भेट दिला. विशाखा इतकी सुजाण व जाणकार समजण्यात येई की भिक्षू मधील भांडणे सोडविण्याकरिता तिला मध्यस्थ नेमित असत. विशाखाच्या घरी भिक्षूना मुली देखील भोजन वाढीत असत. विशाखाची नात दत्ता तिच्या गैरहजरीत भिक्षुणी संघाची व्यवस्था पाहत असे. तिच्या मृत्यू पश्चात विशाखाला खूप दुःख झाले. एकदा बुद्धाचे प्रवचन ऐकायला गेली असताना विशाखाने आपले दागिने दासीजवळ दिले ते ती विहारातच विसरली व त्या दोघी परत आल्या. पुन्हा विहारात पोहोचल्यावर ते दागिने तेथेच आढळले. ते तिने भिक्षू संघास दान दिले. ते विकून विहार बांधण्यात आला. त्या दागिन्याची किंमत नऊ कोटी एक लाख मोहरा आली.

कुंडधामस्थवीर हे एका स्त्रीला पाठीवर घेऊन फिरत असत. त्या विरुद्ध भिक्षुनी संघाकडे तक्रार केली. हे भांडण विशाखाने मिटविले. कौशाम्बीचे भिक्षू हे नेहमी भांडण करीत असत. यांचे भांडण कसे मिटवावे असा सल्ला विशाखाने भगवंतांना विचारला. दोन्ही पक्षांना भरपूर खाऊ घाल नंतर त्यांचे ऐकून घे असा त्यांनी विशाखाला उपदेश केला. एकदा बुद्ध आणि त्यांच्या भिक्षू संघाला विशाखाने जेवणाचे आमंत्रण दिले. सकाळच्या प्रहरी खूप पाऊस पडला. भिक्षूना दुसरी वस्त्रे नसल्यामुळे नग्न अवस्थेत ते आपली वस्त्रे वाळवीत होते. ही बाब दासी मार्फत विशाखाला कळली. ती काही न बोलता वाट पाहून राहिली. दुसऱ्या तथागताचे भोजन झाल्यानंतर त्यांच्याजवळ बसून विशाखा त्यांना म्हणाली भगवान मला आपल्याकडून आठ वर हवे आहेत. भगवान म्हणाले विशाखा वर कोणते आहेत ते समजल्या वाचून तथागत वर देऊ शकत नाहीत. विशाखा बोलली मी मागणार आहे ते वर उचित आणि निरोपद्रवी असेच आहेत. तथागतांनी अनुज्ञा देतात विशाखा बोलली भगवान आयुष्यभर वर्षा काळात भिक्षूंना चीवरे द्यावे अशी माझी मनीषा आहे. तसेच विहारात दाखल होणारे आणि बाहेर जाणाऱ्या भिक्षूंना व आजारी तसेच त्यांची सुश्रुषा करणाऱ्या भिक्षुंना भोजन द्यावे. आजारी भिक्षूंना औषधी आणि भिक्षू संघाला खीर तसेच भिक्षूनींना स्नानासाठी वस्त्रे पुरवावीत अशी माझी इच्छा आहे. तथागत म्हणाले पण विशाखा तथागता कडून हे अष्ट वर मागण्यात तुला काय हेतू आहे? आणि विशाखा म्हणाली भगवान, मी सेविकेला आज्ञा केली की जा आणि भोजन तयार आहे असे भिक्षु संघाला सांग. माझी सेविका त्याप्रमाणे गेली पण ती विहारात पोहोचली तेव्हा पाऊस पडत असल्यामुळे भिक्षुणी आपापली वस्त्रे उतरून ठेवली असल्याचे तिच्या दृष्टीत्पत्तीस आले तिला असे वाटले की ते भिक्खू नसून पावसात देह भिजून घेणारी कुणी नग्न तपस्वी आहेत.म्हणून ती परतली तिची समजूत घालून पुन्हा मला तिला पाठवणे प्राप्त ठरले.

१. भगवान नग्नता अपवित्र आणि असते त्यामुळेच संघाला अजन्म वर्षावास उपयुक्त अशी वस्त्रे द्यावी अशी मी इच्छा प्रकट केली.

२. माझ्या दुसऱ्या वरा बद्दल सांगायचे म्हणजे दुरून येणारे भिक्खु सरळ मार्ग अपरिचित असल्यामुळे आणि भिक्षा उपलब्ध होईल असे गाव माहीत नसल्यामुळे भिक्षा मिळविताना वाटेत थकून जातात भगवान यामुळेच विहारात येणाऱ्या भिक्षूंची आजन्म भोजनाची व्यवस्था करावी अशी माझी इच्छा आहे.

३. तिसरे म्हणजे बाहेर जाणारा भिक्षु भिक्षा मिळवता मिळवता कदाचित मागे पडेल अथवा जाण्याच्या ठिकाणी उशिरा पोहोचेल साहजिकच मार्ग काढता काढता तो थकून जाईल.

४. चौथे म्हणजे रुग्ण भिक्खूला आवश्यक अन्न मिळाले नाही तर त्याचा आजार वाढेल आणि कदाचित त्याचा अंतही होईल.

५. पाचवे म्हणजे रुग्णाचे सुश्रुषा करणाऱ्या भिक्खूला बाहेर जाऊन भिक्षा मिळवण्यास सवड मिळणार नाही.

६. सहावे म्हणजे रुग्ण भिक्खूला आवश्यक औषध प्राप्त झाली नाही तर त्याचा आजार वाढेल आणि कदाचित त्याचा अंतही होईल.

७. सातवे म्हणजे भगवान आपण खिरीची प्रशंशा केली आहे की तिच्यामुळे बुद्धी तल्लख होते भूक तहान क्षमते निरोगी माणसास ती पौष्टिक आणि रुग्णास पथ्यकारक ठरते म्हणून आजन्म संघास खीर पुरवावी अशी माझी मनीषा आहे.

८. आठवे आणि शेवटचे म्हणजे भगवान अचिरावती नदीत भिक्खुनी गणिका समवेत विवस्त्रावस्थेत तटापसी स्नान करीत असतात गणिता त्यावेळी त्यांना खिजवतात आणि बोलतात तारुण्यात पावित्र्य राखण्यात काय फायदा वृद्धापकाळी पावित्र्य राखा म्हणजे दोन्ही साधेल. भगवान, नग्नात ही स्त्रीच्या बाबतीत अपवित्र, किळसवाणी आणि तिटकारा आणणारी गोष्ट ठरते. माझ्यावर मागण्याचे हे प्रयोजन आहे.

तथागत म्हणाले, पण विशाखा तथागता कडून हे आठ वर मागण्यात तुला स्वतःचा काय लाभ आहे? विशाखा म्हणाली वर्षासाठी ठीक ठिकाणी राहणारे भिक्खू तथागतांना भेटण्यासाठी श्रावस्तीला येतील आणि तथागता कडे आल्यावर ते विचारतील

अमुक अमुक भिक्खू निधन पावला आता त्याला काय गती मिळेल त्यावर जशी त्याची गती असेल त्याप्रमाणे तथागत सांगतील की त्याला मार्गफल प्राप्त झाले आहे किंवा त्याला निर्वाण प्राप्त झाले आहे किंवा त्याला अरहत्व प्राप्त झाले आहे. आणि मग मी त्यांच्यापाशी जाऊन त्यांना विचारीन की प्रस्तुत भिक्खु श्रावस्तीत कधी पूर्वी होता काय? आणि होकार मिळाला तर मला जाणवेल की नक्की वर्षावासासाठी त्याला चिवडरे प्राप्त झाली असतील किंवा बाहेर जाणाऱ्या अथवा आत येणाऱ्या त्या भिक्खूला भोजन मिळाले असेल किंवा त्या रुग्णाला किंवा त्याची सुश्रुषा करण्याला अन्य मिळाले असेल किंवा त्याला आजारपणात औषध आणि खीर सतत मिळाली असेल आणि मग माझ्या मनात प्रसन्नता वाटेल आणि प्रसन्नतेमुळे आनंद प्राप्त होईल आणि आनंदामुळे सर्व देहाला शांती प्राप्त होईल. शांतीच्या प्राप्तीने सुखकर तृप्तीची अनुभूती मिळेल आणि त्या अनुभूतीने माझ्या हृदयात शांती निर्माण होईल. एक प्रकारे माझ्या नैतिक सामर्थ्याचा किंवा सप्त संबोधीचा उपयोग केल्यासारखे होईल भगवान हे आठ वर मागण्यात माझा हा लाभ होणार आहे.. त्यावर तथागत म्हणाले विशाखा हे फार बरे हे फार बरे की हे लाभ ध्यानात घेऊन तू हे आठ वर मागितले जे पात्र आहेत त्यांना दान करणे सुपीक फल देणाऱ्या मातीत सुबीज पेरण्यासारखे आहे उलट जे राग लोभादी मनोविकाराच्या आधीन आहेत त्यांना दान करणे हे खराब भूमीत बीज पेरण्यासारखे आहे. दानाचा स्वीकार करणाऱ्यांचे मनोविकार गुण विकासास कुंठीत करून टाकतात. त्यानंतर बुद्धांनी विषयाचे आभार मानले ते असे म्हणतात सील संपन्न उपासिका श्रद्धायुक्त मनाने आणि निस्वार्थी वृत्तीने जे काही दान देईल ते दान दिव्य दुःखनाशक आणि सुखकारक ठरेल. अपवित्रता आणि कलंक ह्यापासून मुक्त असलेल्या मार्गाने जीवन कंठीत असताना सुखी जीवन तिला प्राप्त होईल. सत्य प्रवृत्तीमुळे तिला सुख मिळेल आणि आपल्या दातृत्वाने तिला आनंद प्राप्त होईल. विषय घेणे पूर्वाराम विहार संघास दान दिला आणि उपासिकांमध्ये व्यवस्थापिका होण्याचा बहुमान तिला लावला. यावरून विशाखा किती दानशूर होती हे आपल्याला दिसून येते.

विशाखाची जी माहिती उपलब्ध आहे त्यावरून ती प्रज्ञा, शील, करूणा, ममता यांची मूर्तीमंत प्रतिमा असल्याची दिसून येते. उपासिकात तिचे स्थान यामुळेच अग्रगण्य आहे. विशाखाच्या चरित्र्यातून निर्विवादपणे दिसून येते की, बौद्ध धम्माने सर्व थरातील, सर्व जातीतील स्त्रियांना समान पातळीवर आणले होते. स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली व त्यांच्या आत्मसन्मान स्वाभिमान आणि स्वावलंबन भाव जागृत केला होता. बौद्ध धम्मात पंचशीलास अत्यंतिक महत्त्व आहे. 'भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथात बाबासाहेब स्पष्ट बजावतात की, शील हे प्रारंभी असते व ते शेवटीही असते. सर्व सद्गुणांची शील हीच जननी आहे. सर्व चांगल्या गुणांचा प्रारंभ शिलापासून होतो म्हणून आपले शील स्वच्छ ठेवा. अशाच प्रकारची शीलवान विशाखा होती म्हणून तिची कीर्ती बुद्धकाळात सर्व दूर पसरली होती. ती शीलवान, धनवान, रूपवान, दयाळू, ज्ञानसंपन्न,दानशूर होती. हा तिचा आदर्श तिला बुद्धाने दिलेला आदर्श आहे. हा आदर्श व्यक्तिमत्व प्राप्त करण्याकरता माणसाने पर स्त्रीबद्दल आपल्या मनात मातृभाव, बहीण भाव व कन्या भाव जागृत केला पाहिजे. विशाखाचा आवाज मधुर होता. कुणाल पक्षासारखा आवाज होता. असा एक प्रसंग आहे विशाखा एकदा मैत्रिणीबरोबर नदीवर आंघोळ करायला गेली होती तेव्हा पाऊस आला तिच्या मैत्रिणी धावत धावत ज्या ठिकाणी काही ब्राह्मण थांबले होते त्या ठिकाणी आल्या आणि थांबल्या. विशाखा मात्र हळूहळू तिच्या नेहमीच्या गतीने चालत आली तिचे वस्त्र पावसाने ओली झाली होती ती भिजली होती. ब्राह्मणांनी निरीक्षण केले आणि ती सुंदर आहे, रूपवान आहे, बलवान आहे पण ती आळशी दिसत आहे असे तिच्या चालण्यावरून असा निष्कर्ष काढला. ती जवळ आल्यावर ब्राह्मणांनी प्रश्न विचारला तेव्हा ती उत्तर देताना अतिशय मधुर आवाजात बोलली तेव्हा तिचा आवाज मधुर आहे असे ब्राह्मणांना समजले. तेव्हा त्याने तिला हळूहळू का आलीस? धावत का आली नाहीस? असा प्रश्न केला. तेव्हा तिने उत्तर देताना अतिशय विचारपूर्वक समजदारपणे योग्य अशा प्रकारचे उत्तर दिले. ते उत्तर देताना म्हणाली काही कारणास्तव मी धावत आली नाही. त्या ब्राह्मणांनी प्रश्न केला असे कोणती कारणं आहेत की तू धावत आली नाहीस? तेव्हा तिने प्रश्नाचे उत्तर देताना सांगितले की चार प्राण्याला धावणे शोभत नाही. एक म्हणजे राजाचा मंगलमय हत्ती त्या हत्तीला धावणे शोभत नाही कारण त्या हत्तीची चाल मदमस्त असते. दुसरे राजाला धावणे शोभत नाही. तिसरे स्त्रीला धावणे शोभत नाही कारण शालिनता हा तिचा अलंकार आहे. आणि चौथे म्हणजे भिक्षूला धावणे शोभत नाही हे चार प्राणी आहेत ज्यांना धावणे शोभत नाही. मी धावत आले नाही कारण मी एक स्त्री आहे स्त्री ही काचेप्रमाणे नाजूक असते या पावसात मी जर पाय घसरून पडली असती तर माझा हात, पाय मोडला असता आणि त्याचे मला दुःख झाले असते, माझ्या आई – वडिलांना दुःख झाले असते माझा विवाह होण्यास अडचण आली असती हे सगळे दुःखमय आहे म्हणून मी धावत आली नाही. तेव्हा तेथील ब्राह्मणांनी विशाखेचे उत्तर ऐकून ते स्तब्ध झाले आणि तेव्हा ती आळशी नाही हे त्यांच्या लक्षात आले. म्हणून ती सर्व गुणसंपन्न अशा प्रकारची त्या काळातील एक आदर्श व्यक्तिमत्व स्त्री होती. यातून तिची प्रचंड प्रज्ञा, प्रगल्भता दिसून येते. ती १२० वर्षेजगली. तिच्या पश्चात तिला दहा मुले आणि दहा मुली झाल्या होत्या. तिच्या परिवारात चार हजार पेक्षा जास्त लोक होते. अशा स्त्रीचा आदर्श आजच्या काळातील समाजाला घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

निष्कर्ष:

१. बुद्ध, धम्म, संघ यावर विशाखाची अत्यंत निष्ठा होती.

२. प्रज्ञावान, शीलवान, धनवान, सौंदर्यवान, दयाळू अशा प्रकारची विशाखा होती.

३. बुद्धाच्या विचाराचा प्रभाव विशाखेवर प्रचंड झालेला असल्यामुळे भिक्षू संघाची सर्व प्रकारची जिम्मेदारी तिने घेतली होती.

४. सर्व प्रकारची भांडणे ती तिच्या प्रज्ञेमुळे, बुद्धिमत्तेमुळे मिटवीत असत त्यामुळे तिची नियुक्ती मध्यस्थी म्हणून केली होती.

५. विशाखा बुद्ध धम्म, संघ याशिवाय ती कोणालाच शरण गेली नाही.

६. तिच्याकडे आदर्श कन्या आदर्श पत्नी आदर्श माता आदर्श स्त्री आदर्श भिक्षुणी म्हणून तिचा बुद्धकाळात नावलौकिक आहे.

७. बुद्धकाळात माता विशाखाला अग्र उपासिका म्हणून बुद्धाने मानलेले आहे.

८. बुद्धकाळात विशाखा अतिशय दानशूर असल्याचे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ:

१. वसंत मून; बुद्धकालीन स्त्री जीवन; सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे; प्रथम आवृत्ती ऑक्टोबर १९८९

२. डॉ. विमलकीर्ती; नारी जातीकी स्वतंत्रता का ऐतिहासिक दस्तावेज थेरीगाथा; सम्यक प्रकाशन, नई दिल्ली; तृतीय संस्करण २००८

३. डॉ. भरत सिंह उपाध्याय; पाली साहित्य का इतिहास; हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग, इलाहाबाद, शक १९३५ सन २०१३ संस्करण सातवा

४. डॉ .भीमराव रामजी आंबेडकर; अनुवाद घनश्याम तळवटकर प्राचार्य म.भि. चिटणीस शां. शं. रेगे; भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म; धम्म सासन विश्व विद्यापीठ; विशेष आवृत्ती १९९७

५. डॉ. भाऊ लोखंडे व प्रा. रत्नमाला लोखंडे; थेरी गाथा; करुणा प्रकाशन,नागपूर; प्रथम आवृत्ती इसवी सन १९८४

♦ ♦ ♦

भारतीय राजकारणात महिला नेतृत्वाचे प्रमाण

प्रा. डॉ. प्रशांत वा. खेडकर
रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर
राज्यशास्त्र विभाग



भारताच्या स्वातंत्र्य लढयामध्ये पुरूषा सांबतच महिलांचा सहभाग राहलेला दिसून येतो. भारताच्या स्वातंत्र्याचा दिवस उजाडण्याकरीता अनेकांनी बलिदान दिले यामध्ये स्त्रियांचा सुध्दा महत्वाचा वाटा राहलेला आहे हे विसरून चालणार नाही. भारताच्या स्वातत्र्यलढयामध्ये अनेक महिलांनी योगदान दिले त्यामध्ये राणी लक्ष्मीबाई यांनी ५ जुन १९५७ ला इंग्रजा विरूध्द क्रांतीची घोषणा केली. बेगम हसरत महल या महिलेने इंग्रजा विरूध्द सेना सांभाळली होती. अरूणा आसफ अली यांनी १९४२ मध्ये भारत छोडो आंदोलनात महत्वपूर्ण योगदान दिले. एनीबेजंट विदेशी महिलेने स्वातंत्र्य संग्रामात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. कस्तूरबा गांधी, कमला नेहरू या सारख्या अनेक महिलांनी स्वदेशी आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला आहे. भारताला स्वातंत्र्य प्राप्त होउन पंच्यात्तर वर्ष पूर्ण होत आहेत. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव साजरा करीत असतांना भारताच्या स्वातंत्र्यामध्ये स्त्रियांना राजकीय प्रतितीनिधीत्व प्राप्त झाले आहे काय जर असेल तर त्याचे प्रमाण किती. भारतीय संविधाना नुसार महिलांना समान मतदानाचा अधिकार प्राप्त झालेला आहे मात्र याच महिलांना समान प्रतीनिधीत्व प्राप्त झाले काय हे जाणने आवश्यक आहे. आज घरोघरी झेंडा हा उपक्रम साजरा करतांना त्या घरातील महिलांना राजकारणामध्ये केवळ मतदाना पूरते मर्यादित ठेउन राजकीय प्रतीनिधीत्वापासून दुर ठेवल्या जात आहे काय, त्याच प्रमाणे जागतीक पातळीवर महिलांचे राजकारणामध्ये कशाप्रकारचे प्रतिनिधित्व आह तसेच महिलांचे राजकारणातील प्रतीनिधीत्व कमी होण्याची काय कारणे आहेत हे शोधुन त्यावर काय उपाय योजन करता येतील याचा शोध घेण्याच्या उद्येशाने प्रकरणाची प्रस्तृती आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारत एकसंध देश होण्याच्या आधी विविध राज्यांमध्ये वाटलेला होता. वेगवेगळे राजे राज्य करीत असत. त्यांच्या काळात महिलांचं स्थान महत्त्वाचं होतं. अभ्यासक मोहिनी कडू यांच्या मते, 'ऋग्वेदातील मंत्रांमध्ये स्त्रियांचं राजकारणातील स्थान दिसतं. वैदिक काळाच्या उत्तरार्धात स्त्रियांच्या शिक्षणाचे दाखले मिळतात.' रामायणात सीतेचं स्थान महत्त्वपूर्ण आहे. महाभारत कुंती, द्रौपदीच्या भोवती फिरतं. सम्राट अशोकाची मुलगी धर्मप्रचारासाठी विदेशात गेलेली दिसते. चंद्रगुप्ताची मुलगी प्रभावती एका भागाची प्रमुख झालेली दिसते. चालुक्य वंशातील राजकुमारी विजय भट्टारिका राजकारणात सक्रिय असलेली दिसते.मुस्लिम राजवटीत रझिया सुलतानची कारकीर्द इतिहासानं नोंदविलेली आहे. चांदबिबी, राणी दुर्गावती, छत्रपती शिवरायांच्या मातोश्री जिजाऊ भोसले, औरंगजेबाच्या दरबारातील एक हिंदू सेनापती म्हणून पुढे आलेली सावित्रीबाई उदाराम ज्यांना औरंगजेबानं रायबागण हा किताब दिला होता.

मोगलांना जेरीस आणणारी छत्रपती राजाराम यांची पत्नी ताराराणी, १८५७ च्या युद्धात ब्रिटिशांना सळो की पळो करणारी झाशीची राणी यासारख्या कर्तबगार महिलांच्या नोंदी इतिहासाच्या पानापानांवर नोंदविलेल्या आहेत. यावरून राजकारणात महिला कुठंही मागे नव्हत्या, असं दिसतं.

मतदानाचा हक्क व महिला

भारतीय राजकारणातील स्त्रीयांची स्थिती पाहण्या आधि जागतीक पातळीवर महिलांची राजकीय क्षेत्रात प्रतिनिधीत्वाची स्थिती काय आहे हे जाणन्याचा प्रयत्न करू. जागतीक पातळीवर राजकीय सहभाचा विचार केल्यास असे दिसून येते की, स्त्रीयांना पुरूषाच्या बरोबरीने मतदानाचा अधिकार मिळावा या करीता १९ व्या शतकात युरोपीय देशात, अमेरीकेत आणि युरोपीयनांची मोठी वस्ती असलेल्या दक्षिण आफ्रिकेसारख्या वसाहतीत चळवळ सुरू झाल्या. फिडलंडमध्ये १९०७ मध्ये नॉर्वेत १९१३ तर डेन्मार्कमध्ये १९१५ मध्ये स्त्रियांना समाज मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. बोल्शेविक क्रांती नंतर १९१७ मध्ये ब्रिटन, जर्मन पोलंड १९१८, ऑस्टिया आणि नेदरलँडमध्ये १९१९ मध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला फ्रान्स मध्ये १९४४, इटलित १९४६ तर ग्रीसमध्ये १९५२ मध्ये स्त्रीयांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. स्विझलँडमध्ये स्त्रीयांना मतदानाचा अधिकार १९७१ मध्ये प्राप्त झाला. दुसद्या महायुध्दानंतर अनेक आशिया आणि आफ्रीका देशांना स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या देशामध्ये स्वातंत्र्य मिळताच स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला त्यामध्ये भारताचा समावेश आहे.

भ्वू प्दकपं इमबंउम क्मउवबतंजपब या पुस्तकात डॉ. शनी यांनी वसाहतवादी सरकारच्या काळात महिलांच्या मतदानाच्या अधिकाराला कसा विरोध करण्यात आला याबद्दल लिहिलं आहे. शनी लिहितात, 'सार्वभौम मताधिकार भारतासाठी योग्य राहणार नाही, असं ब्रिटिश अधिकार्यांचं म्हणणं होतं. ब्रिटिशकालीन भारतात निवडणुका मर्यादित स्वरूपात होत होत्या, ज्यात धार्मिक, सामुदायिक आणि व्यावसायिक बाबींना आधारभूत मानून वर्गीकरण केलेल्या जागांवर उमेदवार उभे केले जात असत. त्यासाठी निवडक लोकांना मतदान करण्याची परवानगी असे.' महिलांच्या अधिकारासाठी लढणार्या मृणालिनी सेन यांनी १९२० मध्ये लिहिलं होतं, 'ब्रिटन सरकारनं तयार केलेले सर्व कायदे महिलांना लागू होत आणि महिलांकडे संपत्ती असेल, तर त्यांना करही भरावे लागतय पण मतदानाचा अधिकार मात्र महिलांना देण्यात आला नव्हता.' १९२१ नंतर मुंबई आणि मद्रास पहिले प्रांत ठरले जिथं महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. नंतर १९२३ ते १९३० च्या दरम्यान इतर सात प्रांतांमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. महिलांचं नाव मतदारयादीत समाविष्ट करण्यासंबंधी वेगवेगळ्या प्रातांनी वेगळेवेगळे नियम बनवले. मद्रासमध्ये जर कुणी महिला पेन्शन घेणारी विधवा असेल, एखाद्या अधिकार्याची पत्नी अथवा आई असेल, तिचा पती कर भरत असेल अथवा संपत्तीचे मालक असतील, तर अशा महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला.

'भारत स्वतंत्र झाला. नोव्हेंबर १९४७ मध्ये मतदार याद्या तयार करण्याचं काम सुरू झालं. १९५० मध्ये भारताला स्वतरूची राज्यघटना मिळाली, तोपर्यंत सर्वांना मतदानाचा अधिकार आणि निवडणुकीतून लोकशाहीचा विचार पक्का झाला होता,' असं शनी यांनी लिहिलं आहे. १९४८ मध्ये जेव्हा मतदारयादीचा मसुदा तयार करण्याची वेळ आली, तेव्हा त्या वेळी अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं. महिलांची नावं लिहिताना अडचणी येत होत्या. अनेक महिलांनी स्वतरूचं नाव सांगण्यास नकार दिला. स्वतरूच्या नावाऐवजी त्यांनी कुणाची तरी पत्नी, आई, मुलगी अथवा विधवा असं सांगितलं. ती परिस्थिती ते आजची परिस्थिती, यात खूप बदल झालेला आहे. आज महिला पुरुषांच्या बरोबरीनं मतदानाचा हक्क बजावत आहेत. त्यांना अद्याप योग्य प्रतिनिधित्व प्राप्त झालेलं नाही.

जागतीक क्रमवारीत भारत

जगातील १९० देशांमधील राजकीय क्षेत्रात स्त्री प्रतिनिधित्वाचे सर्वेक्षण अहवाला नुसार देशातील कायदेमंडळातील कनीष्ठ व वरीष्ठ सभागृहामध्ये सब.त्री प्रतिनिधीचे प्रमाण हे अशा प्रकारे दिसुन येते. १९० देशाच्या क्रमवारी मध्ये स्त्री प्रतीनिधीत्वामध्ये रवांडा देशाचा पहिला व क्युबा देशाचा दुसरा क्रमाक दिसुन येतो. सयुक्त राज्य अमेरीकेचा ७७ वा क्रमाक दिसून येतो. रशीया सारख्या विकसीत देशाचा १३० वा क्रमांक आहे. तर या क्रमवारीमध्ये भारताचा १४९ वा क्रमांक लागतो. एकुण १९० देशाच्या यादी मध्ये कनीष्ठ सभागृहातील स्त्री प्रतीनीधीमध्ये म्हणजेच भारताच्या लोकसभेमध्ये एकुण ५२४ पैकी ६६ स्त्रीया प्रतीनिधी त्याचे प्रमाण १२ण्६: एवढे आहे. तर वरीष्ठ सभागृहामध्ये एकुण २४४ पैकी २८ राज्यसभेच्या सभासद बनल्या त्याचे प्रमाण ११ण्५: एवढे असल्याचे दिसून येते.

भारतातील लोकसभेमध्ये स्त्रीयांचे प्रतिनिधीत्व.

१९५७	४९४	४५	२७	३	५ण४७
१९६२	४९४	६६	३४	३ण७	६ण८८
१९६७	५२३	६७	३१	३	५ण९
१९७१	५२१	८६	२२	३ण३	४ण२२
१९७७	५४४	७०	१९	३	३ण४९
१९८०	५४४	१४३	२८	३ण२	५ण१५
१९८४	५४४	१७१	४४	३ण१	८ण०९
१९८९	५२९	१९८	२८	३ण३	५ण२९
१९९१	५०९	३३०	३६	३ण९	७ण०७
१९९६	५४१	५९९	४०	४ण३	७ण३९
१९९८	५४५	२७४	४४	५ण९	८ण०७

१९९९	५४३	२८४	४८	६०२	८०८४
२००४	५४३	३५५	४५	६०६	८०२९
२००९	५४३	५५६	५९	६०९	१००८७
२०१४	५४३	६६८	६१	७०६	११०२३
२०१९	५४३	७११	७८	८०८	१४०३६

भारतामध्ये जवळपास स्त्रीयांचे प्रमाण पन्नास टक्के असल्याचे दिसून येते म्हणजेच मतदान करण्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण पन्नास टक्के आहे असे असतांना प्रतीधित्वामध्ये स्त्रीयांचे प्रमाण हे अतिशय कमी असल्याचे दिसुन येते. जागतीक क्रमवारीमध्ये प्रत्तेक स्त्रियांचे प्रतिनिधीचे प्रमाण हे कमी असल्याचे दिसुन येते मात्र जगातल्या क्रमवारीचा विचार केल असता त्यामध्ये भारताचा १४९ वा क्रमांक लागतो भरतामध्ये स्वतंत्र भारताच्या लोकसभेची पहिली निवडणूक १९५२ ची झाली त्यामध्ये २२ स्त्रीया निवडून आल्या होत्या. त्यानंतर पाच वर्षानी १९५७ मध्ये २२ स्त्रीया निवडून आल्या म्हणजेच या पाच वर्षामध्ये स्त्री अमेदवरांची संख्या ही जैसे थे राहिली आहे १९६२ च्या लोकसभेमध्ये स्त्री उमेदवाराची संख्या वाढून ३१ एवढी झाली. पण चौथ्या १९६७ व पाचव्या १९७१ आणि सहाव्या १९७६ च्या लाकसभेमध्ये स्त्री प्रतिनिधीची संख्या घसरत जाउन अनुक्रमे २९, २८, १९ अशी झाली असल्याचे दिसुन येते. त्यामध्ये आर्श्चर्याची गोष्ट ही की १९६८ ते ७० या अकरा वर्षाच्या काळात भारताच्या पंतप्रधानपदावर एक स्त्री इंदिरा गांधी हया विराजमान होत्या. ज्या जगातील दुसद्यया शासन प्रमुख होत्या त्यापुर्वी हा मान फक्त सिलोनच्या जो आज श्रिलंका म्हणून ओळखल्या जातो तेथील सिरिनाओ बंदरनायके यांना मिळाला होता त्यानंतर १९८० मध्ये लोकसभेत २८ स्त्रीया निवडून आल्या होत्या. इंदिरा गांधीच्या हत्ये नंतर १९८४ मध्ये जी निवडणूक झाली त्यामध्ये तब्बल ४३ स्त्रीया लोकसभेत निवडून आल्या हेत्या हा त्यावेळेसचा उच्चांक होता. पण त्यानंतर १९९० मध्ये ४१,१९९६ मध्ये४०,१९९८ मध्ये ४३, १९९९मध्ये ४९ आणि २००४ मध्ये ४५ अशी महिलांची संख्या चाळीसीच्या आसपास स्थीर राहीली. २००९ मध्ये लोकसभेमध्ये महिला प्रतीनिधिनी पहिल्या वेळेस ५० चा आकडा पार केला त्या वर्षी ५९ महिला लोकसभेत निवडून आल्या होत्या त्यानंतर सोळाव्या लोकसभेत तो आकडा ६१ झाला.त्या नंतर २०१९ मध्ये सताराव्या लोकसभेमध्ये एकुण ७८ महीला निवडून आल्या. म्हणजेच १९५२ पासून तर आजपर्यत लोकसभेमध्ये स्त्रियांच्या प्रतिनीधीची संख्या ही चढउतार करत केवळ २२ वरून ७८ एवढी पोहचलेली दिसून येते. वेळोवेळी ही संख्या वाढावी याकरीता स्त्री आरक्षणाचे प्रस्ताव संसदेत मांडल्या गेले परंतु आजपर्यत ते मंजुर हेउ शकले नाहीत. भारतातील पंचायराज मध्ये महिलांना आरक्षण प्रदान करण्यात आले आहेत मात्र निर्णय निर्धारण प्रक्रीयेमध्ये त्याचा फार उपयोग झालेला दिसून येत नाही.

भारतातील राज्यसभेमध्ये स्त्रीयांचे प्रतिनिधीत्व.

संसदेचे वरीष्ठ सभागृह राज्यसभा या मध्ये स्त्रीयांच्या प्रतिनिधित्वाचे प्रमाणे हे १९५२ पासून तर २०२० पर्यत १२.७ टक्यापेक्षा वाढू शकली नाही. १९५२ मध्ये १५ सब.त्रीय हया राज्यसभेमध्ये प्रतिनीधि होत्या. त्यानतर २०१४ मध्ये हि संख्या वाढून ३१ एवढी झाली. त्यानंतर पुन्हा ही संख्या कमी होउन २०२० मध्ये २५ एवढी झाली असल्याचे दिसून येते. या आकडेवारी वरून राज्यसभेमध्ये सुध्दा स्त्रीयांचे प्रतिनीधित्वाचे प्रमाण अतिशय कमी असल्याचे दिसून येते.

स्त्रीयांचा राजकारणामध्ये सहभाग वाढविण्याचे उपाय–

१. स्वस्थ सामाजिक सरंचना–

स्त्रीयांची राजकारणातील स्थीती खालावण्यामागे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे आपल्याकडील नकारात्मक सामाजिक सरंचना आहे जी स्त्रीयांना त्यांच्या राजकीय अधिकारापासून वंचित ठेवत आहे. वर्तमान स्थितीमध्ये गरज आहे की एक अशी सामाजिक रचना जी समानतेवर आधारीत असेल ज्यामध्ये लींग भेद न होता सहयोगाची भावना निर्माण होईल. प्रत्तेक कुंटूबामध्ये स्त्री पुरूष समानता निर्माण होणे आवश्यक आहे. स्त्रीयांचा राजकारणात सहभाग वाढवीण्याकरीता केवळ कायद्यामध्ये बदल करणे पुरेसे नाही त्या करीता सामाजिक दृष्टिकोण बदलला पाहिजे. समाजामध्ये स्त्रियांचे स्थान हे पुरूषा समान आहे हे समजनारी समाज सरंचना निर्माण करणे गरजेचे आहे.

२. स्त्रीयांमध्ये शैक्षणिक सुधारणा झाली पाहिजे –

स्त्रीयांना राजकारणामध्ये अधिकार प्राप्त होउनही त्या त्याचा उपयोग करतांना दिसत नाही.निर्णय निर्धारण प्रक्रीयेमध्ये स्त्रिया सहभागी होतांना दिसत नाही त्या केवळ नावापुरत्या राजकरणामध्ये पदावर विराजमान झालेल्या दिसून येतात निर्णय मात्र त्यांच्या वतीने पुरूष घेतात. या मागचे सर्वात महत्वपूर्ण कारण म्हणजे स्त्रीयामध्ये असणारा शिक्षणाचा अभाव. या करीता स्त्रीयामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे अनिवार्य आहे.

३. सब.त्रीयांनी आपल्या विचारामध्ये बदल करणे आवश्यक आहे–

भारतीय संविधाना नुसार स्त्रीयांना पूरूषाच्या बरोबरीचे अधिकार प्राप्त झाले असतांना सुध्दा महिलांची स्थिती विचारणीय आहे. आजही पुरातन काळापासून चालत आलेल्या काही जुनाट अनीष्ठ व अन्यायकारक पंरपरेमध्ये स्त्रीया जगत आहेत आणि त्यांचे समर्थन स्त्रियाकडून होतांना दिसते. आणि ज्या स्त्रीयाकडून या अन्यायकारक परंपरेला विरोध होता त्यांचा विरोध बहुसंख्याक स्त्रीयाकडून केला जातो. गरज आहे की स्त्रीया व्दारे या पंरपरेला विरोध करून एक सन्मानाचे जिवन जगतायावे या करीता प्रत्तेक

स्त्रीने वैज्ञानीक दृष्टिकोणातून विचार करून आपल्या वास्तवीक राजकीय अधिकार ओळखण्याची.

४. कौटूबिक सामज्यस्याची आवश्यकता –

स्त्रियांचा राजकारणात सहभाग वाढविण्याकरीता केवळ आरक्षण कायदा करून चालणार नाही त्याकरीता त्यांना कौटूबिक सामज्यस्याची गरज आहे. स्त्रियांवर कौटूबीक जबाबदाद्या एवढया टाकल्या जातात की त्या मुळे त्या राजकीय पदप्राप्त करूण सुध्दा त्याला न्याय देउ शकत नाहीत. जर स्त्रीयांना कौंटूबीक वागणूक योग्य मिळाली नाही तर त्या राजकारणामध्ये सक्रीय सहभाग नोंदू शकत नाही. आजपर्यत ज्या स्त्रिया राजकारणमध्ये यशस्वी झाल्या त्यांच्या मागे त्यांच्या कुटूंबाची महत्वपूर्ण भूमिका आहे. त्या मध्ये भारताच्या पंतप्रधान श्रिमती इंदिरा गांधी, भारताच्या राष्ट्रपती प्रतीभाताई पाटिल यांचा समावेश होतो. एकतर त्या महिला यशस्वी झाल्या ज्यांच्यावर कुंटूबाची काहीच जबाबदारी नव्हती. या करीता गरज आहे कौटूबिक सामज्यस्याची. प्रत्तेक कुटूंबाने स्त्रीच्या पाठिमागे राहुन तिला प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे.

५. राजकीय जागृकता आणि स्त्री संघटनची आवश्यकता –

स्त्रीयांचा राजकीय सहभाग वाढविण्याकरीता राजकीय जागृकता स्त्रियामध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. स्त्रियांना आपले राजकीय अधिकार काय आहेत या बद्यल माहिती असणे गरजेचे आहे.या करीता महिला प्रौढ केंद्र स्थापन करून शिक्षित महिलांनी त्याचा प्रसार करावा. स्त्रियांना राजकीय अधिकार प्राप्त करण्याकरीता ठराविक काही महिलांनी लढा देउन चालणार नाही त्या करीता गरज आहे स्त्रीयांचे विषाल संघटन तयार करण्याचे जेणे करून त्या आपला राजकीय प्रभाग व दबाव निर्माण करू शकतील. त्याकरीता विशाल संघटन तयार होणे गरजेचे आहे या करीता सब.त्री प्रयत्नाची गरज आहे.

६. स्त्रीयांना राजकारणात आरक्षण प्रदान करणे –

समाजातील अनिष्ठ प्रथा व अन्यायकारक परंपरेने स्त्रियांना मुख्य राजकारणाच्या मुख्य प्रवाहापासून दुर ठेवले आहे. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये ज्या घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दुर ठेवल्या गेले त्यांना घटकांना राजकारणामध्ये व शिक्षणामध्ये आरक्षण प्रदान करून त्यांच्या विकासाकरीता प्रयत्न करण्यात आला. त्याच आधारावर स्त्रियांना राजकीय आरक्षण प्रदान करणे गरजेचे आहे. भारतीय संविधाना नुसार स्त्री पुरूषांना समान राजकीय अधिकार प्रदान करण्यात आले असले तरी राजकारणामध्ये आजपर्यतचे स्त्रीयाचे प्रतीनिधित्व पाहता स्त्रियांचा केवळ मतदारापूरता उपयोग करून त्यांना प्रतिनिधित्वाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. राजकारणामध्ये स्त्रियांचे प्रतिनिधित्व वाढावे याकरीता स्त्रियांना केंद्रीय व राज्याच्या कायदेमंडळात तसेच राज्याच्या मंत्रीमंडळात ५० टक्के आरक्षण प्रदान करणे गरजेचे आहें. भारतामध्ये पंचायत राज मध्ये स्त्रियांना ५० टक्के राजकीय आरक्षण प्राप्त झाले त्याचा परीणाम म्हणून आज अनेक स्त्रिया निर्णय निर्धारण प्रक्रीयेत सहभागी होत आहेत मात्र पचायतराजच्या अधिकाराला मर्यादा असल्यामुळे त्याचा परीणाम स्त्रियांच्या अधिकारावर हेत असल्याचे दिसून येते.

भारतीय राजकारणात स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्याकरीता गरज आहे या सर्व घटकाच्या अंमलबजावणीची त्या करीता राजकीय ईच्छाशक्ती व सामाजिक दृष्टिकोण बदलने गरजेचे आहे.

संदर्भ सूची –

डॉ. निशांत सिह, महिला राजनीती और आरक्षण, ओमेगा पब्लीकेशन्स दिल्ली.

कमलेश कुमार गुप्ता, भारतीय महिलाए शोषण, उत्पीडन एंव अधिकार, प्रकाष्न बुक एनक्लेव जयपूर.

देशमुख निलिमा, महिला जनप्रतिनिधिचे सबलीकारण, नागपूर प्रकाशन.

भारतीय निवडणनूक आयोग ची रिर्पोट, प्रेस सुचना केंद्र आणि प्रसार मंत्रालय व्दारा प्रकाशीत हँडबुक.

♦ ♦ ♦

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण

डॉ. मंगल पांडुरंग खेडेकर
मराठी विभाग प्रमुख,
उत्तमचंद बगडिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
रिसोड जिल्हा वाशिम



प्रस्तावना

आपला भारत देश हा विविधतेने नटलेला देश आहे.भारतात विविध जाती धर्माचे लोक राहतात.सांस्कृतिक भिन्नता असलेले लोक राहतात.भौगोलिक स्थिती पाहता ती देखील भिन्न असल्याचे आपल्याला दिसते.भारत देशामध्ये जाती, धर्म आणि पंथ रितीरिवाज यामध्ये देखील भिन्नता दिसते. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाहीच्या माध्यमातून ही विषमता दूर करण्याचे प्रयत्न झालेत व आजही होत आहेत. राष्ट्रीय एकात्मता वाढीस नेण्याचा प्रयत्न सतत वेगवेगळ्या माध्यमातून होतच आहे .पूर्वी भारत देशामध्ये स्त्रीयांना विविध संकटांना सामोरे जावे लागत होते .परंतु महात्मा ज्योतिबा फ्फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीमुक्तीचे दार उघडले व स्त्रियांच्या विकासाला सुरुवात झाली.पूर्वी भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांना अगदीच खालच्या पातळीवर लेखलं जात होते .स्त्रियांना ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आले होते .शिक्षणापासून दूर ठेवण्यात आले होते .त्यांना धर्म ज्ञान शास्त्र यांच्या अधिकार तर नाहीच परंतु जगण्याच्या अधिकारावर देखील गदा आणल्या गेली होती .पतीचे मृत्यू झाल्यानंतर तिची इच्छा असेल नसेल तरी देखील तिला बळजबरीने सती जावे लागत असे .याविरुद्ध आद्य समाज सुधारक राजाराम मोहन राय यांनी आवाज उठवत महिलांची मुक्तता करण्याकडे पहिले पाऊल उचलले .महात्मा ज्योतिबा फ्फुले यांनी प्रथम मुलींसाठी शाळा उघडली आणि स्त्रीशिक्षणाच्या कार्यास प्रारंभ केला. यातूनच सतीबंदी ,मुरळी बंदी ,अन्याय अत्याचार हुंडाबंदी इत्यादी कायदे अस्तित्वात आले व स्त्रियांच्या दृष्टीने मानव अधिकार निर्माण झाला.आज शिक्षणाचा अधिकार स्त्रियांना बरोबरी मिळत आहे. मोफ्फत शिक्षण, मोफ्फत प्रवास, अभ्यासाची साधने याद्वारे त्यांचे शिक्षणाचे यथायोग्य सोय डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फ्फुले यांच्यामुळे झालेली दिसून येते .

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा महिलाविषयक दृष्टिकोन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री मुक्तीचे पक्के समर्थक होते. त्यांच्यावर गौतम बुद्ध यांच्या शिकवणीचा व महात्मा ज्योतिबा फ्फुले यांच्या विचाराचा प्रभाव होता. बाबासाहेबांच्या मते, कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातील स्त्रीयांची परिस्थिती कशी आहे यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करावे ही त्यांची आग्रही भूमिका होती. त्यांच्या मते, पुरुषांबरोबर स्त्रीयांची प्रगती झाली पाहिजे.

त्यांनी औरंगाबाद येथे(छत्रपती संभाजी नगर येथे)महाविद्यालय सुरू केले असता त्यामध्ये मुलांबरोबरच मुलींना देखील प्रवेश दिला.बाबासाहेब आंबेडकर यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन परिवर्तनवादी होता. त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये स्त्रियांना प्रोत्साहित केले. २७ डिसेंबर १९२७ ला

स्त्रियांच्या संदर्भात अत्यंत शोषित तथा पीडित बनवणारी मनुस्मृतीचे दहन करून त्यांनी महिलांच्या मुक्तीचा मार्ग मोकळा केला. स्त्रियांची स्वतंत्रता स्वाभिमान त्याचबरोबर पुरुषांसारखे समानतेचे अधिकार त्यांनी दिले.महिलांच्या प्रगतीला खूप महत्त्व दिले. नागपूरमध्ये दलित स्त्रियांची परिषद संपन्न झाली.त्याचे अध्यक्ष अमरावतीच्या सुलोचनाबाई डोंगरे होत्या.त्यावेळेस आंबेडकर यांनी स्त्रियांना संबोधित करताना म्हणाले, स्त्रियांना आपले कर्तव्याचे महत्त्व समजण्यासाठी काम केलं पाहिजे आणि आपलं कर्तव्य अधिकार समजून घेतले पाहिजे.१६ जुन १९३६ ला मुंबई येथे कामठीपुरा दामोदर हॉलमध्ये त्यांनी देवदासी वाघ्या मुरळी जोगतीन ह्या हिंदूंच्या देवतांना अर्पण केलेल्या महिलांना त्यांनी प्रबोधित केलं.स्वतः समाजात इज्जत कमवायची. चुकीचा व्यवसाय करायचा नाही. आपण गरीब आहोत, गरिबीची भीती बाळगायची नाही, कष्ट करायचे शिकायचे आणि स्वतःच्या पायावर उभे राहून स्वाभिमानी जगायचं.असा संदेश त्यांनी दिला. देव देवतांच्या नावावर स्त्रियांमध्ये देवदासी मुरळी जोगतीन बनून आणि परंपरा पाळायच्या नाहीत. त्याला विरोध करायचा आणि स्वाभिमान आणि शुद्ध चरित्राने आपल्या जीवन जगायचा हा मूलमंत्र त्यांनी दिला. स्त्रीशिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

घरातील महिला शिकली तर संपूर्ण घर पुढे येते थोडक्यात जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उधारी या म्हणीप्रमाणे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या शिक्षणाला महत्त्व दिलेले दिसते. एक स्त्री शिकली तर कुटुंब सुधारते. कुटुंब सुधारले तर समाज सुधारतो आणि समाज सुधारला तर देश सुधारतो असे उदारमतवादी विचार स्त्रियांच्या विषयी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे होते. १९३६ मध्ये त्यांनी मजूर पक्षाची घोषणा केली . त्यामध्ये त्यांनी पुरुषांच्या सोबत स्त्रियांच्या शिक्षणाची घोषणा दिली.महिलांचे शिक्षण अधिकार ठुकराणा?या विचारांचे दहन मनुस्मृतीच्या रूपात त्यांनी केले . स्त्री शिक्षणाचे महत्त्व देताना डॉक्टर आंबेडकर म्हणतात, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि शिक्षण घेतले नाही तर जीवन व्यर्थ आहे. विचार करण्याची, समजण्याची आणि चिंतन करण्याची ताकद माणसाला शिक्षण देत असते आणि म्हणून शिक्षण हे महत्त्वाचे असल्याचे डॉ. आंबेडकर यांनी सांगितले.भारतीय समाजामध्ये स्त्रियांवर खूप सारी बंधन होती आणि त्यातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना स्त्रियांची मुक्ती करायची होती म्हणून त्यांनी राज्यघटनेतून स्त्रियांना अनेक अधिकार मिळवून दिले आणि महिला शक्तिशाली बनविण्यावर भर दिला. स्त्री सक्षमीकरण योजना बनवल्या.वैदिक कालीन सामाजिक व्यवस्थेत स्त्रियांची मृतप्राय अवस्था निर्माण झाली होती आणि त्यातून बाहेर काढण्यासाठी कायदा हाच आधार होता. हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चांगल्या पद्धतीने जाणत होते.स्त्रियांसाठी त्यांनी पुरुष समानतेचे अधिकार उपलब्ध करून दिले आणि त्यासाठी महत्त्वपूर्ण काही गोष्टी त्यांनी केल्या.

१) आधारावर भेदभाव आणि महिलांना अनादरपूर्वक व्यवहारांचा त्याग

२) समान काम समान वेतन ही सुविधा

३) आर्थिक विषमता कमी करणे

४) महिलांना प्रस्तुती काळात रजा

५) राजनीतिक आणि आधारभूत स्तरावर विकास प्रक्रियेत महिलांची भागीदारी

तसं पाहिलं तर या सर्व गोष्टीचे प्रतिबिंब किंवा आधार आपल्या संविधानात असल्याचे दिसून येते .स्वातंत्रता समता न्याय तथा बंधुभाव हे तत्व संविधानात अंतर्भूत आहे .संविधानात स्त्रियांना सामाजिक न्याय व विकास ही संधी दिलेली दिसते .ब्रिटिश शासनाच्या काळामध्ये हिंदू समाजाला समाजव्यवस्थात मनोस्मृती आधार बनून हिंदू कायदा बनवला होता परंतु या कायद्यामध्ये महिला व पुरुषांमध्ये विषमता केली होती. ही विषमता दूर करण्यासाठी समाज सुधारक तथा महिला आंदोलकांनी बरेचसे प्रयत्न कायद्याच्या आधारावर केले. १९३७ मध्ये मध्यवर्ती कायदा मंडळाने विधेयक/ बिल प्रस्तुत केले.परंतु कायदा संमत झाला नाही. त्यानंतर बरीच आंदोलने मोठ्या प्रमाणात चालली आणि त्याचा प्रभाव किंवा परिणाम म्हणून २६ जानेवारी १९५० ला संविधानामध्ये या सगळ्या गोष्टी यशस्वीपणे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पुढाकाराने मिळाल्या

हिंदू कोड बील आणि भारतीय स्त्री

डॉ.बाबासाहेबांनी १९३६ मध्ये हिंदू कोड बिलाची पायाभरणी केली. त्यानंतर पुढील ११ वर्षेत्यांनी या कामासाठी धडपड केली. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांसाठी प्रेरणादायी असे हिंदू कोड बिल तयार केले आणि ते १९४८ मध्ये घटना कमिटीसमोर सादर केले. परंतु पंतप्रधान पंडित नेहरूजींनी हे विधेयक १९५१ पर्यंत संमत करण्यास स्थगिती दिली, या कारणामुळे डॉ. आंबेडकरांनी कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला. भविष्यात हिंदू कोड बिल भारतीय महिलांसाठी संजीवनी ठरू शकते असे मान्य केले. परंतु हिंदू सनातनवाद, अंधश्रद्धा आणि महिलांना गुलामगिरीत ठेवण्याची मानसिकता असलेल्या समाजकंटकांमुळे त्यावर बंदी आली.पण बाबासाहेबांच्या काळात १९५५ पासून हळूहळू त्याची अंमलबजावणी झाली.

२५ डिसेंबर १९५२ रोजी कोल्हापुरात झालेल्या महिला परिषदेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, 'स्त्रियांना संपत्तीचा वारस बनवण्याची तरतूद हिंदू कोड बिलात करण्यात आली आहे. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश करण्यात आला

१. स्त्रियांना घटस्फ्फोटाचा अधिकार

२. पतीच्या कमाईवर हक्क

३. वडिलांच्या उत्पन्नात समान वाटा

४ पत्नी असतानाही पती पुन्हा लग्न करू शकत नाही.

५. महिलांना दत्तक घेण्याचा अधिकार मिळाला पाहिजे.

६. मुलींनाही मुलांप्रमाणे दत्तक घेण्याचा अधिकार मिळायला हवा

७. स्त्रीचा स्वतःचा वारसा हक्क

८. पुनर्विवाह करण्याचा अधिकार.

९. पतीने घटस्फ्फोट घेतल्यास आयुष्यभर पालनपोषणाचा अधिकार

१०. अंतर जातीय विवाह मान्यता दिली

अशाप्रकारे हिंदू संहिता बील स्त्रीसाठी वरदान ठरली. महिलांच्या भविष्यातील उज्ज्वल जीवनाच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या चौकटीत महिलांना पुरुषांच्या बरोबरीचे सर्व अधिकार बहाल केले आहेत.

अमेरिकन महिलांना त्यांचे हक्क मिळवण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला. पण भारतीय महिलांना अनेक अधिकार न मागता सहज मिळाले. आज हिंदू कोड बिलाने दिलेल्या अधिकारांचा महिला सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लाभ घेत आहेत. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मेहनतीचे फ्फळ आहे.

निष्कर्ष

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे भारतीय बंदिस्त गुलामगिरीत जीवन जगणारी स्त्री मुक्त झाली आणि तिची क्षमता ओळखायला लागली

२) हिंदू कोड बिलामुळे भारतीय स्त्रियांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळाले

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या परिश्रमामुळे भारतीय स्त्रियांना स्वाभिमानी जीवन मिळाले

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे परंपरातून आणि बंधनातून भारतीय स्त्रियांना मुक्ती मिळाली

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यातून अस्पृश्यनादेखील प्रगती मिळाली आहे

५) भारतीय स्त्रीचे अधिकार आणि वैचारिक जागृती ही डॉ. आंबेडकरांमुळेच मिळालेली आहे

६) भारतीय संविधानामुळेच भारतीय स्त्रियांना पुरुषप्रधान मानसिकतेतून समता, न्याय, स्वातंत्र्य मिळाले आहे

७) संविधानामुळे भारतीय महिलांना सन्मानपूर्वक वागणूक, आत्मविश्वास आणि नेतृत्व क्षमता विकसित झाली आहे

संदर्भसूची

१) धनंजय कीर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर,पॉपुलर प्रकाशन मुंबई

२) खेरमोडे, चां भा .(सपा.) – डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल , सुगावा प्रकाशन पुणे

३) भारतीय राज्यघटना ,– डॉ. बी . आर . आंबेडकर

♦ ♦ ♦

मानसिक आरोग्याबाबत सामाजिक दृष्टीकोन

कु.संगिता गंगाराम मेश्राम
संशोधक विद्यार्थीनी



मानवाला जसे शारीरिक आजार होतात तसेच मानसिक आजार देखील होतात.परंतु शारीरिक आजार हे दृश्य स्वरुपात असल्यामुळे लवकर लक्षात येऊन त्यावर तात्काल उपाययोजना केली जाते.मात्र मानसिक आजार अदृश्य स्वरुपात असल्यामुळे या आजाराची सुरुवात लक्षात येत नाही.जेव्हा मानसिक आजार तीव्र रूप धारण करतात तेव्हा त्याचे गांभीर्य लक्षात येते. मानसिक अस्वास्थ्य असलेल्या व्यक्तींची लक्षणं लगेच ध्यानात आली नाहीत तर त्या आजाराची तीव्रता अधिक वाढत जाते.मानवाचे संपूर्ण आरोग्य हे व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर अवलंबून असते.

आधुनिक आणि धावत्या युगातील ताण–तणावामुळे होणारे मनोकायिक आजार प्रचलित आहेत हे आजार अपुर्या वैद्यकीय उपायांना दाद न देता बळावू लागल्यानंतर या आजाराची प्रचिती येते. मानसिक आरोग्य हा आपल्या संपूर्ण आरोग्याचा अविभाज्य व महत्वपूर्ण भाग आहे.आपले शारीरिक आरोग्य,आपण किती पोषक घटकयुक्त आहार घेतो तसेच शारीरिक व्यायाम कसे करतो यावर अवलंबून आहे. मानसिक आरोग्य हे आपले आंतरिक कार्य आणि आपण आपल्या जीवनात कसे आहोत याचे वर्णन करते.मानसिक आरोग्य सर्वसाधारणपणे जीवनाच्या विविध क्षेत्रामध्ये जसे की नातेसंबंध,काम,खेळणे आणि बरेच काही चढ –उतार असूनही भरभराट होण्याची स्थिति आहे,हे ज्ञान आहे की,आपण आपल्या समस्यांपासून वेगळे असल्यामुळे आपण त्या समस्या हाताळू शकतो हा ठाम विश्वास असायला हवा.

'मानसिक आरोग्य म्हणजे मानसिक आजाराची अनुपस्थिती होय.'

जीवनात समस्या,आव्हाने आणि संकटाचा अभाव असेल तर मानसिक आरोग्य स्थिर राखणे सोपे जाईल.

'मानसिक आरोग्य म्हणजे जीवनातील चढ–उतरांना आपण कसा प्रतिसाद देतो.'या साध्य मानसिक आरोग्याच्या परिभाषेत आपल्या जीवनासाठी सखोल अर्थ आणि परिणाम दडलेला आहे. यात एखादी व्यक्ति कशी विचार करते,भावना कशी हाताळते,आणि कार्य कसे पूर्णत्वास नेते.या बाबी देखील महत्वपूर्ण आहेत.

मानसिक आरोग्य हे शारीरिक आरोग्या इतकेच महत्वाचे आहे. 'विचार,भावना आणि वर्तन हे जेव्हा समभुज असतात.तेव्हा त्याला मानसिक आरोग्य म्हणायचं.जीवनात खेचाखेच चालू असली की,त्याला म्हणायचं विसंवाद आणि त्रिकोण फ्फाटला की,त्याला म्हणायचं मानसिक विकार अशा प्रकारे मानसिक विकाराची परिभाषा आपल्याला करता येईल.मनाचा समतोल ढासळला की,आपल्या कृतीवरील नियंत्रण हळूहळू कमी व्हायला लागत.यातूनच सुरुवात मानसिक दुर्बलतेची होते.परंतु ही लक्षणे लवकर निदर्शनास येत

नाहीत.

'विचार,भावना आणि वर्तन यांच्या मार्गात विकास आहे. विचारांच्या मध्ये विकास करून घेणे म्हणजे ज्ञानमार्ग, भावनांचा विकास करणे म्हणजे भक्तिमार्ग आणि वर्तनाचा विकास करणे म्हणजे कर्म मार्ग.'(डॉ.आनंद नाडकर्णी)

मानवाने आपल्या मानसिक आरोग्याला तडे कधी जायला लागले याचा विचार करावा, तसेच आपल्या मनात नकारात्मक भावना येत-जात असतात. परंतु प्रत्येकाने हा विचार करावा की मी नकारात्मक भावनेला महत्त्व देणार नाही अथवा स्थान देणार नाही. या नकारात्मक भावनेला माझ्या मनात कणमात्र देखील जागा देणार नाही. ही भावना माझ्या मनात उत्पन्न व्हायला नको कारण ही भावना मानसिक आरोग्य बिघडण्यास करणीभूत आहे.

मानसिक आरोग्य असंतुलित होण्याचे प्रमुख कारण तुमच्या मनातील नकारात्मक भावना आहे. या नकारात्मक भावनेमुळे आपण आपल्या जीवनातील उद्दिष्टांपासून दूर जातो व आपले वर्तन असंतुलित होऊन नातेसंबंधापासून तुटण्याची शक्यता वाढते. मानसिक आरोग्याबाबत पारंपारिक,अवैज्ञानिक गैरसमज दूर करण्याची नितांत आवश्यकता आहे. अशिक्षित समाजातील मनोविकार विषयक अंधश्रद्धा आपण विचारात घेणार आहोत.पण सुशिक्षितांमधील मानसशास्त्र विषयक अविवेकी आत्मविश्वास मानसिक आरोग्यातील प्रगतीला अडथळे आणू शकतात. जागतिक पातळीवर समाजात शंभरात एक जण तरी कोणत्या ना कोणत्या मानसिक आजाराने बाधित आहे. सुमारे १० ते १२ टक्के माणसं कमी तीव्रतेच्या मानसिक आजारांनी पछाडलेली असतात. महाराष्ट्र राज्यात लोकसंख्येचा जर विचार केला तर सुमारे ८ ते १० लाख मानसिक आजाराने त्रस्त आहेत. म्हणजेच आपल्या राज्यात मानसिक आजार ही समस्या गंभीर रूप धारण करू पाहत आहे. म्हणूनच या गंभीर समस्येवर विविध दृष्टीकोणातून संशोधन होऊन आजच्या धावपळीच्या युगात या समस्येवर उपाययोजना शोधणे काळाची गरज आहे.

मानसिक आरोग्य आणि त्यात समाविष्ट असलेल्या सर्व गोष्टी त्यांच्या स्वत:च्या अधिकारात जीवनाचे महत्वपूर्ण घटक आहेत. मानसिक आरोग्य आणि तंदुरुस्ती ही वैशिष्ट्ये आणि कौशल्ये आहेत. जी आपणसतत विकसित आणि सुधारित करतो.कारण आपण गोंधळलेले आणि दर्जेदार जीवन जगतो.

वेब्स्टर यांच्या मते, 'मानसिक आरोग्य म्हणजे मनाची नैसर्गिक रित्या झालेली निकोप,सुदृढ वाढ व विकास होय.'

मानसिक स्वस्थता,ज्यामधे एखाद्या व्यक्तिला स्वत:च्याक्षमतेचा अनुभव येतो. ती व्यक्ति जीवनातले सर्वसामान्य तणाव सांभाळून समजाच्या विकासात हातभार लावू शकते. मानसिक आरोग्य हे मुख्यत: आपल्या मेंदूच्या आरोग्याशी आणि भावनिक स्थिरतेशी संबंधित आहे.तसेच मानसिक आरोग्य हा एक व्यापक शब्द असून जो आपल्या एकूण सकारात्मक कार्याच्या सर्व पैलूंचा अभ्यास करतो.

सारांश

मानसिक आरोग्य ही एक जागतिक समस्या झालेली आहे. व्यक्तीच्या, कुटुंबाच्या, समजाच्या तसेच देशाच्या प्रगतीसाठी त्या देशातील नागरिक सुदृढ व निरोगी असणे आवश्यक आहे. कोणत्याही देशाची संपत्ती त्या देशातील पैसा किंवा जमीन-जुमला नसून त्या देशातील सर्वांगिण विकसित जनता आहे. ज्यांचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास होणे गरजेचे आहे. म्हणूनच संशोधक या समस्येवर तोडगा काढण्याचा अविरत प्रयत्न करत आहेत. काही अंशी यश आलेले आहे,परंतु पुष्कळ संशोधन बाकी आहे.

संदर्भग्रंथ सूची :

१. मानसिक आरोग्य – विकिपीडिया
२. मानसिक आरोग्य मानसिक आजाराची व्याख्या
Research Gate https://www.researchgate.net255
३. HindustanTimes Marathi-Mental Health Issue
https://www.marathi Hindustantimes.com.....
४. Mental health First Aid India https://mhfaindia.com
५. मानसिक आरोग्य आणि मानसिक आरोग्याची संकल्पना
Lippincott https://www.journals.comfulltext

♦ ♦ ♦

महिलांचे शारिरीक आरोग्य

कु. अश्विनी सु. हूड
एम.ए. (गृहअर्थशास्त्र) बी.एड., संशोधक विदयार्थी
रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर



प्रस्तावना

प्रत्येकाने आपल्या जीवनात स्वस्थ राहणे किंवा असणे हे खूप गरजेचे आहे त्यासाठी आपले आरोग्य चांगले असने आवश्यक आहे म्हणूनच आरोग्याचे महत्व समजल पाहिजे आपले आरोग्य हा आपल्या जीवनातला सर्वात महत्त्वाचा घटक आहे तशी म्हण ही प्रचलित आहे.

। आरोग्यम् धन संपदा ।
सुदृढ शरीर असावं
मस्त तब्येतीत जगावं
स्वतः जगण्याचा आनंद घ्यावा
आणि इतरांनाही तो दयावा
मनं शांत, समाधानी असावं

वरील ओळी ऐकायला फार छान वाटतान, आणि असचं प्रत्येकाला वाटत असतं पण नुसतं वाटणे वेगळे आणि प्रत्येक्षात ते अवतरणं वेगळे या शोधाच्या वाटेवरचा पहिला टप्पा म्हणजे आरोग्याच अर्थ. जाणून घेणे केवळ आजार नसणं आणि तक्रारी नसणं म्हणजे उत्तप आरोग्य नव्हे.

आरोग्याचा अर्थ

आरोग्य हा आनंदायी असा अनुभव आहे की जो जीवनात आपल्याला सातत्याने शारिरीक आणि मानसिक स्तरावर जानवत असतो. आपली उर्जा, मन आणि शरिर हे सतत समाधानकारक स्थितीची अनुभूती देत असतात आपले आरोग्य चांगले राहिल्याने आपली उपयोगिता आणि शारिरीक क्षमता वाढते. आपण कोणत्याही क्षेतात यशस्वी होवू शकतो आनंद आणि तीव्रता ही आपले स्वभाव गुण बनुन जातात. आरोग्य चांगले असल्यास आपण आनंदी व उत्साही असतो याउलट आरोग्य बिघडले असल्यास आपण निरुत्साही, निराश अशा अवस्थामध्ये. राहतो म्हणजेच शरिराचा आणिआरोग्याचा जवळचा संबंध आपण रोगमुक्त जीवन जगण्याची इच्छा करणे स्वाभाविकच आहे. पण त्यासाठी आपल्याच आरोग्यदायी जीवनशैलीचा अंगीकार करावा लागेल आजच्या धावपळीच्या युगात रोगमुक्त जगण फार अवघड आहे त्यासाठी अनेक बाबीचा वापर टाळने आणि अंगीकारणे आवश्यक आहे सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाश्चात्य संस्कृती आणि त्यांच्या जीवनशैलीचा अट्टाहास सोडायला हवायं.

रोग नसणं म्हणजेच आरोग्य का? निरोगी निरामय अशी विषेशन उत्तम प्रकृतीच्या माणसाला उद्देशून वापरली जातात, तेव्हा आरोग्याची व्याख्या आपण नकारार्थी शब्द वापरून करत असतो. परतू आरोग्य या शब्दाचा अवाका कितीतरी आधिक आहे. या अधिक चिन्हाचा अर्थ कळण्यासाठी आपल्याला आरोग्य समजावून काय ? हे समजावून घेणे आवश्यक आहे.शारीरिक सक्षमता म्हणजे काय या शरीराला कोणत्याही जुनाट व्याधी, विकार नसणं हे तर त्यात गृहीतच आहे. याखेरिज

त्यांना रोग म्हणता येणार नाही. पण तरीही त्रासदायक अशा बारिक – बारिक तक्रारीचाही इथे पूर्ण अभाव असायला हवा. उन्हान गेले की डोके दुखी, आईसक्रीम खाल्ली की घसा खराब वैगरे सतत कंटाळा, थकवा, अशक्तपणा, निरुत्साह ही असी चांगल्या आरोग्याची लक्षणे नव्हे.

आरोग्याची व्याख्या : जागतिक आरोग्य संघटना यांच्या मते 'शारिरीक मानासिक, सामाजिक, लैंगिक पातळीवरील सक्षमता आणि आनंदी वृत्ती म्हणजे शरिरीक आरोग्य होय.'

महिलांच्या शारिरीक आरोग्याची उदिष्टये

१) महिलांच्या शारिरीक आरोग्याचे अध्ययन करणे

२) महिलांचे हिमोग्लोबीनचे प्रमाण तपासणे

३) महिलांच्या शारिरीक आरोग्याच्या दृतिकोणातून आहार सुचवणे

महिलांच्या शारिरीक क्षमता वाढविण्याचे पाच महत्वपुर्ण पैलू खालील प्रमाणे,

१) स्नायूमधील ताकद :

आजच्या काळात महिला आणि पुरुष यांच्यामधील हीच कामे महिलांची आणि हीच कामे पुरुषाशी असे म्हनता येणार नाही बरेचदा शारिरीक क्षमता असेल नसेल तरीही काही कामे करावीच लागतात उदा. फर्निचर हलवणे जड बॅग उचलणे, गैस सिंलेडर हलवणे वैगरे अशी कामे पण बरेचदा करतो खरं! पण कुठे कमरेत नाही तर खादयात लचक भरली म्हणून विव्हळत बसतो. याच कारण आपले स्नायु अशी कामे करायला असमर्थ असतात. त्यांची ताकद कमी असते ही ताकद वाढविण्यासाठी दररोज व्यायाम आणि योग करणे फार गरजेचे आहे.

२) लवचिकता :

नुसतं स्नायु पुष्ट असून आणि ताकदवान असून चालत नाही तर शरिराच्या सर्व हालचाली सांध्याच्या लवचिक तेवर अवलंबून असतात. सांध्याचे घटक असणारी हाड त्यांना जोडणारे आस्थिबंध (लिगमेट्) स्नायुबंध सांध्याची मर्यादा जपणारी कॅप्सुल हे सारचं निरोगी असावं लागत शरीर लवचिक असलं की हालचालीत चपळता येत सहजता येते अशा व्यक्तीच बसणं, उठणं चालणं काम करणं सार काही डौलदार असत यामूळे कुठल्याही महिलेचे व्यक्तीमत्व आकर्षक दिसतात.

३) चिवटपणा :

कोणतेही एकाच प्रकारच काम दीर्घकाळ सतत त्याच क्षमतेने करत राहणं उदा. दिवसातून आठ–आठ किलो पापड लाटणाऱ्या माहिला अशा कामाच स्वरूप असे असत की तिथे ताकद आणि लवचिकतेपेक्षा, सहनशक्ती, चिवटपणाची गरज असते.

४) एरोबीक फिटनेस :

आपली फुफ्फुस, हृदय आणि रक्तवाहिण्या यांच्यामुळे शरीरातल्या प्रत्येक पेशीला प्रत्येक क्षणाला प्राणवायू आणि पोषक द्रव्याचा पुरवठा होत राहतो. त्यामुळे पेशींचे कार्य सुरळीत चालते आणि पेंशीची दमणूक होत नाही शरीर उत्तम राखण्यासाठी सपाट रस्त्यावरून जलद चालणं हा सर्वात सुरक्षित व्यायामाचा प्रकार आहे.

५) शरीर संररचना

शरीरानील मेद आणि स्नायुचा परस्पर गुणोत्तर– यथायोग्य असणं महत्त्वाच असत स्थूलता ही केवळ सौदर्य आणि व्यक्ती महत्त्वाची बाधा आणते अस नाही तर अशा स्थूलतेच्या पोटी अनेक विकारांची बीजे रोवली जातात शरीर संररचनेचा मापदंड म्हणजे उंची, वजन कमरेचा घेर आणि नितंबनाचा घेर याचं गुणोत्तर आणि त्वचेखालील चरबीच प्रमाण बदलण्यासाठी त्वचेची जाडी मोजणं.

कौंटुबीक आरोग्य :

कोणत्याही कुंटूबाची राहण्याची, जगण्याची एक पद्धत असते. चालीरिती असतात. आपण याला 'कोंटुबीक संस्कृती' म्हणजेच फॅमिली कल्चर म्हणतो. या संस्कृतीचेही अनेक पदर अनेक पैलू आहेत. आपल्या कुटुंबात कोणत्या प्रकारच अन्न शिजवावं? त्यात तेला–तुपाचा, साखरेचा वापर किती करावा? फळ – हिरव्या भाज्या सॅलडसब, पालेभाज्या यांना स्थान किती? बाहेरचे तळणीचे पदार्य, वाढीच्या मुलांना रोज दूध, कडधान्य प्रथिनं मिळाली की नाही वृद्धांना पचतील असेच पदार्य मिळतील या सर्वांचा विचार एक गृहीणी करने मात्र या सर्वात तिच्या आहाराकडे ती लक्ष देत नाही तिची भूमिका या खांदय संस्कृतीत फारच महत्त्वाची असते दिवसात एक तरी वेळा जेवन सर्वांनी एकत्र बसून घ्यावं त्या वेळी गप्पागोष्टी व्हाव्यात कारण कुंटूबातील एकमेकाच्या आवडी–निवडी जपणं ही तिची एकटीची जवाबदारी नाही तर कुंटूबातील प्रत्येकानेच एकमेकांच्या आवडीनिवडी जपणं तितकेच महत्वाचे आहे.घरातल्या गृहीणीच सारं लक्ष इतरांना खाऊपिऊ घालण्यात असतं यात स्वतःच्या आहाराची ती हयगय करण ही ब–याच बायकांची अंगवळणी पडलेली सवय आहे. 'गृहीनी गृहमुच्चते' असे जर असेल तर घरच्या गृहीनीने कुपोषित राहुन जमेल का?

प्रत्येक कुटुंबाच्या काही चालीरिती असतात. कुळाचार, व्रत, सणवार करण्याच्या पध्दती असतात. त्यांना कालबाह्य समजल जात, हल्ली या पद्धतीतून माणसं एकमेकांना जास्त जवळ जात होती हे आपण विसरतो. आपली छोटी मुलं आई–बाबाच्या, आजी–आजोबाच्या कुशीत मांडीवर कडेवर खांद्यांवर वाढावायला हवीत, मायेचे, वात्सलतेचे स्पर्श आणि तितकेच हक्काने मारलेले धपाटे या दोन्हींना महत्त्व आहे. कौंदुबीक आरोग्यासाठी आणि त्यातूनच स्त्रियाचे मानसिक आरोग्यही सुधारते.

महिलामधील हिमोग्लोबीनचे प्रमाण :

हिमोग्लोबीन हा रक्तातल्या तांबड्या पेशीत असूणारा मोठा वैशिष्ट्यपूर्ण घटक आहे. त्यात ग्लोबीन नावाचे प्रोटीन असते आणि हीम नावाचे रंग द्रव्य असते या हिम ला प्राणवायू आणि

कार्बन डायऑक्साईड (तसेच कार्बन मोनोकसाईड सुद्धा) या दोन्हीची भारी ओढ असते हिम मुळे रक्तातून हे दोन वायू वाहून नेले जातात आणि शरीरातल्या सर्व पेशींची कार्य सुरळीत पार पाडली जातात. हीमची आणि तांबड्या पेंशीची निर्मिती तांबड्या आस्थिमज्जैत होते आणि प्रत्येक तांबडी पेशी मृत झाल्यावर पूढची विल्हेवाट स्लूप्लिन (पाणथरी) नावाच्या अवयवात लावली जाते. हीमच्या निर्मिती साठी मुख्यतः लोह, फोलीक ॲसिड, बी-१२, जीवनसत्व, पॅरिडॉ- क्सीन, कोबाल्ट वैगरे सुक्ष्य द्रव्य यावरून आपल्या लक्षात येईल की ॲनिमिया व्हायला. हिमोग्लोबीनची निर्मिती कमी पडते.आपल्या, शरीरात हिमोग्लोबीनचे प्रमाण किती असायला हवे हे खालील सारणीवरून त्यक्षात येईल.

Ages and Genders	Normal Haemoglobin levels (gm/dl)
1) New born	- 17-22
2) One week	- 15-20
3) One month	- 11-15
4) Children	- 11-13
5) Adult males	- 14-18
6) Adult womens	- 12-16
7) Men after middle age	- 12.4 - 14.9
8) Women after middle age	- 11.7 - 13.8

हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढविण्यासाठी रोजच्या आहारामध्ये पालेभाज्या त्यातही विशिष्ट पालेभाज्जाचा समावेश अतिशय महत्त्वाचा आहे.

१) पालेभाज्या:-

फ्लावरची पानं, हरमट्याची पानं, माठ, चवळाई, शेपू यांचा जास्त प्रमाणात सामावेश असावा.

२) कडधान्ये :-

सोयाबीन, मस्की, फुटाणे, वाटाणे

३) फळामध्ये

कलिंगड, मनुका, खारिए,

४) धान्यामध्ये

पोहे, बाजरी

५) तेलबिया

हळीव, आणि कारळे

६)मसाल्यांमध्ये

हळद, आमचूर, हिंग

वरील सर्व पदार्थाचा समावेश आहारात असणे गरजेचे आहे. शक्यतो भाज्या लोखंडी कढईमध्ये शिजवाव्यात आंबवलेले पदार्थ, मोड आणणं, या प्रक्रियामुळे शरिरामध्ये लोहाचे शोषण आधिक यशस्वीपणे होते.

आहार आणि शारिरीक आरोग्य :

खरं तर हल्लीच्या स्त्रीया त्यांच्या आई आजीच्या मानाने आरोग्यविषयक जास्त जागरूक आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपलब्धमूळे कोणत्याही समस्येची माहिती त्या निमिषार्धात काढतात पण माहिती म्हणजे ज्ञान नव्हे आणि ज्ञान म्हणजे शहाणपन नव्हे यापैंकी किती ज्ञानकण जानिवेपर्यंत पोहचतात आणि त्यांचा उपयोग करन कितीजणी चांगल्या आरोग्यासाठी झटतात हा महत्त्वात्चा मुद्दा आहे. मुलांच्या संगोपणाच्या बाबतीत शहरातील सुशिक्षित स्त्रिया फार जागरूक आहे. त्याचा आहार, आरोग्य आणि व्यक्तीमत्त विकासासाठी त्या झटतात. त्या नादात स्वतःचा आहार-व्यायामा- कडे दुर्लक्ष करतात, मात्र यातल्या काही महत्वाकांक्षी आया मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अतिरेकी कठोर पावलं उचलतात. अवास्तव अपेक्षा धरतात शिस्तीचा बडगा वापरतात. मुलांच्या दैनदिन उद्योगात नको इतके लक्ष घालून त्याचं जगणं अवघड करून टाकतात आणि अपेक्षाभंग झाला की स्वतःच्या मनो- शारिरीक विकारांना बळी पडतात.

शहरामधल्या नोकरी व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया या पुरुषप्रधान जगात स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी जिवापाड मेहनत करित आहेत. त्यांना वाटतं त्या जे काही करत असतील त्यात त्यांनी सर्वोकृष्ट यश मिळवलच पाहिजे. 'बायका आम्ही ठरवून टाकलयच-टाकलय बायांना नोकरीवर घ्यायचंच नाही'अशी कामाच्या ठिकाणी होणारी स्त्रियांची अवहेलना टाळण्यासाठी स्त्रिया त्याच्या पुरुष सहकाऱ्यांन पेक्षा जास्त कष्ट करतात ऑफिस मध्ये पुरुष वरिष्ठाकडून सहकाऱ्यांकडून मत्सर किंवा तुच्छता आणि घरी अपराधी भावना या कात्रीत सापडलेल्या स्त्रिया स्व:ताला जराही सुट न देता झुंजत आहेत शिक्षणाने जग पाहिल्यामुळे वाढलेल्या संवेदनशीलतेमुळे अनेक प्रकारचे ताणतणाव आणि त्यातून होणारे मनोशारिरीक विकार अशा स्त्रियांना त्रस्त करत आहेत त्यामूळे आजकाल सदोष शैलींशी निगडीत असे अनेक रोग स्त्रियामध्ये वाढत्या प्रमाणात दिसून येत आहेत आणि ते म्हणजे उच्च रक्तदाब, मधुमेह हदयविकार, आम्लपित्त, अल्सर, संधीवात, स्थुलपणा निद्रानाश, मानसिक तणाव, चिंता, नैराश्य - अगदी आत्महत्या सुध्दा,स्त्रीरोगां व्यतिरिक्त कित्येक रोग असे आहेत की त्याचे प्रमाण पुरुषापेक्षा स्त्रियामध्ये जास्त प्रमाणात आहे.मधुमेहाच्या रुग्णात स्त्रीयाचे प्रमाण पुरुषापेक्षा जास्तच आहे ऋतूसमाप्तीनंतर वयात हृदयविकाराचं प्रमाण स्त्रियामध्ये वेगाने वाढत-वाढत जात. स्त्रियाच हृदयविकार पुरुषांच्या हृदयविरापेक्षा वेगळा आणि आणि विशेष असतो 'अजायना पेक्टोरिस' छातीतली आणि उपचाराची खात्री असते, पुरुषाच्या बाबतीत मात्र स्त्रियाना अजायनासारखी कळ न येता किरकोळ कुठेतरी दुखतं याच खर स्वरूप डॉक्टरांना काय पण खुद्द पेंशटलाही ओळखू येत नाही. त्यामूळे ती स्त्री पटकन डॉक्टरांपर्यंत पोहचत नाही दुर्लक्ष करते डॉक्टरांकडे गेली तरी डॉक्टरांना ते दुखनं अपचना मूळे किंवा मानासिक वाटू शकतं ई.सी.जी. (ECG) काढला तरी फारसे बदल नसतात हृदय विकाराच्या रुग्णावर बायपास शस्त्रक्रिया केली जाते तिथेही स्त्री पुरुष भेदाभेद दिसून येतो. ऋतूसमाप्ती, नंतरच्या स्त्रिया आणि त्याच वयाचे पुरुष यांच्यावर बायपास सर्जरी मध्ये सहा पुरुषामागे

एक स्त्री रुग्ण एवढी तफावत पडते बायपास सर्जरीच्या दीर्घकालीन फायदा पुरुषांनाजास्न होतो. मात्र स्त्रियाच्या तुलनेन कारण त्यांच्या रक्त वाहिन्या मुळातच अरुंद असतात.

नवनवीन प्रतिजैविकामूळे, पाण्याच्या शुद्धी- करणामुळे प्रतिबंधक लसीमूळे जंतुजन्य विकारांना आळा बसतो. पण याचा परिणाम माणसाच आयुष्य वाढण्यास जितक जास्त वर्ष जगाव नितकेच वृद्धत्वाचे प्रश्न उभे राहतात ऋतू समाप्ती नंतर आणि वृद्धत्वताचा अपरिहार्य परिणाम म्हणून स्त्रियाच्या हाडातलं कॉल्शिअम झपाट्याने कमी होत आणि ठिसूळपणा वाढतो, उंची कमी होते, पाठीला पोक येन थोड्याश्या आघाताने अस्थिभंग होणं म्हणजे हे प्रकार ऑस्टिओपोरोसिसचे दृश्य परिणाम या गोष्टी होऊ नयेत म्हणून अगदी तरूण वया पासूनच स्त्रियानी कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी युक्त आहार, पुरक गोळ्या आणि वजन उचलणं, वजन ढकलणं अशा पध्दतीने व्यायाम केले पाहिजेत.

घरून कामाच्या ठिकाणी पोहचन आणि घरी परत येणं यामुळे अधिकच निरनिराळ्या समस्या उद्भवतात. शहरातली स्त्री. गृहीणी असो की नोकरदार दुचाकी, वाहनावरून रोजचा कित्येक किलोमीटरचा प्रवास तिला करावाच लागतो. यामूळे तिल्या अनेक प्रकराचे धोके संभवतात. प्रदुषणामूळे ॲलर्जी त्वचा आणि केस खराब होण हवामानाचा अनिष्ट परिणाम कडक ऊन, पावसात भिजणं, थंड वारा लागण यामुळे होणारा त्रास भरगच्च आणि बेशिस्त गर्दीतून वाट काढतांना येणारा रोजचा तान आणि थकवा शरीर स्थिती चुकीची असल्यामूळे होणारी मान दुखी पाठ दुखी वैगरे स्त्री गर्भवती असली तरी ती शेवटपर्यंत वाहन चालवतेच. कारण दुसरा पर्याय नसतो गर्भपात, अकाली प्रसुती दिवस भरण्यापूर्वीच कळा येणं याशिवाय अपघाताची शक्यता आहेच.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात विविध क्षेत्रामध्ये पुरुषाच्या बरोबरीने स्त्रीने स्थान मिळवले आहे. संगणावर दीर्घकाळ काम केल्याने होणारे विकार आता स्त्रीयामध्ये दिसू लागले आहे.वांरवार माउस क्लिकींग, टायपिंग केल्यामुळे मनगटाच्या सांध्याला इजा होणे (कार्बल टनेल सिंड्रोम) डोळे कोरडे पडणं, डोळ्याना तान, डोके दुखी, अपचन, पाठदुखी, चक्कर लैंगिकतेच्या समस्या, मानसिक ताण वैगरे लक्षण सर्व तरुणमुली मध्ये आता आढळत आहेत. त्या गोष्टी टाळण्यासाठी प्रत्येकाने स्वंतंत्र प्रशिक्षण घेतल पाहिजे आपली शरिर स्थिती जाणिवपूर्वक सुधारली पाहिजे.

आज अनेक स्त्रीयानी मूलभूत शास्त्रशाखात उच्चशिक्षण घेतलेले आहे आणि अनेक संशोधनकार्यात गुंतलेल्या आहेत याचा अर्थ दिवसाचे अनेक तास एका ठराविक शरीर स्थितीत उभे राहुन उंच स्टुलावर बसून ओणवं वाळून त्या काम करित असतात काहीजणी रसायन हाताळतात तर काहीजणी जीवजंतू विषयी संशोधन करित आहेत याशिवाय बाहेरिल उकाडा आणि ऑफीसमधील थंडगार हवा याशिवाय बाहेरील विरोधाभासाचाही त्रास होवू शकतो. अशा प्रकारची कोणतीही परिस्थती असेल तर स्त्रियांनी आपल्या कामामध्ये नेमका काय धोका आहे तो टाळण्यासाठी काय कराव तसेच ठराविक कालावधी नंतर नियमित तपासण्या करून घ्याव्यात म्हणजे गरज पडल्यास उपचारही लवकर करता येईल.

आजच्या सुशिक्षीत स्त्रियांना हे नक्की माहिती आहे की आरोग्य तीन खांबी तंबू आहे योग्य आहार व्यायाम आणि ताणतणाव समायोजन ही आरोग्याची त्रिसूत्री आहे आणि तरीदेखील आपण सारे आधिक साखर मीठ मैदा खातच आहे. बेकरीचे पदार्य,फास्ट- फुड, शीत पेय आईस्क्रीम, खूप जास्त कॅलरी आणि स्निग्धता असलेल्या पदार्थाच सेवन प्रचंड प्रमाणात वाढतच आहे कामावरन घरी जाता-जाता असे पदार्थ विकत घेणाऱ्या दर शनिवारी-रविवार किंवा सुटीच्या दिवशी कुटुंवियासोबत बाहेर हॉटेलमध्ये जेवायला जाणाऱ्या स्त्रियाच प्रमाण दिवसे दिवस वाढतच आहे. आपल्याला कळायला हव की आपले सारे पांरपारिक सण, उत्सव पक्वान आहेत.

आहार नियोजनाचे मूलभूत नियम.

१) आहारात विविधता असावी
२) मोजकंच जेवाव
३) स्निग्ध पदार्थ माफक प्रमाणात घ्यावेत
४) संपृक्त मेद एकदम कमी घ्याव
५) वनस्पती तेलापासून केलेले घन पदार्थ पूर्ण वर्ज्य करावेत
६) आहारामध्ये पुरेसा चोथा पाहिजेच
७) साखर, मैदा या पांढऱ्या शत्रूवर बहिष्कार टाकावा.
८) मधपान, मिठाचा वापर बंदच करावा.
९) ताजे, सात्विक शुद्ध अन्न खाः
१०) अवेळी खाणे, जागरण टाळा.

आपले शरीर, आरोग्य सुदृढ शरीर हे ईश्वराचे श्रेष्ठ वरदान आहे, सर्व सुख सोयीचा वस्तु असूनही तब्येतच ठिक नसेल आपल्यासाठी सर्वच निरुपयोगी प्रत्येक गृहीणी घराची आधारशिला आहे. ती प्राचीन काळापासून आई, परिचारिका डॉक्टर, शिक्षिका, बहिण, बायको अश्या अनेक भूमिका बजावते आहे. समाजातील प्रत्येकच स्त्री ही वंदनीय आहे.

संदर्भ सूची

१) डॉ.लिली जोशी- आनंदी शरीर आनंदीमन रोहन प्रकाशन पुणे
२) डॉ.श्रीपाद ढवळे आहारातून आरोग्य कसे मिळवालं विद्याभराती प्रकाशन

♦ ♦ ♦

महिला सक्षमीकरण व श्रम प्रतिष्ठा की भूमिका

डॉ. अनिल खांडेकर
भारतीय महाविद्यालय, अमरावती



प्रस्तावना

२१ वी सदीमें महिलाओंकी स्थिती और सशक्तीकरण सामने आता है तो कई प्रकारकी घटनायें प्राप्त होती है। संपूर्ण विश्वमें किसीनी किसी रुपमें महिला असमानता, अत्याचार एवं शोषणकी शिकार हो रही है। उनकी इन अवस्थामें अब तक कोई परिवर्तन नही आया है। २१ वी सदीमें महिला सक्षमीकरणकी पहला १९८५ में नैरोबीमें हुई थी। उसके पूर्व १९७५ में पूर्वी बर्लिनमें आंतरराष्ट्रीय महिला दिन मनाया गया था। पिछले दशक में यह आंतरराष्ट्रीय सम्मेलन चीनमें मनाया था। इस बिच कई देश अलग – अलग महिलाओंके वर्ष घोषित करते रहे है। २१ वी सदीकी शुरुवात भारतमें सन २००१ वर्ष को महिलासक्षमीकरण का वर्ष घोषित किया था। आज देश की आधी जनता अर्थात स्त्रियोंका एक बहुत विशाल प्रतिशत अपने वैधानिक अधिकारों को जानता ही नही। अधिकारोंका जब ज्ञान ही नही है तो उससे लाभ देने का प्रश्नही नहीं। अधिकारों का जब ज्ञानही नही है तो उससे लाभ लेनेका प्रश्नही उपस्थित नहीं होता। आजभी दूरदराज के गावोंमे स्त्रि की दिनभर छीनकर उसका पती शराब पी आता है और पत्नी को पिटता है। आश्चर्य तो इस बात का है, स्त्रि इन पिटाई को अपना अधिकार समझती है। आज हिन्दू दूल्हन आगमेंजल रही हैं तो मुस्लीम औरत तपेंदिक मे गल रही है। २१ वी सदी की और अग्रेसर भारतकी नारीका यह चित्रण हमारी विभागगाथा पर एक कलंक है। आज महिला जागरण प्रारम्भ हो चुका है। नारीकी पिडा नारीही समझ सकती है। आज आवश्यकता यह है कि, भारतमें जो भी कानून महिलाओंके लिए बने है उन का ज्ञान महिलाओंको दो। महिला सक्षमीकरणका प्राथमिक उद्देश महिलाओंकी सामाजिक एवं आर्थिकदशा को सुधारता है ऐसी स्थितीमें डॉ आंबेडकरके विचार स्त्रियोंके संदर्भ काफी व्यापक थे आज वह स्थिती आ गयी।

भारतीय संस्कृतीमें महिलाओंको लक्ष्मी माना जाता है पर उसके हाथोमें आर्थिक सत्ता बहाल नही करते महिलाओंको सरस्वतीका रुप मानते है। लेकीन अपने बेटीके शिक्षणके उपर खर्चा करना, भविष्य के लिए जैसा गुंतवणूक किये नही लगता उसे हम रणरागीणी बोलते लेकीन उसे खुदके विचार प्रगट करने का स्वातंत्र्य बहाल नही करते डॉ. बाबासाहाब अम्बेडकरजी के विचारोंसे और उनकी दुरदृष्टीसे महिलाओंकी उन्नती करने हेतू उन्होने तत्कालीन महिलाओंके विरोध के बावजुद भारतीय संविधानमें जो प्रावधान रखै उसे विचारोसे प्रेरीत होकर, महिला शिक्षित बनी और शासन और प्रशासन आज महिला सशक्तीकरण करनेके विविध उपाय, उपक्रमका समाज में वापर कर रही है।

इस आशयसे ही महिलाओंके विकास का सशक्तीकरण का वेध लिया गया है। भारत को स्वातंत्र्य प्राप्त होकर ६४ साल पुरे हो रहे है और डॉ. बाबासाहब अम्बेडकरव्दारा लिखित संविधान

लागू होकर ६१ साल पुरे हुए लेकीन आजभी हमारी ८० प्रतिशत महिलाये गुलामीका जीना जी रही है । भारतमें आजभी पती को कहती है की 'मारना है तो पीठ पर मारो, मगर पेट पर मत मारो क्योंकी पेट में तुम्हारा वंश पल रहा है और पीठ यह तुम्हे मारने के लिए ही मैकें के लोगोने दी है' ऐसी स्थिती १०० प्रतिशत स्त्रीयों की नही रही तो भी आजकी ३५ प्रतिशत ग्रामीण अनुजाती जनजाती मागा सजातीयों के स्त्रियों की स्थिती है । संयुक्त राष्ट्रसंघने वूमन यह नयी संघटना स्थापीत की, उसमें 'प्रोग्रेस ऑफ दी वर्ल्ड्स वुमेन' अहवालमें आज भी भारत की ३५ प्रतिशत महिलाये नियमीत रुपसे मार खाती है ढोल, गवार, शुद्र, पशू नारी, सब है ताडनके अधिकारी इस मनुवादी विचारोंका पगडा आजभी हमारे देशकी महिलाओ पर कायम है । यह सबसे बडा चिंतनका विषय है ।

भारतमें जन्मे सन्तो, महापुरुषोने इस परंपरागत विचारोंका खंडन करनेका प्रयास किया । इसमें महात्मा गौतम बुध्द, संत कबीर, महात्मा ज्योतीबा फुले, राजश्री छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती महापुरुष शाहु महाराज ऐसे कई महापुरुष हुये उन्होंने अपने जीवनकी आखरी साँस तक इस मनुवादी व्यवस्थाके विरुध्द संघर्ष किया महात्मा फुलेने अपनी पत्नी क्रांतीमा सावित्रीबाई को शिक्षीत कर समाजके सामने शिक्षीत होने से स्त्रीकेविचार कैसे बदल सकते है और वो कैसी आत्मनिर्भर बनती है, यह उनके चरित्रसे हमे दिखाता है ।

देश को तत्वज्ञान अपनानाही पडेगा । नारीवाद की शुरुवात सन १९२० में समान मताधिकारके मुद्दे को लेकर हुयी थी जो बाद सर्वेतनिक कार्यके क्षेत्र और घरेलू कार्यकलापो, कानुनी संबंधो और सांस्कृतिक प्रथाओंमें लैगिक समानताके एक आमूल परिवर्तनवादी आंदोलन बदल गया। नारीवादकी प्रथम लहर मुख्यत स्त्रि एवं पुरुषकी औपचारिक समानताकी समस्यासे संबंधित थी । व्दितरतहर जिसका १९६० में दशक हुआ था । इसमें नारीवाद आंदोलनने निखेतेवर प्रदर्शित हुये।

विभिन्न समाजोमें लैगिंग संबंधोके भिन्नरुपस्वरुप है । ऐतिहासिक काल, प्रजाविक और जातीय समूहो, सामाजिक वर्ग और पिढीयोंमें फिरभी पुरुषों और स्त्रियोंके बीच अन्तरमे मामलेमें सभी समाजोमें समानता है । यद्दपियह अंतरकी प्रकृतीमें काफी सामाजिक भिन्नता है । लिंगभेदसे संबंधित एक सर्वाधिक समान विशेषताहमे लिंग असमानतामें देखने को मिलती है और यह विशेषता एक सार्वभौमिक विशेषत है । सामाजिक जीवनके कई अंगोमे लिंगभेद की रचना और अभिव्यक्तीकी जाती है । सहसंस्कृती विचारधारा औरतार्किक धारणाओं तकही सिमित नही है । घर में लैगिक श्रमविभाजन से लेकर श्रम बाजार तक राज्यकी व्यवस्थामें काम, हिंसाकी रचना और सामाजिक संगठनमें कई पक्षोंमें संबंधोकी रचना होती है । लगभग १३ मौले प्रसव और बच्चे के समुह होती है ।

महिला सक्षमीकरण –

सामंतवादी, साम्राज्यवादी शक्तिया अर्थशोषण के स्त्री शोषण को भी महत्व देती नजर आती है। इतिहास इन बातो का गवाह है की नारीओ को हासिल करने के लिए भी युध्द लडे गये है। अक्सर युध्द जितकर नारीओ को हासिल किया गया है। सामंत वादी युग तो सुरा और सुंदरी से भरा हुआ नजर आता है। स्त्रि के बाह्य सौदर्य पर रीझनेवाला कवि उसके अन्तरंग को नही समझ सका। वह अबला बनकर ही जीवन अर्जित करती नजर आती है।

नारी को बाल्या अवस्था मे पिता, यौवन मे पति और बुढापे मे बेटे पर निर्भर रहना पडता था जो नारी के साथ सरासरी ज्यादती है। जब की डॉ. आंबेडकर स्त्रि के स्वतत्र अस्तित्व के पक्षधर है। डॉ. बाबासाहब आंबेडकर अपने हिन्दू स्त्रीयों की उन्नती और अवनती इस ग्रंथ लिखते है की हिन्दुओं ने स्त्रियोंके साथ जो अमानवीय तरीक से बर्ताव किया, जिसकी विश्व मे कोई ?मिला नही है। इसी का परिणाम यह हुआ है कि,? हिन्दू कोडबील व्दारा डॉ. आंबेडकर के विचारों की पहल करते हूये नारीयों को समान की जिंदगी बक्शते है। डॉ. आशारानी व्होरा ने अपनी नारी शोषण आईने और आयाम तथा भारतीय नारी अस्मिता और अधिकार मे महिलाओं की दशा व दिशा पर विस्तुत अध्ययन प्रस्तृत किया है। उसके विचार मे जाने का यह अवकाश नही है। हम अनुभव कर रहे है की आज भी बकॉल एंगेल्स परिवार मे पति बुर्जआ होता है और पत्नी सर्वहारा। संभव है जब उन्हे क्रांतिकारी न आंदोलनो मे शामिल किया जाए। महिला मुक्ति संघर्ष के आंदोलनो के विस्तार से चर्चा करने का यह समय नही है। प्रसंग मे नव बौध्द डॉ. भिमराव आंबेडकर के प्रयत्नो का विशेष रुप से उल्लेख करना चाहूंगी। उन्होंने ?दलित महिला और बहू संख्यांक समाज की घृषीत गूलामी और गेर इंसानी ना इंसाफी की जंजीर तोडने मे आधुनिक जग मे प्रवर्तक की भुमिका निभाई। दलित में भी दलित महिला की स्वतंत्र्यता और समता गरिमा और मुक्ति के प्रश्न पर प्रतिगामी ताकतोसे उन्होंने लगातार संघर्ष किया।

निष्कर्ष –

डॉ. आंबेडकर ने शुद्र–अतिशुद्र और दलितत महिलाओ की धर्म शक्ति का हिस्सेदार ही नही बल्कि अधिकारी भी बनाया। विद्यमान व्यवस्था को बदलने के लिए उन्होने एक हाथ मे शिक्षा,संघर्ष और संगठन सुत्र तो दूसरे हाथ मे स्वतंत्रता, समानता और बंधत्व के नयी सिध्दांत का हथियार अवाम के लिए बहाल ?किया। हम कह सकते है कि महिला सशक्तीकरण के सामुहक संघर्ष हम कह सकते है की महिला सशक्तीकरण के सामुहिक संघर्ष और जनआंदोलन को डॉ. आंबेडकर के विचार आज भी प्रेरित कर सकता है। यह तय है कि अपनी स्वतंत्र्यता और मुक्ति के लिए हमे संघर्ष करना होगा। आधुनिक स्त्री विमर्श की एक प्रमुख लेखिका डॉ. प्रभा खेतान मानो बुध्द की आत्मशरह की अवधारणा को आधुनिक संदर्भ मे प्रस्तृत करते हुये सही कहा हैकि हमारा अपना

अंतरंग ही हमारा पहला अस्त्र है वही हमारा बौध्दीकता का प्रस्थान बिन्दू है। महिलासक्षमीकरण के लिये अपने इसी अंतरंग अनुभव और आत्मशरण के मार्ग पर चलकर संगठीत संघर्ष की जरुरत है, स्वयंमुक्ति का मार्ग आत्मसंघर्ष और समवेत संघर्ष का मार्ग है। १ महिला सक्षमीकरण के हेतू से महिला आर्थिक सामाजिक एवंम राजकीय और सांस्कृतिक रुप से स्वयंपूर्व बनना होगा। २ महिला हर बात पर सक्षम है। परंतू वह काम करने की संधी और जिम्मा उसे सौपना जरुरी है। ३ महिलाओं मे शिक्षा देकर जागृती की बहुत आवश्यकता है। ४ स्वतंत्र्यता के बाद भी महिला अंधश्रध्दा, कुपोषन मे डूबी है। उनका स्तर सभी अंगो से बढना होगा। ५ महिला सक्षमीकरण के लिये समाज मन यह महत्वपूर्ण कारण है।

♦ ♦ ♦

संदर्भ ग्रंथ

१. भारतीय नारी– अस्मिता और अधिकार आशारानी व्होरा १९८६.
२. डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा भाष्कर लक्ष्मण १९९८.
३. डॉ. आंबेडकर धनंजय किर २००३.
४. डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण एक अभ्यास शेषराव मोरे.
५. भारतीय इतिहासातील स्त्रीया पाटील पदमजा, जाधव शोभना, फडके प्रकाशन कोल्हापूर.
६. कीर धनंजय –डॉ. आंबेडकर फॅप्युलर प्रकाशन मंबई १०८६.

सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी : महिला सक्षमीकरण के आद्य प्रेरक एक समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ. संदीप महादेवराव हाडोळे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
रामकृष्ण महाविद्यालय दारापूर



प्रस्तावना –

हिंदूस्थान में प्राचीन काल से जातीव्यवस्था और वर्णव्यवस्था परंपरा से चली आ रही थी, ऐसा ठतिहास में लिखा है। ब्राम्हण जाती सबसे श्रेष्ठ और शुद्र जाती का दर्जा सबसे निम्न था। स्त्री चाहे ब्राम्हण की हो या शुद्र की वह निंदनीय, अबला, कम बुध्दीवाली समझी जाती थी। स्त्री पुरूषें के एक उपभोग्य वस्तू से जादा उसको समाज में दर्जा नहीं था। आध्यात्मीक, धार्मिक जगत में स्त्री जाती को काई स्थान नहीं था। समाज का पचास प्रतिशत हिस्सा स्त्री का होते हुए भी, उसको कोई सामाजिक दर्जा नहीं था। हिंदुस्थान में नागरी एवं ग्रामीण समाज में पितृसत्ताक कुटूंब पध्दती स्त्री सक्षमीकरण के लिए बाधा थी।इस अंधियारें में स्त्री खुद अपना मार्ग ढुढ नहीं सकती थी। वह अज्ञान और पिडा में इतनी फसी हुयी थी की, कोई पुरूष ही उसे इस अंधेरे से बाहर निकालने के लिए सामने आए , उस पुरूष की राह देखते देखते इ.स. ११०० की सदीयाँ गुजरी थी। डॉ. आ.ह. साळुंखे ने मरीठी में बताया है की, 'डावपेचांचा अत्यंत विषारी अर्क इ.स. पूर्व दुसद्यया शतकात मनुस्मृतीमध्ये घनीभूत झाला आणि पुढे दोन हजार वर्षेयेथील बहूजनांच्या मनगुटीवर बसला' बिल्कुल ऐसी ही हालत पुरे बहूजन समाज और स्त्री जाती की थी।

स्त्री–शुद्रों के उध्दारक श्री चक्रधर : जीवन और कार्य –

हिंदूस्थान ऐसा देश है, ऐसी कर्मभूमी है, जीसमे बडे बडे महापुरूष यहाँ आकर उन्होंने समाज को अच्छी विचारधारा प्रदान की। समाज में समता, बंधूता और न्याय के लिए संघर्ष किया। अन्याय को रोककर यहॉ न्याय की प्रतिष्ठापना की। इ.स. ११ वीं सदी में गुजरात से महाराष्ट्र जो आए वह अलौकीक पुरूष श्री चक्रधर स्वामी उन महापुरूषों में एक है। श्री चक्रधर स्वामी पच्चीस बरस की उम्र में विदर्भ में रिध्दपुर जिला अमरावती में पहले पधारे। वह अपने गुरू श्री गोविंद प्रभूजी को मानते थे। उनसे मिलने हेतू श्री चक्रधर स्वामी यहॉ आए। इस समाज में उस वक्त स्त्री – शुद्रों की, बहुजनों की पिडा उनसे देखी नहीं गयी। उस वक्त समाज बहुत दुःखी और पिडित था।

इस भूमी पर वैदिक विचारों ने काफी हंगामा मचा दिया था। सत्री एवं शुद्रों पर अगणित अन्याय और अत्याचार हो रहे थे। श्री चक्रधर स्वामी ने पुरे महाराष्ट्र के गावं गावं में जाकर समाज का निरिक्षण किया, पिडितों के आंसू पोछे, स्त्री अबला को सहारा दिया, स्त्री – पुरूष ऐसा भेद उन्होंने नहीं माना। शुद्रों के घर का खना खाया, पानी पिया, सबके साथ समता का व्यवहार किया। वैदिक धर्म के विरोधी अपना तत्वज्ञान समाज को बताया। धर्म में चली आ रही ब्राम्हणों की मक्तेदारी समाप्त की और खुद का नये विचारों पर आधारीत 'महानुभाव पंथ' स्थापन किया। नैसर्गिक, सामाजिक, संकट में गावं की रक्षा की, समाज को आधार दिया, नैतिक मुल्यों के पाठ अपने शिष्य परिवार को किये, श्री चक्रधर

स्वामी ने स्त्री – शुद्र एक साथ बैठकर ईश्वर का नाम स्मरण करणे का अधिकार है, ऐसा बताया।

श्री चक्रधर स्वामी के क्रांतीकारी विचार –

श्री चक्रधर स्वामी ने हिंदु धर्म के अनुसार चली आयी धार्मिक परंपरा का विरोध किया। हिंदुओं के सभी देवताओं का धिक्कार किया। मुर्तिपूजा,यज्ञ और कर्मकांड का विरोध किया और श्रीकृष्ण भक्ती का एकही मार्ग जो, नामस्मरण से मुक्ता की ओर ले जाता है, वह बताया। अंधश्रध्दा का विरोध किया। जाव और ईश्वर यह दो अलग अलग वस्तू है, जीव अज्ञानी है, वह माया के प्रभाव से अपने स्वरूप को जान नहीं पाता, इंद्रिय सुख में लिन रहता है, यह जीव ईश्वर से बिल्कुल अलग है। हिंदु धर्म में जीव और ईरूवर एकही माने जाते है। मरणोपरांत जीव ईश्वर में विलिन हो जाता है, ऐसा माना जाता था। श्री चक्रधर स्वामी ने चातुर्वण की जाती व्यवस्था का विरोध किया। 'एथ जातीकुळ नाही : ऐथ खुंट दावे नाही' कृष्ण भक्ती का सुसंघटीत संप्रदाय महानुभाव पंथ है। ऐसा जाती रहीत समाज श्री चक्रधर स्वामी को अपेक्षीत था।

श्री चक्रधर स्वामी आद्य स्त्री दास्य विमोचक –

पुरूषांचा काही जीव आणि स्त्रीचा काही जिऊलिया? ऐसा सवाल श्री चक्रधर स्वामी ने एक शिष्य के साथ बातचित करते हुए किया था। कोई भी जीव अपने लिंग के आधार पर एक दुसरे से अधिकार के बारें में उँच निच नहीं होता। श्री चक्रधर स्वामी ने अपने महानुभाव संप्रदाय में अधिकतर स्त्रीयों को ही समाविष्ट किया था। हिंदु धर्म स्त्री को शुद्र मानता था। श्री चक्रधर स्वामी ने स्त्रीयों को मोक्ष का अधिकार है ऐसा पहली बार बताया। उस काल में बचपन में शादी ब्याह होने से बहुतसी महिलाएँ कम उम्र में विधवा होती थी और सामाजिक बंधन में फंस जाती थी। श्री चक्रधर स्वामी ने ऐसे बहुतही निराधार पिडीत स्त्रीयों को अपने पंथ में प्रवेश दिया, उनको तत्वज्ञान बताया।

'महदंबा' वह बचपन से ही विधवा थी, वह शिष्य परिवार की विश्वासू स्त्री थी। श्री चक्रधर स्वामी को हर वक्त प्रश्न पुछती थी। ब्रम्हातीरी चर्चक म्हातारी जिज्ञासक, ऐसा श्री चक्रधर स्वामी उसके बारे में कहते थे। महदंबाने श्री चक्रधर स्वामी से प्रेरणा लेकर धवळे लिखे। 'महानुभाव पंथ टिकविण्याचे कर्तूत्व महदाईसेने केले' यह घवळे मराठी भाषा की पहली काव्य रचना है। उससे यह कहा जाता है की, महदंबा मराठी भाषा की आद्य कवियत्री है। श्री चक्रधर स्वामी ने स्त्रीयों को धार्मिक और वैचारिक स्वातंत्र्य दिया। स्त्री हो या पुरूष दोनों को समान रूप से ज्ञान और भक्ती का अधिकार है। दोनोंही ईश्वर से मुक्ती पा सकते है, ऐसा बताया। स्त्री में जो मातृत्व शक्ती है उसका सम्मान होना चाहिए, यह शक्ती जगत की सबसे बडी शक्ती है। इस जगत का अस्तित्व इसी शक्ती के आधार पर मजबूत रूप से खडा है। इस शक्ती का सम्मान हसेना चाहिए, लेकिन सन्यास लेने वाले पुरूष ने स्त्री से दुर रहने आग्रह खुद श्री चक्रधर स्वामी ने किया है। स्त्री को सुरक्षीत रखना चाहिए। स्त्रीयोंने लोंगों की दृष्टी जहाँ पर हो वैसे ही जगह रहना चाहिए, ऐसा स्त्री संन्यासी के बारें में श्री चक्रधर स्वामी ने कहाँ है।

वर्तमान भारतीय स्त्री सक्षमीकरण के आधार : श्री चक्रधर स्वामी –

श्री चक्रधर स्वामी ने ८०० वर्षो पहले ही बताया था की, स्त्री और पुरूष में भेदाभेद नहीं, सभी जीव समान है। इसी तत्वज्ञान का आगे चलकर विस्तार हुआ। महाराष्ट्र का कार्य समाप्त होते ही श्री चक्रधर स्वामी उत्तर भारत की ओर निकले। मध्यप्रदेश, हरियाना, पंजाब में जाकर श्री चक्रधर स्वामी ने स्त्री पुरूष समता का पुरस्कार किया। शुद्र –बहूजन समाज को मुक्ती का मार्ग बताकर, उनको धर्म और विचार व्यक्त करणे का स्वातंत्र्य है, अधिकार है ऐसा बताया। यह श्री चक्रधर स्वामी का कार्य इस देश के लिए महत्वपूर्ण है। इस कार्य को अष्ठि मानकर महाराष्ट्र में वारकरी संतों का अभियान शुरू हुआ। वारकरी संप्रदाय के सामने श्री चक्रधर स्वामी के समतावादी विचार असैर कार्य थे। उन्हों ने स्त्री – पुरूष ऐसा भेद नहीं माना। आगे मुस्लीम सत्ता इस देश पर आयी। १८ वीं सदी महात्मा फुले ने अंग्रजी सत्ता का आधार लेकर स्त्री साक्षरता का अभिनव कार्य शुरू किया। महात्मा फुले संतों के विचार को मानते थे। स्त्री दास्य मुक्ती शिक्षा से होगी यह उन्होंने जाना था। स्त्री जब शिक्षित होगी त बवह विचार करेगी, खुद अन्याय का विरोध करेगी, यह महात्मा फुले मानते थे। महात्मा फुले का स्त्री सक्षमीकरण कार्य इस देश में महत्वपूर्ण है।

वर्तमान काल में स्त्री सक्षमीकरण के भिन्न भिन्न प्रयोग इस देश में शुरू है। पुरूषी मानसीकता भी अब पहले जैसी नही रही। हर घर में स्त्री का आदर और सम्मान किया जाता है। कुछ प्रतिशत समाज में स्त्री पर अन्याय होता दिखाई देता है। पितृसत्ताक कुटूंब पध्दती जो बरसों से चली आ रही यह उसका परिणाम है। प्राचीन काल से लेकर आज स्त्री पुरूष समानता की लढाई महापुरूषों ने ही आगे आकर लढी है। समाज में स्त्री को बराबरी का दर्जा पुरूषों ने ही दिया है। अन्याय का विरोध किया, स्त्री को आत्मसम्मान देकर उनमें जागृती जताई है। इस परिवर्तन की शुरवात महाराष्ट्र में श्री चक्रधर स्वामी ने की है।

निष्कर्ष –

१) ११ वीं सदी तक भारतीय स्त्री अन्याय और अत्याचार से पिडित थी।

२) श्री चक्रधर स्वामी ने वैदिक धर्म विरोध करके, अपनी अलग विचारधारा स्थापीत की, जो समतावादी और जातीभेद रहीत थी।

३) श्री चक्रधर स्वामी ने अपना जीवन सामाजिक समता और स्त्री शुद्रों का उध्दार करनें में व्यतित किया।

४) श्री चक्रधर स्वामी ने पहलीबार स्त्री को धार्मिक और सामाजिक अधिकार बहाल किया, पुरूषों के बराबर स्त्री को समझा।

५) मराठी भाषा में पहली बार कविताएँ लिखने वाली श्री चक्रधर स्वामी की शिष्या महदंबा थी जो श्री चक्रधर स्वामी के परिवार से जुडी थी।

६) महाराष्ट्र, हरियाना और पंजाब के स्त्री मुक्ती अभियान को श्री चक्रधर स्वामी के विचारों का अधिष्ठान है।

७) वर्तमान काल की स्त्री सक्षमीकरण को श्री चक्रधर स्वामी के स्त्री दास्य मुक्ती के विचार और कार्य की पृष्ठभूमी है।

संदर्भ –

१) डॉ. आ. ह. साळुंके – वैदिक धर्मसुत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी, एक्सप्रेस पब्लिकेशन हाउस, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९९८

२) प्रा. पुरूषोत्तम नागपूरे – महानुभाव एक आव्हान, श्री प्रभू प्रकाशन, रिध्दपूर, १९९३

३) डॉ. सुशीला धाबे – क्रांतीदुत, महानुभाव पंथातील स्त्रीया, राज्यस्तरीय चर्चासत्र स्मरणिका

४) डॉ. अण्णासाहेब अडसोड – महानुभाव दर्शन विश्वभारती प्रकाशन, नांदगावं खंडेश

♦ ♦ ♦